OM:6 137

THE UNIVERSITY LIBRARY
The Maharaja Sayajirao University
of Baroda
Call No. B
133
.B4V4
BK-3537

UNIVERSITY LIBRARY
M. S. UNIVERSITY OF BARODA

# विनोबा विचार दर्शन

( हैद्राबाद यात्रेंतील विविध विषयांवरील विवेचनाचें संकलन )

यदुनाथ थत्ते

महाराष्ट्र ग्रंथ भांडार लि.
कोल्हापूर

किंमत ३ रुपये

Gift
Bk-3537

या पुस्तकाच्या या आवृत्तीच्या दर्शनी किंमतीच्या दहा टक्के रक्कम **'ग्राम सेवा मंडळ'** नालवाडी या **विनोबाजींच्या** मार्गदर्शनाखालीं काम करणाऱ्या संस्थेला देण्यांत येणार आहे.

B
133
.B4V4

**प्रथमावृत्ति**
**१९४९**

**प्रति**
**२५००**

**मुखपृष्ठ**
**मधु आठल्ये**

—: **मुद्रक** :—
स. पां. जोशी
श्री समर्थ प्रेस, ठाणें

—: **प्रकाशक** :—
शं. वा. कुलकर्णी
दि महाराष्ट्र ग्रंथ भांडार
गिरगांव, मुंबई नं. ४

# निवेदन.

विनोबाजींच्या हैद्राबाद संस्थानच्या दौऱ्याच्या निमित्तानें १५ मार्चपासून ९ एप्रिल पर्यंत विनोबाजींच्या समवेत साधनेचा प्रतिनिधि म्हणून होतों. त्या प्रवासांतले कांहीं वृत्तान्त साधनेंत येत होते. लोकांना ते आवडले. हे वृत्तान्त पुस्तकाकारांत एकत्र उपलब्ध व्हावेत अशी अनेकांनीं आपली इच्छा व्यक्त केली. ह्या दौऱ्यांत अनेक ठिकाणीं प्रार्थना प्रवचनें झालीं, चर्चा झाल्या, व्यक्तिगत बोलणीं झालीं. हा सारा वृत्तान्त कोठें येणार ? आणि अधिकृत रीतीनें वृत्तान्त द्यावयाचा तर विनोबाजींनीं तो पाहिला पाहिजे. विनोबाजी ह्या कामासाठीं तेवढा वेळ केव्हां काढणार ? परंतु ह्या दौऱ्याच्या अवधींत मी त्यांच्याबरोबर होतों, त्यावेळीं त्यांच्या विविध विषयांवरील विचारांचें जें दर्शन मला झालें तें या ठिकाणीं आहे. महत्त्वाचें वाटल्यानें जे विचार मनांत ठसले ते येथें आहेत, संपूर्ण व्याख्यानेंच येथें नाहींत. यांतील सर्व चर्चांचे वृत्तान्त मी फार काळजीपूर्वक घेण्याचा प्रयत्न केला. या चर्चांमधेंच मला अधिक रस वाटला, त्या अधिक जिव्हाळ्याच्या व जिवंत मला भासल्या. विनोबाजींच्या प्रार्थना प्रवचनांचे शब्दशः वृत्तान्त मिळूं शकतील. परंतु चर्चांचे मिळणार नाहींत आणि या दृष्टीनें पुस्तकाचें हें एक वैशिष्ट्य आहे. ही माझी जवळ जवळ तीन आठवड्यांची वैचारिक प्राप्ति. १५ मार्च ते ९ एप्रिल पर्यंतची ही माझी डायरी आहे. विनोबाजींचे विचार देतांना त्यांना अमान्य होण्यासारखें यांत कांहीं येऊं नये एवढी खबरदारी मी घेतली आहे. अजाणतां कांहीं चुका झाल्या आहेत परंतु विनोबाजींची क्षमा उदार असल्यानें ते मला ती करतीलच.

विनोबाजींच्या सहवासांत इतका काळ घालविण्याची संधि मला साने गुरुजी व साधना साप्ताहिक यामुळें मिळाली. त्यांचे आभार मानण्याचा औपचारिकपणा मी करीत नाहीं. पू. गुरुजींनीं वेळांत वेळ काढून **थोडें प्रास्ताविक** आणि **"जीवन परिचय"** लिहून दिला आहे.

महाराष्ट्रीय जनतेच्या विचाराला या पुस्तकानें चालना मिळाली आणि पटलेलें आचरणांत आणण्याचा प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळाली तर पुस्तक कृतार्थ होईल.

**यदुनाथ थत्ते**

## विनोबाजींचें विचारप्रवर्तक वाङ्मय

* मधुकर.
* जीवन दृष्टि.
* गीता प्रवचनें.
* गीताई.
* स्वराज्यशास्त्र.
* स्वातंत्र्याची प्रतिज्ञा व अर्थ.
* तेरा दिवस.
* संतांचा प्रसाद.
* नामदेवांचीं भजनें.
* एकनाथांचीं भजनें.
* ज्ञानदेवांचीं भजनें.
* स्थितप्रज्ञ दर्शन.
* उपनिषदांचा अभ्यास.
* शांति यात्रा.
* अभंग व्रतें.
* विचार पोथी.
* ईशावास्योपनिषत्.
* सर्व धर्म प्रार्थना.

**ग्राम सेवा मंडळ, नालवाडी; वर्धा (म. प्रां.)**


# थोडें प्रास्ताविक

पू. विनोबाजींच्या परिपूत विचारांना मी प्रस्तावना ती काय लिहायची ? प्रिय मित्र यदुनाथ थत्ते यांना ते हायस्कूल मध्यें येवल्यास विद्यार्थी असल्यापासून मी ओळखतों. ४२ च्या आंदोलनांत ते तुरुंगांतहि गेले. येवल्यास श्री. आपटे गुरुजींच्या सान्निध्यांत ते वाढलेले. ते बी. एस्सी. आहेत. महाराष्ट्रभर सेवादल सैनिकांशीं त्यांच्या जिव्हाळ्याच्या ओळखी. ते सायन्सचे विद्यार्थी असले तरी साहित्याचीहि त्यांना गोडी आहे. हिंदी ते चांगलें बोलतात, हिंदींत लिहूं शकतात. मराठींत त्यानीं छोटीं छोटीं पुस्तकें लिहिलीं आहेत. साधना साप्ताहिक चालवतांना आमची फार तारांबळ उडे. श्री. यदुनाथ यांना आम्ही बोलावलें. ते तत्काळ आले नि त्याच सुमारास पू. विनोबाजींचा हैद्राबादभर दौरा होणार असें कळलें. त्यांचीं सारीं प्रवचनें, संभाषणें टिपून आणून साधनेंत देण्याची इच्छा होती. परंतु मी कसा जाऊं शकणार ? यदुनाथांना म्हटलें "तुम्हीं जा". ते आनन्दानें गेले आणि सारीं प्रवचनें,संभाषणें टिपून पाठवते झाले. साधनेला तो एक अलंकार झाला. पू. विनोबाजींच्या अनुमतीनें तीं सारीं प्रवचनें नि संभाषणें डायरीच्या रूपानें प्रस्तुत पुस्तकांत देण्यांत येत आहेत. भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक, भाषिक विविधतेतील वैभव, शिक्षण, ग्रामोद्योग, वाङ्मय, अनेक विषयांवरचे स्फूर्तिमय जिवंत विचार येथें मिळतील. विनोबाजी स्वतंत्र प्रज्ञेचे महापुरुष. त्या प्रज्ञेला थोर तपश्चर्या नि महान् स्वानुभव यांचें तेज चढलेलें. त्या विचारांची थोरवी मी काय सांगू ! गेलीं पंधरा वर्षें मी बराचसा त्यांच्या विचारांवर पोसला गेलों आहें. त्या विचारानुरूप आचार न झाला तरी मी धडपडत असतों. यदुनाथहि साधक वृत्तीचे आहेत. हीं प्रवचनें नि संभाषणें प्रसिद्ध करून मराठी वाचकांची ते थोर सेवा करीत आहेत असें वाटतें. हें अमोल पुस्तक सर्वत्र जावो हीच इच्छा.

पू. विनोबाजींचा प्रत्यक्ष लिहिण्याकडे फारसा कल नाहीं. त्यांचें बोलणें हेंच त्यांचें लिहिणें. तेंच जर सारें कोणी टिपून घेतलें तर त्यांचे ग्रंथ होतील. धुळे तुरुंगांत विनोबाजींनीं गीतेवर प्रवचनें दिलीं. मी तीं टिपून घेतलीं. गीताप्रवचनें म्हणून तीं आतां प्रसिद्ध आहेत. मी १९३३ मध्यें तुरुंगांतून सुटल्यावर वर्ध्यास गेलों होतों. तेव्हां तेथील एक कार्यकर्ते म्हणाले "तुम्ही तुरुंगांत विनोबाजींचीं प्रवचनें टिपून घेतलीत. आम्ही गेलीं कित्येक वर्षें तसें केलें असतें तर कितीतरी

विचार महाराष्ट्राला वाचायला मिळाले असते". वर्ध्याहून निघणाऱ्या सेवक व सर्वोदय मासिकांत विनोबाजींचीं अलीकडे ठायीं ठायीं जीं प्रवचनें, संभाषणें होतात तीं दिलीं जातात. त्यांच्या संपादकत्वाखालीं सर्वोदय मासिकहि वर्ध्यास निघतें. त्यांतहि ते आतां थोडें फार लिहितात. हीं दोन्ही मासिकें भारताच्या आजच्या परिस्थितींत आपण कसें वागावें हें समजून घेण्यासाठीं सर्व धडपडणाऱ्या लोकांनीं घ्यावीं.

पू. विनोबाजी हे स्वतंत्र प्रज्ञेचे पुरुष आहेत. अभ्यास, तपश्चर्या, सेवा अनुभव, इत्यादींनीं त्यांच्या प्रज्ञेला अपूर्व तेज चढलें आहे. त्यांचें महान् जीवन म्हणजे एक महान् साधना आहे.

पू. विनोबाजींच्या या विचारांना प्रस्तावना लिहिण्याऐवजीं त्यांचें थोडें, चरित्रच आरंभीं दिलें तर बरें असें आम्ही ठरविलें व तदनुसार तें पुढें देण्यांत येत आहे:

**साने गुरुजी**

# जीवन परिचय

विनोबाजींचा जन्म १२ सप्टेंबरला कुलाबा जिल्ह्यांतल्या गागोदें गांवीं झाला. लहानपणींच ब्रह्मचारी राहण्याची त्यांनीं प्रतिज्ञा केली. पुढें ते बडोद्याला शिकायला गेले. त्यांचे वडील तेथें नौकरीला होते. विनोबाजी विद्यार्थिदशेपासून अति बुद्धिमान्. विद्यार्थ्यांचे ते म्होरक्ये असत. त्यांना पायीं चालण्याचा नाद. भर उन्हांतूनहि जायचे. कधीं संध्याकाळीं जायचे. झोपायच्या वेळेस परतायचे. बरोबर दुसरे मित्रहि असायचे. शाळेत हजेरी लावून पुष्कळ वेळां विनोबाजी व त्यांचे मित्र बडोद्याच्या लायब्ररींत जाऊन बसत. एकदां शिवाजी उत्सव होता. विनोबाजी म्हणाले " हा उत्सव दिवाणखान्यांत साजरा करणें पाप. रानांत जाऊं डोंगराच्या अध्यक्षतेखालीं उत्सव साजरा करूं". विनोबाजी व त्यांचे मित्र शाळेला बुट्टी देऊन गेले. दुसऱ्या दिवशीं कोठें गेलां होतां म्हणून वर्गशिक्षकांनीं विचारलें. " शिवाजी उत्सवासाठीं गेलों होतों " मुलें म्हणालीं. " शाळेंत नाहीं का करतां येत " शिक्षकांनीं विचारलें. " नाहीं. स्वतंत्र वातावरणांतच तो करायला हवा " मुलें म्हणालीं. शिक्षकांनीं दंड केला. विद्यार्थ्यांनीं भराभरा खिशांतून तो बाहेर फेकला. आणि एकदां त्यांचा एक मित्र चहा सोडीना. तो संडासांत गेला असतां विनोबांनीं बाहेरून कडी लावली. मित्र म्हणाला " दार उघडा ".विनोबा म्हणाले "चहा सोडतों म्हण नाहींतर बस नरकांत".मित्रानें कबूल केल्यावर कडी निघाली. विनोबाजी घरीं आईला केसरी वगैरे वाचून दाखवीत. गीतेंतले सोपे संस्कृत श्लोक काढून द्यायचे. स्त्रियांना, मुलांना समजेल अशी मराठी गीताई करायचें तेव्हांपासून त्यांच्या मनांत होतें. विनोबाजींनी संशोधक व्हावें, परदेशांत जावें अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. कॉलेजांत यासाठीं फ्रेंच भाषा त्यांना घ्यावी लागली. बिनोबाजींना गणित फार आवडे. तें त्यांचें जणुं दैवत विद्यार्थिदशेंत मिळालें तें झाडून सारें मराठी वाङ्मय त्यांनीं वाचून काढलें. मोरोपंतांच्या हजारों आर्या त्यांना पाठ आहेत. मोरोपंतांची केकावली ते अशी खणखणीत आवाजांत म्हणायचे कीं सारी गल्ली निनादे. दासबोध, ज्ञानेश्वरी, तुकारामाचे अभंग सारें त्यांनीं मुखोद्‌गत जणूं केले आहे. मराठीचे शिक्षक त्यांना ९९ मार्क द्यावयाचे व म्हणायचे १०० कसे द्यायचे? ते पायांत घालीत नसत. उन्हाळ्या-

तरी तसेंच अनवाणी चालत. वाचनहि त्यांचें विपुल. या अनवाणी चालण्यानें आणि वाचण्यानें त्यांचे डोळे बिघडले. घरीं आईला दळायला मदत करीत. गोड खात नसत, गादीवर झोंपत नसत. आई माहेरीं असतांना एकदां वडील परगांवीं जात होते. जातांना त्यांनीं आंबे वगैरे घ्यायला पैसे दिले. विनोबांचे तसेच राहिले. जेवतांना पानांत पडेल तेवढेंच खात. विनोबाजींचे एक मित्र गोपाळराव काळे. सध्या मध्यप्रांताचे ते मंत्री आहेत. विनोबाजी त्यांना गोप्या म्हणून हांक मारायचे. त्यांचें लग्न झालें तरी विनोबा त्यांना रस्त्यांतून मोठ्यानें 'गोप्या' म्हणून हांक मारीत. गोपाळरावांची चुलती रागावून म्हणायची "त्यांचें लग्न झालें तरी त्याला गोप्या काय म्हणतोस ?" परंतु त्यांचा तोच खाक्या. विनोबांना विनोबा हें नांव गांधीजींनीं दिलें. त्यांचे मित्र त्यांना पूर्वी विनायक म्हणत.

१९१४ मध्यें त्यांनीं विद्यार्थि-मंडळ काढलें. ह्या मंडळातर्फे हनुमान् जयंती, शिवजयंती, गणेशोत्सव, दासनवमी, वगैरे उत्सव केले जात. हातांनीं लोकांचें दळण दळून हे विद्यार्थी पैसे मिळवीत आणि त्यांतून त्यांनीं सुंदर ग्रंथालय चालविलें. सोळाशें उत्तम ग्रंथ त्यांत होते. मोलस्वर्थ कँडीचे मराठी कोश त्यांत होते. पुढें साबरमतीच्या सत्याग्रह आश्रमास हें ग्रंथालय देण्यांत आलें.

ह्या विद्यार्थि-मंडळांत विनोबांचीं व्याख्यानें व्हायचीं. त्यांचीं भाषणें म्हणजे ज्वलंत स्फूर्ति असे. आज विनोबाजींच्या वाणींत अपार शांति आहे. परंतु त्या वेळेस प्रखर आग होती. ते त्यावेळेस फार संतापी होते. कोणी विचारलें "केस फार वाढले, नखें किती वाढली" तर विनोबा म्हणायचे "तुम्ही न्हावी का आहांत ?" कोणी ऐटीनें इंग्रजींत बोलूं लागले तर म्हणायचे "आपली आई का मडम होती ?" बडोदें शहरांत खांद्यावर सदरा टाकून ते खुशाल उघडे हिंडायचे.

त्यांचा एक मित्र पेशव्यांच्या घराण्यांतला. एकदां एका साहेबानें त्या मित्राच्या जागेवर तंबू ठोकला. मित्र गेला व म्हणाला "उद्यां येथें तंबू दिसता कामा नये". दुसऱ्या दिवशीं तंबू तेथेंच पाहून त्यानें तो उपटून फेकून दिला. विनोबाजींना येऊन त्यानें ही हकीगत सांगितली. ते म्हणाले "साहेबालाच कां नाहीं फेकलेंस ?"



कॉलेजच्या पहिल्या वर्षाची परीक्षा होती. गणिताची प्रश्नपत्रिका पहिल्यापासून ते सोडवीत जायचे. परंतु त्यावेळेस पहिला प्रश्न होता कठीण. परंतु तोच घेऊन बसले. शेवटीं प्रश्न सुटला. परंतु इतर प्रश्न राहिले. जेमतेम पासापुरते मार्क मिळाले. पुढें इंटरच्या वर्गांत गेले. लोकमान्य सुटले होते. त्यांचें गीतारहस्य प्रसिद्ध झालें. तें त्यांनीं अधाशासारखें वाचलें. त्यांनीं संस्कृतचाहि खूप अभ्यास केला. उपनिषदें, वेद, सारें वाचलें. इंटरच्या वार्षिक परीक्षेसाठीं ते निघाले. परंतु परीक्षेसाठीं मुंबईला न जातां बंगालमध्यें गेले. महायुद्ध चालू होतें. गदर चळवळ चालू होती. परंतु क्रांतिकारकांचा दहशतवाद त्यांना पटला नाहीं. ते काशी क्षेत्रीं येऊन राहिले. तेथें मूर सेंट्रल लायब्ररींत ग्रंथ वाचीत बसत. हिमालयांतहि ते जाऊन आले.

महात्माजींनीं आश्रम सुरू केल्यावर विनोबा आश्रमाला येऊन मिळाले. महात्माजींनीं विनोबा आल्यावर त्यांच्या घरीं पत्र लिहिलें: "तुमचा विनोबा माझ्याजवळ आहे. तो कांहीं बाबतींत माझ्याहि पुढें गेलेला आहे". पुढें आई आजारी पडल्यावर विनोबाजी सेवेला गेले होते. आईवर त्यांची अपार भक्ति. ते एकदां म्हणाले "लोकमान्य टिळक, मगनलाल गांधी व माझी आई यांचे आत्मे माझ्याभोंवतीं आहेत असें वाटतें". आई त्या दुखण्यांत वारली. आईला स्मशानांत नेलें. ते स्मशानांत गेले नाहींत. घरींच ते उपनिषदें, गीता वाचीत राहिले. त्यांचे भाऊ बाळकोबा व शिवाजी दोघेहि पुढें आश्रमांत आले. विनोबाजींचे वडीलहि अत्यंत कडक होते. संगीताचें आणि रंगाचें संशोधन करीत.

महात्माजींच्या आश्रमांतून ते महात्माजींची परवानगी घेऊन वाईला नारायण शास्त्री यांच्याजवळ राहिले व तेथें शांकरभाष्य त्यांनीं वाचलें. त्यावेळीं ते पावसांतहि उघड्यावर झोंपत. त्यानंतर महाराष्ट्रांतील ऐतिहासिक स्थळें पहात गीतेवर प्रवचनें देत ते हिंडले. दोन आण्यांत तेव्हां ते जेवत. आणि ठरलेल्या दिवशीं ते गांधीजींच्याकडे परत आले. पुढें असहकारानंतर जमनालालजींनीं वर्ध्यास आश्रम काढल्यावर गांधीजींनीं त्यांना तिकडे पाठविलें.

वर्ध्याला असतां कांहीं दिवस 'महाराष्ट्र धर्म' साप्ताहिक आणि मासिक त्यांनीं चालविलें. त्यांतल्या निवडक लेखांचें 'मधुकर' हें दिव्य पुस्तक. पुढें खादींत

रमले. नागपूरच्या झेंडा सत्याग्रहांत होते. वायकोमलाहि हरिजनांच्या सत्याग्रहांसाठीं गेले होते. ३२ सालीं ते धुळयाच्या जेलमध्यें होते. तेथें दर रविवारीं त्यांचीं गीतेवर अपूर्व प्रवचनें होत. पुढें फैजपूरला महाराष्ट्रांत पहिली खेड्यांत कॉंग्रेस भरली. विनोबाजी तेथें येऊन राहिले. सुभान नांवाचा एक सत्याग्रही आजारी पडला तर विनोबाजी तीन मैल चिखलांतून त्याच्या घरीं गेले. असे मनाचे ते कोवळे आहेत. पुढें कॉंग्रेस मंत्रिमंडळें प्रांतोप्रांतीं आलीं. वर्धा शिक्षण पद्धति, दारुबंदी वगैरे कार्यक्रम आले विनोबाजी प्रसन्न झाले. परंतु महायुद्ध आलें. महात्माजींनीं वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू करून विनोबाजींना पहिले सत्याग्रही निवडलें. तोंवर विनोबाजी फारसे कोणाला माहीत नव्हते. गांधीजींनीं ' हरिजन ' मध्ये लेख लिहून विनोबाजींचा परिचय करून दिला. विनोबाजींनी त्यावेळेस वडिलांस पत्र लिहून " ही तुमची कृपा " असें कळविलें.

पुढें ' चले जाव ' चा लढा आला. लोकांनीं विनोबाजींना ' संदेश द्या ' म्हटल्यावर " सर्वत्र स्वतंत्र आहोंत असें रामनामाप्रमाणें सांगत फिरा " असें त्यानीं सांगितलें. ह्यावेळीं विनोबाजीना वेलोर जेलमध्यें ठेवण्यांत आलें होतें. तेथें त्यानीं द्राविड भाषांचा अभ्यास केला. त्यांना देशांतल्या बऱ्याच भाषा येतात. कुराणासाठीं अरबीचाहि अभ्यास त्यानीं केला आहे. अबुल कलाम आझादांना त्यांनीं कुराण निर्दोष म्हणून दाखविलें होतें. त्यांचें भाषा-ज्ञान विपुल आणि व्युत्पत्तिज्ञान अपार आहे. तुरुंगातून बाहेर आल्यावर सर्व संस्थांचे संबंध सोडून ते मोकळे झाले. " सत्य मोकळें हवें. संघटनेनें तें संकुचित होतें" असें म्हणाले. सुटून आल्यावर रोज सकाळीं सुरगांवला जाऊन भंगी काम करून यायचे.

१५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य आलें. परंतु फाळणीमुळें देशभर दंगली नि कत्तली झाल्या. अखेर महात्माजींची आहुति पडली. परंतु एकाच ठिकाणीं स्थिर झालेले विनोबाजी हिंदुस्थानभर शांतीचा संदेश द्यायला बाहेर पडले. ते १९३३ मध्यें म्हणाले होते " असा एक दिवस येईल ज्या वेळेस माझ्या पायांना भिंगरी लागेल ". अजमीरला एका मुस्लीम संताचा दर्गा आहे. महात्माजी तेथें उत्सवाला जाणार होते. परंतु ते तर देवाघरीं गेले विनोबाजी तेथें गेले. कुराणावर त्यांनीं प्रवचनें दिलीं. मुसलमानांवर त्यांचा अपार परिणाम झाला. त्यांच्या हातावरीं त्यांनीं प्रेमानें चुंबनें घेतलीं. निर्वासितांत ते हिंडत असतात. त्यांना धीर



देत असतात. नेहरूनीं हैद्राबादमध्यें जायला विनविलें तर तिकडेहि फिरले. त्यानीं सर्वत्र ऐक्याचा संदेश दिला. १५ दिवस ते तिकडे होते.

नंतर ते गुजरातकडे गेले. तेथून दक्षिणेंत आंध्रांत कांहीं दिवस होते. कारण भरतपूरकडे मेवांच्या पुनर्वसाहतीचें काम होतें. आंध्रांतून ते दिल्लीला गेले. बिहारमधें ते जायचे होते परंतु प्रकृति बिघडल्यानें वर्ध्यालाच राहिले. शांतिनिकेतनच्या शांतता परिषदेलाहि ते जाऊं शकले नाहींत. त्या परिषदेला पाठविलेल्या संदेशांत ते म्हणतात. " आम्ही राज्यांपासून फारशी आशा ठेवतां नये. त्यांना विश्वशांति नको आहे असें मानायला नको. परंतु तीं एका कुचक्रांत सांपडलीं आहेत. तीं एकमेकांशीं लढतात आणि एकमेकांना भितातहि. आमचें काम आम जनतेंत आहे. किसान मजदूरांकडे, विद्यार्थ्यांकडे शास्त्रज्ञांकडे आणि शिक्षकांकडे जाऊन त्यांनाच आम्ही अहिंसा पटविली पाहिजे. शेवटीं हत्यारें तर मजूरच बनवतात, शास्त्रज्ञ त्यांत मदत करतात, शिक्षक आणि विद्यार्थी त्यांचे समर्थन करतत, आणि भोळी जनता यांतच आपलें हित आहे असें मानते. ह्या सर्वांशीं आम्ही प्रत्यक्ष संबंध जोडला पाहिजे आणि सेवेंतूनच हें होऊं शकतें. त्याच्या जोडीनें जर जीवनाची शुद्धि आम्ही केली तर ईश्वराच्या प्रकाशाचे आम्ही वाहक बनूं शकू. शवटीं काम तर तोच करणार आहे. आम्ही त्याच्या हातीं निमित्तमात्र, औजार म्हणून. परंतु त्याच्या हातचें औजार बनायचें म्हणजे पूर्ण निरहंकार आम्हांला बनल पाहिजे, स्वतःला शून्यवत् केलें पाहिजे. आजच्या युगांत संघटनेला फार महत्व दिलें जातें. परंतु अहिंसेचा प्रकाश केवळ संघटनेनें निर्माण होणार नाहीं. तो जीवन-शुद्धींतून निर्माण होईल आणि निर्माण झाल्यावर आपल्यांतील अंतः शक्तीनें कामहि करून जाईल." जगांतले हे सारे शांततावादी नंतर वर्ध्यालाहि जमले होते. विनोबाजी वर्ध्याला प्रकृतिस्वाथ्यासाठीं राहिले असले तरी त्यांचें कार्य अखंडपणें चालूच आहे. सध्यां विणाईकडे त्यांचें विशेष लक्ष आहे.

देशभर ही पुण्यपावन मूर्ति, ज्ञान, भक्ति व कर्म यांची मूर्ति, सर्वांचे ऐक्य अनुभवण्यासाठीं सर्व धर्म, सर्व भाषा अभ्यासणारी ही मूर्ति, शांत गंभीर निष्पाप मूर्ति हिंडत आहे. त्यांची प्रखर बुद्धिमत्ता, मूलगामी प्रज्ञा, त्यांचें

अफाट वाचन, खोल अभ्यास, प्रत्यक्ष सेवेचा दीर्घ अनुभव, तें वैराग्य, ती साधुता नि शुचिता; द्वेष मत्सरास यत्किंचितहि वाव न देणारी वृत्ति. कोठें मिळतील या वस्तु ? ते म्हणाले, "मी माझ्या जीवनांत भारताचें दर्शन घेतों; मानवतेचें घेतों" महात्माजींच्या प्रेमैक्याचा, स्वावलंबनाचा, ग्रामोद्योगांचा संदेश ते देत आहेत.

साने गुरुजी

१५।३।४९ : : :

शनिवारीं १२ मार्चला गुरुजी म्हणाले, "विनोबाजी पैठणला जाणार. तूं जाशील ? तेथले फोटो, त्यांच्या प्रवचनांचे वृत्तांत घेऊन ये." मी हो म्हणालों. परंतु रविवारीं गुरुजी दौऱ्यावर गेले. मी विचार केला, आपण हो तर म्हणालों पण हें कसें काय जमणार ? शीघ्रलेखन तर आपल्याला येत नाहीं. ह्या वृत्तपत्रीय प्रतिनिधि म्हणून फिरण्याचा पहिलाच अनुभव येणार होता; त्यामुळें मन बरेंच साशंक होतें. शिवाय विनोबाजींच्या कडकपणाबद्दलच्या अनेक आख्याइका मी ऐकलेल्या होत्या. परंतु मागें धुळ्याच्या त्यांच्या मुक्कामांत त्यांची भेट झाली होती, त्यांच्याशीं चर्चाहि केली होती त्यामुळें थोडी भीडहि चेपली गेली होती. सोमवारीं गुरुजी परत आले आणि मी विनोबाजींच्या प्रवचनांचे वृत्तान्त आणण्यासाठीं निघालों.

## संस्कृतीच्या गाभ्यांतील दौरा

पंडित जवाहरलालजींनीं विनोबाजींना हैद्राबादमधें जायला विनविलें होतें. परंतु प्रकृतीच्या व अन्य कारणांमुळें ते जाऊं शकले नव्हते. नाथ-षष्ठीला पैठणला मोठी यात्रा भरते, उत्सव होतो. ह्यापूर्वीं २।३ वर्षें रझाकारी राजवटींत स्वातंत्र्यानें ह्या यात्रा कधीं भरल्या नाहींत. नेहमींसारखा उत्साह जनतेंत नव्हता. परंतु यंदा त्यांना मुक्ति मिळाल्यानें यात्रा अपूर्व होणार हें दिसत होतें. शिवाय नाथांचें मंदिर हरिजनांसाठीं उघडें व्हावयाचें असल्यानें विनोबाजींच्या दृष्टीनें तो अधिकच आनंदाचा प्रसंग. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा गाभा याच बाजूला. ज्ञानदेवांचें आपेगांव, नाथांचें पैठण, समर्थांचें जांब हीं पवित्र स्थानें येथेंच. गुरुजींची विनोबाजींवर भक्ति आणि त्यांचा ह्या

संस्कृतीच्या गाभ्यांतला हा दौरा ह्यामुळें मुद्दाम मला पाठविण्यांत आलें. मीहि एक प्रकारच्या अज्ञात साशंकतेनें जावयाला निघालों.

रात्रीं मनमाडला पोंचलों. होळीचा दिवस. सर्वत्र टिपूर चांदणें पडलेलें होतें. मनमाडपर्यंतचा प्रवास तर ठीक पार पडला. परंतु पुढें निझामी गाडी. पंढरपूरला जातांना यात्रेच्या वेळींच कायती गर्दी असते, पण ह्या निझामच्या रेल्वेंत बारा महिने अठरा काळ गर्दीच गर्दी. शिवाय रझाकारांच्या उपद्रवानें पांगलेल्या लोकांचीहि जाण्याची गर्दी होती. परंतु औरंगाबादला तर पोंचलों. १५ तारखेला पहांटे पोंचलों. दिवस धुळवडीचा. कोठें उतरावयाचें तेहि नक्की नव्हतें. औरंगाबादला पूर्वी गेलेलों असलों तरी विशेष माहिती नव्हती. विनोबाजीहि आलेले नव्हते. लोकांना शोधित फिरावयाचें म्हटलें तर धुळवड ! शेवटीं स्टेट काँग्रेसच्या कचेरींत दुपारपर्यंत कोंडून घेण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. विनोबाजींचा संस्थानांतील दौऱ्याचा कार्यक्रम मिळविण्याचा प्रयत्न केला, परंतु तोहि मिळूं शकला नाहीं. चार वाजेपर्यंत कचेरींत कोंडून घ्यावें लागलें. कारण रंग खेळण्याचा जनतेचा उत्साह फार होता. गेलीं २--३ वर्षें रझाकार जमान्यांत कोणताहि हिंदू सण पाळणें तेथें मुश्कील होतें. आतां रझाकारांचा जुलूम नाहींसा झाल्यानें खैर रीतीनें लोक रंग खेळत होते. हा रंग खेळणें पाहून देशांत कापड टंचाई आहे असें कोणालाच वाटलें नसतें. दुपारीं तीन नंतर हें रंग खेळणें बंद पडल्यावर मी स्टेशनवर गेलों.

## औरंगाबादला स्वागत

नाथषष्ठीला नाथमंदिर हरिजनांसाठीं उघडणार त्यासाठीं पैठणाच्या कार्यकर्त्यांनीं अति आग्रहानें विनोबाजींना बोलावलें. ता. १५ रोजीं विनोबाजींनीं औरंगाबादकडून संस्थानांत प्रवेश केला. औरंगाबादला ते ता. १५ रोजीं सायंकाळीं ५॥ ला पोंचले. स्टेशनवर जनसंमर्दानें त्यांचें स्वागत केलें. स्वामी रामानंदतीर्थ व हैद्राबाद समाजवादीपक्षाचे साथी काबरा यांनीं व इतर अनेक संस्थांनीं त्यांचें स्वागत केलें. त्यांची प्रकृति खराब आहे. परंतु सकाळ दुपार अनेक कार्यकर्त्यांशीं ते बोलतील, चर्चा करतील. रोज सायंकाळीं त्यांची प्रार्थना गांधी मैदानावर होणार. हजारोंच्या संख्येनें सर्व धर्मांचे लोक आज होते. तेथल्या मुसलमानांच्या तर्फेहि कांहीं लोकांनीं भेट घेतली.



## इतिहासाची अखंड साक्ष देणारी भूमि

विनोबाजींनीं साऱ्यांशीं मनमोकळी चर्चा केली. प्रार्थनेंत तर त्यांनीं सांगितलें कीं सर्वांनीं माझ्याकडे यावें. मी कोणत्या पक्षाचा आहें असें समजूं नये. माझ्याभोंवतीं कोण आहेत तें पाहूं नये. साऱ्यांना माझें दार खुलें आहे. गांधी मैदानावर औरंगाबादच्या दलानें त्यांना सलामी दिली. नंतर प्रार्थना झाली. प्रवचनांत विनोबाजी म्हणाले—

" प्रिय बंधुभगिनींनो,

पुष्कळ दिवसांपासून या प्रांतांत येण्याचा विचार होता. परंतु अनेक कारणांमुळें तो लांबणीवरच पडत गेला. आतां तीन महिन्यानंतर निझाम-हद्दींत प्रवेश केला. प्रवेश करतांना विचार करीत होतों कीं, प्रवेश कोठून करावा ? पैठणच्या यात्रेसाठीं जावयाचें म्हणून औरंगाबादकडून प्रवेश केला. ही भूमि फार जुनी आहे. प्राचीन काळापासूनची इतिहासाची अखंड साक्ष येथें दिसून येते. निदान गेल्या २००० वर्षांचा तरी इतिहास येथें अंकित झालेला सहज सांपडतो. अशी ही ऐतिहासिक भूमि आहे. शातवाहनाचें राज्य येथें होतें. स्वातंत्र्याची प्रतिष्ठानगरी पैठण हीच त्याची राजधानी. शातवाहनांच्या राज्यावर शकांचें आक्रमण झालें. शालिवाहन राजा होता. शकांच्या आक्रमणापासून शालिवाहननें मुक्ति दिली. शालिवाहनापाशीं सैन्य नव्हतें. त्यानें मातीप्रमाणें जड झालेल्यांत प्राण ओतला, चैतन्यहीन जडांतून त्यानें सैन्य उभें केलें. स्वातंत्र्याचें परकी आक्रमणापासून रक्षण केलें. शालिवाहनानें जडांना चेतन करण्याचा हा जो पराक्रम केला त्याचाच शालिवाहन शक अजून चालू आहे.

शातवाहनवंशानंतर येथें चालुक्य आले, राष्ट्रकूट आले. त्यांच्या राज्यांत त्यांनीं कलात्मक प्रदर्शन खूप केलें. अजिंठा व वेरुळचीं हीं लेणीं त्यांच्याच वेळचीं. त्यानंतर येथें मुसलमानांचें राज्य आलें. औरंगजेबाची समाधि येथें जवळच ह्या जिल्ह्यांत आहे. त्यानंतर इंग्रजांचें राज्य आलें. ह्या इंग्रजी राज्याचा इतिहासहि येथें अंकित झालेला आहे. जनरल वेल्स्लीनें येथें जवळच लढाई दिली. आसईची लढाई प्रसिद्ध आहे. अशा प्रकारें शालिवाहनापासून तों वेल्स्लीपर्यंतचीं इतिहासचिन्हें येथें आहेत. ही ऐतिहासिक भूमि आहे. आतां नवयुग आलें, जुनें गेलें. आतां सर्वोदयाचें युग आहे. आतांपर्यंत इतिहास-

कालांत जसा पराक्रम येथें घडला तसाच पराक्रम सर्वोदय–युगाला साजेसा तुम्ही कराल अशी आशा करतों. आतां जे कोणी येथें राहतील ते समान भावनेनें राहतील. कोणी खालीं नको, वर नको. उंच नको, नीच नको. सारे समान. नव्या युगाचा संदेश सर्वोदयाचा. तो ऐकवण्यासाठीं राऊच्या सर्वोदय संमेलनानंतर मी इथें आलों.

## सत्तेचें राज्य नको, भक्तीचें असूं दे

आतांपर्यंतच्या उत्तमांतल्या उत्तम राज्यव्यवस्थेपेक्षां ही सर्वोदय-व्यवस्था वेगळी असेल. आतांपर्यंतच्या राज्यव्यवस्था सर्वांची समान जबाबदारी घेणाऱ्या नव्हत्या, सर्वांना समान सुख व पुरुषार्थाचा समान अवसर नव्हता. सर्वोदयकारी व्यवस्था सर्वांची समान जबाबदारी घेईल. सर्वांना समान सुख व पुरुषार्थाला समान अवसर देईल. यापुढें सत्ता सत्यस्वरूप असेल. भलेपणा म्हणजे सत्पणा. ह्या सत् वरूनच सत्ता शब्द बनला. आतां यापुढें जीं राज्यें येतील तीं सत्तेचीं नसतील, भक्तीचीं असतील. भक्ति ज्ञाननिष्ठ असते. तिला दिशा असते. परंतु शक्ति दिशाशून्य असते. त्यामुळें ती कोणाहिकडे जाऊं शकते आणि तिचा दुरुपयोगहि होऊं शकतो. या उलट भक्तीला दिशा असते. ती ज्ञाननिष्ठ असल्यानें ती सज्जनांच्या जवळच राहते. सर्वोदयकारी राज्य म्हणजे भक्तीचें राज्य. आतां भक्तीचें युग आलें आहे. त्या भक्तीला अनुकूल वातावरण आपल्याला निर्माण करावयाचें आहे.

## अभेदासाठीं बुद्धि लागते

ज्याप्रमाणें इतिहासाची परंपरा येथें आहे त्याप्रमाणें संत पुरुषहि येथें झाले आहेत. एकनाथ तर पैठणचेच. ज्ञानेश्वरांचें निवासस्थान आपेगांव इकडचेंच आणि समर्थांचें जांबहि इकडेच आहे. अशी ही संतांची भूमि, भक्तीची भूमि आहे. आतां आपल्याला भक्तीची शक्ति सिद्ध करावयाची आहे. आतां शारीरिक शक्तीवर चालणारीं राज्यें येथें नकोत. जो प्रेम करील त्याचीच शक्ति येथें चालो. हें भक्तीचें राज्य येथें निर्माण करण्यासाठीं पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे पक्षीय भावना सोडून द्या. आतां येथें पक्ष नको. दोनच पक्ष असोत. एक सेवकांचा पक्ष व दुसरा स्वामींचा. ही सारी दुनिया स्वामी व



आपण सारे सेवक. हे दोनच पक्ष. इतर सारे पक्ष आपण विसरूं या. हिंदुस्थान हें ३५ कोटींचें राष्ट्र आहे. येथें भव्यता, दिव्यता आहे कारण संकुचितता येथें नाहीं. जातींचीं बंधनें मानायला नकोत. नको पक्षांचीं, भाषांचीं, प्रांतांचीं बंधनें. हीं बंधनें स्वीकाराल तर कोंडमारा होईल. ह्या बंधनांतून, संकुचिततेंतून तेजस्विता येणार नाहीं; विनाश येईल. भेदाला बुद्धिमत्तेची जरुरी नसते. भेदांतून अभेदाकडे जाण्याला बुद्धिमत्ता लागते. वेगवेगळ्या प्रकारचीं फुलें फुललेलीं असतात त्यांना एकत्र आणून त्यांची सुंदर सुशोभी माळ करायला दोरा लागतो, तशी अभेदासाठीं बुद्धिमत्ता हवी. कांचेचा पेला आपटला तर त्याचे तुकडे तुकडे होतात. हे तुकडे करायला बुद्धि लागत नाहीं. लहान मूलहि हें करूं शकतें. परंतु तोच अखंड कांचेचा पेला बनवायचा असेल तर ? तर त्याला ज्ञान विज्ञान लागतें, बुद्धिमत्ता लागते. तुकडे करावयाला बुद्धि लागत नाहीं. जोडायला बुद्धिमत्ता लागते. म्हणून पक्षीय भावना टाका. लहान लहान मुद्दे घेऊन आपले अहंकार नका उभे करूं. नको पक्षोपपक्ष. सर्वांना समान मान्य असलेला विचार घेऊन सर्वांनीं एकत्र काम करावयाचें, सेवा-परायणतेनें काम करावयाचें असें ठरवा. तें बुद्धिमत्तेचें लक्षण आहे.

## मोठी वृत्ति असेल तर मोठे व्हाल

जगांत इतरत्र सर्वत्र लहान लहान राष्ट्रें असतांना आपलेंच हें एवढें मोठें राष्ट्र कां ? बाकीच्या राष्ट्रांना संतानोत्पादनशक्ति कमी आहे व आपल्यांत का जास्त आहे ? नाहीं. आपण इतके लोक एकत्र राहिलों याचें कारण येथली प्रजा ही अद्वैताच्या वातावरणांत वाढली आहे. हिमालयापासून सागरापर्यंत सर्वत्र एकतेचें वातावरण होतें. सर्व जातीजमाती एक असें आपण मानीत होतों. महाराष्ट्र हें माझें राष्ट्र, बंगाल हें माझें राष्ट्र, असें जर लोक मानते तर येथेंहि युरोपप्रमाणें २५–३० राष्ट्रें झालीं असतीं. आपण दोन दोन, चार चार कोटि राहिलों असतों. परंतु आपण एकता मनानें घेतली, चित्तांत ठसविली म्हणून महान् झालों. मनांत स्वतःला लहान म्हणाल तर लहान राहाल, मोठे मानाल तर महान् व्हाल. आपल्या मनांतल्या कल्पनेप्रमाणें आपण छोटे किंवा मोठे होऊं. लहानाचा अभिमान सोडा. आपली वृत्ति विशाल ठेवा. क्षुद्र नका होऊं.

## संत विश्वाला घर मानीत

आपल्या येथें विशालतेचें वातावरण पूर्वींपासून आहे. तुकाराम महाराज देहूच्या परिसरांत जेमतेम २५ मैलांच्या टापूंत फिरले असतील. परंतु त्यांचा देश कोणता म्हणून ते सांगतात ? ते म्हणतात :

आमुचा स्वदेश
भुवनत्रयीं वास

ही भावना त्यांची होती. महाराष्ट्र नाहीं ते घेऊन बसले. त्यांची भावना विशाल होती, म्हणून ते एवढे मोठे होऊं शकले. तुकारामाचें मन केवढें होतें, भावना केवढी होती ! तो क्षुद्र नाहीं राहिला. संकुचित नाहीं राहिला. महाराष्ट्र देश नाहीं त्यानें मानला. जगाचा–विश्वाचा नागरिक जणुं होता.

## वैदिक ऋषीचा संदेश

कांहींना वाटतें, इंग्रजाच्यामुळें आपलें एवढें मोठें राष्ट्र झालें. परंतु तसें नाहीं. आपण अति प्राचीन कालापासून असे विशाल आहोंत. ही व्यापक भावना इंग्रजांनीं निर्माण केलेली नाहीं. आपल्या वेदांतहि ही भावना आहे. वैदिक ऋषि म्हणतो कीं, हिमालयाकडला वारा व सागराकडला वारा हे जणुं प्राण व अपान. आणि त्यांच्या श्वसनाचा प्राणायाम हा हिंदुस्तान करतो. नरसी मेहता गुजरातचा संत. परंतु आपला जन्म कुठें झाला हें सांगतांना तो असें नाहीं म्हणत कीं मी गुजरातेंत जन्मलों. तो म्हणतो " भरतखंड भूतळमां जन्म्यो." म्हणजे या भूतलावर माझा जन्म भरतखंडांत झाला आहे. त्यावेळीं वाहतुकीचीं साधनें किती तोकडीं ! काशीपासून रामेश्वराला जायचें तर महिनेच्या महिने लागत. या उलट आज सकाळचा दिल्लीचा माणूस संध्याकाळला हैद्राबादला येतो, तिकडून मद्रासकडूनहि येतो. त्या जुन्या जमान्यांतहि नरसी मेहतामधें गुजराती ही भावना नव्हती. भारताची भावना त्यामधें होती. त्यापासून आपण शिकूंया. आतां वाहतुकीचीं वेगवान साधनें असतांना लहान अभिमान नको. सर्वोदयाचें काम हें महान् कार्य आहे. तें क्षुद्र चित्ताचें काम नाहीं. आतां पक्षोपपक्ष नकोत. भेद वाढविणारें कांहींहि नको.

## भांडाल तर वाढून आलेलें ताट जाईल

जनतेची स्थिति बदलून राष्ट्राचा उदय करावयाचा आहे. प्रेम निर्माण करावयाचें आहे. सर्वांना मान्य कार्यक्रम रचून काम केलें तरच सर्वोदय येईल.



संकुचितता सोडा. व्यापक बुद्धि घ्या. हृदय विशाल करा. हें कराल तर इथें सर्वोदय येईल. सत्तेच्या मागें लागूं नका. भोग-बुद्धिप्रधान बनूं नका. त्यानें तुकडे तुकडे होतील. तुमच्यापुढें आतां ताट वाढून आलें आहे. जर बुद्धि व्यापक केली, भेदभाव टाकून दिले तरच तें वाढून आलेलें ताट पोटांत जाईल. नाहींतर भांडणांत तें सारें सांडून लवंडून जाईल.

## व्यापक वारसा विसरूं नका

जगाच्या दृष्टीनेंहि हिंदुस्थानला किंमत आहे. हिंदुस्थानचा मार्ग, सर्वोदयाचा मार्ग नवा आहे. सारी शक्ति ऐक्यभावनेसाठीं लावा. एशियन कॉन्फरन्सनें हेंच दाखविलें. भारतीयतेपेक्षां कमी अभिमान नकाच ठेऊं.

आपला तो पूर्वींचा ऋषि ' अहं ब्रह्मास्मि ' म्हणतो. असा व्यापक अभिमान धरा. गर्भ–श्रीमंताच्या मुलानें भिकारी होण्याची वृत्ति सोडावी. आपला व्यापक वारसा ध्यानांत ठेवा."

प्रवचनानंतर विनोबाजी निवासस्थानाकडे गेले. तेथल्या गिरणीच्या आवारांतल्या एका बंगल्यांत त्यांचा मुक्काम. प्रार्थनासभेपूर्वीं साधना प्रकाशनाचीं बापूजींच्या गोड गोष्टींचीं पुस्तकें विकलीं. इकडले लोक ज्ञानविज्ञानाच्या दृष्टीनें भुकेलेले आहेत. निझामानें येथल्या जनतेला इतर भारतीय जनतेशीं मिसळूं दिलें नाहीं. इतर ठिकाणचीं वर्तमानपत्रेंहि तिकडे येऊं दिलीं जात नसत. परंतु पोलीस-ॲक्शननंतर सारें वातावरण बदललें. जनतेंत उत्साह दिसला.

प्रार्थनेनंतर मीहि विनोबाजींच्या निवासस्थानीं गेलों. ह्या दौऱ्यांत त्यांच्याच सहवासांत रहावयास मिळावें अशी इच्छा होती. विनोबाजींच्या नांवें चिठ्ठी पाठविली. परंतु पुढचा कार्यक्रम ठरवित होते. शेवटीं त्यांच्या सेक्रेटरीनीं सांगितलें, "येथें त्यांच्याजवळ राहण्याची सोय कशी करणार ? सकाळ संध्याकाळ प्रार्थनांना येत जा." जरासा निराश झालों या उत्तरानें. साधना प्रकाशनाचीं, बापूजींच्या गोड गोष्टींचीं पुस्तकें त्यांना दिलीं. शहाणे यांनीं केलेला पहिल्या भागाचा कानडी अनुवादहि दिला. थोडा वेळ तेथें बोलत बसलों नंतर परतलों.

## १६।३।४९

: : :

समाजवादी पक्षाचे येथले कार्यकर्ते वीरेंद्र काबरा भेटले. त्यांच्या पत्नीचा १९४३ सालीं परिचय झालेला. सेवादलाचें कार्य त्या उत्साहानें तेव्हां करीत. त्यांनीं बोलाविल्यानें त्यांच्याचकडे रहायाला गेलों. हैद्राबाद संस्थानच्या राजकारणाची बरीच कल्पना तेथें आली. एका बाजूचा दृष्टिकोन समजला.

दुपारीं विनोबाजी कार्यकर्त्यांशीं चर्चा करणार होते म्हणून मिलकडे गेलों. या चर्चेला सर्व पक्षाचे लोक होते. प्रश्न कागदावर लिहून दिले होते. विनोबाजीनीं उत्तरें दिलीं. चर्चा फार सुंदर झाली. एकप्रकारचें तें प्रश्नोपनिषदच होतें. प्रश्नांना महत्त्व नव्हतें. त्या प्रश्नांच्या निमित्तानें विनोबाजींचे विविध विषयावरचे विचार ऐकायला मिळाले. विनोबाजींच्या विचारांत एकप्रकारचा जोर ( Force ) आढळतो. त्यांची समजावून सांगण्याची हातोटीहि अप्रतिम आहे. सांगतांना उदाहरणें विपुल देतात त्यामुळें विषय मनावर चांगला ठसतो. आम्हाला प्रवेश दिला त्यापूर्वी तेथल्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांशींहि त्यांची चर्चा झाली होती. त्या चर्चेच्या दिशेनेंच पुढेंहि विचार मांडले गेले. अनेक विषयांवरचे विनोबाजींचे नाविन्यपूर्ण विचार ऐकायला मिळाले.

पूर्वीच्या काळीं आजच्यासारखीं मोठमोठीं विद्यालयें नसत. गुरुजींच्या बरोबर राहून विद्यार्थी ज्ञान घेत. गुरुजी म्हणजे चालतें बोलतें विद्यापीठच जणुं असे. मी हें वाचलें होतें परंतु विनोबाजींच्या सान्निध्यांत हा अनुभव मला आला. विनोबाजी म्हणजे एक विद्यापीठ मला भासले. अनेक विषयांवरील त्यांचे विचार अगदीं स्वतंत्र होते. एक प्रकारचा वैचारिक आनंद तेथें मिळाला. ते म्हणाले,



## जनता आपला हितकर्ता ओळखते

"इतिहासांत ज्यांचीं नांवें येतात तेवढेच लोक कांहीं प्रसिद्ध असतात असे नव्हे. ज्यांचीं नांवें इतिहासांत नाहींत त्यांचीहि जनतेच्या जीवनावर अमिट छाप असूं शकते. जनता आपला खरा हितकर्ता ओळखते, त्याची ओळख ठेवते.

आज जे लोक प्रसिद्धि पावले आहेत त्यापेक्षां कितीतरी उत्कटतेनें कार्य करणारे लोक आहेत. इतिहासाच्या कॅमेऱ्याच्या फोकसमध्यें ते येत नाहींत. त्यांचा इतिहास पुस्तकांत सांपडणार नाहीं. तो अलिखित असा आहे. तो लिखित नसला तरी जनतेच्या जीवनांत तो सामावून गेलेला आहे. त्यांच्या सत्कार्याचा सुगंध सर्वत्र दरवळून राहिलेला असतो. जनतेपर्यंत तो पोंचलेला असतो. जनतेचें जीवन त्यामुळें सुरभित झालेलें असतें, सुगंधित झालेलें असतें. हा इतिहास हाच खरा हिंदचा इतिहास. ह्या खऱ्या इतिहासाला राजांची दाद नाहीं. खेडोपाडींच्या असंख्य जनतेला अशोक ठाऊक नाहीं, शिवाजी माहीत नाहीं. एखाद्या मुसलमानाला जाऊन विचारा अकबर कोण होता? त्याला तें ठाऊकहि नसेल. ह्या इतिहासाला संतांची, सेवकांची दाद आहे, इतरांची नाहीं. लिखित इतिहास हा जीवनांतून अनुस्यूत होणारा इतिहास नव्हे. तो पुस्तकांतून बाहेरून शिकवावा लागतो. या भारतांत श्रीमंतांची सत्ता कधींच नव्हती. येथें माणसांचा जयजयकार नव्हता. परंतु आज उलट दृश्य दिसतें. परमेश्वराला लोक मानीत नाहींत त्याचा जयजयकार करावयाचा इन्कार करतात. परंतु पंडित जवाहरलालजी, महात्माजी यांचा जयजयकार करतात, याचें नवल वाटतें. पंडितजी व गांधीजी हे अति थोर. परंतु परमेश्वराच्या जयजयकाराला नकार देणारे त्यांचा जयजयकार करतांना पाहून नवल वाटतें. आपल्याकडे मनुष्य-परायणता, शरीर-परायणता वाढत आहे. सेवा-परायणता, विचार-परायणता दिसत नाहीं. पूर्वीं असें नव्हतें. संतांच्या जीवनाचा सुगंध सगळीकडे पसरत असे. खेडोपाडींच्या असंख्य जनतेला राज्यकर्त्यांशीं काडीचें कर्तव्य नव्हतें. त्यांना शिवाजीचें नांवहि ठाऊक नसेल. मागें कांहीं मित्र शिवजयंति उत्सवाला निघाले होते. गाडींत गर्दी होती. मित्रांना ते अशिक्षित खेडूत पाहून नवल वाटलें. त्यांना वाटले हेहि शिवजयंतिउत्सवालाच जात असावेत. एकानें चौकशी केली. ते म्हणाले "तुकाराम बीज आहे. आम्हीं देहूला चाललों

आहेत." त्यांना शिवाजीउत्सवाचा पत्ताहि नव्हता. हिंदुस्थानचा खरा इतिहास पुस्तकांत नाहीं. तो हिंदी जनतेच्या हाडीमाशीं खिळलेला आहे. आज हजारों वर्षें ह्या इतिहासाचें अखंड सूत्र आहे. आजहि तुम्हीं खेड्यांत गेलांत तर वेदांतील वर्णनाच्या अनुरोधानें खेडीं चाललेलीं दिसतील. सूक्ष्म अवलोकन मात्र हवें. जवाहरलाल नेहरूंना या अखंड सूत्राचें कौतुक वाटलें. आपल्या भारताचा शोध ( Discovery of India ) या ग्रंथामध्यें त्यांनीं हें लिहिलें आहे. पंडितजींचें शिक्षण पाश्चात्य पद्धतीनें झालें. हिंदी इतिहासाच्या अध्ययनानें त्यांना हा शोध लागला. ही इतिहासाची पकड जवाहरलालजींना दिसली व त्यांनीं कौतुकानें त्याचें विवेचन केलें."

## संघर्ष म्हणजे द्वेष नव्हे

विरोध–विकासवादाबद्दल मुद्दा एकानें उपस्थित केला, तेव्हां विनोबाजी म्हणाले,

"हल्लीं संघर्षवादाचा वराच बोलबाला आहे. संघर्षांतून उत्कर्ष, विरोधांतूनच विकास असे लोक म्हणतात. मी मागें एक संघर्षवादी आला होता त्याला विचारलें, "संघर्षांतूनच उत्कर्ष होतो ह्याचीं कांहीं उदाहरणें द्या." त्यानें कांहीं दिलीं. मी म्हणालों, मीहि पक्का संघर्षवादी आहें. बालकाच्या मुखाचा आईच्या स्तनाशीं संघर्ष होऊन त्याची वाढ होते. अशा अर्थाचा संघर्षवाद असेल तर मला मान्य आहे. परंतु संघर्ष याचा अर्थ द्वेषबुद्धि असा असेल तर मात्र त्यांतूनच विकास होईल हें म्हणणें बरोबर नाहीं. संघर्ष म्हणजे परस्पर विचारविनिमय, चर्चा. अशी चर्चा वाईट नाहीं. त्यांतून विचारांना चालना मिळते. अशा चालनेवांचून प्रगति अशक्य आहे हें मी मानतों. संघर्षांत विचार-भेद असावा. परंतु सर्वमान्य विचारावर सहकार्यहि असावें. ह्या दोन गोष्टी म्हणजे संघर्ष असेल तर यांतूनच प्रगति होईल."

## विश्वस्त कल्पनेनें धनाचें अधिष्ठान जातें

गांधीजींच्या विश्वस्तकल्पनेबद्दल ते म्हणाले, "ट्रस्टी या शब्दाचा अर्थ नीट न समजल्यानें गांधीजींच्या विश्वस्तकल्पनेबद्दल फार गैरसमज आहेत. पण ट्रस्टी हा शब्द आपण ज्यावेळीं वापरतों त्यावेळीं आपल्या समाजांत श्रीमंताच्या धनाच्या व्यक्तिगत मालकीला जी मान्यता आपण दिली, तिचें आपल्या मनांत जें



अधिष्ठान आहे तें आपण अमान्य करतों. वेगळ्या भाषेंत आपण त्या श्रीमंताला असें सांगत असतों कीं, तूं या संपत्तीचा मालक नाहींस. ती ज्योतिष्याची गोष्ट आहेना. एक ज्योतिषी राजाकडे गेला. राजानें आपलें भविष्य विचारलें. तो म्हणाला "तुमच्या अनेक आप्तांचे मृत्यु तुम्हांला पहावे लागतील." राजा रागावला. त्यानें दुसऱ्या ज्योतिष्याला बोलावलें. तो म्हणाला, "तुम्हांला उदंड आयुष्य आहे." दोघांनीं एकच सांगितलें. हा उदंड आयुष्याचा होणार म्हणजे अनेक आप्तांचे मृत्यु पाहणें त्याच्या नशीबीं असणारच. तसाच हा ट्रस्टी शब्द आहे. आपण ह्या शब्दानें त्याची मालकी काढून घेतों. आणि ट्रस्टी अप्रामाणिक असला तर त्याचा हक्कहि काढून घेतां येतो. ट्रस्टी–शिपची कल्पना जे अमान्य करतात ते त्या संपत्तीवरचा धनिकांचा मालकीहक्क मान्य करतात. त्यांची संपत्ति काढून घेणें हा एक अन्यायहि मग ठरूं शकेल. याउलट गांधीजी त्यांना मालक मानित नाहींत. त्यांचा मालकीहक्क अगोदरच ते अमान्य करतात.

परंतु त्यांच्याजवळ संपत्ति येऊन चुकलेली असते. ती संपत्ति त्यांच्याजवळ असते. त्यांच्याजवळ टॅलेंट ( बुद्धि ) असते म्हणूनच संपत्ति असते. मूर्खांच्याजवळ संपत्ति टिकत नाहीं. मूर्खहि आहेत व श्रीमंतहि राहत आहेत असें सहसा सांपडणार नाहीं. त्यांच्याजवळ ही जी टॅलेंट, बुद्धि आहे तिचाहि उपयोग करून घेतां आला तर प्रयत्न करण्याला ह्यांत वाव आहे. परंतु त्यांचें मालकीहक्काचें अधिष्ठान मात्र यांत काढून घेतलेलें आहे. स्वातंत्र्य आल्यानंतर सगळेच सरकारी नोकर आपण काढून टाकले नाहींत. पूर्वी ज्यांनीं लांचलुचपत केली त्यांनाहि संधि दिली. आतां यांत धनिकांना संपत्ति देण्याची तर गोष्टच नाहीं. नवीन त्यांना कांहींहि न देतां विश्वस्तकल्पनेनें आपण त्यांच्या मालकीहक्काचें अधिष्ठान काढून घेतों. मालकीहक्क अमान्य करतों. त्यांची बुद्धि ( टॅलेंटहि ) राष्ट्रकार्यार्थ लावण्याची संधि आपण देतों. अप्रामाणिक विश्वस्त असतील तर त्यांना काढून टाकण्याचा हक्क गृहीत आहेच."

## चळवळी व रचनात्मक कार्य एकच

रचनात्मक कार्याबद्दलची चर्चा करतांना ते म्हणाले,

"रचनात्मक कार्य व चळवळी हे दोन वेगवेगळे मार्ग समजणें चूक आहे. रचनात्मक कार्य असेल तेथें शिक्षण होत असतें, जागृति होत असते व चळवळीहि

तेथेंच रुजतात. विधायक कार्यावांचून केलेली चळवळ म्हणजे बिन बुडाची चळवळ. थोडा काळ ती असंतोष दाखवूं शकेल, परंतु लौकरच ती मृतवत् होते. भन्साळी मला सांगत होते कीं पोलीस ॲक्शन जर झाली नसती तर हैद्राबादची प्रजा अगदीं मृतवत् झाली होती. कारण रचनात्मक कार्य झालें नव्हतें. ज्या ठिकाणीं रचनात्मक कार्यानें जनतेचें शिक्षण झालेलें असतें, जागृति झालेली असते, तेथल्या चळवळी टिकावू व प्रभावी होतात. नुसत्या क्षोभांतून निर्माण झालेल्या चळवळी ह्या यशस्वी झाल्यासारख्या वाटल्या तरी त्यांचा परिणाम तात्पुरताच होतो. त्यांतून मनोवृत्ति तयार होत नाहीं. आतां क्षोभात्मक जागृति नको. प्रासंगिक जागृति पुरणार नाहीं. मनोवृत्तीच बदलली पाहिजे राष्ट्रीय सद्गुणांवर आतां समाज उभा करावयाचा आहे. तो विधायक कार्याशिवाय कसा उभा राहणार ? एकजण आपले हाल सांगत होता. म्हणाला "दहा तोंडें खाणारीं, कमावणारा मी एकटाच." हें दृश्य नको आहे. आज आपला समाज आळसावर उभा आहे. श्रमाची महती येथें नाहीं. आज जे श्रम करतात तेहि कांहीं मनापासून करतात असें नव्हे. लाचारीचा श्रम आज येथें आहे. श्रम केले नाहीं तर जगतां येणार नाहीं म्हणून श्रम केले जातात. शेतकरीहि श्रमाचा उपासक नाहीं. नाइलाजानें तो श्रम करतो. आजचा समाज जोंपर्यंत आळसावर उभा आहे तोंपर्यंत दुःख जाणार नाहीं. श्रमप्रतिष्ठेचा राष्ट्रीय सद्गुण आज आपणाजवळ नाहीं. हा निर्माण करायला नुसती क्षोभात्मक जागृति पुरणार नाहीं. त्याला रचनात्मक कार्यच पाहिजे. आज लांच ही सहजप्रवृत्ति झाली आहे. कारण श्रम नको असतात. थोडीशी लांच दिली कीं पटकन काम होतें. कष्ट नको असतात. अडचणी सहन करण्याची अशीच घातक प्रवृत्ति आपल्यांत आहे. लाचारीनें अडचणी सहन करतों. रेल्वेंत काय गर्दी. गुरें भरावीं तशीं माणसें भरलीं जातात. आणि हें सारें सहन केलें जातें. एकादा मनुष्य डब्यांत शिरूं लागला तर आंतले लोक अगोदर विरोधी सूर काढतात. पण मधें आल्यावर त्याला बसूं देतात. ही लाचारीची सहनशीलता तरी कां ? कारण कष्टाचा कंटाळा. आळसाची ही प्रतिष्ठा गेली पाहिजे. तकलीफ आपल्याला नको असते. लाचारीची सहनशीलता हा आपला राष्ट्रीय दुर्गुण आहे. तो काढून टाकला पाहिजे. मनोवृत्ति बदलण्याचा हा प्रश्न आहे. केवळ क्षोभात्मक जागृतीनें तो सुटणार नाहीं ! त्यासाठीं विधायक कार्याची जरुरी



आहे. कोणतीहि चळवळ विधायक कामावरच उभी राहूं शकेल. अन्याय मग तो कोणाचाहि असो तो सहन नाहींच करतां कामा. ही वृत्ति वाढली पाहिजे."

## पक्षातीत लोकशाही

लोकशाहीसाठीं विरोधीपक्ष नको कां असें विचारल्यावर विनोबाजी म्हणाले,

"पक्षातीत लोकशाही असूं शकते. त्यासाठीं सत्तेचें केंद्रीकरण व्हावयाला नको आहे. विभाजन हवें. सत्ता बहुतेक सारी गांवाच्याच हातांत हवी. ग्रामसंस्थेंतहि अल्पमत, बहुमत नको. कारण तें भेदाला जन्म देतें. ग्रामपंचायतीचा सर्व कारभार एकमतानेंच चालावा. एकमताशिवाय गांवाचें ऐक्य टिकणार नाहीं. चार विरुद्ध दोन, पांच विरुद्ध एक अशा बहुमतानें पंचायतींतला एकहि निर्णय होऊं नये. अल्पमत, बहुमत जोंपर्यंत राहील तोंपर्यंत सर्वत्र (Minority Problems) अल्पसंख्याकांचे प्रश्न राहतील. परंतु एकमतानेंच सर्व निर्णय करावयाचे म्हटले तर हे प्रश्न नाहींसे होतील. कांहीं कामांच्यापुरती त्यांच्या अत्यावश्यकतेनुसार ८०–९० टक्के बहुमताची सूट ठेवतां येईल. परंतु तें अपवादापुरतें. ऐक्य टिकण्यासाठीं एकमतानेंच कारभार चालावा. जेवढ्या कामापुरतें एकमत होईल तेवढेंच अमलांत आणावें. कारण एका माणसाचें मतहि महत्त्वाचें असूं शकेल. मतभेदाच्या मुद्यांवर चर्चा करीत असावें. १० पैकीं समजा ९ च मुद्यांवर एकमत झालें, तर त्या ९ मुद्यांची अंमलबजावणी करावी दहाव्या मुद्यावर चर्चा करावी, विचारविनिमय करावा. असें केलें तरच संस्थांचें ऐक्य टिकेल व सर्वांची शक्ति कामाला लागूं शकेल. यांतूनच पक्षातीत लोकशाहीचा उदय होईल. पण पक्षभेद नसावेत याचा अर्थ विचारभेद नसावेत असा नाहीं. विचारविनिमयांतूनच शहाणपण येत असतें. तेव्हां विचारभेद चालेल. विचारभेद असतील त्यांनीं एकत्र येऊन चर्चा करीत असावें.

आजच्या काळांतहि माणसाच्या जीवनापैकीं ९० टक्के प्रश्न शासनसंस्थेच्या बाहेरच आहेत. पूर्वी ९९ टक्के बाहेर असत. पहिले माधवराव पेशवे हे सर्वांत कर्तबगार पेशवे होते. वास्तविक कर्ज राज्याला होतें. परंतु प्रजा तें कर्ज वैयक्तिक माधवरावाचें मानी. स्वतः माधवरावहि तसेंच मानीत. इतकें त्याकाळीं जनतेचें जीवन शासनसंस्थेच्या बाहेर होतें. आजहि ९० टक्के जीवन शासनसंस्थेच्या बाहेरच आहे. याचा अर्थ ९० टक्के तरी आपण पक्षातीत असूं शकतो.

सेवक हा एकच पक्ष असावा असें मीं म्हटलें याचा अर्थ सर्वजणच सत्तेपासून अलिप्त असावेत, सत्ता कोणी घेऊंच नये असा नाहीं. सत्ता जर आपल्याला नको असती तर मग स्वातंत्र्यासाठीं तरी आपण कशाला धडपडलों? बरें झालें, इंग्रजांच्या हातीं आहे, असें आपण म्हटलें नाहीं. स्वातंत्र्य म्हणजे सत्ताच. सत्तेचें काम कांहीं सज्जन लोकांनीं घ्यावें. परंतु आज साऱ्यांचीं तोंड सत्तेकडेच आहेत. सारे सत्तेभोवतीं फिरत आहेत. तसें व्हायला नको आहे. आज स्वातंत्र्य मिळालें पण सत्तेच्या मागें लागल्यानें आपण खरोखर परतंत्र झालों. सत्ताधारी हवे आहेत पण सेवेसाठींच जे सत्ता वापरतील ते सत्ताधारी असोत. जनकासारखे ते असावेत."

## गांधीजी आचरण शिकवीत

गांधीजींनीं जगाला नवें तत्त्वज्ञान दिलें का? असा प्रश्न विचारल्यावर विनोबाजी म्हणाले,

" मी जगाला कांहीं नवें तत्त्वज्ञान दिलें असें गांधीजी कधींहि म्हणाले नाहींत. ते म्हणत "मी आचरण शिकवतों." तुकाराम महाराजहि असेंच म्हणाले,

आम्ही वैकुंठवासी। आलों याच कारणासी।
बोलले जें ऋषी। साच भावें वर्ताया॥

जगांत चांगले विचार आहेतच. नवे विचार कांहीं शोधावयाचे आहेत असें नाहीं. परंतु त्यांचें आचरण शिकवायचें आहे. गांधीजी तें करीत होते."

## पुढारी अनुयायांचे अनुयायी नकोत

समाजवादाबद्दल ते म्हणाले,

" समाजवादी विचार चांगले आहेत. ते अंमलांत आणण्याची युक्ति कोणती हा प्रश्न. जयप्रकाशजी माझ्याकडे आले व भेटले. त्यांनीं सांगितलें कीं चांगल्या ध्येयासाठीं चांगला मार्ग हवा, साधनें शुद्ध हवींत हें मला पटलें आहे. हिंसात्मक, अशुद्ध साधनें वापरलीं तर सर्वत्र असंतोष माजेल व दुःख वाढेल. १९४२ च्या लढ्यांतील गुप्ततेबद्दलसुद्धां त्यांनीं हेंच सांगितलें. परंतु म्हणाले " आतां इंग्रज गेले आहेत. तो प्रश्नच आतां नाहीं."



परंतु प्रश्न आहे तो जयप्रकाशजींचे अनुयायी हें कितपत मानतात हा. आणि जर ते मानीत नसतील तर जयप्रकाश त्यांना सोडतील का? हल्लीं पुढारी प्रत्येक वेळीं मागें पहात पहात चालतो. मागें किती अनुयायी आहेत? लोक कमी असतील तर तो थांबेल. जे मागें मागें अनुयायांच्याकडे वळून पाहातात व त्यावर अवलंबून आपली गति ठेवतात ते खरोखर पुढारी नसून माघारी असतात. हल्लीं पुढारी अनुयायांचे अनुयायी बनले आहेतसें वाटतें. आपल्याला पटलेल्या विचाराप्रमाणें पुढारी पुढेंच जात राहील. तो अनुयायांना समजावील, त्यांना चालना देईल पण तो थांबणार नाहीं असा पुढारी हवा.

समाजवादीपक्षांत कांहीं प्रामाणिक तळमळीचे कार्यकर्ते आहेत. कांहीं सामान्य आहेत. कांहीं अप्रामाणिक आहेत. इतर पक्षांतहि तसेच आहेत."

## हृदयपरिवर्तन व बाह्य परिवर्तन

हृदय-परिवर्तनानें क्रांति कशी होइल असें विचारतां ते म्हणाले " हृदय-परिवर्तन व बाह्य-परिवर्तन हें एकच. दोन्ही अन्योन्यावलंबी आहेत. भांडवलदारांच्या हृदय--परिवर्तनाइतकीच बिन भांडवलवाल्यांच्या हृदय--परिवर्तनाचीहि गरज आहे. दूध, तूप, फळें, धान्य कोणापाशीं आहे? भांडवलदारापाशीं आहे काय? कांहीं दगड, कांहीं कागद व कांहीं पिस्तुलें त्यांच्याजवळ आहेत. त्यांना श्रीमंत कोणी केलें? त्यांच्या दगडांना, त्यांच्या कागदांना कोणी किंमत आणून दिली? तूप गरीबाकडे असतें. त्याच्याकडे श्रीमंत येईल. त्यानें सांगावें "माझ्याकडे तूप आहे, परंतु माझीं तीन मुलें आहेत. त्यांना व मला पुरेल इतकेंच तें आहे." तो श्रीमंत म्हणेल "तुला अधिक भाव देतों." त्यानें असें सांगायची हिम्मत धरावी "तूं कांहींहि भाव दे. परंतु आम्हांला पुरून उरण्याइतकें तूप नसल्यानें तें देणार नाहीं." त्यानें लोभ आणि भीति दूर ठेवावी. परंतु इतर गरजांसाठीं त्याला पैसा हवा असतो. परंतु त्याच्या प्राथमिक गरजा जर तो स्वावलंबनानें भागवूं शकेल, तर मग तो खाऊन शिल्लक उरलें तरच विकील. हें जर झालें तर भांडवलदाराचें हृदय-परिवर्तन होऊं शकेल." विनोबाजींच्या ह्या चर्चेनंतर सारे भारावून प्रार्थनासभेच्या जागेकडे निघाले. कालच्यापेक्षां आज श्रोतृवृंद बराच मोठा होता.

प्रार्थनेनंतर विनोबाजी म्हणाले,

" माझ्या मित्रांनो,

## पक्षभेद नको, विचारभेद असूं दे

काल तुमच्यासमोर मी एक गोष्ट सांगितली. हिंदुस्तानांत अनेक पक्ष करून लाभ होणार नाहीं. आतां त्याचाच थोडासा अधिक विचार करूं. हिंदुस्तानांत वेगवेगळे पक्ष नसावेत याचा अर्थ वेगवेगळे विचार नसावेत असा नाहीं. जर सर्वत्र एकच विचार झाले तर सारें नीरस होईल. निरनिराळे विचार सुचणें चांगलें आणि तें स्वाभाविकहि आहे. विचारभेदावांचून जग शुष्क होईल. एका साच्यांत ओतल्यासारखे विचार नकोत. त्यानें ह्या समाजांतील सर्व सौंदर्य, माधुर्य व गोडी नाहींशी होईल. सर्वांनीं स्वतंत्रपणें विचार करावा. त्याची जरूरी आहे. विचारभेद असलेल्यांनीं विचारविनिमय करावा. संगितांत अनेक सूर असतात. त्या अनेक सुरांतून आपण संगीत निर्माण करीत असतों. साऱ्यांचे विचार एकच झाले म्हणजे बळ वाढेल, संघटना वाढेल असें वाटतें. परंतु तें बरोबर नाहीं. ह्यांतून संघटना नाहीं वाढत, जडता वाढते. जडता म्हणजे संघटना अशी का संघटनेची व्याख्या आहे ? खऱ्या अर्थाच्या संघटनेंत प्रत्येकाला स्वतंत्र प्रेरणा असेल. प्रेरणा स्वतंत्र असो. विचारहि स्वतंत्र असो. परंतु ह्या वेगवेगळ्या विचारांसाठीं एक सर्वसामान्य आचार बनविणें म्हणजे संघटना. वेगवेगळ्या विचारांतला समान अंश शोधून त्यावर जोर द्यावा. सेवेसाठीं तेवढ्या अंशाचीच निवड करावी. तोच विचार प्रधान ठेऊन सेवा करावी. ह्यामुळें जडता न येतां संघटना होईल. प्रत्यक्ष कार्यामुळें एक भावना, एक हृदय होईल. अनेक विचार असावेत. त्यामुळें अनेक दृष्टिकोनांतून निरीक्षण होईल. एकांगीपणा नाहींसा होईल. लहान सहान बाबींचाहि अनेक दृष्टींनीं विचार होऊं शकतो. मोठ्या गोष्टींना अनेक बाजू असणारच. प्रत्येकाचें दर्शन वेगळें असतें व अशा प्रकारें दर्शनांतला एकांगीपणा नाहींसा होऊन अनेक अंगांनीं दर्शन होतें.

## विविधतेंतील गोडी

अनेक विचार, अनेक वेश, अनेक भाषा, अनेक संस्कृति, यामुळें शोभा वाढत असते, अपूर्वता येतें, रस वाढतो. येथें वेद--कालापासून विविधतेचें स्वागत केलेलें आढळेल. वेगवेगळ्या सुरांत जेव्हां एक गाणें निघूं लागतें



तेव्हां तें किती गोड लागतें. एकाच सुरांतलें संगीत आपल्याला आवडेल का ? सूर अनेक असले तरी गाणें एक असतें. त्या सुरांत मेळ साधला कीं गाण्यांत आकर्षकपणा येतो व लोकांना सुख होतें. वेगवेगळीं रत्नें असतात. त्या रत्नांचे गुण वेगळे, त्यांची शोभा वेगळी. तीं रत्नें जेव्हां एका दोऱ्यांत गुंफतात तेव्हां त्या हारांत अपूर्वता येते. तसेंच विचार-भेद जर जनसेवेचें एकच गीत वाजवूं लागले, त्या एकाच सूत्रांत ते ओवले गेले तर तो मेळ मधुर होईल. परंतु जर विचारभेदच नसतील तर सगळीकडे जडता येईल. आपण सारे ठोकळे बनूं. आज जगांत इतर देश तेंच करीत आहेत. फाशीवादी, साम्राज्यवादी व साम्यवादी हे सारे तेंच करीत आहेत. ह्या सर्वांनीं ठोकळेबाज विचारासाठीं शिक्षणाच्या गोंडस नांवाखालीं एक यंत्रणा उभी केली आहे. सर्वांनीं शिक्षण-खातें सरकारच्याच हातीं ठेवलें आहे. तेथलें सारें शिक्षण सरकारच्या हातीं. सरकार देईल तेच विचार घ्यायचे, शिकवतील तेवढेंच शिकायचें. अशाप्रकारें सरकार विचारस्वातंत्र्य नाहींसें करीत आहे. आतां शिक्षण कवायतीसारखें झालें आहे. पृथ्वीचें वर्णन वेदांत आहे. जणुं पृथ्वी-मातेचें तें गीत. जसें राष्ट्रगीत तसें हें पृथ्वीगीत. त्यांत म्हटलें आहे.

" नाना धर्माणम् पृथ्वीम् विवाजसम् " अनेक धर्म व अनेक वाणी ही पृथ्वीची शोभा आहे, वैभव आहे. त्याला दोष नाहीं म्हटलें. ही विविधता नसेल तर शोभा नाहींशी होईल, विकासहि होणार नाहीं !

## भूमिकेनुरूप धर्म असतो

आध्यात्मिक विकासाच्या दृष्टीनें अनेक धर्मांचा असाच उपयोग होतो. त्याचा लाभ मात्र घेतां आला पाहिजे. प्रत्येकाचा विकास वेगळा त्यामुळें प्रत्येकाचा धर्महि वेगळा. साऱ्या हिंदूंचा, साऱ्या मुसलमानांचा धर्महि एक नसतो. प्रत्येकाचा धर्म वेगळा आणि तोहि काळाबरोबर बदलत असतो. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास असे कालानुरूप बदलणारे धर्महि आहेतच. जसजशी भूमिका बदलत जाते, तसतसा धर्महि बदलत जातो. कांहीं धर्म मात्र सर्वांनाच समान असेल. हा हृदयाचा धर्म, मानवताधर्म, भावनांची ही एकता, आनंद देईल. सर्व धर्मांची विविधता जोडणारें हें सूत्र. हिंद या

दृष्टीनें अति भाग्यवान आहे. येथें किती विविधता आहे. अनेक भाषा येथें आहेत. प्रत्येक भाषेची घडण वेगळी, गोडी वेगळी. त्यामुळें त्या भाषांच्या अभ्यासांत केवढा आनंद वाटतो. परंतु त्या साऱ्या भाषांत विचारांचें साम्य ओततां आलें पाहिजे. अशाप्रकारें भेदांत अभेद दाखविण्याची ही परमेश्वरी योजना आहे. जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठीं अशी वेगळी दृष्टि व वेगळे विचार यांत जर एकच सूत्र असेल तर लाभदायक होतें.

## भेदांत अभेद आणून वैभव वाढवा

साऱ्या जगांत वेगवेगळ्या भाषा, धर्म. हिंदुस्तानांतहि सारे धर्म आणि अनेक भाषा आहेत. तुमचें संस्थानहि या दृष्टीनें भाग्यवान. येथेंहि अनेक भाषा, अनेक धर्म आहेत. इतिहासाच्या सर्व कालखंडांतील स्मृतिचिन्हें निजाम संस्थानांत आहेत, ह्या औरंगाबाद जिल्ह्यांत आहेत. शालीवाहनापासून वेल्स्लीपर्यंत अनेकांचीं स्मृतिचिन्हें येथें आहेत. असें हें वैभव जें पृथ्वींत तें हिंदमध्यें व तेंच निजामींत तुमच्या औरंगाबाद जिल्ह्यांत आहे. जर तुमच्यांत रसिकता असेल तर ह्या विविधतेचा उपयोग करा. एका सूत्रांत हे सारे भेद ओवून वैभव वाढवा. पक्षभेद माजवूं नका. जर पक्षभेद करीत बसाल तर त्यांतून द्वेष वाढेल व क्लेशहि वाढेल. तुमचें हें कुटुंब खानदानी कुटुंब आहे. ही खानदानी विसरूं नका. भांडत बसाल तर ही खानदानी जाईल, सारे पोरकट म्हणतील. धर्माचें, विचारांचें संशोधन करा. वेगवेगळ्या विचारांच्या लोकांच्या विनिमयानें हें होईल व विचारशुद्धि होईल. चांगले विचार ठेवा, वाईट टाकून द्या. विचारभेदाचा अशा प्रकारें उपयोग होऊं शकतो.

## एक देवाचा संदेश

येथें हिंदूमुसलमान आहेत. त्यांचा एकमेकांवर परिणाम झाला आहे. इस्लाम एकच देव मानतो. प्राचीनकाळीं वेदांतहि देव एकच आहे. असें सांगितलें होतें. "एकम् सत् विप्रा बहुधा वदन्ति" असें म्हटलेलें आहे. परंतु ही एकत्वाची भक्ति गेली. अनेक देव-देवता उभ्या राहिल्या. उपनिषदानें ब्रह्ममयम् जगत् म्हटलें तेंहि विसरलों होतों. मुसलमान फकीर येथें आले. त्यांच्या प्रचारानें आमची झोपलेली भावना जागी झाली. सारे संत पुढें आले.



त्यांनीं एकत्व सांगितलें. तुलसीदासापासून, रामदासापासून साऱ्यांनीं ही एकता सांगितली. रामदासांनीं दासबोधांत रेशमाचा देव, दगडाचा देव, यांवर टीका केली आहे. ते म्हणतात "ज्यांनीं सृष्टी केली ते देव. सृष्टींत आले ते कसले देव. दगड सृष्टींत आले ते देव नव्हत." इस्लामचा हा उपकार आहे. रामदासांनीं म्हटलें "जगीं थोरला देव तो चोरलासे" आमचा देव चोरीला गेला होता. तो शोधायला इस्लामनें मदत केली. इतिहासाचा तटस्थ अभ्यासक असेंच म्हणेल. अशा प्रकारें भेदामुळें संशोधनाची संधि मिळते. करून घेणाराला विचार-भेदानें फायदा होतो. परंतु हें ज्याच्या त्याच्या बुद्धीवर अवलंबून आहे. विवेक असेल तर ह्या भेदांतून फायदा होईल परंतु अविवेकानें भांडणें मात्र निर्माण होतील.सर्व धर्मांचा समन्वय करा. ह्या विचारभेदांत जेवढें ऐक्य असेल तेवढ्याचें आचरण करा. ह्याकरितां पक्षांची जरूरी नाहीं. अशी जर पक्षभेदातीतता निर्माण केलीत तर क्लेशाचा लेशही येथें उरणार नाहीं."

विनोबाजी तीन दिवस औरंगाबादला राहणार. दोन दिवस जिल्ह्यांत फिरणार. दौलताबाद वेरुळही पाहणार आहेत. विनोबाजींच्या समवेत जाण्याची इच्छा आहे. विनोबाजींच्या सेक्रेटरींना त्याबाबत विचारलें. परंतु पेट्रोलच्या अभावामुळें मला त्यांच्याबरोबर जाणें अशक्य. भाड्याच्या मोटारीनें जाऊनहि काय उपयोग? कारण ते मोटारनें जसजसे फिरतील तशी भाड्याची गाडी कशी फिरणार? तेव्हां दोन दिवस मधले कसे घालवायचें हा प्रश्न आहे. पैठणला २० तारखेला पोंचावयाचें आहे.

———

## १७।३।४९ : : :

शैक्षणिक दृष्ट्या औरंगाबाद हें हैद्राबाद संस्थानांतलें बरेंच प्रसिद्ध गांव आहे. इंटरमिजियेट पर्यंत कॉलेजहि येथें आहे. परंतु गांव जुन्या क्षेत्रांच्या सारखें. अरुंद गल्ल्या व त्यामुळें घाणहि विपुल आहे. शैक्षणिक सोयी येथें असल्या तरी शैक्षणिक वातावरण मात्र येथें आढळलें नाहीं. पूर्वी 'वंदेमातरम्' गाण्यासाठीं येथल्या विद्यार्थ्यांनीं सत्याग्रह केला होता. येवल्याच्या आमच्या हायस्कूलांत व सेवादलांत त्यांतले बरेच लोक होते, त्यांच्याहि ओळखी निघाल्या.

औरंगाबादला रेडियो केंद्रहि आहे. हिंदुस्तानांतल्या इतर कोठल्याहि केंद्रापेक्षां ह्या केंद्रावरून अधिक मराठी कार्यक्रम ध्वनिक्षेपित करण्यांत येतात असें ऐकलें होतें. मराठीचे एक ख्यातनाम कवि कांत ह्या केंद्राच्या मराठी विभागाचे प्रमुख आहेत. त्यांना भेटलों, गुरुजींनीं औरंगाबाद केंद्रावर रेडियोवर बोलण्यासाठीं यावें अशी त्यांची फार इच्छा असल्याचें त्यांनीं सांगितलें. दुपारी केंद्र पहावयास इवें तर या म्हणाले.

दुपारीं रेडियोकेंद्र पहावयास गेलों होतों. छोटेखानी पण टुमदार बिल्डिंगमधें केंद्र आहे. वागणूकहि चांगली वाटली. कवि कांत यानींच केंद्राची रचना दाखविली. तेथून प्रार्थना स्थानाकडे गेलों. प्रार्थनेनंतर विनोबाजी हिंदुस्थानींत बोलले. म्हणाले

" प्रिय बंधूनों आणि भगिनींनो

प्रार्थनेचा आजचा तिसरा दिवस. यानंतर कदाचित् २३ तारखेला येथें सायंप्रार्थना होईल. दोन दिवस आतां मी जिल्ह्यांत फिरणार आहें. रात्रीं रोज



इथें येत राहीन. ज्यांना भेटावयाचें ते भेटूं शकतील. सकाळची प्रार्थनाहि येथेंच होईल. काल कांहीं गोष्टी सांगितल्या आजहि थोड्या मांडतों.

आतां स्वराज्य आलें आहे. परंतु आपल्याला तें आलें असें वाटत नाहीं. स्वराज्य आल्यावर आपल्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी होतील असें आपल्याला वाटत होतें. परंतु तसें कांहीं झालें नाहीं. परंतु मला ह्यांत आश्चर्य वाटत नाहीं. मला तशी आशाहि नव्हती. त्यामुळें मी निराश नाहीं. स्वराज्यानंतरच खरें काम सुरू होणार. कारण इतरत्रहि तसेंच झालें होतें. इतिहास हेंच सांगतो. स्वराज्य आलें म्हणजे भोग सुरू होईल, स्वराज्यांत काम नसेल असें मी मानलें नाहीं. स्वराज्यानंतर अनेक संकटें आलीं. जेव्हां राष्ट्र स्वतंत्र होतें तेव्हां अनेक विरोधांना तोंड द्यावें लागतें. मी हें समजलों होतों. त्यामुळें मला थोडीहि निराशा वाटली नाहीं. उलट या विरोधी परिस्थितीमुळें आपण उत्साहित व्हायला हवें होतें. आपल्या कर्तबगारीला आतां वाव आहे असें वाटून उत्साह संचरायला हवा होता.

## परदेशांतून अन्न मागवणें लज्जास्पद

आज दीडशें वर्षानंतर स्वातंत्र्य आलें आहे. ह्या दीडशें वर्षांत राष्ट्रांत अनेक दुर्गुण निर्माण झाले आहेत. ह्या दुर्गुणांत सर्वांत मोठा दुर्गुण म्हणजे आळस. परावलंबन व बेकारी ह्याहि गोष्टी आहेत. दीडशें वर्षांत सरकारनें आपल्यासाठीं सर्व गोष्टी बाहेरून आणून आपल्याला परावलंबी व बेकार केलें. जेथें जेथें आळस असतो तेथें तेथें लक्ष्मी कधीं येत नाहीं. आळसाजवळ सुखहि राहात नाहीं. आपण उद्योगी बनलें पाहिजे. आज उत्पादनवाढीची घोषणा दिली जात आहे. अन्नहि आपणाला परदेशांतून मागवावें लागतें, हें लज्जास्पद आहे. हें स्वातंत्र्य नाहीं. ही गुलामीची निशाणी आपण समजली पाहिजे. उत्पादन वाढवा हे किसान मजूरांना सांगतात पण अन्न खाण्यांत आणि कपडा वापरण्यांत तर इतरांचाहि हिस्सा आहे. पण पैदाइस मात्र किसान मजूरांनीं करावयाची. याचा अर्थ इतर सेवा करीत नाहींत, किंवा त्यांची सेवा तुच्छ असते असें नाहीं. परंतु ती सेवा उत्पादक नाहीं, उपयोगी आहे. परंतु ज्या अर्थी आपल्याला खावें लागतें, कपडा लागतो, त्याअर्थी आपण उत्पादनांत भाग घेतलाच पाहिजे.

## उत्पादक श्रमाची उपासना

गांधीजींनीं याबाबत आपल्याला मार्गदर्शन केलें आहे. गांधीजींनीं कांतावयाला सांगितलें. कांतणें हें उत्पादक परिश्रमाचें एक अंग, एक चिन्ह म्हणून त्यांनीं सांगितलें. पण याचा अर्थ फक्त कांतणें म्हणजेच उत्पादक परिश्रम असा नव्हे. परंतु प्रत्येकानें नित्य कांहीं उत्पादक परिश्रम केले पाहिजेत, यज्ञ केला पाहिजे हा याचा अर्थ. विनाउत्पादन खाणें हें पाप आहे ही भावना त्यांना आपल्यांत रुजवावयाची होती. परंतु ती आपल्यांत अजून तितकीशी रुजली नाहीं. शहरांतले लोक उत्पादक परिश्रम करीत नाहींत.नव्या युगाला अनुसरून नवी उपासना आपण दिली पाहिजे. विना-काम खाणें नको. ८ तास काम करतां येत नसेल तर एक चिन्ह म्हणून नित्य कांहींतरी उत्पादक परिश्रम केले पाहिजेत. न्यायाधिशानें न्याय द्यावा. त्याची ती सेवा राष्ट्राला अवश्यक अशीच आहे. त्याबद्दल त्याला तनखाहि मिळावा. पण ज्याअर्थी त्याला खावें लागतें त्याअर्थी त्यानेंहि उत्पादक श्रम केले पाहिजेत. त्यानें सूत कांतावें, बागवानी करावी, भाजीपाला लावावा. हें जर तो करीत नसेल तर आपलें कर्तव्य तो पूर्ण करीत नाहीं असेंच म्हणावें लागेल. जर आपल्या समाजांत ही नवी धारणा रुजली तर आजची स्थिति बऱ्याच अंशांनीं पालटेल. घरांत लहानपणापासून मुलांत ही भावना रुजवली पाहिजे. आईनें मुलांमधें ही भावना जागृत करावी. त्याच्याकडून कांहीं तरी उत्पादक काम करून घेतल्यावांचून त्याला जेवावयाला घालूं नये. त्याला कांतायला लावावें, बागेंत भाजीपाला करावयाला लावावें. अशा प्रकारें परिश्रम-प्रतिष्ठा वाढविली पाहिजे. त्याशिवाय उन्नति होणार नाहीं.

## श्रमाचा तिरस्कार हें ऱ्हासाचें चिन्ह

रोमच्या पतनाचा इतिहास गिबननें लिहिला आहे. रोमचें साम्राज्य कां रसातळाला गेलें हें त्यानें लिहिलें आहे. तो म्हणतो लोकांची प्रवृत्ति परिश्रमाचा तिरस्कार करूं लागली त्यामुळें रोमच्या साम्राज्याचें पतन झालें. हिंदुस्थानचें पतनहि असेंच झालें. आपली गुलामी अशीच आली. काम करणारांना आपण क्षुद्र समजलों, हीन समजलों. परिश्रम न करणारे उच्च म्हणून मिरवूं लागले. कष्ट करणाराबद्दल आपण तिरस्काराची, नीचतेची भावना लहाणपणापासून,



मुलांत निर्माण करीत गेलों. एकदा सुंदर कारागीर सुतार असतो. अनुभवानें, वयानेंहि तो मोठा नसतो. परंतु एखादा मुलगाहि त्याला अरेतुरेची भाषा वापरतो. शिक्षकापेक्षां तो सुतार कमी दर्जाचा मानला जातो. त्याची योग्यता का कमी ? हा भेद शिकवला जातो. आपण त्याचें काम कमी दर्जाचें मानतों. आपण आपल्या समाजांत अशा रीतीनें दर्जे उत्पन्न केले. काम करणारांना आपण खालचें मानतों. आपलें अधःपतन यांतूनच झालें. हा दुर्गुण १५० वर्षांत आपल्या हाडींमासीं खिळला आहे. आतां तो घालविला पाहिजे. प्रत्येकानें उत्पादक परिश्रम केले पाहिजेत. सूत सोपें आहे. कोणालाहि तें जमूं शकेल. कापड ही आपली एक प्राथमिक गरज आहे. म्हणून गांधींनीं सूत निवडले. अशा प्रकारच्या परिश्रम–निष्ठेंतूनच सुख येईल. त्याशिवाय सुख येणार नाहीं. आपल्या देशांत दुध नाहीं. अन्न नाहीं. कपडा नाहीं. भाजीपाला नाहीं संख्या मात्र आहे. ह्यांतून झगडे होतात. ह्याच्या मुळांत आळसाची संवय आहे. उत्पादन वाढले तर कमी होतील. उत्पादनाचें व्रत घेतलें पाहिजे तरच आपल्या देशाची प्रतिष्ठा, स्वातंत्र्य सारें टिकेल.

## सहकारी बुद्धीनें विकास

दुसरी गोष्ट म्हणजे येथें सर्वांनीं प्रेमानें रहावें. येथें अनेक धर्म व भाषा आहेत. या विविधतेंतून आपल्याला पुष्कळ शिकतां येतें. काल याचें मी उदाहरण दिलें होतें. आपल्या धर्मांत एकेश्वराची भूमिका दृढ व्हायला आपल्याला इस्लामचा उपयोग झाला. आतांच मला चिठ्ठी आली आहे कीं कांहीं सनातनींना माझ्या ह्या उद्गारांनीं दुःख झालें आहे. परंतु त्यांना असें दुःख कां व्हावें हें मला समजत नाहीं. मला थोडक्यांत सांगावयाचे होतें. म्हणून मी हिंदु धर्माचें उदाहरण दिलें. आर्यसमाज, प्रार्थना समाज, ब्राह्म समाज यांनींहि इस्लामचें अनुकरण केलें. आपल्याकडे एका ईश्वराची कल्पना होती. परंतु इस्लाम इतकी साफ कल्पना दुसरीकडे कोठें नाहीं. सर्व धर्मांचा अभ्यास करणारानांच हें समजूं शकेल. हिंदु धर्मांतहि इतरांनीं घेण्यासारखें आहे. आपली मांसाशनत्यागाची कल्पना ही इतर धर्मांनीं घेण्यासारखी आहे. अशा प्रकारें वेगवेगळ्या धर्मांच्या अभ्यासानें फायदा होऊं शकतो. दुसऱ्या

धर्मापासून आपण कांहीं शिकलों असे म्हणण्यांत कांहीं कमीपणा नाहीं. हिंदूंच्या अनेक देवतांमध्यें अवधूत ही एक देवता आपण मानली आहे. त्या अवधूतानें २४ गुरु केले. त्याला आपण देवता मानतो. मग इतर धर्मापासून आपण जर एकादि चांगली कल्पना घेतली असेल व तसें कबूल केलें तर त्यांत वाईट वाटण्यासारखें कांहीं नाहीं. ज्याला म्हणून ज्ञानाची इच्छा असेल त्याला अनेक गुरु मिळतील व गुरूपासून शिकलें तरच त्याची ज्ञानाची इच्छा तृप्त व्हावयाची व कसोटीहि लागावयाची. असे गुरु केले तर त्यांत आपल्या धर्माचा मोठेपणा व उदारता दिसते. व ती कांहीं दुःख करण्यासारखी गोष्ट खात्रीनें नव्हे. अशा गोष्टींनीं तर आपल्याला आनंद झाला पाहिजे. जसें मुसलमानापासून आपण शिकलों तसें ख्रिश्चन धर्मापासूनहि आपल्याला शिकायला मिळालें आहे. त्यांच्यामध्यें किती सेवावृत्ति! हिंदमधें हिंदुमुसलमान महारोगी आहेत परंतु त्या महारोग्यांची सेवा करणारे ५।१० हि हिंदुमुसलमान सांपडणार नाहींत. ख्रिस्त्यांनीं हें केलें आहे. हिंदमधें व जगांतील इतर देशांतहि महारोग्यांची सेवा करतांना त्यांनीं धर्मभेदाचा विचार नाहीं केला. केवळ भूतदयेनें प्रेरित होऊन त्यांनीं हें केलें आहे. हिंदुधर्मानें भूतदया जरी पूर्वीपासून सांगितली असली तरी ती पुस्तकांतच राहिली; आपल्याला ख्रिश्चनांच्या पासून ही भूतदयेची सेवा शिकावयाला पाहिजे. माझें सनातन्यांना आवाहन आहे कीं त्यांनीं ह्या सेवाक्षेत्रांत काम करण्यासाठीं पुढें यावें. दत्तपूरला कुष्ठाश्रम काढला आहे. तेथें मनोहरजी सेवा करीत आहेत. त्यांना कार्यकर्त्यांची कमतरता भासते. प्रत्यक्ष कामाला लागलें पाहिजे. नुसता अभिमान काय कामाचा ? तुलसीदासांनीं सांगितलें आहे "दया धरमका मूल है । पाप मूल अभिमान ॥" हा असला धर्माचा व्यर्थ अभिमान हें पाप आहे. ज्याला ज्याला म्हणून धर्माची पर्वा असेल तो शिकतो व पुढें जातो. पूर्वी आपण यज्ञयाग करीत होतो. आतां करतों कां? नाहीं. मग ही सुधारणा नाहीं का ? इतर धर्माच्या कळत न कळत झालेल्या परिणामामुळेंच हें झालेलें आहे. अशा प्रकारें आपण आपापल्या धर्माचा विकास इतरांपासून शिकत शिकत करतों. इस्लामपासून बंधुभाव, ख्रिश्चनांपासून सेवाभाव, हिंदूंपासून मांसाहार-त्याग, असें जर आपण शिकलों तर, ह्या विचारभेदाचा आपण सहकारी बुद्धीनें उपयोग केला असें होईल व विकास होत राहील. भेदांचा अशा



प्रकारें जर सहकारी बुद्धि असेल तर उपयोग होईल. आपल्या भाग्यानें आपण एका छोट्या दुनियेंतच आहोंत. दुनियेंतले वेगवेगळे नमुने इथें आहेत. विविधता आहे. शिकावयाला महान् संधि आहे. अशा प्रकारें भेदांत अभेद जर आपण पाहूं शकलों तर आपला विकास होईल. शिवाजीची लढाई ती सुद्धां मुसलमानांविरुद्ध नव्हती. त्यावेळच्या अन्यायांविरुद्ध होती. मुसलमानांच्या खऱ्या धर्मतत्त्वांची इज्जत करून त्यानें आपल्या धर्माचा मोठेपणा दाखविला. हज करावयास जाणाऱ्या हाजींनाहि त्यानें सवलती दिल्या, मशीदींना वर्षासनें दिलीं. याचसाठीं वेदानें सांगितलें कीं, "नाना धर्माणम पृथ्वीम् विवाजसम् " नाना धर्म, नाना भाषा, यामुळें त्या वैदिक ऋषीला उचंबळून येत आहे. त्यांत त्याला आपला कमीपणा वाटत नाहीं. गौरव वाटतो. नाना भाषा, नाना धर्म असले तरी दिल एक हवें, भाईचारा हवा. आणि इंग्रज जर येथें आले नसते तर येथें तें संग्राहक वैदिक राज्य अखंड दिसलें असतें. आपलें राज्य टिकावें म्हणून इंग्रजांनीं येथें हिंदु-मुसलमानांत भांडणें लावून दिलीं. आतां तीं सारीं मिटवून आपण एकदिल होऊं या.

## सलामती समिति

आज येथल्या कार्यकर्त्यांनीं एक चांगला उपक्रम केला. ज्ञानदेव, एकनाथ यांची ही थोर भूमि. त्यांच्या शिकवणुकीचा अंमल करण्यासाठीं सलामती समिति नेमली. त्यांत हिंदुमुसलमान आहेत. सर्व जमातींत प्रेम राहण्यासाठीं ही कमिटी प्रयत्न करील. त्यांचे अहवाल माझ्याकडे पाठविले जातील. परंतु नुसत्या कमिटीनें सारे होणार नाहीं. सर्वांचा प्रयत्न हवा, सहकार्य हवें. आपलें शास्त्र तर सर्वांना "अमृतस्य पुत्राः" म्हणून हांक मारीत आहे. प्रेमानें वागलों तर खरोखरच आपण अमृताचे पुत्र होऊं. सर्वांनीं परमेश्वराला, हृदयस्थ आत्म्याला ओळखावें व त्याच्या सर्व व्यापित्वाचें भान राखावें.

आज मी मराठींत बोललों नाहीं कारण येथील सर्वांना हिंदुस्तानी समजूं शकतें. मराठी सर्वांनाच समजतें असें नाहीं. वास्तविक येथें मराठींत बोलणेंच अधिक उचित. ती प्रादेशिक भाषा. येथें राहणाऱ्या सर्वांनीं ती शिकावी. राष्ट्रभाषा व प्रादेशिक भाषा. ह्या आपापल्या मर्यादांत शोभतात व अविरोधानें

नांदू व वाढू शकतात. प्रादेशिक भाषांची प्रतिष्ठा टिकली पाहिजे. येथील मुसलमानभाईना विनंति कीं त्यांनीं येथल्या किसानांची भाषा शिकावी त्यानें फायदा होईल. इतर धर्मांचा अभ्यास करावा. मी कुराणाचा, बायबलचा अभ्यास केला आहे. बौद्ध, जैन तत्त्वज्ञानें पाहिलीं आहेत. पारश्यांचे जेंद अवेस्ताहि पाहिलें ! त्या सर्वांपासून मी कांहीं कांहीं शिकलों आहें. पण तरी मी हिंदूच आहे. माझ्या हिंदू-धर्माला त्यानें बाध आला नाहीं तर मला हिंदुधर्माचें खरें ज्ञान होऊं शकलें. असो." विनोबाजींनीं प्रवचनानंतर सांगितलें कीं आतां येथें काश्मिरचे एक कार्य-कर्ते महंमद शफी भाषण करतील. विनोबाजींच्या प्रार्थनेच्या व्यासपीठाचा स्टेट कॉंग्रेसचे कार्यकर्ते उपयोग आपल्यासाठीं करून घेतात कीं काय असें मला वाटलें. परंतु एवढ्यांत भाषण सुरूं झालें. भाषणाचा प्रवाह गंगौघासारखा अस्खलीत होता. आन्तरिक प्रेरणा त्यांत भासमान होत होती. "जो लोग यहाँ झगडा पैदा करते हैं, मेलजोलमें खलल डालते हैं वे मुसलीमलीग और हिंदुसभा विचारके हैं, ब्रिटीशोंके वे वारीस हैं। ब्रिटीशका काम कर रहे हैं। दुनिया झगडोंसे ऊब गयी है। वह दंगा-फसाद, लढाई-झगडे नहीं चाहती। वह तो चाहती है अमन। बापूके संदेशपर वह चलना चाहती है काश्मिरमें अगर हमनें कुछ किया है तो यही कि देश बापूके मिशनको हमने चलाया है, हम जान जोखी-ममें डालकर भी देश बापूके मिशनको चलायेंगे।" अशा प्रकारची स्फूर्तिदायक वचनें एकसारखीं बाहेर पडत होतीं. बापूजींचें ध्येय साकारण्याचें कार्य काश्मिरमधें किती जोमानें नॅशनल कॉन्फरन्स करीत आहे याचा धावता आढावा त्यानीं घेतला. सारे श्रोते भारावून गेले. व्याख्यानांत सारख्या टाळ्या पडत होत्या. शेवटीं शफी म्हणाले "मैं यहाँ देखता हूँ कि फूटके बादल अब चले गये हैं। अमन कायम हो रहा है। यहाँ अगर अमन कायम होगा तो हिंदके मुसलमान समझेंगे कि यहाँभी सबके साथ बराबरीसे मुसलमान रह सकते हैं। मुसलमानोंकोभी चाहिये कि वे पुरानी बातें भूल जायें और यहाँके और लोगोंपर यकीन करें और मेलसे रहे।" भाषणानंतर व्यासपिठाकडे सारे श्रोते गेले. शफींनीं अति प्रेमानें सर्वांशीं हस्तांदोलन केलें. "ये भारतके नौनिहाल बच्चे हैं, येही बापूका मिशन आगे चलायेंगे" असें मुलांशीं हस्तांदोलन करतांना ते म्हणत. सेवादलाच्या गणवेशांतल्या मुलांच्या आस्थेचें कौतुक करून म्हणाले "मैं भी सेवादलकाही



हूँ। हमारे यहाँके बच्चोंका सेवादल है बालकसेना" मीहि त्यांना भेटलों. सविस्तर मुलाखत मिळाली तर प्रयत्न करावा असा विचार होता परंतु भेटींत वेळ मिळणार नाहीं एवढें समजले. शफींच्या भाषणांतल्या 'देश बापूका मिशन' च्या गुंगींतच परतलों.

विनोबाजींच्या बरोबर अजिंठा, वेरुळ, दौलताबाद पाहण्याची फार इच्छा होती. जनार्दन स्वामींची लेण्यांत समाधी आहे. शिवाय कन्नड विभागांत काका देशमुख नांवाचे समाजवादी कार्यकर्ते काम करीत. त्यांच्या विषयीं स्टेट कॉंग्रेस कार्यकर्त्यांनीं विनोबाजींजवळ बऱ्याच तक्रारी केल्या होत्या. पोलीस ॲक्शनच्या काळांत काकांच्या हातून कांहीं चुका झाल्या नसतीलच असें मी सांगू शकत नव्हतों परंतु त्यांच्या कार्याचें विधायक स्वरुपहि मी करंजखेड शिबिराच्या वेळीं पाहिलें होते. विनोबाजी त्या विभागांत गेले तर त्यांना दुसरी बाजूहि दाखवावी असें वाटत होतें. त्यामुळें ह्यावेळीं त्यांच्याबरोबर जाणें आवश्यक वाटत होते. शिवाय विनोबाजी औरंगजेबाच्या कबरीच्या ठिकाणीं जाणार असल्याचेंहि सम-जले होते. परंतु जाण्याची सोय नव्हती. तेव्हां दोन दिवस औरंगाबादमधेंच खोळंबून राहण्यापेक्षां भुसावळला कॉलेज विद्यार्थ्यांचें सेवादलाचें एक शिबिर चालू होते. त्यांचें बोलावणेंहि होतें, म्हणून रात्रींच्या गाडीनें भुसावळला रवाना झालों. विनोबाजींच्या बरोबर जातां येणें शक्य नाहीं याची हळहळ वाटत होतीच.

---

## २०।३।४९ : : :

१८।१९ हे दिवस भुसावळला दलसैनिकांच्या सहवासांत मोठ्या आनंदांत गेले. अण्णासाहेब सहस्रबुद्धे शिबिराच्या वेळीं तेथें आले होते. त्यांच्याशीं सुंदर चर्चा झाली. कॉलेज विद्यार्थ्यांचें एक प्रश्नोत्तर बौद्धिक त्यांनीं घेतलें. विनोबाजींच्या सहवासाला दोन दिवस मुकलों तरी अण्णासाहेबांशीं झालेल्या चर्चेनें खूपच आनंद मिळाला. धान्य भाव वाढवून घेण्याच्या मागणीबद्दल ते बोलले तें मनांत ठसून गेलें. " धान्याचें भाव वाढविल्यानें प्रश्न सुटणार नाहींत. आज ज्या धान्याचे २० रुपये मिळतात त्याच्या निम्म्या धान्याचे जर भाव वाढल्यानें वीस रुपये मिळतील तर आपला किसान अधिक उत्पादन काढील असा भरवसा नाहीं. देशांत बाहेरुन धान्य आयात करावें लागूं नये. त्यासाठीं उत्पादन वाढलें पाहिजे. उत्पादन वाढ ही नुसता भाव वाढविल्यानें होणार नाहीं. भाव वाढविण्याऐवजीं पूर्वी जे शेतकरी करीत होता त्यापेक्षां अधिक उत्पादन जर त्यानें केले तर अधिक उत्पन्न केलेल्या धान्याला बक्षीस रूपानें अधिक रक्कम दिली पाहिजे " असें त्यांनीं मांडले. हल्लीं कापडाची टंचाई असतांनाहि कापड गिरण्या बंद होण्याचें रहस्यहि त्यानीं सांगितलें. अण्णाशीं बोलून कॉलेज सैनिकांना खूपच आनंद झाला.

१९ तारखेला अलाहाबादनें मनमाडला आलों. यावेळीं गाडींत जागा मिळणें फारच मुष्कील झालें. कांहीं सैनिकांनीं जनतेला हातांतल्या छड्या मारून बाहेर काढले "लढनेकेलिये हम, गोली खानेकेलिये हम और हमे बैठनेकेलियेभी जगा नहीं देते। उठो!" असा आरडा ओरडा करीत त्यांनीं लोकांना हुसकले. स्वतंत्र हिंदुस्तानच्या सेनेंतील लोकांचे हें वर्तन मनाला बरें वाटले नाहीं. पण दोष



दोन्हींकडे आहे. लष्करी सैनिकांनीं हिंदी जनतेशीं बेफिकिरीनें, मग्रूरीनें वागावें व दबदबा कायम ठेवावा असें शिक्षण त्यांना मिळालेलें. त्याचे संस्कार त्यांचे गेले नव्हते आणि हिंदी जनतेलाहि त्या सैनिकांच्याबद्दल यत्किंचितहि आपलेपणा वाटत नव्हता. मागें वृत्तपत्रांत वाचलेले मला आठवले कीं काश्मिर आघाडीवर लढणाऱ्या सैनिकांना वाचण्यासाठीं जुनी मासिकें व पुस्तकें पाठवा म्हणून सैनिकी अधिकाऱ्यांनीं विनंति केली, तेव्हां फक्त हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या भेटी आल्या. उलट इंग्लंडमध्यें अशा विनंतिनंतर हजारों भेटी येऊन पडत होत्या. सैनिक व जनता यांच्यांत आपलेपणा असण्याची जरूरी या प्रसंगांतून मनावर ठसली. जर असे झाले तर ते सैनिक आपले, आपल्यासाठीं मरावयाला तयार झालेले असें वाटून जनतेनें त्यांची सोय केली असती. त्यांत भीति व अहंकार यांना वाव राहिला नसता आणि मग लष्करी शिपायांनींहि जनतेवर हात उगारला नसता. आपण ह्या जनतेचे सेवक आहोंत, आपल्याला अहंकार कशाला असें त्यांना वाटले असते.

परंतु संकटें एकटीं येत नाहींत म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आमचा प्रवास सुखानें जरी नसला तरी चालू होता. औरंगाबादला सकाळपर्यंत पोंचण्याची शाश्वती वाटत होती. परंतु एवढ्यांत डब्याच्या खालून धूर निघूं लागला. लासूर स्टेशनवर डब्यांतून सर्वांना उतरविण्यांत आले. आतां पुढें काय हा प्रश्न होता. डबाहि लहान नव्हता. निदान तीनशें माणसें तरी त्यांत खच्चून भरलेली असतील. एवढ्यांची सोय कशी व्हायची. लासूरसारख्या छोट्याशा स्टेशनावर दुसरा डबाहि मिळण्याची शक्यता नव्हती. परंतु सुदैवानें एका डब्याच्या खिडकींतून सामान आंत ठेवायला व बाहेर उभे रहायला जागा मिळाली. झोंप तर मी म्हणत होती. परंतु पुढें खिडकीच्या तावदानाच्या जागीं अडचणीनें बसण्याची सोय झाली आणि औरंगाबादला पोंचलों.

स्टेशनवरून निझाम सरकारच्या बसेसची व्यवस्था होती. यात्रेच्या निमित्तानें जादा सोय केली होती. एका मोटारीनें मी पैठणला निघालों. निझाम संस्थानांत निझामचें स्वतंत्र चलन असल्यानें फार घोंटाळा होतो. आपल्या सुमारें १३॥ आण्याला त्यांचा रुपया मिळतो. त्यांच्या नाण्यावर सारे उर्दू लिहिलेले. त्यांचा एक आणा चौकोनी, जुना चवलीसारखा गोल. त्यानें घोंटाळा होतो. शिवाय

तेथल्या एक आण्याचे सहा पैसे व आपल्याचे ७ पैसे होतात. ह्या पैशांना खडकू म्हणतात. पण चलनाचा हा सारा घोटाळा निवारण करून भाडें घेतल्यावर 'एकनाथ महाराजकी जय' या जयघोषांत मोटार निघाली. ८॥ ला पैठण. तेथल्या सरकारी शाळेंत विनोबाजी उतरले होते. इकडल्या शाळांच्या इमारती फार सुंदर आहेत. सरकारी इमारती आहेत. मोटारींतून उतरतांच प्रत्येक यात्रेकरूला सक्तीनें कॉलऱ्याची लस टोचीत होते. संगीनधारी पोलीस उतारूंना दटावून तिकडे नेत होता. सुरवातीला मला वाटलें की करोडगिरीसाठीं हें असेल. करोडगिरी म्हणजे जकात. परंतु सेवादलाच्या गणवेशांत असल्यानेंच बहुधा कॉलरा टोचणीतून माझी सुटका झाली असावी. परंतु हें सारें माझ्या मागून लक्षांत आलें.

माझी उतरण्याची सोय विनाबाजी उतरले होते तेथेंच झाली. त्यांच्या सेक्रेटरींनींहि आपुलकीच दाखविली. माझी विनोबाजींच्या सहवासांत राहण्याची इच्छा सफल होणार असल्याचें दिसल्यानें मला आनंद वाटला.

विनोबाजींच्या कार्यक्रमाबद्दल चौकशी करतां समजलें कीं ९॥ वाजतां त्यांचें नाथवाङ्मय उपासक मंडळापुढें व्याख्यान व्हायचें आहे. लगेच व्याख्यानाच्या जागीं गेलों. विनोबाजींचें व्याख्यान भक्तिरसानें ओथंबलेलें होतें. नाथांच्या स्मरणानें डोळ्यांतून अश्रुधारा येत आहेत, गळा कुंठीत होऊन शब्द उमटत नाहींत असें तें पावन दृश्य होतें. भक्तिभावाचें तें एक सुंदर दृश्य होतें नाथांच्या वाङ्मयीन दृष्टीचें सुंदर व सहृदय समालोचन तेथें ऐकावयाला मिळालें. प्रवचन संपलें तरी श्रोत्यांची उठण्याची इच्छा नसावीसे दिसलें. विनोबाजींचें तें प्रवचन अप्रतीम आहे. विनोबाजी म्हणाले—

"माझ्या मित्रांनो,

मी कांहीं वाङ्मयाचा अनन्य उपासक नाहीं. वाङ्मयाबद्दलची माझी दृष्टि नाथांच्या सारखीच आहे. मी या ठिकाणीं आलों तो नाथांचा उपासक म्हणून आलों. समाजसेवा हीच परमेश्वरसेवा मी मानतों. या बाबतींत एकनाथांचें मार्गदर्शन आहे. नाथांच्या ४००० पद्यांतून मी ३०० निवडली व प्रार्थनेपासून



ईश-दर्शनापर्यंत त्यांची विभागवार मांडणी मी केली आहे. 'एकनाथांचीं भजनें' ह्या पुस्तकांत ही माझी निवड आहे.

## नाथांची दृष्टि

नाथांची दृष्टि काय होती? नाथ म्हणतात:

"कनककान्ता न ये चित्ता। तोचि परमार्थी तत्त्वता।
जन तोचि जनार्दन। एका जनार्दनीं भजन।
वाचा सत्यत्वें सोवळी। येरें कविता ओवळी॥

नाथांची ही दृष्टि होती. परमार्थ म्हणजे शास्त्रांचा तात्त्विक काथ्याकूट, चर्चा, असें त्यावेळीं मानीत. बुद्धीचा तो खेळ समजत. परंतु नाथानीं सांगितलें कीं परमार्थांत हृदयाला अधिक महत्त्व आहे. साहित्याची व्याख्या करतांना म्हटलें आहे कीं भाषा-चमत्कृति व शैली हीं साहित्याचीं अंगें. पण नाथानीं त्या काळच्या रूढ कल्पनेला धक्का दिला. त्यानीं सांगितलें कीं सत्य हेंच साहित्य. नाथ सारीं तत्त्वें सांगत. युक्लिडची भूमिती आहे. तसे त्यांचें लिहिणें. तिच्यांत ना अलंकार ना शैली. सरळ सत्य तें तेथे सांगितलेलें असतें. तें अमर साहित्य. अशा अमर साहित्याचा जीवनावर ठसा उमटतो. सत्याला स्वतःचीच स्वयंपूर्ण गोडी आहे. शब्दचमत्कार व शैली यांची न थांना चिंता नव्हती. त्यांना शैलीची चिंता नव्हती, शीलाची कदर होती. शक्तीपेक्षां सत्याची आराधना हवी असें त्यांना वाटे.

## नाथांचें भजन

तुकाराम महाराज परमेश्वर भक्तीनें ओसंडत. परमेश्वराचें नांव घेतांना ते गहिंवरत. भक्ताचें असें वर्णन साहित्यांत असेल. परंतु तुकारामांचें फक्त रडणेंच ध्याल तर ते डोळ्यांतील अश्रू परमेश्वरापासून दूर ठेवणारेहि असतील. तें बाह्य वर्णन म्हणजे शुद्ध भक्तीचें नाटकहि असेल. यासाठीं गीतेनें बाह्य वर्णन नाहीं केलें. द्वेष नसणें, दक्ष असणें, स्वच्छ असणें, असें भक्ताचें वर्णन १२ व्या अध्यायांत केलें आहे. वाणी हें भजन-साधन मानलें आहे. तोंडानें नामाचा गजर करण्याला केवढें महत्त्व. परंतु एकनाथांचें भजन वेगळें. ते म्हणतात:—

जन तोचि जनार्दन, एका जनार्दनीं भजन॥

जनता हाच जनार्दन व जनसेवा ही त्याची भक्ति, असें एकनाथ मानीत. त्यांची ही नवी दृष्टि. फार थोर लोक तुमच्या ह्या भागांत होऊन गेले. गेल्या २००० वर्षांचा येथला इतिहास प्रसिद्ध आहे. पण या दोन हजार वर्षांत झालेल्या थोर लोकांत नाथांचें एकट्यांचें नांव अति मोठें आहे. त्यांचें यश अतिपावन आहे. नाथांच्या थोरवीची तुलना ह्या समोर जाणाऱ्या गोदावरीच्या प्रवाहाशीं होऊं शकेल. इतरत्र आहेत त्याचप्रमाणें पंचमहाभूतें येथें आहेत, पापी कांहीं आहेत तर पुण्यवान् कांहीं आहेत. परंतु पाप्यांचें पाप जिरवण्याइतकें यश नाथांचें आहे. त्यामुळें माझ्यासारखे लोक पावन होऊन जातात. देहानें जरी मी आज येथें येऊं शकत असलो तरी नाथांची व माझी संगत जुनी आहे. देह–संगति ही खरी संगति नव्हेच. मनाची संगति ही खरी संगति. नाथांच्या पावन यशोगंगेत शेकडों स्नानें मी केलीं आहेत. आज तुमच्या भेटीनें मला आनंद झाला. आपल्यावर परमेश्वराची अपार कृपा आहे. येथें अनेक संत झाले. परंतु प्रत्येकाचें कांहीं तरी विशेष असतें. संत्रें गोड, केळें गोड, द्राक्ष गोड. तिन्ही मधुर रसाळ. परंतु प्रत्येकाचें कांहींतरी वैशिष्ट्य आहे. सारे संत थोर परंतु प्रत्येकाचें कांहीं वैशिष्ट्य असतें. महाराष्ट्रीय संतांत नाथांची विशेष जागा आहे. ज्ञानदेव, तुकाराम, रामदास, नामदेव सारे दिग्गज पण नाथांची जागाहि त्यांत विशेष आहे. जशी संत्रें, केळें, आंबा यांची तुलना होऊं शकत नाहीं, सारी मधुर पण वेगवेगळीं, तसे या संतांचेंहि. आणि मला तर तुलना आवडत नाहीं.

## सेवाप्रधान नाथ

साऱ्याच संतांचा सामान्य भाग म्हणजे ईश्वरनिष्ठा व आत्मानुभव. परंतु आत्मा अनंत-गुण व परमेश्वर अनंत-शक्ति असल्यानें त्यांत प्रकार, विविधता. जसे एकाच गव्हाचे अनेक प्रकार करून आपण खातों तसेंच आत्मानुभवाचे, ईश्वरभक्तीचे अनेक प्रकार. नाथांची भक्ति ही इतरांपेक्षां वेगळ्या प्रकारची होती. नाथ जन तोची जनार्दन मानीत. त्यांनीं गुरु व ईश्वर दोन्ही एक केले. परंतु हें त्यांचें वैशिष्ट्य नव्हे. शंकराचार्यांनीं “ भज गोविन्दम् , भज गोविन्दम् ” अशी गुरुलाच परमेश्वर मानण्याची भक्तीची युक्ति केली. परंतु जन तोची जनार्दन मानण्याचा प्रकार नाथांत अधिक स्पष्ट होता. संतांपैकीं कोणी



चिंतन-प्रधान, कोणी प्रेम-प्रधान असतात. परंतु नाथ सेवाप्रधान होते. परंतु प्रेमांत चिंतन व सेवा येऊन जातात, सेवेंतहि चिंतन व प्रेम येऊनच जातें. परंतु ज्या बाजूनें, ज्या दिशेनें माणूस विकास करतो तो रंग त्याच्या एकूण साधनेला चढतो. नाथांची भक्ति सेवावृत्तीनें रंगलेली होती. नाथानीं जनार्दनाची आरती केली. त्यांत ते म्हणतात, ‘ अवलोकितां जन, दिसे जनार्दन ॥ ’ हीं सारीं माणसें त्यांना जनार्दन–स्वरूपच दिसतात. ‘ साखर दिसे परि गोडी न दिसे ’ साखर दिसते पण गोडी दिसत नाहीं. परंतु ती अनुभवता येते. साखरेची गोडी चाखावी लागते. त्याप्रमाणें जन तोचि जनार्दन केव्हां दिसेल ? नाथ म्हणतात “ तया पहावया सांडी अभिमान. ” जोंपर्यंत हा अभिमान सुटला नाहीं तोंपर्यंत हीं माणसें माणसेंच दिसतील. त्यांच्यांत गुण, दोष, विकार आढळतील. परंतु अभिमान गळतांच सर्वत्र ईश्वरच ईश्वर दिसेल. नाथांना जन तोचि जनार्दन वाटतो व त्याची सेवा हीच भक्ति वाटते. नाथांची अशीं शेंकडों वचनें सर्वत्र आहेत.

“ सहज कर्में झालीं तीं ब्रह्मार्पण । जन नव्हे अवघा हा जनार्दन ॥ ”

नाथ म्हणतात जर सेवाकर्में अशीं सहजीं झालीं तर तीं आपोआपच ब्रह्मार्पण होतात. परंतु डोळे फुटलेले असतात. त्यामुळें दोष दिसतात, परंतु एकनाथांना :

‘ जन नोहे अवघा हा जनार्दन ’ असें भासत आहे व इतर संत जनांना हें समजल्यावर त्यांना खूण पटते. ते म्हणतात :

“ आईकतां म्हणती साधुजन । एका जनार्दनीं बाणविली खूण ॥ ”

भगवद्गीतेंतहि असेंच सांगितले आहे. भगवान् म्हणतात :—

“ मज मानव–रूपांत तुच्छत्वें मूढ देखिती ॥ ” मूढ लोक माझें मानव रूप तुच्छतेनें अवलोकितात. त्यांना मानव विकारांनीं बरबटलेले दिसतात. त्यांना ओळखतां येत नाहीं. ‘ जन तोचि जनार्दन ’ हें त्यांना अनुभवतां येत नाहीं. परंतु तत्वग्राही लोक हे आकारनिष्ठ नसतात, प्रकारनिष्ठ असतात.

## शेजारधर्माचा अभाव म्हणून गुलाम

नाथांनीं सेवा हीच भक्ति मानली. त्यांची जनसेवा ही प्राणिमात्र सेवाच होती. आपल्याकडे भूतदया हा शब्द आहे. परंतु त्या व्यापक शब्दामुळें मानव-सेवा आपण विसरलों, तिला पारखे झालों. म्हणून नाथांनीं जनसेवा हा शब्द वापरला. आपण भूतदयेसारखा व्यापक शब्द वापरला, परंतु शेजाऱ्याची काळजी घेण्याचें साधें कामहि केलें नाहीं. म्हणून नाथांनीं 'जन तोचि जनार्दन' असें म्हणून अल्पसंतोश मानला. वास्तविक त्यांना अभिप्रेत 'प्राणी तोचि जनार्दन' असेंच आहे. आपण शेकडों, हजारों वर्षें गुलाम राहिलों याचें कारण भूतदया मानणारे आपण शेजार-धर्म विसरलों हेंच आहे. परंतु नाथांना जंतुमात्र जनार्दन वाटत होता. काशीची कावड रामेश्वराला नेण्यासाठीं त्यांनीं भक्तीनें आणली होती, सोवळें नेसून आणली. परंतु तळमळणारें गाढव पाहून त्याला त्यांनीं ती पाजली. त्याना गाढवांतहि परमेश्वरदर्शन झालें. अशा प्रकारें 'जन नोहे अवघा हा जनार्दन' हें मानतांना जन म्हणजे प्राणिमात्र असा नाथांचा अभिप्राय आहे. नाथांची ही थोर वृत्ति होती.

## वडिलांची ओळख

शांततेचा, अहिंसेचा प्रतिकार ही गांधीजींची जाहीर शिकवण आपण मानतों. परंतु गांधीजींची शिकवण ही आपली शिकवण नाहीं असें महाराष्ट्रांतले कित्येक लोक मानतात. ते म्हणतात, 'जशास तसें' ही आमच्या पूर्वजांची शिकवण आहे. परंतु त्यांना आपल्या आई–बापांची ओळख नाहीं. रेड्याच्या पाठीवर मारलेल्या फटक्यांचे वळ ज्यांच्या पाठीवर उमटले ते ज्ञानदेव आणि थुंकणाऱ्या यवनाला क्षमा करून स्नानसत्याग्रह करणारे नाथ, हे आमचे मायबाप आहेत. आई–बापांची ही ओळख आपण करून घेतली पाहिजे.

## हरीजन प्रेमी नाथ

नाथांचें मंदिर हरिजनांना खुलें झालें आहे. इतके दिवस हरिजनांना मज्जाव होता हें ऐकून तर त्यांना आश्चर्य वाटलें असेल. नाथांनीं श्राद्धाकरितां केलेलें अन्न



हरिजनांना घातलें होतें. आणि तेंहि त्या जुन्या काळांत. चुकलेली महाराची पोर त्यांनीं उचलून कडेवर घेतली, आपल्या धोतरानें तिचा शेंबूड पुसला.

मोरोपंतांनीं नाथांचें वर्णन करतांना म्हटलें आहे :

बा एकनाथा दयाळू अति थोर । दिना जनांचा भारी तुला घोर ।
त्वा अंत्यजाचें घेऊनी कडे पोर ॥

मोरोपंतांना एकनाथांची काय थोरवी वाटते, कोणत्या नाथांचें चित्र मोरोपंत उभें करतात? दीनजनांचा घोर लागलेलें व कडेवर अंत्यजाचें पोर घेतलेले असे नाथ.

## नाथांचें भाषा प्रेम

पुष्कळ लोक म्हणतात नाथांनीं मराठीची खूप तरफदारी केली. मराठीचा त्याना ज्वलन्त अभिमान होता. परंतु त्यांनीं मराठीची जी अमोलिक सेवा केली ती मराठीच्या अभिमानानें नव्हे. त्यांना दीनजनांचा घोर होता. दीनजनांना मराठीच सहज समजणारी असल्यानें त्यांनीं मराठीचा आधार घेतला. संस्कृत जर सामान्य जनतेला मराठीपेक्षां सुलभ असती तर ते मराठीचा अभिमान धरून बसले नसते. त्यांनीं सारपंचाध्यायी लिहिली. काशींत त्यांनीं लिहिलें. तेथले पंडित मराठीचा द्वेष म्हणून मराठीला विरोध नव्हते करीत तर संस्कृतमधील सार-सर्वस्व मराठींत नीट उतरणार नाहीं अशी भीति त्यांना वाटत होती. त्यामुळें संस्कृतविद्या प्राकृतांत आणतांना त्यांचा विरोध होई त्यांत द्वेष नव्हता. आजहि हीच स्थिति आहे. वेदाचें भाषांतर वाचून खऱ्या वेदाची कल्पना येऊं शकत नाहीं. परंतु नाथांचा विश्वास फार जबरदस्त होता. नाथांनीं भागवत त्यांच्या हातीं दिलें. म्हणाले "हे घ्या, वाचून पहा. न आवडलें तर गंगेंत टाका." केवढा त्यांचा आत्मविश्वास! आपली दिव्य कृति त्यांनीं प्राकृत-द्वेषी समजल्या जाणाऱ्या पंडितांच्या हातीं सोंपविली. प्रथम पंडितांनीं शलाका न्यायानें परीक्षा केली. शलाका घेऊन पानें उलटावयाची व निघेल तें पान तपासावयाचें. तें पसंत पडलें तर दुसरें. अशी परीक्षा करायची. एकादें पान नापास तर ग्रंथ नापास व्हायचा. परंतु नंतर पुस्तकाचे पानन पान त्यांनीं अवलोकिलें. ग्रंथाचा जयजयकार त्यांनीं केला. नाथांचा केवढा आत्मविश्वास, केवढी अपार श्रद्धा, नम्रता, निरभिमानता, विरोधकांविषयींहि केवढी आदर-बुद्धि, केवढी सत्याग्रह-निष्ठा! या अनेक गुणांमुळें ते

मराठीची अनन्य सेवा करूं शकले. परंतु ह्या साऱ्याच्या बुडाशीं दीनजनांचा घोर होता. भाषाभिमान नव्हता. महात्माजींनीं मातृभाषा–अभिमान असा शब्द मातृभाषेचा समावेश विधायक कार्यांत करतांना घातला नाहीं. त्यांनीं मातृभाषा–प्रेम हा वापरला. प्रादेशिक भाषांचें प्रेम हवें आहे. त्या प्रादेशिक भाषांचा विकास अभिमानानें नाहीं होणार तर दीनांच्या प्रेमामुळें तो होईल. म्हणून किसान-कामगारांच्या भाषेचा अभ्यास प्रत्येकानें करावा. नाथांनीं मराठी भाषेची सेवा केली किंवा त्यांच्या हातून जी घडली ती मराठीच्या अभिमानानें नव्हे तर दीनांच्या प्रेमामुळें ती झाली.

## पाप दूर करील तें साहित्य

चारित्र्यबळ हेंच तत्त्वज्ञान ते मानीत. सेवा हीच भक्ति असें ते समजत. शील हीच शैली आणि सत्य हेंच साहित्य अशी त्यांची धारणा होती. नाथांचें साहित्य हें असें आहे. मी नाथप्रेमी आहे. त्यामुळें माझ्यापासून सेवा घ्यावयाचा तुम्हाला हक्क आहे. नाथांच्या साहित्याची उपासना करणारांचे तुमचें मंडळ नाथांची ही दृष्टि घेऊन चर्चा करील तर लाभ होईल. भागवतांत शुकदेवांनीं साहित्याची अशीच व्याख्या केली आहे. ते म्हणतात, जनतेचीं पापें धुण्याचें सामर्थ्य ज्यांत आहे तें साहित्य.

" स वाग्विसर्गो जनताघविप्लवः ॥ "

नाथांच्या साहित्यामधें जनताघविप्लत्वाची अपार शक्ति आहे. "

या प्रवचनानंतर आम्ही निवासस्थानीं परतलों. विनोबाजींना भेटावयाला व त्यांच्या सहवासाचा लाभ घेण्यासाठीं अहमदनगर जवळच्या भिंगारहून दिघोळकर आले आहेत. ते पायीं आले. त्यांच्या बरोबर वसंत पळशीकर नांवाचा एक मुलगाहि पायीं आला. मांगें तो मुंबईला गुरुजींच्याकडे आला तेव्हां ओळख झाली होती. तोहि आतां बरोबर राहणार आहे. विनोबाजींच्या सेक्रेटरींचा दामोदरदासजींचा भाचाहि आहे. वेळ येथें कसा जातो तें समजतहि नाहीं. विनोबाजींच्या बरोबर फिरणें, टिपणें करणें व साधनेसाठीं मजकूर पाठविणें यांत बराच वेळ जातो. शिवाय नव्या लोकांशीं ओळखीहि होत आहेत. पुण्याचे सुप्रसिद्ध सर्जन



डॉ. दातार व त्यांच्या पत्नी सौ. सीताबाई. मुद्दाम ते दोघे पैठणला आले आहेत. दातार कुटुंब विनोबाजींसंबंधी अति आदर बाळगणारें आहे.

आज गुरुजींचेंहि पत्र आलें. विनोबाजींच्या बरोबर फक्त पैठणमधे रहावें म्हणून मी मुंबईहून आलों परंतु आतां सबंध हैद्राबाद संस्थानच्या दौऱ्यांतहि रहावें असें गुरुजींचे पत्र आहे. येथल्या कार्यकर्त्यांनीहि विनोबाजींच्या समवेत प्रवासांची सोय करण्याचें आश्वासन दिलें आहे. एकूण बरेच दिवस विनोबाजींचा सहवास लाभणारसें दिसतें.

पू. विनोबाजी तीन दिवस औरंगाबादला होते. नंतर दोन दिवस ते औरंगाबाद जिल्ह्यांत हिंडले. वेरूळ, दौलताबाद, अजिंठा इत्यादि स्थानें त्यांनीं पाहिलीं. औरंगजेबाच्या कबरेजवळ थोडें बोलले म्हणाले म्हणतात. " औरंगजेब मेला तेव्हां म्हणाला माझी कबर नका सजवूं. माझ्या गुरूची सुंदर बांधा. " पैठणमध्यें आल्यावर सकाळीं फिरत फिरत मंदिरें, मठ, सारें अवलोकिलें. नाथवाङ्मयाचा कोठें अभ्यास चालतो का त्यांनीं चौकशी केली. नाथकालीन हस्तलिखित पोथ्या पाहण्याची त्यांना इच्छा होती.

## मुसलमानानें लिहिलेली पोथी

एका मुसलमानानें नाथांच्या वाङ्मयाचा अभ्यास करून लिहिलेली एक पोथी मिळाली. त्या मुस्लीम कवीचें नांव शेख चांद. सायंकाळीं शाळेच्या आवारांत प्रार्थना झाली. प्रार्थना स्वतः विनोबाजींनीं चालविली. त्यांच्या त्या प्रार्थनेचें रेकॉर्डिंगहि झालें. रघुपति राघव राजाराम विनोबाजी म्हणत होते. अति सुंदर तें वाटलें. माझें हृदय सकंप होत होतें. नाथांचें एक भजनहि म्हणाले. प्रार्थनोत्तर प्रवचनांत ते म्हणाले :

" मित्रांनो, नाथषष्ठीच्या उत्सवाला मी प्रथम येत असलों तरी मनानें मी अनेकदां येऊन गेलों. नाथांचें वास्तव्य व समाधि पैठणलाच असें नका समजूं. त्यांचें वास्तव्य, त्यांची समाधि त्यांच्या विचारांत आहे. माझा नाथांच्या विचारांशीं लहानपणापासून परिचय. तदनुरूप आचरण व्हावें म्हणून मी सतत प्रयत्न करीत आलों आहे. ठेंचाळत त्या मार्गानें जात आहे. मी नेहमींच

या अर्थानें पैठणांत आहे. हरिजनांना नाथांचें मंदीर मोकळें झाल्यानें मलाहि संधि लाभली.

## तीर्थस्थानें धर्माचे वसौटे करा

यात्रेच्या या जागा. तीनचारशें वर्षें या यात्रा अखंड सुरू आहेत. श्रद्धेनें लोक येतात, अव्यक्त निष्ठा घेऊन जातात. हीं तीर्थक्षेत्रें, स्वच्छतेचीं, सेवेचीं भक्ति-ज्ञानाचीं आगरें झालीं पाहिजेत. दुर्दैव कीं असें दिसत नाहीं. आपल्याकडील जनतेची अपार श्रद्धा म्हणून हें सर्व चालू शकतें. ही श्रद्धा इतकी कीं ती अनुभवाकडेहि दुर्लक्ष करूं शकते. श्रद्धेचें हें संगोपन जनतेनें केलें हा तिचा फारच मोठेपणा. परंतु यांत आम्हां सेवकांचा मोठेपणा नाहीं. जनतेला येथें अव्यक्तनिष्ठेशिवाय अन्य काहींतरी प्रत्यक्ष मिळायला हवें. हीं क्षेत्रें धर्माचीं जिवंत प्रदर्शनें व्हावींत. मध्यंतरी आपण केवळ जड बनलों होतों. शिवूं नको धर्माचे उपासक झालों होतों. खाण्यापिण्याचे निर्बंध म्हणजे धर्म असें समजत होतों. पुढें भजनमार्ग आला. भजनपूजन करणारे पुढें गेलेले असें वाटूं लागलें. परंतु धर्मात उत्तरोत्तर नवी तपस्या, नवी उपासना ओतली पाहिजे. सदैव उजळा देत राहिलें पाहिजे. नाथांनीं हा उजळा दिला म्हणून ही यात्रा. नाथांच्या पूर्वींहि धर्माला अशी चालना मिळत होती, त्यांच्या काळांतहि मिळाली, त्यानंतरहि मिळत आहे. नाथांच्या वेळेसच उत्तरेकडे तुलसीदास होते. तेहि आपल्यापरी धर्माची शुद्धि करीतच होते. त्यांच्यानंतर महात्माजींनीं व इतरांनीं हें काम केलें आहे. सामान्य जनतेची कल्याणकारी शक्ति व वृत्ति आज जागृत दिसत नाहीं. अखंड सेवा चालली तर ती दिसेल. इतर ठिकाणांहून येथें अधिक स्वच्छता हवी. येथें नित्य ज्ञानचर्चा हवी. अखंड अभ्यास चालायला हवा. नाथांच्या व अन्य संतांच्या वाङ्मयाचा येथें अभ्यास हवा. इतर धर्माचाहि अभ्यास हवा. अखंड ज्ञानाचें वातावरण हवें. आणि त्याचबरोबर सेवाहि हवी. नाथांचें जीवन सेवामय होतें. हरिजनांचा त्यांना किती कळवळा. त्या काळांत त्यानीं त्यांना जवळ केलें. अशी सेवा निरंतर हातून व्हायला हवी. परंतु यात्रेवरच आपण समाधान मानून घेतों हें पुरेसें नाहीं. रामकृष्ण मिशनचे लोक सेवा करतात. ख्रिस्ती मिशनरी सेवा करतात. जगभर महारोग्यांची सेवा त्यांनींच चालवली



आहे. आपण हें शिकलें पाहिजे. या यात्रेच्या स्थानीं तरी पक्षरहित निरहंकार सेवा चालो. सारी मानवजात म्हणजे परमेश्वर आणि आपण सारे सेवक.

## तीन वस्तूंची जरूरी

ज्ञानचर्चा, सेवा आणि स्वच्छता या तीन वस्तु सतत येथें चालोत, असें करूं तर हा नामघोष जिवंत होईल. त्याला तेज चढेल. परमेश्वराचें नांव केवळ तोंडीं नको. तें हृदयांतून येवो. असें नाम यावें म्हणून या तीन गोष्टींची जरूरी.

२१।३।४९ ⁝ ⁝ ⁝

## पहांटेची प्रार्थना

पहाटेला प्रार्थना होते. पहांटेची प्रार्थना आज मी प्रथम ऐकली. गायत्री मंत्रहि मराठींत केलेला म्हणण्यांत येतो. ॐ देहें प्राणें मनें, वर्णीयते सवित्याचें तेज देवाचें ध्याऊं या प्रेरो बुद्धीस आमुच्या ॥ असा हा अनुवाद. मुसलमानी प्रार्थनाहि मराठींत केलेली ऐकली:

" आरंभी देवाचें नाम। कृपाळू जो कनवाळू ॥
स्तुति त्या देवाची प्रभु जो विश्वाचा ॥
कृपाळू कनवाळू। स्वामी शेवटच्या दिवसाचा ॥
तुझी करूं भक्ति। तुझीच रे याचना ॥
सरळ मार्ग दाखीव तूं आम्हां। ज्यावरी तूं करितोसि कृपा त्यांचा ॥
न ज्यांवरी तुझा प्रकोप उतरे। न वा भ्रमित जे त्यांचा ॥

अशी ही प्रार्थना आहे. प्रार्थनेंत ज्ञानेश्वरींतील

" माळिये जेउतें नेलें तेउतें निवांतचि गेलें।
तया पाणियाऐंसे केलें होआवें गा ॥ "

ही ओंवीहि होती. प्राथनेंत माहात्माजींचें आवडतें ईशोपनिषद् मराठींतून सारें म्हटलें जातें. महात्माजींनीं येरवड्यास हें उपनिषद अनेकदां लिहून काढून पाठ केलें होतें. गीतेचें काढलेलें सारहि म्हणण्यांत येतें. हल्लीं विनोबाजी तुलसीदासांची विनयपत्रिका अभ्यासित आहेत. त्यांतील एकेक पद प्रार्थनेनंतर ते समजावतात. विनोबाजी उत्कृष्ट शिक्षक आहेत. समरस होऊन ते समजावून देतात.



## आपेगांवीं

विनोबाजींबरोबर ज्ञानदेवांच्या जन्मग्रामीं आपेगांवीं गेलों. वाटेंत अनेक विषयांवर चर्चा झाली. विनोबाजी म्हणाले, जुन्या वाङ्मयाचा अर्थ वाटेल तसा केला जातो. खोल बघत नाहींत. 'सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें। परंतु तेथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे ॥' यांतील पाहिजे या शब्दाचा अर्थ ' want ' या अर्थी घेतात. परंतु पाहिजे म्हणजे 'देखिजे' see या अर्थी घ्यायला हवा. निराळाच अर्थ दिसूं लागला. कृण्वन्तो विश्वम् आर्यम्। याचा अर्थ सर्वांना आर्य करा असा केला जातो. आर्यसमाजानें हे ध्येयवाक्य ठेवलें आहे. याचा अर्थ केला जातो कीं शुद्ध करून दुसऱ्याला हिंदुधर्माची दीक्षा द्या. परंतु सर्वांना आर्यांसारखें करा असा अर्थ करावा. भाषान्तराबद्दल म्हणाले " भाषान्तराचे भाषान्तर करण्यानें मूळ अर्थापासून आपण दूर जातों. मूळ वापरलेल्या धातूचे चार पांच अर्थ असतात. भाषांतरकार त्यांतून एक घेतो. त्या दुसऱ्या भाषेंतील भाषांतराच्या धातूचे पुन्हां चार पांच अर्थ. त्यांतला एखादा घेऊन हा दुसरा अनुवाद होतो. अशा रीतीनें अर्थ दूर जातो." शेवटीं आपेगांव आलें. ज्ञानेश्वरांचा वाडा पाहिला. ज्ञानेश्वरांचे आजोबा ज्या विठ्ठलाच्या मूर्तीची पूजा करीत ती पाहिली. ज्ञानेश्वरांच्या गांवांत ज्ञानेश्वरी वाचली जात नसल्याचें ऐकून विनोबाजींना कसेसेंच वाटलें. ज्ञानदेवांचा वाडा आज सर्व गांवचा आहे. विनोबाजी गांवकऱ्यांना म्हणाले "येथें जमून ज्ञानेश्वरी वाचीत जा." विनोबाजी विठ्ठल दैवतावर बोलतांना चर्चा करीत होते. पुंडलिकामुळें हें दैवत आलें अशी समज. पण आद्य शंकराचार्यांनीहि कमरेवर हात ठेवून भवसागर इतकाच खोल असें भक्तांना सांगत पांडुरंग उभा आहे असें पांडुरंगाष्टकांत म्हटलें आहे. पंढरपूर हें कर्नाटक व महाराष्ट्र यांच्या सीमेवर असेल तेव्हां. दिगंबर जैनांचाहि तिकडे त्यावेळेस प्रचार. विठोबाची मूर्ति त्यांनाहि आवडावी म्हणून ती दिगंबर ठेवावी, पण आपल्याहि धर्मभावना दुखावल्या जाऊं नयेत म्हणून बाळकृष्ण करून त्याला नग्न ठेवलें. शैवांना संतुष्ट करायला पिंडीचा आकार देऊन डोक्यावर शिदोरीहि आहे असें दाखविलें. अशा रीतीनें ही ऐक्यमूर्ति आहे.

आम्ही पैठणला परतलों. मुसलमान बंधु भेटायला आले होते. चर्चा झाली. सायंकाळीं प्रार्थनोत्तर प्रवचन झालें.

"मित्रांनो, सकाळीं आपेगांवला जाऊन आलों. ज्ञानेश्वरांची ती जन्मभूमि आणि पैठण नाथांची जन्मभूमि. आठदहा मैलांच्या अंतरांत दोन मोठे पुरुष जन्मले. कुराणांत एक उत्तम विचार मांडलेला आहे. "परमेश्वर दरएक जातीला त्यांच्या भाषेंत संदेश देणारा पाठवितो." महंमद असें म्हणून पुढें म्हणतात "अरबींत संदेश द्यायला मी आलों आहे." मराठीसाठीं प्रभूची काय योजना होतो? या प्रश्नाला माझें निःशंक उत्तर कीं त्यानें ज्ञानदेव पाठवले. नाथांच्या ही गोष्ट लक्षांत आली होती. म्हणून त्यानीं ज्ञानदेवाचे भाष्यकार होण्याचें काम पत्करलें. ज्ञानेश्वरीची प्रत त्यानीं दुरुस्त केली. ज्ञानदेवांनीं गोतेचा आत्मा मराठी भाषिकांस दिला. नाथांनीं ज्ञानेश्वरीच्या आधारें भागवतावर लिहिलें. ज्ञानेश्वर ईश्वरी संदेश देणारे, आपण त्यांचे विवरणकार अशी नम्र भूमिका नाथ घेतात. ज्ञानदेवांची भाषा वेंचको, नेमकी नि वेधक. नाथांचो अघळ पघळ असें साहित्याची चर्चा करणारे म्हणतात. तें बरोबर आहे. परंतु नाथांचा तो दोष नसून त्यांच्या भूमिकेचा तो गुणच आहे. ज्ञानदेवांचा संदेश विवरून सांगणें हें काम नाथांचें म्हणून पाल्हाळ आणि तोहि युक्तच. ज्ञानेश्वरी ज्यांना कठिण वाटते त्यांना भागवत सोपें जातें. ज्ञानदेवांचा संदेश सर्वांगसुंदर आहे. नाथांनींहि त्याचें निर्विवाद विवरण केलें आहे. परंतु त्यांच्या विचारांचें स्वरूप काय?

## अद्वैतांत भक्ति ओतणें

एक काळ हिंदुस्थानांत असा होता कीं तत्त्वज्ञानी चर्चा करीत करीत अद्वैतापर्यंत उडी मारते झाले. अद्वैताशिवाय त्यांचें समाधान होऊं शकलें नाहीं. परंतु त्यांत भक्ति कशी ओतायची हा प्रश्न पडला. एक तर अद्वैत घ्या किंवा भक्ति घ्या असा झगडा होता. ज्ञानदेवानीं नि नाथांनीं हा झगडा मिटविला. ज्ञानदेवानीं लेणी पाहिलीं होतीं. लेण्यांत दगड कोरून त्यांतच देव, भक्त, पूजासाहित्य सारें दाखविलेलें असतें. एकाच दगडाचें सारें. दगडी अद्वैतांत जर भक्तीचें चित्र दाखवतां येतें तर इतरत्र कां दाखवतां येऊं नये? ज्ञानेश्वर म्हणतात :

"देव देउळ परिवारु, कीजे कोरुनि डोंगरू,।
ऐसा भक्तीचा व्यवहारु, कां न होंवावा॥"



ज्ञानदेवानीं अद्वैतांत भक्तीची सोय केली. बुद्धीचें व हृदयाचें, दोघांचें समाधान साधलें. ज्ञानेश्वरानीं पूर्ण समाधानाचा संदेश दिला आहे.

## ज्ञानाचा कर्माशीं मेळ

ज्याप्रमाणें अद्वैताचा भक्तीशीं मेळ केला तसाच ज्ञानाचा कर्माशीं घातला. कर्मकांडाचा आत्मज्ञानाशीं विरोध असूं शकतो. परंतु निष्काम कर्मयोगाचा विरोध तर नाहींच उलट एक दुसऱ्याचें साधन, एक दुसऱ्याचें बाह्यस्वरूप असें आहे. ज्ञानेश्वर म्हणतात "ज्यांना आत्मदर्शन झालें त्यानीं सत्कर्माचा धडा समाजाला घालून द्यावा. यासाठींच ज्ञानाचा अवतार असतो. ज्ञान, भक्ति, कर्म, सारें हृदयशुद्धीसाठीं. हृदय शुद्ध व्हावें म्हणून सद्गुणविकास. सद्गुणांची चर्चा दोघांनीं विस्तारानें केली आहे. दोघांना समाजाचा कळवळा. सद्गुणविकासावांचून परमार्थविकास पंगू असतो हें त्यांनीं समाजाच्या चित्तावर ठसविलें. अशाप्रकारें संपूर्ण धर्म त्यांनीं दिला. तोहि अशा प्रकारें कीं त्या मूळ ग्रंथाचा उदार व्यापक व लवचीक अर्थ करून. म्हणून त्यांचें विवेचन धर्मप्रवचन वाटतें, धर्मसंकीर्तन वाटतें. इतरांनीं शब्दचर्चा, अर्थचर्चा केली. परंतु ज्ञानदेव आणि एकनाथ यांचें विवेचन सांगोपांग, अखंड व अनुभवाचें आहे. शब्दांचा जुलूम सहन न करतां परंतु त्यांची रेखाहि न सोडतां त्यांनीं विवेचन केलें.

## सत्त्वपरीक्षक समाज

दोघांचा समाजाकडून छळ झाला. समाजाकडून ज्यांचा छळ होतो त्यांची वाणी चिडखोर होते. परंतु नाथ वा ज्ञानेश्वर दोघांच्या वाणींत चिडखोरपणाचा मागमूसहि नाहीं. क्षमाशील वृत्तीनें समाजाकडून झालेला त्रास विसरून शान्त चित्तानें ते विवेचन करतात. परम शान्ति, सहिष्णुता, सर्वांविषयीं आत्मीय भावना, व्यापक उदार बुद्धि त्यांच्याजवळ होती. कसोटी घ्यायचा जनताजनार्दनाला हक्क आहे असें त्यांनीं मानलें. सत्याग्रहीनें समाजाची टीका पुष्पमाला समजून आदरानें स्वीकारावी. आपण क्षमा करतों आहोंत ही भावनाहि मनीं नसावी. यालाच अनाक्रोशक क्षमा म्हणतात. या दोन्ही महापुरुषांनीं ही थोर दृष्टि दिली आहे. दोघांच्या वाणींत कोठेंच कडुपणा नाहीं.

परमेश्वरानें ज्ञानदेवांच्या द्वारा मराठी भाषेंतून मराठ्यांना सर्वांगसुंदर धर्म दिला. माझी तुम्हांला आग्रहाची सूचना कीं त्यांच्या ग्रंथांचा खोल अभ्यास करा. विश्वासानें, आदरानें, चिकित्सक बुद्धीनें अभ्यास करा. त्यांच्या थोर वचनांचा काळानुरूप प्रगतिशील असा मोकळा उदार अर्थ कराल तर ह्या दोन सूत्रभाष्याकारांकडून, या दोन धर्मसंस्थापक व धर्मप्रचारकांकडून, जीवनभर पुरणारें पाथेय आपणांस मिळेल.''

## सेवादलापुढें

पैठणला सेवादलाची एक शाखा चालते असें समजले होते. त्या मुलांना शोधून काढले. नाशिकला शिकणारीं दोन मुलें आहेत तीं काम करतात. विनोबाजींनीं दलसैनिकांशीं बोलावे अशी त्यांची इच्छा होती. विनोबाजींना भेटून त्यांच्यासाठीं वेळ ठरविला. पैठणला मुलींचीसुद्धां शाखा आहे. विशेष म्हणजे मुलांच्या शाखेअगोदर मुलींची सुरू झाली. विनोबाजींनीं त्यांना दुपारचा वेळ दिला होता. तेथल्या शाखेच्या कामाबद्दलची माहिती विनोबाजींनीं विचारून घेतली. नंतर त्यांना प्रश्न, अडचणी विचारण्यांत आल्या. एक कार्यकर्ता म्हणाला "आतां दोन सेवादलें झाली आहेत. स्टेट कॉंग्रेसचें एक आणि राष्ट्र सेवादल दुसरें. आम्ही कोणाच्या सेवादलांत जावें?" विनोबाजी म्हणाले :

"पैठणचें सेवादल पैठणचेंच असूं द्या. सेवादल कोणत्या पक्षाचें नसावें. त्यानें सेवा करावी. सेवेच्या एका सूत्रांत सारे असा. सर्वांशीं सहकार्य करावें. जीं कामें राहतील त्यांना स्वतः चालना द्यावी. येथें मुलींचें सेवादल अगोदर सुरू झालें हें फार छान. तुम्ही दळायचा व्यायाम कां नाहीं करीत? येथें दोन आणे पायली दळण आहे. जर दोन दोन मुलींनीं अर्धा अर्धा तास दळलें तर महिन्याला ते रुपया सहज मिळवतील. वर्षाचे बारा होतील. शंभर मुलेंमुली येथें आहेत. बाराशें रुपये झाले. हे पैसे तुमच्या श्रमाचे. पालकांकडून वर्गणी घेऊन दलाला देणें त्यांत काय अर्थ? श्रीमंती व्यायाम नकोत. व्यायामहि नीट उत्पादक करा. आज अनुत्पादक व्यायाम आम्हांला आवडतो. दळणाच्या व्यायामाचा प्रयोग १९१७ मधें मी वयाच्या २२ व्या वर्षी केला. आम्हीं कांहीं मुलें सकाळ सायंकाळ जमून दळीत असूं. त्या पैशांतून आम्हीं वाचनालय चाल-



वलें, पुस्तकें आणलीं. पन्नास घरांतून तुम्हीं दळण आणलेंत तर त्या पन्नास घरांत तुमचा संदेश जाईल. त्या घरांत क्रांति जाईल. कलापथकांत नाटकें करतां. त्यानें जागृति होत नाहीं असें नाहीं. परंतु पराक्रम करावा व उत्पादन करावें. पराक्रमानें राष्ट्रांत तेज येईल. वास्तविक शाळांतूनच हें शिक्षण द्यायला हवें. तेथें मिळत नाहीं म्हणून दलामार्फत द्या.

## सारे परदेशी

खेळाचें सामानहि परदेशी. असें नको व्हायला. केवढे हें पारतंत्र्य! मी येथें राहिलों तर चक्कीचा वर्ग काढीन. उद्‌घाटन मात्र स्वतःच्या हातानें करा. नाहींतर कोणाला बोलावून त्याचा हात चक्कीला लागला कीं फोटो घ्याल. आयतोबाला उद्‌घाटनास बोलावूं नका. फोटोपुरते दळणारे पांढऱ्या हाताचे नकोत. धुळ्याच्या तुरुंगांत राजकीय कैद्यांना मी प्रेमानें दळायला लावलें. जेलरनें माझी बदली होऊं दिली नाहीं. साध्या सजेचे सत्याग्रहीहि दळायला येत. इतके ते त्या कामांत रंगले होते. दळा, तसेंच भाजीपाले करा. फुलें लावा. त्यांतून हजार बाराशें रुपये येतील. मग मला बोलवा. मी अवश्य येईन. आपल्या समाजांत श्रमाचा तिरस्कार आहे. तो काढून टाका. दळा, सूत काढा, विणा. दळणासाठीं गिरणीपुढें तासन् तास लोक तिष्ठत उभे असतात. मला नवल वाटतें. जणूं देवाचिये द्वारीं तिष्ठत उभे. केवढी पुरुषार्थ-हानि!

## प्रत्येकानें उत्पादक व्हावें

ज्या देशांत उत्पादन कमी, तेथलि व्यक्ति कोणत्या तरी कारणानें उत्पादनाचे श्रम टाळते, ही चांगली गोष्ट नाहीं. कोणी अभ्यासाच्या निमित्तानें टाळतो कोणी खेळाच्या निमित्तानें. तुम्ही हें बदला. पैठणचें दल कोठें जोडलेलें नसेल तर मार्गदर्शक कोण असें तुम्हांस वाटतें. तुम्हाला का डोकें नाहीं? ज्यांना मार्ग दाखवणारे समजतां तें बहकवणारे असूं शकतील. त्यांच्यापासून विचार मिळण्यापेक्षां विकारच मिळतील. तुम्ही स्वतंत्र विचार करूं नये असें त्यांना वाटते. परंतु तुमचीं डोकीं कां खोकीं? साऱ्यांना एका साच्यांत घालणें का बरें? तुम्ही मी सांगतो तो प्रयोग करा. मग तुमच्यांत तेज येईल.''

पैठणच्या दलांतील मुलींना गीता शिकविण्यांत येते. विनोबाजींच्या सूचने-वरून मुलींनी ९ वा अध्याय सुरेख म्हटला. मुलांच्या हस्तलिखितांतील हस्ताक्षर व कला पाहून विनोबांना बरें वाटलें.

आज पहांटें गाढ झोंपलों होतों. रोज विनोबाजी विनय-पत्रिका मोठ्यानें वाचतात ती ऐकत पडून रहावेसें वाटतें. अर्धा पाऊण तास विनय-पत्रिका म्हटल्यावर मग प्रार्थना होते. आज विनय-पत्रिकेचे मधुर स्वर ऐकत पडलों तों झोंपच लागली. उठलों तो प्रार्थना सुरु झाली होती. विनोबाजी प्रार्थने-नंतर सहसा बोलत नाहींत.

## निर्जीव असून अहंकारी

पण विनोबाजी आज थोडें बोलले. म्हणाले, "माझ्या मनांतीलच चिंतन मी मोठ्यानें करतों आहे समजा. मला आज सर्वत्र निर्जीव व अहंकारी कार्यकर्ते दिसत आहेत. निर्जीवाला अहंकार हवाच कशाला ?"

विनोबाजींबरोबर नंतर एक कार्यकर्ते वैद्य तात्यासाहेब महाजन यांच्याकडे गेलों. त्यांच्या मुलीनें—

"ती पहा, ती पहा, बापुजींची प्राणज्योती, तो पहा"

हें गीत म्हटलें. समोर विनोबाजी जणूं बापूजींची प्राणज्योति होऊन बसले आहेत असें वाटलें. नंतर एका दर्ग्याकडे गेलों. गंगेच्या तीरावरच आहे. नाथ-मौलांचा दर्गा म्हणतात. हे मौला नाथांना प्रथम विरोध करणारे. परंतु मागून नाथप्रेमी झाले तेथें खिडक्यांना हल्लीं गज आहेत एक हिंदू मुलगा मागें येथून खोल पडला. परंतु लागलें नाहीं. पुढें गज बसवले. दहीहंडीचा समारंभ पहा-यला दुपारीं गेलों. विनोबाजी म्हणाले, "हा भोळा भाबडा भक्तिभाव हृदयस्पर्शी आहे. वाटतें आपणहि त्यांत मिसळावें. शरीर दुबळें नसतें तर गर्दींत घुसून मी प्रसाद घेतला असता." रात्रीं आठ वाजतां प्रार्थना होऊन मग प्रवचन झालें.

"येथें बोलण्याचा हा तिसरा प्रसंग. उद्यां मी जाईन. काल्याचा समारंभ पाहून आलों. भक्तिरसाचें तें दृश्य हृदयाला स्पर्श केल्याशिवाय रहात नाहीं. लिन यूटांग म्हणून प्रख्यात चिनी लेखक आहे. तो म्हणतो हिंदुस्थान म्हणजे



भक्तीनें झिंगलेल्यांचा देश ( God-intoxicated ). लिन यू टांगनें भक्ति-भावनेचा देखावा पाहिला असेल. त्यानें हिंदुस्थानच्या साहित्याच्या परिचयावरून तसें म्हटलें.

## सर्वोत्तम साहित्य भक्तीचें

संस्कृत धरून या देशांत पांच पंधरा भाषा आहेत. या भाषांतील सर्वोत्तम साहित्य ईश्वरभक्तीला वाहिलेलें आहे. देशांतील सर्वोत्तम कवित्वशक्ति ईश्वराचे गुणानुवादांत खर्च झाली. ईश्वराच्या वेडानें भारलेलें साहित्य बाजूला काढलेंत तर मग नांव घेण्यासारखें कांहीं उरतच नाहीं. काल्यासारखे प्रसंग पाहिले कीं याची प्रचीती येते. आपल्या देशाच्या हृदयाची अधिष्ठात्री देवता भक्ति आहे. साहित्याच्या बाजूनें, आणि काल्यासारख्या प्रसंगानें ही साक्ष पटते. परतु असें असूनहि व्यक्तीचें व समाजाचें जीवन अपेक्षेप्रमाणें उजळ कां नाहीं ? काळाबाजार तर काळा आहेच, परंतु रोजचा साधाबाजारीह असत्याला वावडें नाहीं समजत. सौदा करणें म्हणजे चातुर्याचें काम येथें मानलें जातें. शिवाय जनतेंत उच्चनीच-पणाच्या कल्पना. अनेक दर्जे लावलेले.

## ईश्वरभक्तीशीं विसंगत

आर्थिक व्यवहारांत सत्याची चाड नसणें आणि सामाजिक व्यवहारांत उच्चनीच भाव या गोष्टी ईश्वरभक्तीशीं विसंगत आहेत. ही विसंगति दवडून सुसंगति कशी आणायची ? याचा उलगडा एका विचारानें होईल. व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवन एकच आहे. समाजांतली उंचांतली उंच व्यक्तिहि समाजाला अवनत स्थितींत ठेवून फार उंच जाऊं शकत नाहीं. या वस्तूचें भान आपणांस अजून झालेलें नाहीं.

"देव अससी तरी आणिकातें करीसी" असें संतांनीं म्हटलें आहे. तूं देव असशील तर तुझ्या देवत्वाचा स्पर्श आम्हांसहि होईल. दुष्ट असशील तर दुष्टताहि समाजाला लागेल. समाजापासून तूं तुटक नाहींस, अलग नाहींस. तुझी मुक्ति तुझी स्वतःची नव्हे. अहंकाराची मुक्ति म्हणजे परिपूर्णता. मुक्ति म्हणजे स्वार्थशून्यता. तुझ्या गुणविकासाचें माप समाजाच्या गुणविकासावरून करतां आलें पाहिजे. परंतु आसपासचा समाज सोडून एखाद्या पर्वतशिखराप्रमाणें उंचच उंच मी अलग राहीन अशा अपेक्षेनें अनेकांनीं प्रयोग केले. त्यांतूनहि लाभ झालाच. कारण डोंगरांचीं शिखरें कितीहि उंच गेलीं तरी जमीनीला सोडूं

शकत नाहींत गौरीशंकरापर्यंत फारफार तर जातील पण सूर्यचंद्राला, ताऱ्यांना गाठूं शकणार नाहींत.

## भक्तिभावनेचा सामाजिक विनियोग

समाज व व्यक्ति भिन्न नाहींत. त्यांचे परिणाम एकमेकांवर होणार. दोघांचें स्वरूप एकमेकांत बिंबप्रतिबिंबाप्रमाणें दिसतें. ही जाणीव झाली तर व्यक्तीच्या भक्तिभावनेचा सामाजिक विनियोग करतां येईल. या विषयीं मी निराश नाहीं. मी अत्यन्त उत्साही आहे.

## साम्ययोगाचा जयजयकार

ज्ञानदेवानीं गीतेच्या आधारें भक्तीची सर्वांना समजणारी अशी कसोटी सांगितली. ती कसोटी म्हणजे साम्ययोग. त्यानीं साम्ययोगाचा जयजयकार केला आहे. परमेश्वर पिता व आपण त्याचीं लेकरें या नात्यानें साम्याची स्थापना झाली पाहिजे. सारे भाऊ भाऊ बनून प्रेम राखूं. लहानांनीं मोठ्याविषयीं आदर दाखवावा. मोठ्यांनीं लहानाविषयीं कृपाळुपणा राखावा. दोघेहि कुटुंबाचे समान अधिकारीच. हें कौटुंबिक तत्त्व सबंध समाजाला लागूं करणें हें भक्तिमार्गाचें सार. पण हें तत्व दैनिक जीवनापासून तोडून हवेंतच ठेवाल, क्षणभर भक्तीच्या आवेशांत भेद विसरून पुन्हां सारें जीवन भेदांवरच उभें करणार असाल तर काय उपयोग? जीवनाचे तुकडे पाडाल तर भक्ति निर्वीर्य होईल. भक्तीच्या आवेशांत जो अनुभव आला त्याच्या स्मरणानें सारा व्यवहार शुद्ध झाला पाहिजे. व्यवहारांत विवेक सुटत नसतो. परंतु विवेक करतांना भक्तीच्या भरांत जो साम्ययोगाचा महान् अनुभव येतो त्याचें जर स्मरण असेल तर आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत साम्य-योग येईल. तेव्हांच भक्ति खरोखर कसाला लागेल. जर हें स्मरण नसेल तर भक्ति खोटी नसली तरी जड होईल. एकाची आई मेली तो रड रड रडला. परंतु पुन्हां पूर्ववत् भोगासक्त होऊन संसारी रमला. दुसरा एक होता, त्याचीहि आई मेली. परंतु शोकाचा आवेग अश्रूंतून नि रडण्यांतून बाहेर न प्रकटितां त्यांतून त्यानें वैराग्याची शक्ति निर्माण केली. सर्व समाजाविषयीं त्यानें मातृभावना करून घेतली व सेवा करूं लागला. शोकाचा त्यानें उत्तम उपयोग करून घेतला. भक्तीच्याहि आवेगाचें असेंच आहे. रडून घालवला तर तो वायां जाऊं शकतो. सावधानता राखून भक्तिभाव धरावा. त्यानें सर्वत्र प्रकाश पसरेल. "

## २३।३।४९ : : :

आज सकाळीं काका नागोरींच्या गांवीं जायचें ठरलें होतें.. काका नागोरीनीं एक ट्रस्ट केला आहे. त्या ट्रस्टच्या कामाविषयीं विनोबाजींकडून मार्गदर्शन त्यांना हवे होते. दिवसभर ढाकेफळला राहून सायंकाळीं औरंगाबादला जायचें होतें. सकाळींच मोटारीनें पैठणहून निघून सारे ढाकेफळला आलों. विनोबाजी आल्यानंतर गांवांत फिरले. गांवाची पाहणी त्यांनीं केली. या गांवांत ट्रस्टचें काम चालावें अशी नागोरीकाकांची इच्छा आहे. ढाकेफळला मांगाचीहि वस्ती आहे. त्यांनीं ख्रिश्चन धर्म स्वीकारला आहे. विनोबाजी तेथें गेले होते. त्यांच्या राहणीमध्येंहि सुधारणा दिसली. घरांवर क्रॉस होते. एकत्र जमण्यासाठीं त्यांना जागाहि होती. सारे मांग रोज एकत्र जमतात. रविवारीं सामुदायिक प्रार्थनाहि ते करतात, भजनें गातात. रेव्हरंड टिळकांचें एक भजन त्यांनीं गाऊन दाखविलें. तेथून विनोबाजी विश्रांतीसाठीं परतलें. आम्ही नागोरीकाकांच्या मळ्यांत गेलों. निझाम हद्दींत घोड्यांचा वापर खूपच आहे. त्यांच्या मळ्यांत सुंदर घोडे बांधलेले होते. विहीरहि चांगली होती. तिच्यांत पोहोलों. जेवणानंतर थोडी विश्रांति घेऊन सारे विनोबाजींच्याकडे गेलों. गोविंदभाई श्रॉफ हे स्टेट काँग्रेसचा मेंदू समजले जातात, ते होते. अच्युतभाई देशपांडे, नागोरीकाका वगैरे स्टेटमधले काम करणारे लोक होते. विनोबाजनीं प्रश्नोत्तर चर्चा नाहीं केली. म्हणाले " मला कांहीं विचार मांडायचे आहेत ते मांडतों.

## संकल्परूप इतिहास

कांहींतरी संकल्प घेऊन जग सुरू होतें. नाना लाटा त्या त्या काळांत उठतात. समाज त्यांवर हेलावतो. व्यक्ति महत्वाच्या नसून ह्या लाटा मह-

त्याच्या. जगाच्या इतिहासाकडे सामग्र्यानें बघाल तर या लाटा तुम्हाला दिसतील. हजार हजार वर्षांची एकेक लाट. जगांतील सारे धर्मसंस्थापक एक हजार वर्षांच्या लाटेंत आहेत. सॉक्रेटीसापासून महंमदाचा काळ घ्या. आपल्याकडेहि बुद्ध महावीर. चीनमध्यें लाओत्सी, कन्फ्युत्सी. नंतर संतांची लाट येते. जगभर दिसते. अशा या जागतिक लाटा, हे महान् संकल्प पहावयास शिकलें पाहिजे. आतां तिसरी लाट आली आहे. ही साम्ययोगाची म्हणू या. साऱ्या जगभर तिचें स्वरूप या ना त्या प्रकारें दिसत आहे. आपलाहि या लाटेला अनुरूप जीवनक्रम पाहिजे. समता येईल अशीं कामें करा. भंगीकाम, सफाई तुम्हीच करा. बाहेरून भंगी आणून नका करूं. जें जें कराल त्यांतून समता येवो. प्रत्येक कर्मातून साम्ययोग आणाल तर खरें काम होऊं शकेल.

## कामाची प्रतिज्ञा करा

साम्ययोगाचें अंग म्हणूनच सर्वांनीं कांतावें, उत्पादक श्रमांत भाग घ्यावा. साम्ययोगाची लाट सर्वत्र येत आहे, या प्रकाशांत काम करा. पैसा गोळा झाला आहे, त्यांतून काम सुरू होईल, अशी नका कल्पना करूं. मदतीनें हानीहि होऊं शकते. कार्यकर्ता सर्ववेळ काम करीत असेल तर त्याच्या योगक्षेमाची व्यवस्था करावी. परंतु त्याला मिंधेपणा वाटूं नये.

आम्ही काय कुणाचें खातों, तो राम आम्हांला देतो ॥

अशी वृत्ति असावी. कार्यकर्त्यांचें नुसतें जीवनच नका चालवूं, त्यांचें शिक्षणहि करा. इमारतींत पैसे नका दवडूं. आधीं कामाची योजना करायची नि मग कार्यकर्ता शिकायला पाठवायचा हें बरें नाहीं. आधीं कार्यकर्ता हवा. मग त्याची वृत्ति पाहून त्याला कोणत्या गांवीं कोणतें काम देतां येईल तें पहावें. जबाबदार माणसानें आधीं कामाला पुढें व्हावें. एक अमेरिकन पत्रकार एकदां रोमेलला शोधायला गेला. तों रोमेल स्वतः टँक दुरुस्त करीत होता. अशी वृत्ति हवी. आपली गणपती सारखी फजिती होते. गणपतीनें उंदीर वाहनासाठीं पसंत केला, परंतु वर नीट बसतां येईना. आपण मुलें पकडतों त्यांच्याकडून काम करून घेतो. मुलें हातची निसटतात. मग ओरडत बसतो. स्वतः श्रम करा



जमनालालजींचा पुतण्या राधाकृष्ण आमच्याकडे होता. मी त्याला ८ तास सुतारी करायला लावीत असे. एखादा तास त्याला रामायण गीता शिकवीत असे. आज नालवाडीचे सरंजाम कार्यालय तो व भाऊ पानसे यांच्यावर उभे आहे. सुतारानें एखादें काम नाहीं म्हणतांच हे दोघे करून दाखवतात. कसें करावें सांगत नाहीं बसत.

## पैसे बँकेंत नकोत

संस्थेचा पैसा बँकेंत नका अडकवूं. मागे चरखा संघाकडे जादा पैसे होते. परंतु ते इयरमार्क केलेले. ते गोसेवा संघाला घेतां येतना. ते बँकेंत ठेवावे लागले. ते पैसे बँक वाटेल त्या धंद्यांत घालते. काम टिकवण्याच्या चिंतेनें बँकेंत पैसे नका ठेवूं. काम टिकविण्याची चिंता असेल तर कामाचा क्षय झाला तरी चालेल. इस्लामनें व्याजावर कठोर प्रहार केला आहे. पैसा खर्चायला नको असेल तर देऊन टाका. जरूर तेव्हां मागतां येईल. फूटबॉलच्या खेळांत चेंडू सारखा इकडे तिकडे गेला तर मौज. चेंडू एकाच ठिकाणी राहिला तर खेळ कोठला? तसाच पैसा खेळता रहावा. " धनकण घरोघरीं " घरोघरचें धन आपलेंच आहे. पैसा जवळ पडून रहात असेल तर आपण कार्यकर्ते कसले ?

समाजवादी जमीनीवर व्यक्तिगत मालकी नको म्हणतात. मी म्हणतों खेडेगांवचें दुकानहि खाजगी मालकीचें नको. खेडेगांवचें दुकान म्हणजे साऱ्या गांवानें एकत्र येण्याचें ठिकाण. जर दुकान गांवच्या मालकीचें झालें तर गांवचा आयात-निर्यातीवर ताबा राहील. व्यसनें जातील. गांवाला काय लागतें, तेथें काय होऊं शकेल. याचा मग विचार होऊं लागेल. तें दुकान अशा रीतीनें ज्ञान देऊं लागेल. दुकानदार यासाठीं चांगला मनुष्य हवा.

## गांवांत भजनी मंडळें

हिंदु, मुस्लीम, ख्रिश्चन सारे जेथें एकत्र येतील अशी भजनी मंडळें गांवांत असावींत. अशानें भेद कमी होईल. कोणतेहि काम करा परंतु त्यांतून साम्ययोग सिद्ध करायचा आहे. ती आलेली लाट आहे, हें कधीं विसरूं नका. "

ढाकेफळहून पुन्हा सारे औरंगाबादला गेले. सरस्वती मंदिराच्या छात्रालयाची कोनशिला विनोबाजींनीं बसविली. तेथेंच प्रार्थना नि प्रवचनहि. परंतु मोटारींत आम्हाला जागा नव्हती म्हणून बैलगाडीनें फाव्यापर्यंत आलों. तेथून पुन्हां पैठणला. बरोबर तात्यासाहेब महाजनहि होते. त्या भागांत त्यांचें चांगलें वजन आहे. ७००।८०० रुपयांची त्यांची प्रॅक्टिस असे. परंतु रझाकारी जमान्यांत सारें सोडून ते कॉंग्रेस कार्य करीत. रझाकारांनीं त्यांच्यासाठीं बक्षीस लावले होते म्हणतात. रात्रीं मोटारनें औरंगाबादला परतलों. पायींच स्टेशनपासून चाललो होतो. शंकरलाल पटेल तेथले स्टेट कॉंग्रेसचे कार्यकर्ते. त्यांनीं आम्हांला पाहून मोटार थांबविली व निवासस्थानीं पोंचविलें.

---

## २४।३।४९ : : :

पहांटे उठून स्टेशनवर निघालों. सकाळच्या प्रार्थनेलाहि हजर राहतां आले नाहीं. जालन्याला गाडीनें जावयाचें होते. जालना हे गांव खूप मोठें आहे. नांवाजलेली ती व्यापारी पेठ आहे. मागे ८ दिवस तेथें मी सेवादलाच्या कामासाठीं होतो. येथील वॉटरवर्क्स पाहाण्यासारखे आहे, वेड्यांचे इस्पितळहि तेथें आहे. आम्ही बरेच लोक रेल्वेनें गेलों. विनोबाजी आमच्या नंतर १–१॥ तासानें आले. घाटे तेथें ॲडिशनल डिस्ट्रीक्ट जज्ज आहेत. त्यांच्याचकडे उतरावयाची व्यवस्था होती. आश्चर्याची गोष्ट येथें पाहिली ती म्हणजे घरांतच कोर्टहि होते. घाटे हे फार लोकप्रिय जज्ज आहेत. त्यांनीं घर बरेच सजवले होते. म्हणी, सुभाषितें भिंतींवर लावली होती. दुपारीं सामुदायिक सूतकताई ठेवली होती. एक जैन भगिनीहि सूतकताईसाठीं आल्या होत्या. समाजांत जी अनीती पसरत आहे त्याबद्दल मोकळेपणानें त्यांनीं विनोबाजींच्याजवळ तक्रार केली.

सेवादलाच्या सैनिकांची माझी ओळख होतीच. विनोबाजींनीं आपल्यापाशीं चर्चा करावी असें त्यांना वाटत होतें. विनोबाजींनीं त्यांच्यासाठींहि थोडावेळ दिला होता. सैनिकांनीं गांवांत चाललेल्या कार्याची माहिती सांगितली. सरकारतर्फे राष्ट्र सेवादलाच्या बाबतींत कसा पक्षपात करण्यांत येतो ते सांगितले तेव्हां विनोबाजी म्हणाले:–

**“कॉंग्रेसदलाइतकेच इतरांसहि स्वातंत्र्य हवे जर शांततेच्या मार्गानें ते जात असतील तर असे माझें मत आहे.”**

## मुसलमानाजवळ चर्चा

नंतर मुसलमान बंधु भेटायला आले. विनोबाजी म्हणाले हिंदुधर्माचा अभ्यास करा. शेखचाँदनें नाथांवर पुस्तक लिहिलें. हिंदु धर्माचा असा अभ्यास कराल तर फायदा होईल.

## भाषा अनेक शिका

तुम्हांला उत्तम मराठी यायला हवे. मद्रासकडले लोक हिंदुस्थानी शिकतात. दक्षिणी भाषा त्यांना येतेच. इंग्रजीहि येते. ते दिल्लींत येऊन नौकरी करतात. परंतु उत्तरेकडचे लोक आपलीच हिंदी राष्ट्रभाषा होणार या भावनेनें इतर भाषा शिकत नाहींत. आपल्याच घरट्यांत बसतात. त्यामुळें घाटयांत जातात.

## खरा धर्म एक, पंथ अनेक

कुराणांत महंमद म्हणाले "खरा धर्म एकच आहे. पंथ वेगवेगळे" ही गोष्ट विसरूं नका.

## शिक्षणासंबंधी

मुस्लीमांजवळच्या चर्चेनंतर अनेक कार्यकर्ते जमले. एका शिक्षकांनीं चर्चेला तोंड फोडलें. ते म्हणाले अलिकडे विद्यार्थ्यांत ज्ञानलालसा नसते. प्रमाणपत्रें मिळविण्यासाठीं शिकतात. वगैरे विनोबाजींची विचारधारा सुरू झाली.

## ४२ सालीं कोठें होतांत सारे ?

"४२ सालीं तुम्ही सारे शिक्षक नि विद्यार्थी कोठें होतां ? ती आणीबाणीची वेळ. साऱ्या संस्था ओस पडायला हव्या होत्या. परंतु शिक्षक शाळेंत शिकवत होते. विद्यार्थी जात होते. त्यांचें लक्ष का असे शाळेत ? कोठें लाठीमार झाला, गोळीबार झाला, इकडे त्यांचें लक्ष असे. शिक्षणाचा त्यामुळें विचका झाला. खरे शिक्षक नि विद्यार्थी त्या काळीं शाळेंत राहतेच ना.



## आतां स्वराज्यांतील शिक्षण हवें

आज स्वराज्य आलें तरी तेंच रद्दी शिक्षण दिलें जात आहे. विद्यार्थ्यांना कसा रस वाटेल? ४२ मधील घटनांचा पुस्तकांत पत्ताहि नाहीं. जुनें रटाळ लिहिणें रसानें कोण वाचवील? तुम्ही म्हणतां विद्यार्थ्यांत उत्साह नाहीं. हिंदुस्तानीच्या परीक्षेस हजारों बसत आहेत. इंग्रजीची जागा राष्ट्रभाषा घेणार. यांतून हा उत्साह आहे. खामगांवच्या राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थी, शिक्षक तुरुंगांत गेले. आज तेथें उत्साह आहे. समर्थ म्हणतातः

"येथें शब्द नाहीं शिष्यासी हे तो अवघें गुरूपाशीं"

विद्यार्थ्यांकडे दोष नाहीं. काय ती इतिहास शिकविण्याची पद्धत ! हा मोंगल पिरियड, हा मराठा पिरियड. ते बादशहा मेले तरी मुलांच्या डोक्यावर त्यांचें ओझें. जहांगीर बादशहा म्हणेल "माझा काळ कसला ? काळानें मला कधींच गिळलें." व्हाइसरायांच्या वंशावळी कशाला ? अमुक काळांत अमुक विचारांचें साम्राज्य होतें, ती कल्पना साऱ्या जगांत कशी आली, वाढली, तें सांगा. जनता राजेमहाराजांना ओळखीत नाहीं. संतांना ओळखते. अहिल्याबाई त्यांना माहीत आहे. विद्यार्थ्यांना विचारांच्या लाटांचा खेळ शिकवा. त्यांना गोडी वाटेल. गणितही हौदांत पाणी किती आलें, गेलें, चहाची मिसळ, असलें नको."

## मत मतांतरें

देशांतील मतमतांतराची मग चर्चा चालली. विनोबाजी म्हणाले, "विचार पूर्वक कोणी मतें बनवतो असें नाहीं. रामदास म्हणाले :—

नाना मतांचा गलबला, कोणी न पुसे कोणाला।
जो जें मतीं सांपडला, तयासी तेंचि थोर ॥

दारू प्यायलेला दारूचेंच समर्थन करतो तसें होऊं लागलें. हें मत कां चांगलें तर माझें म्हणून ! सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा असें म्हणतात. हिंदुस्थान सर्वांहून छान, कां तर, हमारा ! जगांतील इतर देशांत का पराक्रम

चांगुलपणा नाहीं ? अभिमानाऐवजीं भावना अशी असावी कीं मी येथें जन्मलों म्हणून या देशाची सेवा करणें माझा सहज धर्म. आपला मुलगा सर्वश्रेष्ठ असें ठरवून का आई त्याची सेवा करते ? आज धर्माचाहि अभिमान बाळगतात. धर्म म्हणतो अभिमान सोडा. मी अमुक पक्षाचा हा अभिमान दूर करून केवळ सेवा करा.

## शेतकरी कामकरी राज्य

शेतकरी–कामकरी राज्य तेव्हां येईल जेव्हां प्रत्येकजण उत्पादक श्रम करील. कांहींतरी उत्पादक श्रम केल्याशिवाय खाणें पाप वाटावें. आईनें मुलाला हें शिकवावें. आजची शेतकरी कामकरी राज्याची घोषणा काम टाळणारांचा काम करणाऱ्यांना हेवा वाटतो यांतून निघाली. वास्तविक काम न करणाऱ्यांना काम करणाऱ्यांचा हेवा वाटावा. आपला जगाला उपयोग नाहीं, मी दुर्भागी, परिश्रम न करतां खातों, मी पापी, यांतून सुटका व्हायला हवी, असें वाटावें.

नाथ गरीब निवाज है । मैं गहीं न गरिबी ॥

प्रभु गरिबांचा कैवारी. मी जर गरिबी न स्वीकारली तर माझें रक्षण तो कसें करणार ? असे तुलसीदासांना वाटतें. आपल्यासहि असेंच वाटो. पायांनीं न चालतां दुसऱ्यांच्या खांद्यावर बसणें यांत स्वतःची बेइज्जती वाटली पाहिजे. आज एक कामावाचून गंजत आहे, दुसरा अति श्रमानें झिजत आहे. असें दृश्य आहे. दोघांचें मरण. दोघांचें कशानें रक्षण होईल याचा विचार करायला हवा. झिजणाऱ्या चाकूनें थोडे काम कमी करून गंजणाऱ्या चाकूला थोडे काम द्यावें म्हणजे हे साधेल. शेतकरी कामकरी यांचें राज्य यावें असें म्हणणाऱ्यांनीं श्रमाची प्रतिष्ठा स्थापायला हवी नि स्वतः खपलें पाहिजे.

## राष्ट्रीय नि आंतरराष्ट्रीय

चर्चेचा ओघ राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय गोष्टींकडे वळला. विनोबाजी म्हणाले " दृष्टि आंतरराष्ट्रीय ठेवा आणि कृति राष्ट्रीय करा. आपण पाहतों दूरचें परंतु पाऊल जवळ पडतें. पाय पडतो तेथलेंच बघूं तर आंधळेपणा होईल. आंधळा चांचपडत एक पाऊल टाकतो. जगाचें भलें करण्याची दृष्टि ठेवून राष्ट्राचें भलें



करावें. देशाच्या भल्यांत जगाचेंही भलें होऊन जाइल. आंतरराष्ट्रीय दृष्टि असल्यानें संघर्ष टळेल. कृति राष्ट्रीय असावी असें म्हणण्याऐवजीं ग्रामसेवाधर्म असावा असें मी म्हणेन. माझ्या गांवांत सुख, आरोग्य, भक्ति, सेवा, उद्योग असोत आणि दृष्टि आंतरराष्ट्रीय असो. तिच्याहून कमी ही दृष्टीच नव्हे. आन्तरराष्ट्रीय दृष्टीवांचून कल्याण होणारच नाहीं." कम्युनिझम कां फोफावतो कोणी विचारलें. विनोबाजी म्हणाले " सारे आधीं उत्पादक श्रम करूं लागा. श्रम करणारा अपार श्रम करतो तरीहि त्याच्या गरजा भागत नाहींत. एकीकडे आळशी नि एकीकडे झिजून श्रमणारे. कम्युनिस्ट करतात ती सेवा आपण सन्मार्गानें करूं तर लोक त्यांच्याकडे जाणार नाहींत. परंतु तुम्ही सेवा करणार नसाल तर लोक त्यांच्याकडे जातील. माणसाला तहान लागते. तेव्हां जर त्याला स्वच्छ पाणी मिळालें नाहीं तर गढूळहि पितो. परंतु गढूळाची का त्याला हौस असते? तुम्ही निर्मळ सेवा नेऊन द्या. "

विनोबाजींची भूमिका पक्षातीत. त्या भूमिकेचा कोणत्याहि पक्षाकडून स्वतःच्या राजकीय भांडवलासारखा उपयोग केला जाण्याची शक्यता निर्माण होऊं नये म्हणून विनोबाजी अति दक्ष असतात. औरंगाबादच्या प्रार्थनासभेत म्हणूनच त्यांनीं प्रार्थनास्थानीं जाहीर केलें कीं मी कोणत्याहि पक्षाचा नाहीं. जे कार्यकर्ते विनोबाजींच्या प्रार्थना व्यवस्थेंत प्रामुख्यानें भाग घेतात त्यांना त्यांतून आपल्या राजकीय पक्षाला भांडवल मिळविण्याचा लोभ वाटणें सहाजिक आहे. पण विनोबाजी दक्षतेनें असें होऊं देत नाहींत. **जालना येथें स्टेट कॉंग्रेस कार्यकर्त्यांनीं स्टेट कॉंग्रेसतर्फे विनोबाजी येत आहेत अशीं पत्रकें काढलीं व फलक लावले होते. पू. विनोबाजींनीं याबद्दल आपलें असमाधान व्यक्त केलें.**

जालना येथें प्रार्थना-सभेला खूप मोठा समुदाय हजर होता. सर्वपक्षीय व सर्वधर्मीय लोक हजर होते. विनोबाजींचा सत्कार सर्वांतर्फे करण्यांत आला. प्रार्थना झाली. प्रार्थनेनंतर विनोबाजींनीं प्रवचन दिलें. विनोबाजी म्हणाले—

माझ्या बंधूनो व भगिनींनो,

तुमच्या गांवांत मी प्रथमच आलों आहें. इतकी मंडळी, इतका स्त्री-पुरुष समाज प्रार्थनेला जमला ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. तुमच्या गांवांत

निरनिराळ्या प्रकारची सेवा करणाऱ्या संस्था व मंडळें आहेत. जसें सर्व मंडळींनीं मिळून स्वागत केलें त्याप्रमाणें लोकांच्या सेवेंतहि तुम्हांला एकवटून काम करतां आलें पाहिजे. एवढ्या मोठ्या गांवांत १०—१५ संस्था असणें जरूर आहे. सेवेची क्षेत्रें, विभाग अनेक असतात. ह्या दृष्टीनें ही संख्या जास्त नाहीं. अशा सेवा करणाऱ्या आणखी संस्था निघाल्या पाहिजेत. आतां सांगितल्याप्रमाणें त्यांनीं एकवटून सेवा कार्य केलें तर ठीक होईल. नाहींतर अधिक संस्थांमुळें काम बिघडूं शकेल, असेवाहि होऊं शकेल. सेवा करतांना कोणती दृष्टि असावी तीं मांडण्यचा माझा विचार आहे.

## सर्वत्र ईश्वर समजून सेवा करा

आपण जी सेवा करतों ती परमेश्वराची समजून करावी. हें एकच सूत्र असावें. या भावनेनें जर सेवा झाली तर ती सर्व प्रकारें निर्दोष, निर्व्यंग व परिपूर्ण सेवा होऊं शकेल. त्यांतूनच समाजाचें समाधान साधणारव कुठेंहि बिसंवाद निर्माण होणार नाहीं. ही दिशा चांगली आहे, बरकतहि यांतूनच चांगली येणार. परंतु ईश्वरी भावनेनें सेवा करावी म्हटले तरी अर्थ ध्यानांत येत नाहीं. हें सूत्र मोलाचें असूनहि कामाला येत नाहीं. साधारण माणसाला अतिमोलाचें हें सूत्र असल्यानें कमी किंमतीचें, कमी उपयोगी भासतें. लहानशा गावांत १००० रुपयांची नोट न्यावी. ती जशी तेथें मोठी पडते त्याचप्रमाणें ईश्वरभावनेनें सेवा करावी म्हटलें म्हणजे सामान्य माणसाची गति होते. कारण ग्रहणशक्ति अल्प असते. हें सूत्र त्यामुळें चित्तांत ठसत नाहीं. परंतु हें सूत्र असें आहे कीं ज्याच्या जेव्हां चित्तांत ठसेल तेव्हां बाहेरच्या मार्गदर्शनाची जरूरी त्याला भासणार नाहीं. हें सूत्र डोळ्यापुढें नेहमीं असावें. ह्याची जरूरी आहे.

## निरहंकारी सेवेचें मोल

आपण त्याचा तपशील पाहूं, धोरणें कशीं सांभाळायचीं तें पाहूं. हिंदुस्तानांत व जगांत खरी सेवा फार थोडी आहे. जें काम चाललेलें दिसतें तें अहंकाराच्या प्रेरणेनें चाललेलें काम आहे. त्यांतून आत्मसमाधान मिळत नाहीं. किंचित् निरहंकार सेवा करून पहावी, त्याचा अनुभव घ्यावा. केवढें समाधान



लाभतें तें पहावें. एक महत्त्वाचें सूत्र सेवेच्या बाबतींत सांगतो. सेवेची शक्ति अहंकारानें भागली जाते. वीस शेर सेवा असेल व दहा शेर अहंकार असेल तर त्या सेवेची किंमत दोन इतकी होते. जर अहंकार पांच शेर असता तर किंमत चार झाली असती, दोन शेर असता तर किंमत १० होते. अहंकार जसजसा संकुचित होतो तसतशी सेवेची किंमत वाढत जाते. अहंकार कमी असेल तर थोडी सेवा करूनहि शक्ति त्या मानानें अधिक निर्माण होते. अशा गोष्टी आपण ऐकलेल्या आहेत. पुराणांतहि अशा गोष्टी आहेत. सुदाम्याच्या मूठभर पोह्यांची गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे. तिचा अर्थ काय? सुदाम्यानें जे पोहे दिले त्यांत देण्याचा अहंकार नव्हता उलट आपण कांहींच देऊं शकत नाहीं म्हणून ती पोह्यांची पुरचुंडी तो लपवीत होता. भगवंतानें ती पुरचुंडी सोडून घेतली. त्यांतले पोहे प्रेमानें खाल्ले. सुदामा लाजत होता. त्याचा जो संकोच, जी दीनपणाची वृत्ति, त्यामुळें पोह्यांची किंमत वाढली. दुसऱ्या एकाद्यानें लाखों रुपये दिले असते, त्याची पावती मागितली असती, त्या कामाशीं आपलें नांव जोडावें अशी कल्पना केली असती तर देवानें त्या लाखांची काय किंमत केली असती? हस्तिनापुराला जेव्हां भगवान यायला निघाले तेव्हां दुर्योधन त्यांना महालांत नेत होता. पण भगवान् म्हणाले, मला विदुराकडे घेऊन चल.

साधुची झोपडी बरी उद्धवा, साधुची झोपडी बरी ॥
लड्डू अनरसे नाहीं कामाचे, साधुची आंबिल बरी,
उद्धवा साधुची आंबिल बरी ॥
उंच उंच माड्या नाहीं कामाच्या, साधुची झोपडी बरी, उद्धवा साधुची झोपडी बरी ” ॥

विदुराच्या घरीं उतरून भगवंतानें दुर्योधनाचा सत्कार पत्करला नाहीं. अहंकार कमी होत जाईल तसतशी सेवेची शक्ति व किंमत वाढते. सेवेचा अहंकारानें क्षय होतो. सेवकानें सेवेचा आकार न मोजतां कोणत्या वृत्तीनें सेवा होत आहे तें पहावें.

स्वराज्य मिळाल्यामुळें सेवा करणाऱ्यांच्या मार्गातील अडथळा दूर झाला आहे. आतां सेवेचे दिवस आले आहेत. सर्वांनी आतां सेवेला लागावें. सेवेचें शास्त्र समजून घ्यावें. किती अहंकार आहे तें पहा. तो दूर करा. निरहंकार सेवा म्हणजे सेवा करतो आहे असें न वाटणें. आई मुलाची सेवा करते पण तिला विचारलें तर ती काय सांगेल ? ती म्हणेल मी काय करतें ? कांहींच मी करीत नाहीं. वास्तविक सदासर्वदा ती त्यासाठीं जगते, सेवा करते. ही जी मातेची सहज प्रेरणा तशा प्रेरणेनें सेवा झाली पाहिजे. सेवा करतां करतां जर चित्त तपासलें तर योग्य सेवा होईल.

## मतांसाठीं सेवा

सेवा करणारे अनेक लोक अनेक विचारांनीं सेवा करतात. त्यांचें तरच जमूं शकेल जर त्यांच्यांत अहंकार नसेल. संस्था सेवेचें नांव घेतात, पक्ष बनवतात. त्यांतून अभिमान येतो. आपल्या संघटना बऱ्या वाईट मार्गानें करण्यांत व दुसऱ्यांच्या हाणून पाडण्यांत श्रेय वाटते. ह्या पक्षांना सेवा करावी लागते ती मतांसाठीं. सेवेवांचूनहि मतें मिळतील तर ते प्रयत्न करतात. लोभ व दंड यांचा मतें मिळविण्यासाठीं उपयोग केला जातो. खोटेपणाहि तितकासा वाईट मानला जात नाहीं. ही सेवा नव्हे. विटंबना आहे. यांत त्यांचें व देशाचेंहि कल्याण नाहीं.

विचार भिन्न असणें ठीकच. त्यानें समत्व साधतें. सत्याच्या विविध बाजूंचें दर्शन होतें. निरनिराळ्या बाजू समजतात. भिन्न विचार असणें चूक नाहीं पण त्यांत विरोध नको. एकवटून सर्वांना काम करतां आलें पाहिजे. खऱ्या सेवेची, निरहंकार सेवेची ही बाह्य कसोटी. वेगवेगळ्या विचारकांना सहकार्य करतां येतें कां ? जर येत नसेल तर सेवा नसून ढोंग करतो असें समजावें. निरहंकार सेवा वेगवेगळ्या लोकांनीं केली तर त्यांतून सेवेची बेरीज होईल.

## ऐक्याची कसोटी निराग्रही वृत्ति

लहान लहान गोष्टींना, किरकोळ गोष्टींना आपण सिद्धांताचें स्वरूप देतों. किरकोळ गोष्टींत शक्ति एकमेकांविरुद्ध वापरून आपण ती क्षीण करतों.



आपल्या देशांत अनेक धर्म, पंथ, रिवाज, भाषा, प्रांत आहेत पण ही दुःखाची गोष्ट नाहीं. त्यांत मला गोडी वाटते अभिमान. नसेल, ऐक्य असेल, समानता असेल तर गोडी. सहकार्य नसेल, लहान सहान आग्रह सुटत नसेल तर ही विविधता विनाशाकडे नेईल. बाहेरच्या लोकांनीं आपल्या भेदांचा फायदा घेतला. शेकडों वर्षे आपण गुलाम राहिलों. हा इतिहास आहे. तो नको असेल तर हें शिकलें पाहिजे कीं परस्परांचें ऐक्य टिकलें पाहिजे, त्यासाठीं लहान गोष्टींचा आग्रह सोडला पाहिजे, निराग्रह वृत्ति असली पाहिजे, ऐक्याच्या मुद्द्यांचा कार्यक्रम करावा. पक्षोपपक्ष नकोत. निर्विवाद होऊन सेवा करावी. दुसऱ्याचे दोष सांगणें, खंडन करणें नको. लोक तटस्थ बुद्धीनें निर्णय करूं शकत नाहींत. जनतेपुढें वाद नको, निंदा नको, दोष नको. यानें देशाची हानि होईल. सार्वजनिक कामाचा अशानें विचका होतो. ऐक्याची कसोटी निराग्रही वृत्तींत, बारीक सारीक गोष्टींचा आग्रह सोडण्यांत आहे. सत्याचा आग्रह मला नको आहे. सत्य स्वतःची काळजी घेईल. त्यासाठीं आग्रहाची जरुरी नाहीं. मी फक्त सत्य धरावें. या उलट लहानसहान गोष्टींना सिद्धांत म्हणणें म्हणजे आग्रह.

एकत्र बसून विचार करा. कोणतीं सर्वसामान्य. कामें निघतात तें पहा. सर्वांनीं मिळून काम करण्याचा विचार करा. इतर विचार वैयक्तिक चिंतनासाठीं. वैयक्तिक आचरण त्याप्रमाणें करा. म्हणजे त्यानें तें पसरतील. "

प्रार्थनेनंतर सर्व पुन्हां घाटे यांचे घरीं परतलों.

———

२८।३।१९४९ : : :

सकाळीं प्रार्थनेला हजर होतों. प्रार्थनेनंतर विनोबा नास्ता घेतात. त्यावेळीं मोकळेपणानें बोलतां येते ह्या वेळीं त्यांच्याशीं एक लहान मुलगा आला. त्यानें बोबड्या भाषेंत गीता म्हटली. विनोबाजीनीं थोडा वेळ ऐकलें. म्हणाले " लहान मुलें वेडेवांकडें म्हणतात. त्यांच्याकडून वेडेवाकडें संस्कृत पाठ करून घेण्यापेक्षां मराठींतले सोपे अभंग, गीताई पाठ करून घ्यावी. अर्थशून्य पाठांतरानें कांहीं फायदा होत नाहीं. संस्कृत पाठ केल्यानें स्वर्ग मिळतो ही भावना काढून टाकली पाहिजे. " यानंतर आम्ही सारे स्टेशनवर आलों व तेथून परभणीला. स्टेशनवर कार्यकर्त्यांनीं व नागरिकांनीं स्वागत केलें. परभणी चांगलें व्यापारी गांव आहे. येथेंच मराठवाडा प्रांतिक स्टेट कॉंग्रेसची कचेरी आहे. दुपारीं बरेच लोक जमले होते. तेथें बऱ्याच लोकांनीं प्रश्न विचारले. विनोबाजीनीं त्या प्रश्नांना उत्तरें दिलीं नाहींत. पांच मिनिटांत अर्थशास्त्रीय प्रश्नांचीं उत्तरें कशीं देणार व त्यानें समाधान तरी कसें होणार? परंतु कार्यकर्त्यांनीं अभ्यास कसा करावा हें सांगत सांगत त्यांनीं आपली शैक्षणिक दृष्टि जमलेल्यांसमोर मांडली.

## ज्ञानप्राप्तीची तळमळ नाहीं

ते म्हणाले, "प्रश्न तेच तेच येतात. एकाद्या दिवसाच्या भेटींत चर्चा करून अर्थशास्त्राचा निर्णय होत नाहीं. बारीक अभ्यास व चर्चा त्यासाठीं हवी. त्या प्रश्नांवर लिहिलेलें वाचलें पाहिजे. वाचन नसल्यानें ज्या प्रश्नांचा खुलासा झालेला आहे तेच प्रश्न पुन्हा विचारण्यांत येतात. प्रचारशक्ति आमची कमी आहे. आणि ज्ञान मिळविण्याइतकी जागृति नाहीं. पुस्तकें मागवून



अभ्यास करण्याइतकी प्रवृत्ति नाहीं. गांधींचें जें लिखाण आहे त्यांतलें ७५ टक्के तरी प्रश्नोत्तररूपी आहे. त्यांत अनेक प्रश्न येऊन गेलेले आहेत. लेख कोणी वाचित नाहींत. कौतुकानें थोडे लोक पाहतात. जे प्रश्न विचारले जातात त्यांचें उगमस्थान वर्तमानपत्रें. वर्तमानपत्रांवरून आज विचार बनत असतात. वर्तमानपत्रांपलीकडे वाचन जात नाहीं. कांहीं लोक परदेशांतून आलेलीं पुस्तकें वाचून मोकळे होतात. सर्वोदयाचें व्यापक व मोकळें कार्य आहे. जसजसे प्रश्न निघाले तसें सत्याग्रह शास्त्र वाढलें. जनतेनें काम करतां करतां विकास करावा.

## अखंड ज्ञानचर्चा व अखंड काम

विचारधारा ही नदीच्या धारेसारखी हवी. बांधीव तळें नको. बुद्धींत वृत्तपत्रें व पुस्तकें भरलेलीं असतात व त्यावरच चर्चा चालते. थोडक्यांत उत्तरें देऊन भागत नाहीं. त्यासाठीं एकादें मंडळ हवें. आठवड्यांतून व शक्य तर रोज कांहींतरी काम व चर्चा करावी. वाद मात्र नव्हे. गांधीजी जे लढे लढले त्यांचे इतिहास आहेत ते वाचा. चंपारण्याच्या सत्याग्रहाचें वर्णन राजेंद्रबाबूंनीं दिलें आहे. दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहाचा इतिहासहि आहे. हल्लीं पुस्तकेंहि वाचलें जात नाहीं. ते वाचावें आणि चर्चा करावी. पुराण-श्रवणाप्रमाणें सामुदायिक वाचन करावें. आलेल्या मुद्द्यांचें विचारून समाधान करून घ्यावें. पुस्तकें कोणतीं वाचावीं हें विचारावें. काम करावें व थोडें वाचावें. वाचण्यासाठी म्हणून जगूं नये. अखंड ज्ञानचर्चा हवी.

आपलें मनन चिंतन थांबलें आहे. वर्षांत दहा पांच पुस्तकें वाचा व जें पटेल त्याचे लगेच प्रयोग करूं लागा. त्यानें राष्ट्रांत शक्ति येईल, प्रश्न सुटतलि. आज सगळीकडे ठराविक सांच्याच्या गोष्टी झाल्या आहेत. कोणी आलें कीं त्याचा जयजयकार करावयाचा, हार घालावयाचे प्रश्न विचारावयाचे. ह्या ठरीव कार्यक्रमामुळें वेळ फुकट जातो. हे जयजयकार कशाला ? लहानसहान माणसांचा कशाला जयजयकार ? अंबाबाईचा उत्सव म्हणजे अमूक वटणी, अमूक कोशिबीर करायची, हें जसें ठरलेलें, तसेंच ह्या कार्यक्रमांचेंहि होत आहे. यांतून लाभ नाहीं. काम सुरू करा. दोन महिन्यांत जरी एकत्र कामाला लागलांत तरी बळ येईल.

## कपाळावर लेबल कशाला

माणसाच्या कपाळावर कुठल्या तरी राजकीय पक्षाचे लेबल लावलेलें असतें. रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें ‘ जो जे मतीं सांपडला, त्यास तेंचि थोर।’ जो ज्या मतांत सांपडला त्याचें समर्थन करूं पाहतो. अनुकूल असतील त्यांचा जयजयकार व विरोधकांची टवाळी करावयाची. हा कार्यक्रम वेगवेगळ्या पक्षांचा चालू असतो. दोन्हींची टवाळी लोकांनीं ऐकावयाची, दोन शिव्या द्यावयाच्या. यानें चावटपणा मात्र येतो. कार्यनिष्पत्ति न होता टीका होत रहाते. विचारयुक्त टीका नसते, निंदा असते. प्रत्येक पक्षाच्या आपल्या देवता ठरल्या आहेत. समाजवादी व काँग्रेसची पत्रें हेंच करतात. दुसऱ्या पक्षाचें केवढेंहि मोठें काम झालें तरी त्यांत यायचें नाहीं; पण आपल्या पक्षाची अगदीं किरकोळ भानगडहि त्यांत प्रामुख्यानें यावयाची. पूर्वीच्या शैव व वैष्णवांची जशी वागणूक तशी आजच्या पक्षांची असते. मेंदू ठराविक विचारांनीं भरून टाकला की त्यांत नवें कांहीं शिरत नाहीं हल्लीं कॅनव्हसिंग करतात. आर. एस्. एस्. सारख्या संस्था शपथा घ्यायला लावतात लहान मुलें सत्यनिष्ठ असतात. शपथा घ्यायला लावून त्यांचा उपयोग करावयाचा. एका साच्यांत ओतण्याचें व मनुष्याला यंत्र करण्याचें काम सर्वत्र चालूं असल्यासारखें दिसतें. गुलामी वाढतांना दिसत आहे.

## तरुणांना ठोकळे नका बनवूं

तरुणांना साच्यांत घालण्याचे प्रयत्न सर्वत्र चालत आहेत. त्यांना स्वतंत्र होण्यास कोणी शिकवीत नाहीं. सभासदांच्या याद्या काय करतात! हिंदुस्तानांत माणसें पुष्कळ असल्यानें प्रत्येकाला माणसें मिळतात. मग वृत्तपत्रेंहि काढतात. विशाल भूमिका नाहीं, मोकळेपणा नाहीं. एकांगीपणा वाढत आहे. कांहींना मार्क्स हाच प्रमाण. कांहींना वेद, कांहींना कुराण. दुसरें कांहीं वाचतील तर शपथ. एकदां एका मुसलमानाकडे एक चांगला ग्रंथ घेऊन लोक गेले. म्हणाले, “ हा वाचा; चांगला आहे. ” तो म्हणाला, “ कुराणांत नसलेलें यांत कांहीं असेल तर तें वाचणें योग्य नाहीं. त्यामुळें तें निरुपयोगी आहे. जर कुराणांत असलेलेंच यांत असेल तरीहि तें निरुपयोगीच आहे. कारण कुराणांत तें आहेच ” एक तर म्हणाला, कुराणाचा आरंभ ‘ब’ आहे. बिस्मील्ला शब्द सुरवातीला



आहे आणि शेवटीं ‘मिनन्नास’ म्हणजे शेवटचें अक्षर ‘स’ आहे. म्हणजे कुराण वाचलें कीं ‘बस’ आहे. ” कुराणांत पुष्कळ आहे. पण बाहेर नाहींच असें नाहीं. असेंच हल्लीं होत आहे. स्टडी-सर्कल काढून तींच दोन पुस्तकें सर्वत्र वाचतात. विद्यार्थी म्हणजे ज्याच्या डोक्यांत विचार सहज कोंबतां येतात तो. सारे असें समजतात. सरकारहि शिक्षण देतांना असेंच करतें. बनावटी इतिहास शिकविले जातात. एकच घटना पण रशियन विद्यार्थ्यांना वेगळें शिकवितात, जर्मन विद्यार्थ्यांना वेगळें. विद्यार्थ्यांच्या बुद्धीचें यंत्रीकरण चाललें आहे. तरुणांच्यावर हें आक्रमण आहे. व्यापक विचारशक्ति गेली आहे. हिंदुस्थानसारख्या विशाल देशांत ठरीव सांचाचे विचार असतील तर ती भयंकर गोष्ट होईल. **बिहारचे समाजवादी मित्र गांधी स्मारक निधि जमवूं चाहत होते. परंतु त्यांचें सहकार्य घेतलें गेलें नाहीं. काँ. कार्यकर्ते म्हणाले, ‘ ते फंडासाठीं फिरतील तर त्यांचे संबंध खेडोपाडीं येतील. त्यामुळें आमच्याच पक्षाचा विध्वंस होईल.’ सहकार्य मिळत असेल तर तेंहि दुसऱ्या पक्षाचें नको!** अशी सर्व ठिकाणीं संकुचित वृत्ति दिसत आहे. यासाठींच संन्यास कल्पना. संन्यासी डोकें मुंडतो. विचारांचे चिकटलेले केस नकोत. चांगल्या कल्पनांचाहि बोजा नको. आसक्तींतून संकुचितता येते. पायाला दिशा हवी. परंतु डोळा सर्वत्र पाहणारा हवा, मोकळा हवा. बैलासारखें नको. त्या घाण्या-भोवतीं फिरणारा तो बैल. जिथें त्याचा डोळा तिथें त्याचा पाय. आपला पाय एक फुटावर पडतो पण दृष्टि मैलावर जाते. तो घाण्याचा बैल १०।१५ मैल चालूनहि जागच्या जागींच असतो. कारण पायापुरतीच त्याची दृष्टि. आज आपल्याला दर्शन नाहीं, चांचपडत चालत आहोंत. वागण्याला मर्यादा हवी परंतु विचारांना नको. ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रियें यांचें निरीक्षण केलें तर ही गोष्ट सहज लक्षांत येईल. हात मैलभर जाऊं शकत नाहीं पण कान रेडियोनें हजार मैलांवरचें ऐकूं शकतो. पाय इथें राहून लंडनमध्यें काम करील असें नाहीं. रेडियोचेंहि कानावांचून नाहीं ऐकूं येणार. ज्ञानेंद्रियानें व्यापकपणें दर्शन होतें. परंतु ज्ञानेंद्रियांना कर्मेंद्रियांचें बंधन आलें कीं तीं ज्ञानेंद्रियें कर्मेन्द्रियेंच होतात. त्या घाण्याच्या बैलाच्या डोळ्याला जेव्हां कर्मेंद्रियाचें बंधन पडतें तेव्हां तो पुष्कळ चालूनही जागच्या जागीं राहतो तसें होतें.

## रेव्होल्यूशनचें कसलें शास्त्र ?

मी कॉलेजांत होतों तेव्हां अॅडमिनिस्ट्रेशनचें एक पुस्तक होते. तें पाहून चीड येई. त्या पुस्तकांत हिंदुस्थानचा छान कारभार वर्णन केला होता. अगदीं खोटें त्यांत भरलेलें होते. त्यांतून प्रश्न विचारायचे व उत्तरें पुस्तकांतली द्यायची. रेव्होल्यूशनचें शास्त्र आतां शिकवतात. रेव्होल्यूशनचें शास्त्र म्हणजे का युक्लीडची जॉमेट्री आहे. एव्होल्यूशनचें शास्त्र मी समजूं शकतो. पण रेव्हाल्यूशनचें कसलें शास्त्र ? अशारीतीनें सगळीकडे गुलामगिरी वाढत आहे.

## परिभाषेची उपाधि

परिभाषेचीहि तशीच उपाधि झाली आहे. एकदां त्या परिभाषेच्या दुष्ट वर्तुळांत सांपडला कीं सुटतच नाहीं. त्यांतच प्रश्नोत्तरें. परिभाषा घेतली कीं उत्तरें तींच यायचीं. चर्चावाले जसें घेऊन घेतात तसेंच राजकीय पक्षांतहि होत आहे. शपथा काय घेववतात ! आणि ठरीव पुस्तकांच्या बाहेर जातच नाहींत. विविध-दर्शन असलें पाहिजे.

एक गृहस्थ माझेकडे आले व म्हणाले " जैन लोक योगाची निंदा करतात. " तो योगप्रेमी होता. मी त्याला म्हणालों " ते योगाची निंदा करतात ते बरोबर करतात. त्यांच्या म्हणण्याचा व तुमच्या म्हणण्याचा आशय भिन्न नाहीं. त्यांच्या परिभाषेप्रमाणें 'इंद्रियांमधें असक्त होणें' हा इंद्रिययोग. ह्या योगाची निंदा योग्यच आहे. " पारिभाषिक शब्दांमधून ह्या अशा गुंतागुंती होतात. त्यांतून बाहेर पडा. ह्या पारिभाषिक शब्दांमधून बाहेर पडल्यावांचून बोलण्याची सोयच नाहीं. कारण एकदां परिभाषा स्वीकारली कीं विचारहि स्वीकारावे लागतात. व्यायाम प्रचारकांचे असतात तसे आखाडे मग बनतात. 'नमस्कार पाहिजेत, जोरबैठका नकोत' म्हणणारे, 'जोर बैठकाच पाहिजेत नमस्कार नको' म्हणणारे, 'मुद्‌गल हवे' म्हणणारे, पुन्हां त्यांतहि दोन पंथ, हलके मुद्‌गल खूप वेळ फिरवणारे, जड मुद्‌गल थोडा वेळ फिरवणारे. हे पंथ, हे आखाडे तेथें होतात. वैद्यकीय चिकित्सेंतहि तसेंच. कोणी म्हणतात निसर्गोपचारानेंच रोग जाईल, कोणी म्हणतात इंजेक्शननें जाईल, कोणी



म्हणतात रोग वाढविल्यानंतर तो जाईल, प्रत्येक जण सांगत असतो कीं इतर सर्वांकडे रोगी फिरला पण त्याला गुण आला नाहीं. परंतु मी त्याला बरें केलें. रोग्याचा रोग माझ्या पद्धतीनेंच दुरुस्त झाला पाहिजे. जर माझ्या पद्धतीनें तो बरा झाला नाहीं तर तो बरा होण्यासरखा नव्हताच. असें हें चालतें. परमेश्वराच्या मनांत प्रत्येकाला कांहीं यश देण्याचें असतें. परंतु बरें झालेल्यांची यादी डॉक्टर ठेवतो तशी बरें न झालेल्यांची नाहीं ठेवीत. सॉक्रेटिसची आहे ना गंमत. त्याला देवळांबद्दल सांगण्यांत आलें कीं ग्रीसमधल्या त्या देवळांत नेलें कीं रोगी बरा होतो. बरे झालेल्यांची यादी दगडावर कोरून ठेवलेली असे. सॉक्रेटीस म्हणाला, " बरे न झालेल्यांची यादी कोठें आहे? " भावना अशी असतें कीं ' मरणारा देवाकडून मरतो, बरा होणारा माझ्याकडून बरा होतो. ! ' एक म्हातारी माझ्याकडे आली होती. तिचा एक मुलगा जरा उडाणटप्पू निघाला होता. ती म्हणाली " याला मी एवढें वाढविलें परंतु हा ऐकत नाहीं. " 'ह्याला मी वाढविलें' ती असें म्हणाली. मी त्या म्हातारीला म्हटलें " तुम्ही तीं दुसरी दोन मुलें कां मारून टाकली ? " म्हातारी माझ्या प्रश्नानें दिङ्मूढ झाली. जीं मुलें मेली तीं परमेश्वरानें मारलीं आणि हा मुलगा वाढला तो मात्र तिच्या प्रयत्नानें ! तात्पर्य इतकेंच कीं अहंकार धरावयाचा तर पुरा धरावा. सोडायचा तर पुरा सोडावा.

## भेदबुध्दीचे भक्त

धार्मिक सांप्रदायिकता तशीच इतरत्रहि सांप्रदायिकता. व्याकरणांत सांप्रदायिकता, इतिहासांत तेंच. तिकडे खरे एक सांगतील तर इकडे राजवाडे दुसरें सांगतील. किती तीव्रता ! मागें कांहीं महादजीवादी असत, कांहीं नानावादी. महादजीवादी म्हणजे मराठ्यांचें राज्य महादजीनें बुडविलें नाहीं, नानानें बुडविलें म्हणणारे. नानावादी म्हणजे मराठ्यांचें राज्य महादजीनें बुडविलें नानानें नाहीं म्हणणारे. सर्वत्र पंथ, पक्ष, सांप्रदायिकता. ह्याहि पुढें जाऊन पुढें गांवागांवाचे पंथ पडतात. अगोदर संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर इतरांशीं वाद. तो कमी झाला कीं मग महाराष्ट्राची राजधानी कोणती असावी ह्या प्रश्नावर रणें. मग कांहीं नागपूरवादी, कांहीं पुणेंवादी. एका ठिकाणीं भेद निर्माण झाला कीं तो तेथेंच थांबत नाहीं. त्यांतून दुसरे अनेक वाद चालू होतात.

हें सारें होतें याला कारण आपली भेदबुद्धि. तिकडे पंजाबांत अगोदर हिंदु-मुसलमानांचीं भांडणें होतीं. मुसलमान आतां गेले. तेथें हिंदुशीखांत आतां भांडणें होत आहेत. पुढें शीखा-शीखांत, हिंदू-हिंदूंत तीं होतील. बुद्धि भेदवादी, रजोगुणी असली तर असेंच होत राहील. जुनीं भांडणें संपलीं तर लोक नवीं शोधीत बसतील. या भेदबुद्धींतून शक्तीचा क्षय होतो आहे. मनावर हें बिंबवा. कांहीं काम करा. कांहीं अभ्यास करा. बुद्धि मोकळी ठेवा.

## शहाणे करून सोडा बांधूं नका

मागे विद्यार्थी काँग्रेसचे कांहीं कार्यकर्ते माझ्याकडे बोलवावयाला आले होते. मी म्हणालों मी जर तुमच्याकडे आलों तर तुमच्या संघटनेचें वाटोळें होईल. विद्यार्थ्यांनो, संघटनेंत जाऊं नका असें मी त्यांना सांगेन. विद्यार्थी म्हणजे शेर असला पाहिजे. त्याला काय करावयाच्या त्या युनियना. शेरांची कोठें युनियन असते? युनियन शेळ्यांची असते. विद्यार्थ्यांना विचार घेऊं द्या, पण त्यांच्या कोवळ्या वयाचा फायदा घेऊन बांधू नका. पूर्वी म्हणत असत "शहाणे करूनि सोडावे सकल जन." पण हे म्हणतात "शहाणें करूनि बांधावे सकळ जन." लोकांना बांधायचे उद्योग सगळीकडे चालले आहेत. शंकराचार्यांनीं म्हटलें "ज्ञापकम् शास्त्रम् न तु कारकम्" मी विचार देईन, करविणार नाहीं. रस्त्याव-रची पाटी रस्ता कोठें जातो तें दाखवील. हात धरून घेऊन जाणार नाहीं. "न देवाः रक्षन्ति दण्डमादाय पशुपालवत्" मेंढपाळासारखे दण्ड घेऊन देव उभे राहत नाहींत. ते ज्ञापक असतात, कारक नसतात. म्हणणें पटलें नसेल तर तसे वागूं नका. दबावानें जर कोणी आपल्या म्हणण्याप्रमाणें वागला तर दुःख झालें पाहिजे. आणि न वागेल तर आनंद वाटला पाहिजे.

## हात मोजतात नि डोकीं?

हल्लीं पक्ष फुगत आहेत. त्यांत तत्वनिष्ठा नाहीं, विचारशून्यता मात्र दिसते. ही जी पुष्टि भासते ती पांडुरोगाची पुष्टि आहे. तिचा उपयोग कांहीं नाहीं. फक्त मेल्यावर चार माणसें उचलावयाला पुरत नाहींत. मिलमधल्या कामगारांना इंग्रजीत मिलहँड्स म्हणतात. हल्लीं हात मोजतात, डोकीं जणुं नाहींतच. व्होट्स या म्हण-



तात. मागें वर्ध्याला मी काँग्रेस सभासद होतों. फार वर्षें झालीं त्याला. तेथले सगळे प्रकार पाहून मी काँग्रेस सोडली. गांधींना सारें सांगून परवानगी मागितली ते 'सोड' म्हणाले. पुढें १९३४ सालीं त्यांनींहि काँग्रेस सोडली. मी सभासद करीत फिरत असे. दिवसभर मेहनत करून १०।१५ सभासद व्हायचे. इतर लोक फिरत त्यांचे २००।२५० व्हायचे. मला वाटे ह्या भागांत आपला परिचय नाहीं त्यामुळें असें होत असेल. म्हणून मी एके दिवशीं माझ्या मित्रांना म्हणालों, "तुमच्या बरोबर येतो." परंतु तो मित्र म्हणाला, "तें तुमचें काम नाहीं." मी जाऊन त्यांना सारें समजावीत असे. इतर तसें कांहीं करीत नसत. चार आणे घेऊन सही घेतल्याशीं त्यांचें काम.

आतां स्वराज्य आलें. परंतु त्याची उष्णता अनुभवाला कां येत नाहीं? फैजपूरला १९३६ सालीं काँग्रेसच्या वेळीं मी गेलों होतों. आजारी असल्यानें इतर कांहीं करूं शकत नव्हतों. पण मधून मधून आसपासच्या खेड्यांत जात असे. त्यांना सांगे, "तेथें या, अनेक ग्रामोद्योग पहा, जातिभेदातींत वृत्ति पहा." पण लोक म्हणाले,' 'तुमच्या ह्या प्रचारापासून निवडणूकींत धोका आहे. निवडणूकीनंतर हवा तर प्रचार करा. निवडणुकीच्या वेळीं लोक म्हणतील काँग्रेस सव गोलंकार करणारी, तिला मतें नका देऊं." प्रतिपक्षाच्या उमेदवाराची जात पाहून उमेदवार उभा करतात. हा जय काँग्रेसचा का? मागें युद्धाच्यावेळीं चर्चि-ललला लोक म्हणत 'तुमचे वॉर एम्स डिफाईन करा. युद्ध-हेतु सांगा.' चर्चिल म्हणाला, "War aims ! War aim is to win war" युद्ध जिंकणें हा आमचा युद्ध हेतु. पक्षांचें तसेंच असतें. यांतून कल्याण नाहीं. तत्वनिष्ठा, सत्यनिष्ठा धरून कामें करूं. स्वराज्य आल्यानें आतां अडथळे दूर झाले आहेत. कामाला लागा. इंग्रज गेला ही कांहीं लहान सहान गोष्ट नाहीं. गांधींच्या सांगी-प्रमाणें स्वराज्य आणण्याचा आपण प्रयत्न करूं या."

या चर्चेनंतर सायंकाळीं प्रार्थनेला सारे गेले. प्रार्थनेनंतर विनोबाजींचें प्रवचन झालें.

"आज दुपारीं गांवचें कार्यकर्ते व दुसरी मंडळी चर्चेला आली होती. सर्वसाधारण चर्चा झाली. स्वराज्य मिळालें आहे आतां खादीचा उपयोग काय

आणि खादी देशाची गरज भागवील का असा एक प्रश्न विचारला गेला. हा प्रश्न अनेक लोक विचारतात आणि तो चांगला प्रश्न आहे. त्याचा नीट खुलासा झाला पाहिजे. स्वराज्य आपल्याला मिळालें आहे असें आपण समजतों. याचा अर्थ इतकाच कीं बाहेरच्या लोकांचें जें दडपण होतें तें राज्यकारभारांतून गेलें. परंतु तेवढ्यानें ज्याला आपण जनतेचें स्वराज्य म्हणू तें आलें असें होत नाहीं. केवळ एक दडपण दूर झालें किंवा विघ्ननिवारण झालें. तेवढ्यानें काम होतें किंवा काम संपलें असा अर्थ होत नाहीं. उलट विघ्ननिवारण झाल्यामुळें कामाचा खरोखर आतांच आरंभ व्हावयाचा आहे. हिंदुस्थानची सर्वसामान्य जनता खेड्यांमधें राहते. आणि हिशेब जर केला तर मला वाटतें शंभरांतील नव्वद माणसें खेड्यांत असतात. याचा अर्थ असा कीं हिंदुस्तानची मुख्य जनसंख्या खेड्यांतच आहे. आणि हिंदुस्तान हा खेड्यांचाच देश मोजला जाईल. जर इथल्या मुंबई, मद्रास, दिल्ली अशा सारख्या मोठमोठ्या शहरांचें कोणी दर्शन घेईल तर त्याला हिंदुस्तानचें दर्शन झालें असें मुळींच होणार नाहीं. उलट हीं सगळीं शहरें जवळ जवळ एका नमुन्याचीं दिसतील. आणि त्या शहरांवरून कल्पना इतकीच होईल कीं शहरांतल्या लोकांचीं जीवनें सबंध जगभर जशीं बनलीं आहेत त्याच नमुन्याचीं हिंदुस्तानचीहि बनत चाललीं आहेत. परंतु हिंदुस्तानची जी विशेषता आहे ती इथल्या जीवनाची विशेषता खेडयामधेंच पाहायला सांपडणार. विशेषता अनेक प्रकारची आहे. पण मुख्य विशेषता ही आहे कीं इथली जनता सामान्यतः शेतकरी आहे. म्हणजे शेती हाच इथला मुख्य व्यवसाय आहे. आणि इतकें असून शेती माणशीं फारच कमी आहे. सबंध हिंदुस्तानची सरासरी माणशीं पाऊण एकर आहे. म्हणजे पांच माणसें कुटुंबांत धरली तर पावणेचार एकर शेती पडली एका कुटुंबाला. त्यांतून खेडेगांवचे लोकच मोजले आणि ही सगळी शेती त्यांच्या पुरतीच मोजली तर फार फार तर एका कुटुंबाला पांच एकर पडेल. एका कुटुंबाला पांच एकर जमीन म्हणजे अगदीं कमी जमीन आहे. आणि शिवाय हिंदुस्तानची जनसंख्या वाढती आहे. तेव्हां उत्तरोत्तर हें जमीनींचें मान किंचित कमीच होणार. त्या शिवाय इथली जमीन सुमारें दहा हजार वर्षांची नांगरलेली आहे. जशी अमेरिकेची जमीन दोनचारशें वर्षांची ताजी आहे तशी ही जमीन नव्हे. तेव्हां हिला उत्तम खत वगैरे पुरवून दुरुस्त राखणें आणि तिचा कस



जाणार नाहीं अशा बेतानें तिच्यांतून काम घेणें जरूर आहे. हा सगळा विचार जर केला तर शेतकरी हिंदुस्थानच्या नुसत्या शेतीवर अवलंबून राहून कधींहि सुखी होणार नाहीं हें लक्षांत येतें. पांच एकर जमीनीतून जें कांहीं निर्माण होईल तेवढ्यामधें आपल्या सगळ्या गरजा त्यानें भागवायच्या आणि दुसरा जोड-धंदा त्याला नसायचा ही जर कल्पना गृहीत धरली तर शेतकरी आज त्याची जी स्थिति आहे त्यापेक्षां थोडा सुधारला तरी विशेष सुधारणार नाहीं. थोडी सुधारणा म्हणजे काय तर शेतीची कांहीं सुधारणा करतां येईल तेवढ्या मानानें तो सुधारूं शकेल. परंतु तेवढ्यांत त्याचें भागणें शक्य नाहीं. आज शेतीला जोडधंदा म्हणून कोणी म्हणतात गोरक्षण समजावें. मी असें म्हणतों आहे कीं गोरक्षण हा जोडधंदाच नव्हे. तें शेतीचें अंग आहे. गोरक्षण शेतकऱ्यानें केलेंच पाहिजे. दूध तूप त्याच्याकडे झालेंच पाहिजे. पण शेतीमध्यें धान्य, दूध, तूप, हें सगळें मी गृहीत धरतों आणि इतकें गृहीत धरून पुन्हां म्हणतों कीं दूध तूप पैदा करून सुद्धां आज शेतकरी दूध तूप खात नाहीं. तो कां खात नाहीं ? त्याला दूध तूप आवडत नाहीं असें आहे का ? खात एवढ्यासाठीं नाहीं कीं त्याच्या सगळ्या गरजा त्याला विकत घ्यायच्या आहेत. तेव्हां दूधतूप खाण्यापेक्षां तें विकून जो पैसा येईल तो त्याला जास्त मोलाचा वाटतो. जर अशी आपली इच्छा असली कीं त्यानें दूधतूपहि खावें तर त्याला जोड धंदा दुसरा पाहिजे. ज्याच्या योगानें त्याच्या गरजा पुष्कळशा त्याला त्याच्या गांवांतूनच मिळतील, असें झालें पाहिजे. म्हणजे आपल्या प्राथमिक गरजांपुरता तो स्वावलंबी असला पाहिजे. तरच जें कांहीं उत्पन्न करील त्यांतून तो खाऊन बाकीचें विकील. आज धान्य तो विकतो पुढेंहि त्याला धान्य विकायचें आहे. परंतु धान्य त्याच्यापुरतें तो खायला ठेवतो बाकीचें विकतो. तीच स्थिति पालेभाज्या, दूध, तूप यांची झाली पाहिजे. पण आज दुधतूप, फळें, भाज्या जरी शेतकरी निर्माण करतो तरी त्याच्या वापरण्यांत त्या फार थोड्या येतात. वास्तविक विचार जर केला तर खरोखर श्रीमंत शेतकरीच आहे. परंतु पैशाची किंमत वाढविली त्यामुळें ज्यांच्यापाशीं लक्ष्मी नाहीं, कणभरहि लक्ष्मी नाहीं त्यांना आपण श्रीमंत म्हणतो. श्रीमंतापाशीं फळ नाहीं, भाजी नाहीं, दूध नाहीं तूप नाहीं धान्य नाहीं; सगळें मजूरापाशीं, काम करणारापाशीं आहे. परंतु ज्याच्यापाशीं तें आहे तो झाला आहे भिकारी आणि ज्याच्यापाशीं तें नाहीं तो झाला

आहे श्रीमान. कारण त्याच्यापाशीं पैसा आहे आणि पैसा देऊन तो सर्व खरीदतो. आणि याच्यापाशीं जरी सगळ्या वस्तु आहेत तरी याच्या गरजा भागविण्यासाठीं हा त्या सगळ्या वस्तू विकतो. स्वत: वापरत नाहीं. ही स्थिति शेतकऱ्याची आहे. यासाठीं व्यवस्था अशी झाली पाहिजे कीं तो जो कांहीं कच्चा माल आपल्या शेतांतून काढील त्याचा पक्का माल त्यानेंच केला पाहिजे. ज्याचा कच्चा माल त्याचे शेतांत होत नाहीं त्याचा पक्का माल करण्याची जबाबदारी त्याच्यावर नाहीं. तो पक्का माल त्यानें शहरांतून खरीदला तरी चालेल. परंतु त्याच्यापाशीं जर तीळ आहे तर त्याचें तेल त्यानेंच काढले पाहिजे. त्याच्यापाशीं जर ऊंस आहे तर त्याचा गूळ त्यानेंच केला पाहिजे. त्याच्यापाशीं जर कापूस आहे तर त्याची सरकी त्यानेंच काढली पाहिजे. त्याच्यापाशीं जर कापूस आहे तर त्याचें कापड त्यानेंच काढले पाहिजे. त्याच्यापाशी जर सण म्हणजे आंबाडी आहे तर त्याची दोरी त्यानेंच बनविली पाहिजे. अशा प्रकारें ज्या ज्या गरजेच्या वस्तू आहेत आणि ज्यांचा कच्चा माल त्याचे शेतांतूनच निघतो आहे त्यांतून गरजेच्या वस्तू म्हणेज कच्च्या मालाचा पक्का माल त्यानेंच केला पाहिजे. असें जर आपण न केलें आणि त्यानें ह्या वस्तु शहराला विकायच्या, शहरांतून त्याचा पक्का माल बनायचा आणि तो पुन्हां त्यानें खरिदायचा, असें झालें तर त्याला दोन सौदे करावे लागणार. एक त्याच्या कच्च्या मालाची विक्री त्याला करावी लागणार आणि पुन्हां पक्का माल त्याला विकत घ्यावा लागणार. हे दोन्ही सौदे त्याला परवडायचे नाहींत. आणि दोन्ही सौदे करून तो कंगालच राहणार. विकायच्या वेळेला त्याला स्वस्त विकावे लागणार खरीदायच्या वेळेला त्याला महाग खरीदावे लागणार परंतु आपण असें समजू कीं देशांत अशी रचना झाली कीं त्याला विकतांनाहि नीट चांगला पैसा मिळतो, स्वस्त विकावें लागतें असें नाहीं. नेमक्या पैशानें मिळतें असें आपण धरूं. समाजाची अशी रचना झाली असें आपण समजूं. खरेदी विक्रीचा हा जो व्यवहार आहे त्यांत शेतकऱ्यांचें विशेष नुकसान होणार नाहीं असेंहि वाटल्यास धरूं. पण तसें जरी झालें तरीसुद्धां खरेदी–विक्री जोंपर्यंत अशा तऱ्हेची तो करीत राहणार म्हणजे कच्चा माल विकायचा आणि पक्का माल खरीदायचा तोंपर्यंत त्याच्या गरजा तो भागवित नसल्यामुळें खाऊं शकत नाही, पिऊं शकत नाही अशीच त्याची स्थिति राहणार.



त्याच्यापाशीं सगळें पैदा होणार परंतु त्याला तें विकावें लागणार. म्हणून शेतकऱ्याची माझी व्याख्या शेतकरी म्हणजे जो धान्य निर्माण करतो, दूध तूप निर्माण करतो, भाजीपाला निर्माण करतो आणि जितक्या कच्च्या वस्तू त्याच्यापाशीं होतात त्याचा पक्का माल करतो तो. इतकें सगळें त्यानें खेड्यांत केलें पाहिजे तर खेडीं समृद्ध होतील. नाहींतर ज्याप्रमाणें परदेशांनीं हिंदुस्थानला आतांपर्यन्त शोषून घेतलें त्याप्रमाणें शहरें खेड्यांना शोषून घेतील. शहरें आणि खेडीं यांचें सहकार्य होऊं शकतें. जो कच्चा माल खेड्यामधें होत नाहीं, त्याचा जो पक्का माल बनतो उदाहरणादाखल खनिज पदार्थ आहेत किंवा कांहीं लोखंडी अवजारें आहेत, अशा प्रकारच्या वस्तू, शहरांतून जरूर खरीदल्या पाहिजेत खेडेगांवच्या लोकांनीं. परंतु ज्या वस्तुचा कच्चा माल खेड्यामधें आहे त्याचा पक्का माल जर त्यांनीं नाहीं केला व त्या वस्तूसुद्धां जर शहरांतूनच खरेदूं लागले, आपण असें गृहीत धरूं कीं त्यांना त्या स्वस्तहि मिळतात, तरी सुद्धां त्यांचें जीवन सुरळीत होणें शक्य नाहीं.

त्यांचें शोषणच होणार आणि सदा सर्वदा ते शहरावरच अवलंबून राहणार. त्यांच्या जीवनामध्यें समृद्धि येणार नाहीं त्यांचें जीवन नेहमीं क्लेशाचें राहणार हें निसंशय आहे. जर अशी स्थिति असती कीं त्यांच्या जवळ १०—५ एकर जमीन माणशीं पडली आहे तर म्हणतां आलें असतें कीं ती जमीन मशागत करण्यांमधें त्यांचा वेळहि जाईल आणि इतकें गडगंज निर्माण होईल कीं त्यांनी दुसरें कांहीं न केलें तरी चालेल. ती प्राप्ति विकून त्यांनीं जगावें. तें जीवन परावलंबी तर राहीलच पण परावलंबी राहिलें तरी आपण समाधान मानलें असतें कीं ठीक आहे, समृद्धि तरी पुष्कळ आहे. परस्पर अवलंबनाचा एक प्रकार हा झाला. शेतकरी त्याच्या गरजेपेक्षां सगळ्या जिनसा खूप जास्त निर्माण करितो आहे. त्या विकतो आहे. कांहीं त्यांतल्या बापरतो आहे. असें असतें तर त्यांतून निर्माण होणारें दूधतूप सर्व तो खाऊं शकला असता किंवा विकूंहि शकला असता–पण आजची स्थिति अशी आहे कीं तें जें होत आहे तें त्याला खाणें शक्य नाहीं. त्याच्या गरजांच्या वस्तु ज्यावेळीं तो स्वत: निर्माण करील त्याच वेळीं तो कांहींतरी खाऊं शकेल.

## उत्पादनवृद्धि शेतकऱ्यांसाठीं असावी

तेव्हां आपल्यापुढें प्रश्न असे आतां दोन येणार आहेत. एक तर एकूण देशाची उत्पत्ति वाढवावी कशी हा पहिला प्रश्न आणि दुसरा प्रश्न कीं ती जी उत्पत्ति होईल ती शेतकऱ्याच्या पोटांत कशी जाईल, त्याच्या जीवनाला ती कशी उपयोगी पडेल, त्याच्या अंगीं कशी लागेल. त्या उत्पत्तीचें मुख्य गिऱ्हाईक तो स्वतः असला पाहिजे. तो समृद्ध झाला पाहिजे. सगळ्यांत लक्ष्मीवान तो झाला पाहिजे. आणि बाकीचे शहरचे जे लोक आहेत ते त्याच्या दुय्यम गरजा पुरवितात असें झालें पाहिजे. शहरांनीं खेड्यांच्या दुय्यम गरजा पुरवायच्या आणि खेडेगांवांनीं आपल्या स्वतःच्या व बाकीच्या लोकांच्याहि प्राथमिक गरजा पुरवायच्या अशी योजना जर झाली तरच खेडीं टिकतील, तरच खेड्यांना स्वराज्याचा अनुभव येईल.

## वस्त्राचा प्रश्न

प्रत्येकाला कापड वापरावेंच लागतें आणि खेड्यांमधील लोकांनीं बाहेरून कापड खरेदी करायचें म्हटलें तर हा एक डोईकरच झाला. जो लहान मुलालाहि देणें भाग आहे, बाईला देणें भाग आहे आणि आजारी माणसाला देणें भाग आहे. कारण कपड्याशिवाय कोणी जगूं शकत नाहीं. तेव्हां इतर गरजांच्या बाबतींत कदाचित आपण खरीदण्याची सवलत दिली तरी कपडा खरीदण्याची सवलत आपण त्याला देऊं शकत नाहीं. ती सवलत नव्हे. तें त्याचें अत्यंत परावलंबन आहे. त्याच्यावर तो फार मोठा टॅक्स आहे. समजा कीं एका गावांत हजार लोकसंख्या आहे आणि त्या गांवांत माणशीं वीस वार कापड लागतें. मिलचें कापड अगदीं स्वस्त म्हणजे आठ आणे वार आहे असें आपण धरूं तरी त्याचा अर्थ असा झाला कीं दरेक माणशीं १० रुपयांचें कापड तेथल्या लोकांना बाहेरून खरीदावें लागणार. म्हणजे एक हजार लोकसंख्येच्या गांवांतून दहा हजार रुपये बाहेर जाणार आणि त्याच्या बदल्यांत फार फार तर त्यांनीं जो कापूस निर्माण केला आणि जो त्या कपड्यांत खर्च झाला असेल त्याचीच किंमत त्याला मिळाली. तरी फारतर दोन हजार रुपयांचा कापूस त्या दहा हजार रुपयांच्या कापडांत असणार. एकंदरींत आठ हजार रुपयांचा खर्च त्या गांवाला कापडापायीं पडला. म्हणजे दर



माणशीं आठ रुपयांचा टॅक्स बसला. आतां तुम्ही विचार करा कीं शेतावरचा जो कर असतो तो सुद्धां दरेक माणशीं आठ रुपये पडत नाहीं. आणि हा कापडाचा कर माणशीं आठ रुपये पडला आणि एवढा पैसा जर गांवातल्या गांवात राहिला तर तो गांव सुखी होणार नाहीं का? याचा तुम्हीं विचार करा. खादी म्हटली म्हणजे नुसती खादीच नव्हे. तिच्याबरोबर दुसरे ग्रामोद्योगहि येतात. ते सगळे तुम्ही याच्यामधें मोजा आणि नंतर विचार करा कीं या योजनेनें खेडेगांवें कशीं सुखी होतील आणि गोकुळासारखीं कशीं नांदतील. हें चित्र तुमच्या डोळ्यापुढें उभें राहील.

## उत्पादनाचें व्रत घ्या

मला वाटतें कीं हा विषय मी तुमच्या समोर पिंजून मांडला आहे. जर हा तुम्हाला पटला असेल तर मी अशी आशा करीन कीं तुमच्यापैकीं प्रत्येक मनुष्यानें रोज थोडें तरी कातलेंच पाहिजे आणि तें विणवून घ्यावयाची सोय आपण केली पाहिजे. आणि अशा प्रकारें विद्यार्थी, शिक्षक आणि दुसरे लोक जर आपापला कपडा करून घेऊं लागले तर देशामधें चैतन्य निर्माण होईल. आणि संपत्तींत भर टाकल्यासारखें होईल. आज जो उठला तो सांगून राहिला आहे कीं उत्पादन वाढविण्याची गरज आहे. आजच्या आपल्या हिंदुस्थानच्या गिरण्यासुद्धां कपडा पुरा पाडूं शकत नाहींत. त्यांना बाहेरून यंत्रसामुग्री आणायची आहे. ती अजून त्यांना मिळालेली नाहीं आणि आज स्थिति अशी आहे कीं परदेशांतून देखील कपडा मागवावा लागतो. अशा स्थितीमध्यें जर उत्पादन दरेकानें केलें तर फार मोठें कार्य होणार आहे. आणि देशाची सेवा होणार आहे. म्हणून मी अशी आशा करतों कीं तुमच्यापैकीं प्रत्येकानें हें उत्पादनाचें व्रतच घ्यायला पाहिजे. असा नियम केला पाहिजे कीं उत्पादन केल्याशिवाय खाण्याचा अधिकार नाहीं. दुसरी जरी कांहीं सेवा आपण करतो तरी पण ज्या अर्थी आपण रोज खातो त्या अर्थी कांहींतरी उत्पादन आपल्या हातून झालें पाहिजे. आणि असें प्रत्येकाच्या हातून होऊं शकणारें उत्पादन कपड्याचेंच आहे कारण दरेकाला कपडा वापरावाच लागतो. म्हणून जर तुम्हीं प्रत्येकजण आपला कपडा करून घेऊं लागला तर शेतकऱ्यास अत्यंत उत्तम उदाहरण होईल. आणि शेतकरी वर्ग जागा होईल. शेतकऱ्याचें स्वावलंबन सिद्ध होईल. अशा प्रकारें देशामधें एक महान् कार्य होईल, चैतन्य निर्माण होईल.

प्रत्येकाला देशाच्या सेवेचा लाभ मिळेल. प्रत्येक मुलाला सार्थ अभिमान वाटेल कीं मी देशाचीं कांहीं सेवा करतो आहे, देशाच्या संपत्तींत भर घालतों आहें.

## मनुष्याचा विशेष

माणसांमध्यें एक अपूर्व शक्ति देवानें निर्माण केलेली आहे कीं तो आपल्या शक्तीनें निर्माण करतो. मनुष्याची ही विशेषता आहे. कोणतेंहि जनावर उद्योग करीत नाहीं. कोणतेंहि जनावर शेती करीत नाहीं. परंतु आयतें जें सृष्टीमधें मिळतें तेंच वापरतात. मनुष्यच असा प्राणी आहे कीं जो कांहींना कांही निर्माण करीत असतो. मनुष्याला परमेश्वरानें जे हात दिले आहेत ते दरेकाला दिले आहेत. असें नाहीं कीं शेतकऱ्यालाच हात आहेत आणि मजुरालाच हात आहेत दुसऱ्या लोकांना मात्र डोकीं आहेत, त्यांनीं 'खावें प्यावें' आणि डोक्यानें विचार करावा. हात कांहीं त्यांना नाहींत अशी स्थिति नाहीं. तेव्हां हात जर दरेकाला दिले आहेत तर प्रत्येकानें उत्पादनाचे काम करावे. हें व्रत घ्यावे. हा धर्म समजावा, ही उपासना समजावी. या देशामधें याप्रमाणें तुम्हाला महान उपासना उभी करतां आली तर हिंदुस्तानामधें एक शांतिमय क्रांति होईल आणि तिच्या योगानें साऱ्या जगाला मार्गदर्शन मिळेल.

---

## २६।३।४९ : : :

आज सकाळीं प्रार्थना झाल्यानंतर सात वाजतां विनोबाजी जेव्हां फिरायला निघाले तेव्हां मीहि त्यांच्याबरोबर निघालों. गीतेंतील कांहीं भागाबद्दल असलेल्या माझ्या शंका मी विचारल्या त्या शंका तर विनोबाजींनीं निवारल्याच पण त्यानंतर भाषा व शब्दशास्त्रावर त्यांनीं एक सुंदर प्रवचन दिलें. पूर्वीच्या-काळीं गुरुगृहीं विद्यार्थी रहात. प्रत्येक गुरु म्हणजे एक चालतें बोलतें विद्यापीठ असे, असें म्हणतात. विनोबाजींच्या बाबतींत मला ह्याचा अनुभव आला. त्यांनीं शब्दघटनेवर जे विचार सांगितले, जीं उदाहरणें दिलीं तीं लक्षांत ठेवण्याइतकी माझी बुद्धि कुशाग्र नसल्यानें शब्दशास्त्रावरचें एक सुंदर प्रवचन आज तरी लोकांपुढें येऊं शकणार नाहीं. प्रत्येक शब्दाला कसा इतिहास असतो तें विनोबाजींनीं सांगितलें. शब्दांत इतिहासानें कसें सामर्थ्य येतें तें त्यांनीं उदाहरणें देऊन दाखविलें.

## वैराग्यावर हल्ला नको

स्वराज्य शब्द वेदांत, ज्ञानेश्वरींत, भागवतांत कसकशा अर्थानें आला त्याची उदाहरणें त्यांनीं दिलीं. " रवींद्रबाबूंनीं वैराग्य शब्दाचे विरुद्ध वादळ केलें. वैराग्याविरुद्ध त्यांनीं आवाज उठवला. परंतु वैराग्य शब्दामागें इतिहास आहे, अर्थ आहे. रवींद्रांसारख्यानें जरी हल्ला केला तरी तो मरणार नाहीं. या उलट वैराग्याविरुद्ध हल्ला न करतां त्यांनीं हल्लींचे बैरागी जे आहेत ते खोटे आहेत असें म्हणावयाला हवे होते." असें कितीतरी त्यांनीं सांगितलें. वेदापासून ज्ञानेश्वरीपर्यंतच्या ग्रंथांतले उतारेहि ऐकायला व तेही विनोबाजींच्या

तोडून मिळाले. ज्ञानेश्वरांच्या भाषेबद्दल मग चर्चा निघाली. ओवीसारख्या लहानशा छंदांत ज्ञानेश्वरानीं केवढें मोठें तत्त्वज्ञान भरून दिलें. लहान थोरांना सर्वांना समजणारी त्यावेळची भाषा त्यांनीं ज्ञानेश्वरींत वापरली. त्यानीं ज्ञानेश्वरींतलीं कितीतरी उदाहरणें सांगितली. एक पक्षी नेहमीं ओरडतो. विनोबाजींनीं त्याचें नांव 'ठाकोरजी' ठेवलें आहे. त्याचेंहि किती बारीक निरीक्षण. म्हणाले "जास्तीत जास्त ११ वेळां तो 'ठाकोरजी' म्हणतो. अकरा मण्यांची त्याची माळ असते." अत्यंत आनंदानें आमचे फिरणें झालें साधनेबद्दलहि विनोबाजींनीं विचारपूस केली व कांहीं विचार सांगितले.

फिरून आल्यानंतर थोड्या वेळानें आम्ही स्टेशनवर आलों. नंतर परभणीहून नांदेडला आलों. नांदेडला बोधनकरांच्याकडे सुंदर व्यवस्था होती. नांदेड जिल्ह्यांत रझाकारांनीं बराच धुमाकूळ घातला होता. अनेक दुःखें आहेत. पूर्वीं आवश्यकतेहून अधिक धान्य पिकविणाऱ्या जिल्ह्यांत दुष्काळी परिस्थिति आहे. हतगांव तालुक्यानें सर्वांत अधिक त्रास सहन केला. शेतकऱ्यांच्या जवळ बैलहि उरले नाहींत. रझाकारांनीं मारून खाल्ले. कार्यकर्ते काम करीत आहेत. दुःख निवारण्याचे प्रयत्न करीत आहेत. जिल्ह्यांतूनहि वेगवेगळ्या तालुक्यांतले कार्यकर्ते आले होते. समाजवादी पक्षाचेहि मदन सावंत, बाहेती वगैरे होते.. गोविंददासभाई श्रॉफहि बरोबर आहेत. हैद्राबाद स्टेट काँग्रेसचा मेंदू त्यांना समजतात. धीरगंभीर त्यांची मुद्रा. त्यांनीं विनोबाजींना प्रश्न विचारला. "स्वातंत्र्यानंतर एक ध्येय राहिलें नाहीं, एक प्रेरक शक्ति नाहीं. काँग्रेसचें (Co-operative Common-wealth) को-ऑपरेटिव्ह कॉमन्वेल्थ हें ध्येय तितकेंसें प्रेरक वाटत नाहीं. प्रभावी प्रेरक शक्ति नसल्यानें अधिक नवे कार्यकर्ते पुढें येत नाहींत. यासाठीं काय करावें" असा त्यांचा प्रश्न. विनोबाजींनीं त्या दृष्टीनें आपले विचार मांडले. ते म्हणाले "स्वराज्यानंतर लोकांच्या मनांत पारतंत्र्याचा आरंभ होतो. पारतंत्र्यांत असेपर्यंत लोकांचीं मनें स्वतंत्र असतात. आपल्यालाच सारें करावयाचें आहे असें त्यांना वाटतें परंतु स्वातंत्र्य मिळाल्यावर सर्वांची सर्व कामें सरकारनेंच करावीं असें वाटतें. कांहीं कार्यकर्ते सरकारांत गेले आहेत. कांहीं संसारांत आता लागणार. गेलीं कितीतरी वर्षें ते काम करीत आहेत. त्यांचा संसार उध्वस्त झाला



आहे. आतां संसार थोडा सावरावा असें त्यांना वाटले तर त्यांत कांहीं चूक आहे असें नाहीं. शिल्लक कार्यकर्ते फार थोडे आहेत. लोकहि सरकारकडून फार अपेक्षा करतात. व्याख्यानांतून पूर्वीं अतिशयोक्तिनें भाषणें दिलेली असतात, आणि आमचें साहित्य अतिशयोक्ति हा अलंकार मानते. तीं भाषणें आतां अंगावर उलटतात. १५ ऑगस्टला स्वातंत्र्य मिळविल्याचा मोठा उत्सव आम्ही केला. आतां लोक म्हणतात स्वातंत्र्य आलें आहे तर फळ टाका. सर्वांनीं त्या दिवशीं दिवे लावून स्वातंत्र्य आल्याचें सांगितलें. आतां पराक्रम करा. जर गुपचूप स्वातंत्र्य आलें असतें व आम्ही दिवे लावले नसते तर लोकांनीं इतक्या अपेक्षा नसत्या केल्या. पूर्वीं तुम्ही असंतोषाचे जनक होता, आतां तो असंतोष काढून टाकणारे व्हायला पाहिजे व तो अहिंसेशिवाय होणार नाहीं. ह्या असंतोषांतून मग पक्षभेद होतात. उद्योगशीलतेऐवजी आपलें आसन स्थिर करण्याकडे मग लक्ष लागते. पंजाबांत आज फार विचित्र परिस्थिति आहे. तेथें आर्. एस्. एस्., हिंदू, शीख, कम्युनिस्ट, सोशलीस्ट आहेत. काँग्रेसमधेंहि दोन पक्ष. तेथें राज्य निभावणें हेंच मोठ्या गुणगौरवाचें झालें आहे. इतर चांगले काम दूरच राहिले. शुद्धसेवा भावनेनें सेवा करा. रचनात्मक कार्य करा. तक्रार-निवारण कार्य करा. शाश्वत मूल्यें बिंबविण्याचें काम करा. सरकारी नोकरींतहि कांहीं जातील. परंतु तेथें जाऊन सेवा होतेच असें नाहीं. कारण तेथें बरेचसे नोकर जुनेच असतात. दहांत एकादा नवा असणार. दांतांतल्या जिभेसारखें त्यांचें होते. कार्यकर्ते अडकून पडतात. राज्ययंत्र हातांत येतांच सेवा-कार्य बंद पडूं नये. राज्ययंत्रांत जे काम करतात त्यांच्याशिवाय स्वतंत्र सेवक वर्ग राहूं द्या. जर सेवकवर्ग आपल्याजवळचा संपला तर विरोधी लोकांचा वर्ग उभा राहील. सेवकवर्ग असावा. तो सहकार्य करणारा असेल. प्रसंगीं सत्याग्रही विरोध करणाराहि तो असावा.

खेडोपाडीं संघटना उभी राहिली पाहिजे. लोकांच्या सहकार्यावर जर ती उभी राहील तर ती जास्त प्रभावी ठरेल. सामाजिक भावना असलेल्या माणसांनीं एकत्र येऊन कार्य करावें. तेथल्या माणसांच्या कलानें विविध कामें सुरू व्हावींत.

## गांधीजी दुवा होते

आतांपर्यंत अपल्याजवळ ‘ निगेटिव्ह ’ नकारात्मक ध्येय होतें. परकी राज्य नाहींसें करण्याचें ध्येय, विघ्न निवारण्याचें ध्येय. परंतु तें निवारण्यासाठीं योजावयाच्या मार्गांत भेद होते. परंतु गांधींनीं त्यांना एकत्र आणलें व एकत्र ठेवलें. अराजक मार्गावर विश्वास असलेले, नेमस्त, सार्‍यांना गांधींनीं एकत्र ठेवलें. पूर्वी सारे एकत्र होते ते एका ध्येयामुळें एकत्र होते असें नाहीं. जहाल मवाळांच्या मारामार्‍या झाल्या आहेत. त्यांचा ध्येयवाद एक होता म्हणून ते एकत्र नव्हते. गांधीजी हा त्यांना सर्वांना एकत्र ठेवणारा दुवा होता.

## सर्वोदय शब्द कां ?

स्वराज्य आपल्याला हवें होतें ते गरिबांच्या दुःख निवारणासाठीं. हें ध्येय सार्‍यांना पटेल. काँग्रेसच्या स्थापनेपासून हें ध्येय आहे. विघ्न गेलें आतां तर कामाला लागलें पाहिजे. दुःख कोणत्या मार्गानें दूर करावयाचें ह्या प्रश्नावर मतभेद होणारच. साधनांसंबंधीं हा मतभेद आहे. दुःखितांचें दुःख आहे. श्रीमंतांना समाधान नाहीं, आरोग्य नाहीं. तेहि दुःखी आहेत. इकडे गरिबहि दुःखी आहेत. त्या दोघांचें दुःखनिवारण झालें पाहिजे. त्यांचा उदय झाला पाहिजे. तुलसीदासानें म्हटल्याप्रमाणें ‘बडोंकी बडाई, छोटोंकी छोटाई, दूर करो’ म्हणजे मोठे समजले जाणारांची मोठेपणाची उपाधी, छोटे समजले जाणारांची छोटेपणाची उपाधि दूर व्हावी. यासाठींच सर्वोदय हा शब्द आम्ही काढला.

## श्रमनिष्ठ हाच खरा श्रीमंत

आज गरीबांचें सुख म्हणजे श्रीमंतांचा मत्सर ही व्याख्या झाली आहे. श्रीमंतांचें जिणें किती पराधीन ! त्यांना अन्नहि पचत नाहीं, प्रेम मिळत नाहीं. ही का हेवा करण्यासारखी स्थिती ? श्रीमंतांनींच गरीबांचा मत्सर करावा. त्यांना मोकळी हवा मिळते. दगडावर पडले तरी त्यांना गाढ झोंप येतें. आरोग्यहि त्यांना असतें. श्रीमंतांना त्यांचा हेवा करावयाला शिकवावें त्यांना मजुरी करावेसें वाटलें पाहिजे. त्याला सांगितलें पाहिजे कीं शेती कर, नांगर फिरव, निंदणी कर.



नागोबा नको होऊस. उगीच भलत्या नादी लागून आनंद कां गमावतोस ? तुझें जीवन कांहीं चांगलें नाहीं. श्रीमंताचें कांहीं काढून घ्यावयाचें आहे असें नाहीं. आहेच काय त्यांच्याजवळ ! थोडेसे कागद, रंगीबेरंगी दगड आणि थोडीशीं पिस्तुलें आहेत त्यांच्याकडे. शेतकरी पिस्तुल रोखल्यानें आपल्या स्वतःच्या गरजा न भागतांहि वस्तु कां देतो ? मांहोर रोखल्यानें कां देतो ? कारण त्याला बाहेरून आपल्या गरजा खरिदाव्या लागतात. वास्तविक श्रमनिष्ठ हा खरा श्रीमंत. दूध काढणारा जर प्यायला तर त्याचे हात कोण धरील ? पैशाचें महत्त्व ठरविल्यानें पैसेवाला श्रीमंत ठरला. पैसे ज्याच्याजवळ तो श्रीमंत असा जप करून त्याला श्रीमान् ठरविलें. परिश्रमनिष्ठ हे खर्‍या अर्थानें श्रीमंत आहेत. आपल्या गरजा अगोदर त्यांनीं भागवाव्या असे त्यांना शिकविलें पाहिजे. मग ते दूध खाऊन उरलें तर विकतील. तूप खाऊन उरलें तर विकतील. पैशावर जीवन उभारणें भयानक आहे. लांच एवढी सर्वत्र कां ? करोडो लोक का खोटे ? लबाडाला कारभारी केल्यानें हे होत आहे. आज कारभारी आहे पैसा, आणि तो लबाड आहे. रुपयाची किंमत तरी किती फसवी ! पूर्वी पांच शेर ज्वारी ही किंमत होती, त्यानंतर तीन शेर, आतां दोन शेर आहे. पैसा एक बोलत नाहीं. खरें पहिलें तर ज्वारी महाग स्वस्त होत नाहीं. ज्वारी महाग झाली नाहीं, पैशाची किंमत उतरली आहे. जेव्हां एक शेर ज्वारींत मिळणारे पोषण पाऊण शेरांत मिळूं लागेल तेव्हां ज्वारीची किंमत चढली म्हणतां येईल.

नागपूरच्या आंधळ्यांच्या शाळेचे लोक सांगत होते कीं मदत कमी मिळते. सरकारनें पूर्वी मंजूर केलेले रुपयेच आज मिळतात. आज त्या पैशांची किंमत झाली आहे कमी. पैशाला, लबाड पैशाला कारभारी केल्यानें असें होत आहे.

## पैशाचें महत्व कमी करा

खेड्यांच्या जीवनांतून जर आपण पैशांचें महत्त्व कमी केलें तर खेड्यांचे लोक श्रीमंत होतील. पैशाचें महत्त्व जर राहिलें तर तो श्रीमंत होणार नाहीं फक्त मत्सरी मात्र होईल. शेतकरी जेव्हां स्वतःच्या गरजा भागवून विकील तेव्हां श्रीमान भिकारी होईल. समजा तो श्रीमंत मनुष्य दूध मागायला आला

तर तो शेतकरी म्हणेल "माझ्या मुलांना दूध पाहिजे आहे. एक शेरभर हें शिल्लक आहे तें ह्या भावानें देईन." तो श्रीमंत जास्ती भावानें खरेदूं पाहील पण तो शेतकरी म्हणेल "पाहिजे तर मी सांगतों ह्या भावानें घे. जास्ती मला देतां येणार नाहीं." श्रीमंताला मग चिंता लागेल. तो हातांत कुदळ घेईल, खणील, झाडें लावील. मग श्रीमंत गरीबांचा हेवा करून त्याच्या-सारखा होईल. ज्यांच्याजवळ वस्तुसंचय ते श्रीमंत ठरतील, नुसता धनसंचय असणारे नाहीं. मग कांचनमोहांतून लोक मुक्त होतील. मग खऱ्या अर्थशास्त्राचा सिद्धांत 'समलोष्टाश्मकांचन' अंमलांत येईल. मग किसानाचा मुलगा सोन्याचे दगड घेऊन खेळेल. सोन्याची माया सोडा. अमेरिकेनें सोनें दाखविलें तरी वस्तू दिली नाहीं तर त्या सोन्याची काय किंमत? जर सोन्याची माया आपण सोडली नाहीं तर चार दिवस हा श्रीमंत राहील नंतर चार दिवस दुसरा श्रीमंत राहील.

## पैशाचा मोह नको

सर्वांना एक ध्येय आहे. सर्वोदय व दुःखनिवारण हें असें स्फूर्तिदायक ध्येय आहे. सर्वोदय म्हणजे श्रीमंतांना श्रमाचें महत्व पटवावयाचें गरीबांना वस्तु वापराव्या, वापरून उतरल्या तर विकाव्या हें शिकवायचें. गरीबांनीं आपलें स्वरूप ओळखावें. शंकराचार्यांनीं एक गोष्ट सांगितली आहे. एक वाघाचा बच्चा शेळ्यांत वाढलेला असतो लहानपणापासून. त्याला संवयी तशाच. परंतु एक दिवस एका वाघानें त्या शेळ्यांवर झडप टाकली व एक शेळी मटकावली. ह्या दृश्यानें त्या वाघाच्या बच्चांतलें वाघपण जागृत झालें. स्वरूपज्ञान होताच त्याचा प्रयोग सुरू झाला. दर्शनानें असा पालट होतो. जर किसानांना त्यांचें स्वरूप दर्शन झालें तर ते क्षणांत श्रीमंत होतील. श्रीमंतांच्या द्वेषानें वर्गकलह निर्माण होतील. दोन पैसे जास्त मिळतील. परंतु यानें प्रश्न सुटणार नाहींत. पैशाचा मोह सुटला पाहिजे. वस्तूला संपत्ति मानावयाला शिकविलें पाहिजे. आजच्या नोटा म्हणजे मोठी चोरी खुशाल करतां येण्याचें साधन. आज दहावीस हजार चोरतां येतील. पण जर धान्याला संपत्ति मानलें तर २००० रुपयांची दोन हजार शेर ज्वारी चोरील का कोणी?

## येथला प्रश्न निराळा

खादीच्या आश्रयावांचून आपले प्रश्न सुटणार नाहींत. आपल्या देशांत प्रत्येकीं पाऊण एकर जमीन वांट्याला येते. ही फार कमी आहे. वाढत्या लोक-



संख्येमुळें ती जमीन कमी होत जाणार. दुसऱ्या देशांना लुटण्याचीहि सोय नाहीं. रशियांत हजारों एकर जमीन लागवडीस आणतां येईल, अमेरिकेंतहि माणशीं जमीन खूप आहे. येथील जमीन हजारों वर्षांपासून नांगरली जात असल्यानें तिचा कस कमी झाला आहे. अमेरिकेची जमीन ३००, ४०० वर्षांपासूनच नांगरली जात आहे. अमेरिका व रशियाची उदाहरणें येथें काय कामाचीं? तेथून शिकून येऊन इथली जमीन नाहीं वाढणार.

## ठायींच जोड धंदे द्या

येथला प्रश्न सोडविण्यासाठीं शेतकऱ्यांना त्यांच्या जागींच जोडधंदे दिले पाहिजेत. वीज आणूं म्हणतात. मी म्हणतों आणा. माझा कोठें विरोध आहे? वीज आली तर मला हवी आहे. परंतु विजेनें दूध वाढेल का? जमीन वाढेल का? आणि येथील जमीन जुनी आहे. तिच्यांतून फार पीक आपण काढलें तर जमीन अधिक निकस होईल व पुढच्या पिढ्या शिव्याशाप देतील.

## स्वातंत्र्यांतील विधायक ध्येय

तसें पाहिलें तर पूर्वीचें ध्येय फारसें उत्साहवर्धक नव्हतें. इंग्रजांना घाल-विणें हें काय ध्येय झालें! शेतकऱ्यांना जाऊन विचारा कीं कांटेगोटे काढण्यांत त्याला आनंद वाटतो कीं पेरण्यांत? कांटेगोटे काढण्यांत तुम्हांला उत्साह होता. पण खरी उत्साहवर्धक स्थिति आतां निर्माण झाली आहे. इंग्रजांचें राज्य गेलें आहे. मार्गातील अडचण दूर झाली आहे. आतांच उत्साहानें कामाला लागण्याची वेळ आहे." असे विनोबाजींनीं आपले विचार मांडले. त्यानंतर कांहीं शिक्षक मंडळी आली होती. त्यांनीं प्रश्न विचारला कीं "आतां इंग्रजीला काय स्थान राहील?" विनोबाजी म्हणाले, "आतापर्यंत सर्वांनाच तोळा दोन तोळे इंग्रजी शिकावें लागत असे. परंतु यापुढें तसें असणार नाहीं. शिकणारे शेर दोन शेर शिकतील. परंतु फक्त इंग्रजीच राहील असें नाहीं. इंग्रजी प्रमाणेंच फ्रेंच, जर्मन, रशियनहि लोक शिकतील. एवढेंच नव्हे पण चिनी, जपानीहि शिकायला हवें. आतांपर्यंत इंग्रजीबद्दल जो द्वेष होता तो राहणार नाहीं किंवा इंग्रजीचें लांगूल-चालनहि राहणार नाहीं. इंग्रजीबद्दल यापुढें आदर राहील."

## नांदेडचें गुरुद्वार

चर्चा संपल्यानंतर गांवांत फिरण्यासाठीं आम्ही गेलों. गोदामाईचें दर्शन किल्ल्यावरुन घेतलें. त्यानंतर गुरुद्वारामधें सारे गेलों. नांदेडचें गुरुद्वार फार प्रसिद्ध आहे. अमृतसरचें व नांदेडचें दोन्हीं गुरुद्वारें फार प्रसिद्ध आहेत. गुरुद्वारांत जातांना डोक्यावर कांहींतरी आच्छादन ठेवावें लागतें. गुरुद्वाराच्या इमारती सुंदर आहेत. स्वच्छताहि तेथें खूपच आहे. आत्मीयतेनें तेथल्या लोकांनीं आमचें स्वागत केलें. पाय धुवून आंत जावयाचें असतें. ज्यांच्याजवळ टोप्या नसतील त्यांना टोप्या देण्याची व्यवस्था होती. तेथें गेल्यावर पू. विनोबाजी, गोविंददास श्रॉफ व अच्युतभाई यांना वस्त्रें देऊन त्यांचा सत्कार करण्यांत आला. शीख दरबार भरला होता. भजन चालू होतें ग्रंथसाहेबाचें वाचन चाललें होतें. स्त्री पुरुष समुदाय जमला होता. त्यांत हिंदु होते, मुसलमान होते, वंजारी होते. दरबारानंतर दर्शन घेतलें. तेथें भिंतीवर एक ॐ लिहिलेली तसबीर होती. शीख एक ॐ ला पवित्र मानतात. पू. विनोबाजींच्या सर्वधर्म पार्थनेंत ते

‘ एक ओंकार सत् नाम कर्ता पुरख, निर्भव निर्वैर ’

वगैरे रोज म्हणतात. शीख प्रार्थनेचा भाग तो आहे हें मला ठाऊक नव्हतें. हिंदूंचाच तो मंत्र असावा असेंच ऐकून वाटे.

## सर्व धर्म प्रार्थना

विनोबाजींच्या सर्व–धर्म–प्राथनेला हजर राहिले व ती जरा समजून ऐकली तर आपोआपच सर्व–धर्म–समभाव निर्माण होऊं शकतो. वेगवेगळ्या धर्मांच्या प्रार्थना वेगवेगळ्या भाषेंत असतात व त्यांचा अर्थ समजूं शकत नाहीं. जर तो समजूं शकला तर सर्व धर्मांचें मूळ तत्त्वत: एकच आहे असें समजून येईल. गुरुद्वाराची इमारत विशाल आहे. त्यांत लंगर–अन्नछत्र आणि दवाखाना आहे. तेथें संगमरवरी कामहि होत असतें. तें सर्व पाहून आम्ही मोंढ्यावर आलों. तेथें प्रार्थना होती. विनोबाजींनीं प्रार्थना चालविली. सर्व धर्मांच्या प्रार्थना त्या त्या धर्मांच्या भाषेंत आज विनोबाजींनीं म्हटल्या. त्या नंतर गुरु नानकांचें



एक भजन त्यांनीं म्हटलें. त्यानंतर त्यांचें भाषण झालें. “ प्यारे भाईयो ऑर बहनों । ” इतक्या संख्येनें तुम्ही प्रार्थनेला आलांत. तुम्हांला पाहून आनंद झाला. निजामच्या राज्यांत सध्यां मी फिरत आहें. जातीय ऐक्य करावें म्हणून मी हिंदुस्थानांत फिरत आहें त्याचप्रमाणें येथें आलों. नांदेडमध्यें एकता शिकतां येईल. गोदावरी किनाऱ्यावरचें हिंदूंचें तें तीर्थस्थान आहे, सिक्खांचें गुरु गोविंदसिंहजी यांचें हें निर्वाणस्थान आहे. त्यांचे दहावे गुरु महाराष्ट्रांत आले होते. येथें त्यांचें निर्वाण झालें. सर्व शिखांचें तें पवित्र स्थान झालें आहे. मुसलमानहि येथें आहेत अशा प्रकारें नांदेड ही सर्वधर्मसंयोगभूमि झाली आहे. कांहीं दिवस येथें विद्वेष होता. हिंदुस्तानचे दोन तुकडे झाले. हिंदुस्तान आणि पाकिस्तान झालें परंतु शांति झाली नाहीं द्वेष वाढला. त्याचा परिणाम सर्वांना ठाऊक झाला आहे. त्याचा उल्लेख आतां करीत नाहीं. कारण त्यानें वाणीला दुःख होईल. आतां ते दिवस गेले आहेत. चांगले दिवस आले आहेत. येथल्या गोष्टी इतिहासांत जमा झाल्या आहेत. सगळे एकतेकडे जात आहेत. येथेंहि सगळे हिंदुमुसलमान प्रेमानें राहतील. झालें तें गेलें. त्याची पुनरावृत्ति नको. नांदेड ह्या दृष्टीनें एक चांगले गांव आहे. सर्व धर्म सम्मेलनाची ही जागा आहे हिंदूंनीं मुसलमान आणि शीख धर्मांचा, मुसलमानांनीं शीख आणि हिंदु धर्माचा अभ्यास करावा हिंदुस्तानांत हिंदु-मुसलमान झगडा कधीं नव्हता. झगडा होता तो अन्यायाविरुद्ध होता. अन्याय कोणाचाहि असो त्याला विरोध करावाच लागतो. लढा अन्यायाविरुद्ध होता. धर्माविरुद्ध तो नव्हता. शिवाजीनें जो प्रतिकार केला तो जुलमाचा प्रतिकार होता. मुसलमानांचा प्रतिकार जरी तो भासला तरी शिवाजी इस्लामची इज्जत करी. हजला जाणाऱ्या यात्रेकरूंना शिवाजी मदत करी. त्याच्या आरमारांत मुसलमान अधिकारी होते रामदासस्वामींनींहि सर्व धर्म समभाव शिकविला. गुरु गोविंदसिहांनीं अन्यायाचाच प्रतिकार केला ते रामरहीम एक मानीत ईश्वराची भक्ति जाणत. ईश्वराचीं सारीं लेकरें एक असें मानीत. धर्ममुळें त्यांच्या दृष्टींत फरक नव्हता पडत. जुलमाचा प्रतिकार शिकवावा पण द्वेष नको. धर्मांचा आदर शिकवावा पण द्वेष शिकवूं नये. नांदेड या दृष्टीनें चांगलें ठिकाण आहे. येथें इतर धर्मांचा अभ्यास सहज करतां येईल. नांदेड येथें विद्यापीठ होऊं शकेल. असें सम्मीलन विद्यापीठ करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सर्व धर्मांची अभ्यासभूमि ही बनूं शकेल, येथें जर असें झाले तर तें एक लाभदायी उदाहरण होईल. ”

आज प्रार्थना आटोपून परत आलों. थोडा वेळ शिल्लक होता. विनोबाजींच्या भाषणाच्या ज्या रेकॉर्ड घेण्यांत आल्या आहेत त्या लावावयाच्या ठरलें. परवां सरस्वती मंदिर संस्थेच्या छात्रालयाच्या कोनशिला समारंभानंतर भाषण झालें. मी त्या दिवशीं प्रार्थनेच्या वेळेपर्यंत ढाकेफळहून परतूं शकलों नव्हतों. पण तें भाषण फारच सुंदर होतें. त्याचा सारांश आज देत आहे. विनोबाजीहि तें रेकॉर्ड झालेलें स्वतःचें भाषण ऐकत होते. म्हणाले, " दुसरे कोणी बोलत आहे अशा रीतीनें ऐकत होतों. चुका पहात होतों. शेवटीं सत्याधिष्ठित बलाचाच जय होईल हें त्यानें अगदीं सिद्धच केलें. युक्लीडच्या सिद्धांताप्रमाणें सिद्ध झालें. " विनोबाजींच्या त्या सुंदर भाषणाचा महत्वाचा भाग खालीं दिला आहे. त्या यंत्राचे केवढे उपकार ? विज्ञानाची ही मदत मोलाची आहे.

## सरस्वती मंदिर संस्थेंतील भाषण

" मी आज पैठणाहून आलों. वेरूळ दौलताबादची लेणीं मी पाहिलीं. हें सांगण्याची अवश्यकता नाहीं. साऱ्या जगांतले यात्रेकरू ही लेणी पाहिल्यावाचून रहात नाहींत. हीं लेणी धर्मभावनेची साक्ष देतात. या लेण्यांनीं जितकी धर्मनिष्ठा न कुशलता प्रगट केली तितकीच कुशलता व धर्मनिष्ठा प्रगट करणारी दुसरीं दोन महान् लेणीं निर्माण केलेली आहेत. ज्यांनीं हीं दुसरीं महान् लेणीं निर्माण केलीं त्यांची जन्मस्थानेंहि पाहून आलों. माझें लक्ष ज्ञानदेव व एकनाथ यांचेकडे आहे हें तुमच्या लक्षांत येईलच. यांनीं जीं लेणीं रचलीं तीं माझ्या दृष्टीनें अत्यंत मोलाचीं आहेत. मला जर ईश्वरानें पसंत करायलाच सांगितलें. म्हणाला दगडाचीं ती कोरीव लेणीं स्वीकारशील कीं ज्ञानदेव एकनाथांचीं हीं लेणीं पतकरशील ? दोहों पैकीं तुला कोणते तरी एकच मिळेल. तर मी निःशंक मनानें ज्ञानदेव–एकनाथांनीं रचलेली, कुसरीनें तयार केलेली; जिवंत, जाज्वल्य निष्ठा सर्वांना शिकविणारी, वाङ्मयात्मक लेणी पसंत करीन. ज्ञानदेव व एकनाथ डोंगरांतील हीं लेणीं पाहून गेलेले होते.कारण ते याच मुलखांतले होते. ' गींते देशीं लेणें केलें ' असें ज्ञानदेव म्हणतो. एकनाथी भागवत हेंहि एक लेणें केलेले आहे. माझी आमच्या मंडळींना अशी सूचना आहे कीं त्यांनीं ह्या दोन्हीं लेण्यांचा अभ्यास करावा.



## दोन अनुपम ग्रंथ

ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत जिवंत धर्माचा उपदेश करणारे, नेहमीं मार्गदर्शन करणारे, व्यक्ति व समाज दोघांचेंहि कर्तव्य शिकविणारे अनुपम ग्रंथ आहेत. एका मुसलमान बंधूनें लिहिलेलें नाथांसंबंधी एक पुस्तक परवां पैठणला मिळालें. तें मी वाचलें नाहीं पण चाळून गेलों. त्यावरून त्यांना एकनाथांचें लिहिणें इस्लामाच्या शिकवणीला उत्तम पाठबळ देणारें वाटत आहे. खरी स्थिति अशी आहे कीं ज्ञानदेव व एकनाथ यांच्या लिहिण्यांत कुठेंहि संकुचित भाव नाहीं. मानवाचें हित पाहून त्यांनीं लिहिलें आहे. मुसलमनांनीसुद्धां प्रेमानें, श्रद्धेनें आणि विश्वासानें अभ्यास करावा. त्यानें हानि होणार नाहीं. धर्मनिष्ठा वाढेल, परस्पर सद्भाव वाढेल, जीवनाचें स्पष्ट दर्शन, होईल, अशी मी ग्वाही देतो.

## विश्वोपयोगी गीता

ज्ञानेश्वरानें, गीतेबद्दल लिहिलें आहे ' एका बोलिलें होय सर्वांहित '. एकाला उद्देशून जरी असलें तरी तें सर्वांच्या हिताचें, सर्वांना उपयोगी आणि सर्वोदयकारी असावें. अर्जुनाला उद्देशून जरी गीता असली तरी ती सबंध विश्वाला उपयोगी झाली आहे. तीच भूमिका ज्ञानेश्वर व एकनाथांचीं आहे. हिंदुस्तानाला सर्वोदयापेक्षां कमी दर्जाची गोष्ट परवडणारी नाहीं. चित्ताला जडलेल्या अनेक प्रकारच्या क्षुद्र उपाधी काढून टाकून परिशुद्ध रूप ओळखून घ्यायचें आणि मी व्यापक आत्मा आहे अशी अनुभूति नित्यनिरंतर बाळगायची ही गोष्ट हिंदुस्तानला हवी आहे. परमेश्वरानें हिंदुस्तान हें संकुचित राष्ट्र ठेवलें नाहीं. तें खंडप्राय राष्ट्र आहे. राष्ट्र-समूहप्राय हा देश बनविला आहे. ह्या देशांत छोटे अहंकार लाभाचे होणार नाहींत. मी मराठी, मी बंगाली, मी गुजराती, ही भावना तारणारी नाहीं, मारणारी आहे. मी हिंदू, मी मुसलमान, मी ख्रिस्ती, ही भावना ऐक्यसाधक होणार नाहीं, विरोध उत्पन्न करणारी होईल. कोणत्याहि जातीचा, भाषेचा, पंथाचा अभिमान राखून हिंदुस्तानचें हित साधलें जाणार नाहीं अशी हिंदुस्तानची रचना केली आहे. किंबहुना मीं भारतीय हा अभिमानहि फायद्याचा नाहीं. देशावर, प्रांतावर, भाषेवर,

धर्मावर प्रेम असूं दे, पण अभिमान नसूं दे. जर भारतीयत्वाचा अभिमान राखला तर तो आजच्या जगाच्या प्रवाहाविरुद्ध जाईल व विसंवाद निर्मील. त्यांतून हिंदुस्तानचें किंवा जगाचें श्रेय नाहीं. जगाची हिंदुस्तानकडून अशी अपेक्षा आहे कीं सर्व जगांत ज्यावेळीं विरोध निर्माण होईल त्यावेळीं समन्वय साधण्याचें काम हिंदुस्ताननें करावें. अशा आशेनें जग हिंदुस्तानकडे पहात आहे. एशियन कॉन्फरन्ससारख्या घटनेवरून ही गोष्ट लक्षांत आली असेल. स्वातंत्र्या-नंतर ज्या घटना झाल्या त्यामुळें हिंदुस्तानची इज्जत खालावली आहे परंतु ती एक तात्कालिक हवा होती. ती आली आणि गेली. शेवटीं त्याहि वेळेस हिंदुस्तानचा आत्मा जगाचें नेतृत्व, जगाचें प्रतिनिधित्व करीत होता. त्यांतूनहि जगाला एक आशा वाटूं लागली आहे. ती जगाची आशा जर आपण पुरी केली नाहीं तर त्यांतून निघालेली निराशा आमच्यावर उलटल्याशिवाय राहणार नाहीं. ऐक्य निर्माण करण्याच्या दृष्टीनें भरतखंडाचा अभिमानहि लाभाचा नाहीं. देशाची सेवा करूं, देशावर प्रेम करूं पण अभिमान सोडूं या. आपण मानव आहोंत ही जाणीव राखूं; किंबहुना ज्ञानेश्वर आत्म्याचें शुद्ध स्वरूप सांगतात त्याप्रमाणें मी अमूक ही जाणीव सोडल्यावरच शुद्ध सिद्ध होईल तें आपलें रूप हा बोध आपण घेतला पाहिजे.

## विशाल भावनेनें सेवा करा

अत्यंत व्यापक, अत्यंत विशाल, विराट भावनेनें सेवा करीत जा. सेवा लहान गांवची झाली, कुटुंबाची झाली, रोग्याची झाली तरी चालेल. आईप्रमाणें मुलाची झाली तरी चालेल पण तो मुलगा, तो रोगी, तें कुटुंब, तें गांव तो सबंध विश्वाचा प्रतिनिधि या भूमिकेनें ती व्हावी. मी या सर्व विश्वाचा सेवक आहे, परमेश्वराचा सेवक आहे, हरिदास, हरिसेवक आहें या भूमिकेनें, सेवा होऊं दे; म्हणजे बघतां बघतां देशाचें उत्थान होईल, आणि इतरांच्या उत्थानालाहि मदत होईल.

## निरहंकार संघटना हवी

अभिमानी संघटना हिंसक शक्तीला आवाहन करतात. जगांत जेव्हां एका ठिकाणीं हिंसक शक्ति उभी राहते तेव्हां तशीच दुसरीकडेहि उभी राहते. त्या



हिंसक शक्तींचे प्रतिध्वनि उमटतात. अभिमानी संघटना जर जगांत झाल्या तर त्यांतून शक्तीची वजाबाकी होते. हिंदुस्तानांत जर एक दहा शेराची हिंसक संघटना निर्माण झाली आणि चीनमध्यें ८ शेराची झाली तर शक्ती १०+८=१८ होत नाहीं तर १०−८=२ इतकी होते. हिंसक असलेल्या संघटना क्षय करतात, पुष्टि करीत नाहींत. अभिमान रहित, प्रेमाधिष्ठित, सेवापरायण, निरहंकार, व्यापक संघटना जेव्हां एका ठिकाणीं होते तेव्हां ती तशाच दुसऱ्या संघटनेला प्रेरणा देते. अशा सर्व संघटना मिळून विश्वाची मंगलकारक शक्ति वाढते. शक्तिवर्धनकारी संघटना करावयाची तर मीपण नाहीसें झालें पाहिजे व ज्याची सेवा करावयाची त्याचें तूंपण वगळून सेवा व्हावी. या रीतीनें सेव्य, सेवक अभिमान सोडून एकत्र होतात तेव्हां विश्वमंगल होते, विश्वाचें उत्थान होतें. भूतहित साधणें हा व्यापक शब्द आम्ही घेतला. मानवहित बोलणें बरें वाटत नाहीं. सर्वभूतहित हें मानवतें पण मानवाचें कार्य मानवापासूनच सुरू होणार म्हणून हें प्रत्यक्ष कार्य. त्यांतूनच पुढें सर्व भूतहित साधणार. हें ध्येय असें आहे कीं प्रत्येक तरुणाला या ध्येयानें उत्साह वाटावा. येथली ब्रिटिश सत्ता गेली. निषेधक कार्य झालें. आतां विधायक ध्येय हवें.

## सत्त्वाधिष्ठित बळाचा जोर

विश्वमंगलासाठीं, सर्वोदयासाठीं सर्व शक्ति खर्ची घालावी. सारें मनन, चिंतन, साहित्य या ध्येयासाठीं. कायावाचामनें अंग न चोरतां जर झटूं तर मला मुळींच शंका नाहीं कीं तें आपण गांठूं. सारें विश्व आतां जवळ आलें आहे. एकमेकांचा एकमेकांवर शीघ्र परिणाम होऊं शकतो. जगांत हिंसेचे वारे. आपण हिंदुस्थानांत अहिंसेचे वारे वाहवूं या. जसा हिंसेचा जगावर परिणाम होतो तसा अहिंसेचाहि होतो. परंतु सत्त्वाधिष्ठित बलाचा जगावर अधिक परिणाम होईल. रजामध्यें व तमामध्यें जोर असतो पण त्यांचा परिणाम जगावर होणार नाहीं. सत्त्वाधिष्ठित बळाचा होईल. रजतमांत जोर असतो पण बुद्धि नसते, त्यामुळें तो जोर लटका पडतो. सत्त्वांत बुद्धि आहे. सत्त्वनिष्ठेचा संकल्प निर्माण केला तर लोकांचीं हृदयें अनुकूल आहेत. हिंदुस्थानचा संकल्प साऱ्या जगांत पसरूं शकेल. तो पसरविण्याची हिम्मत आपण ठेवूं या."

रात्रीं जेवण करून आम्ही नांदेड स्टेशनवर आलों. पहिल्या गाडीला जागा मिळते कीं नाहीं याबद्दल सर्वांना शंका होती. पण विनोबाजी म्हणाले "श्रद्धा ठेवा. जागा मिळेल." आणि खरोखरच सर्वांना गाडींत जागा मिळाली. आम्ही नांदेडहून हैद्राबादला निघालों. निझामाबादपासून द्राविड भाषाच कानांवर पडूं लागली. तामिळ, तेलगू, कानडी, मल्याळम् ह्या भाषांतला फरक कांहीं समजूं शकत नाहीं मला तरी. ह्या भाषांपैकीं कोणतीहि भाषा जरीं असली तरी तिला आपण बहुतेक कानडीच ठरवून टाकतों. रात्रीं गाडींत इतकी गडबड होती कीं विचारूच नका. ह्या गर्दींत झोंप मिळणें शक्यच नव्हतें. तिसऱ्या वर्गांत बसावयाला नव्हे तर शिरावयाला जागा मिळाली तर गनीमत! निझाम स्टेट रेल्वेंत तर प्रत्येक स्टेशनवर वाग्युद्ध होत असतें. आरडा ओरडा इतका होतो कीं कुंभकर्णहि जागा व्हावा. आणि आम्हांला त्या आरडाओरडीपैकीं विशेषनामांशिवाय एक अक्षरहि समजत नव्हतें. लोक सारें सहन करीत आहेत. लोकांची सहनशीलता व रेल्वे अधिकाऱ्यांचा बेजबाबदारपणा जगांत अद्वितीय ठरण्यासारखा वाटतो. रात्रीं १२च्या सुमाराला सर्वांच्या ऐक्याचें सुंदर प्रदर्शन गाडींत होतें. अगदीं डोळे मिटून जाति, धर्म, पंथ, पक्ष यांचा विचार सोडून लोक एकमेकांच्या गळ्यांत गळा टाकून झोंपतात! सकाळीं हैद्राबादला पोंचूं.

---

## २७।३।१९४९

आज सकाळीं ९ वाजतां काचीगुडा स्टेशनवर आम्ही पोंचलों. काचीगुडा मिटरगेजचें शेवटचें स्टेशन. तेथून सारे प्रतापगिरजी कोठींत आलों. प्रवासांत जागरण झालेलें होतें. त्यामुळें दुपारीं सूतकताईवांचून इतर कांहीं करूं शकलों नाहीं.

### महंमद शफी

सायंकाळीं प्रार्थनेपूर्वी कायदेकस्मीर चौधरी महंमद शफी भेटले. ते येथील तुटलेलीं हृदयें जोडण्याचें काम करीत आहेत. त्यांचें पहिले दर्शन औरंगाबादला झालें. अत्यंत प्रेमळ हृदयाचा, उत्कृष्ट वक्ता व विद्वान असा हा उमद्या व दिलदार स्वभावाचा काश्मिरी. त्यांनीं हैद्राबाद संस्थानांत जेथें जेथें ते गेले तेथें जनतेवर मोहिनी टाकली. येणाऱ्या प्रत्येकाशीं हस्तांदोलन करून ते स्वागत करीत. त्यांच्या त्या हस्तांदोलनांत मनुष्य आपलासा करण्याची अजब जादू. हैद्राबादच्या मक्का मशिदींत कोणाचें व्याख्यान सहसा होत नाहीं तेथें त्यांचें व्याख्यान झालें "निझाम आला हाजरत नसून काला हाजरत आहे, सांप आहे. गांधीजींनीं सांगितले आहे त्याप्रमाणें नेक रीतीनें चालण्याचा शहाणपणा जर राजांनीं दाखविला नाहीं तर त्यांना काढून टाकले पाहिजे" असें शफींनीं बजावलें. "देश बापूका मिशन चलाने मैं आया हूँ। दुनिया आज जंग नहीं चाहती, वह बापूके संदेशपर चलना चाहती है। अगर हम अपने मुल्कमें अमन कायम कर लेंगे तो बापूका मिशन दुनियामें फैलेगा, कम्युनिझमका खतरा रुक सकेगा।" असेहि ते म्हणाले. औरंगाबादला प्लेबीसाईटमधें काय होईल असें विचारल्यावर आत्मविश्वासपूर्वक ते म्हणाले "अगर हमारे दिलोंसे मुहब्बतका दरिया फूट

निकलेगा तो काश्मीरको तो हम जरूर जीतेंगे इतनाहि नहीं बल्की हमारी मुहब्बतकी धारामें पाकिस्तानभी बह जायगा । काश्मिरकी प्लेबीसाइट मैं हैद्राबादकी जमीन-पर जीतूंगा । अगर यहाँ अमन कायम होगा तो काश्मिरी यकीन करेंगें कि हिंदमें मुसलमानभी समानतासे रह सकते हैं ! काश्मिर प्लेबीसाइट को तो हम हर हालतमे जितेंगेही ! " औरंगाबादला नुसती मुलाखत झाली होती. येथें बरेच बोलणें झाले. बंजारा हिलवर ते रहातात. तेथें येण्याचे आग्रहाचें व आपलेपणाचें निमंत्रण त्यांनीं दिले आहे.

प्रार्थनेला सर्व जातीचा समाज खूप येत आहे. काजी साहेबानीं अगोदर कुराण गाइलें, मग प्रार्थना झाली आणि विनोबाजींनीं हिंदुस्थानींत भाषण केलें.

## सगळ्यांना देवाचें नांव ऐकवीन

मेरे प्यारे भाईयों और बहनों,

माझा येथे येण्याचा फार दिवसांपासून विचार होता. शक्य झालें असते तर ३।४ महिन्यापूर्वीच आलों असतों. पण अनेक कारणांनीं येऊं शकलों नाहीं. आज येऊं शकलों आहे. तुम्हाला पाहून मला फार आनंद वाटत आहे. येथें आठवडाभर तरी राहीन. मी येथे येऊन काय करणार लोक विचारतात. ते मलाहि ठाऊक नाहीं. विचार येवढाच आहे कीं डोळ्यांनीं पहावे कानांनें ऐकावे. लोकांनीं उपयोग करून घ्यावा. मी स्वतः कांहीं करणार नाहीं. माझ्याकडून एवढेच करीन कीं सगळ्यांना देवाचें नांव ऐकवीन. भेदभाव विसरून देवाचें नांव हृदयापासून गा. चिंतन, मनन, त्याचेंच करा.

गेलीं कित्येक वर्षे गांधींचें काम मी करीत आहे. व्याख्यान हें माझें काम कधींच नव्हतें. त्यानीं सांगितलेली कामें करण्यांत मला संतोष होता. आणि त्यानीं दाखविलेली कामें बत्तीस वर्षें मी केलीं. मी स्वतःला परमेश्वराचा तुच्छ सेवक मानतो. जो मार्ग गांधींनीं दाखविला आणि ज्याप्रमाणें चालून मला संतोष झाला त्याप्रमाणें अखेरपर्यंत चालू शकावें व बुद्धि रस्ता सोडून भटकूं नये एवढेंच ईश्वरापाशीं माझें मागणें.



## मुखीं नाम हातीं काम

बत्तीस वर्षे कोपऱ्यांत राहून जो काम करूं शकतो तो जर बाहेर येऊन फिरूं लागेल तर व्याख्यानाचा धंदा नाहीं करूं शकत. त्याचें लक्ष कामावरच असतें. इतक्या वर्षांच्या कामाच्या अनुभवाचा फायदा लोकांना अवश्य मिळेल. तीं सारीं कामें माझ्या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. तीं विधायक कामें असल्यामुळें त्यांतून सुखहि मिळेल. परंतु त्या सर्वांपेक्षां भगवंताच्या नामाला मी अधिक महत्त्व देतों. तीं कामें मला तितकी महत्वाचीं वाटत नाहींत जितकें ईश्वराचें नांव महत्वाचें वाटतें. तेंच नांव मी काम करतांना घेत होतों. देवाची इच्छा असती तर तेंच करीत राहिलों असतों. मुखीं नाम हातीं काम पाहिजे. परतु गांधींजींचा ज्या तऱ्हेनें अंत झाला त्यामुळें मला बाहेर पडावे लागलें. आंतूनहि बाहेर जाण्याची आणि इतर बंधूना भेटण्याची प्रेरणा मिळाली. सर्वांना एकतेचा संदेश देण्याची प्रेरणा मिळाली म्हणून मी हिंदुस्थानभर फिरत आहे. एकता निर्माण करण्याची शक्ति, ताकद परमेश्वराच्या नांवाइतकी दुसऱ्या कशांत नाहीं. तेंच ईश्वराचें नांव मी तुम्हाला निरंतर ऐकवीन आणि मी नित्यनिरंतर गाईन. दुसरी ताकद मजजवळ नाहीं. मला ती नको आहे, त्यावर भरंवसाहि माझा नाहीं. दुसऱ्या ताकतीनें बनणारी गोष्ट जास्त बिघडते. ईश्वराच्या नांवानें कोणाचें कांहीं बिघडलें नाहीं. ज्यांनीं मनापासून तें घेतलें त्यांचा फायदा झाला आहे.

इंदूर जवळ राऊ येथें सर्वोदय सम्मेलन झालें. तें आटोपून मी येथें आलों. तेथें सर्वोदयासाठीं काम करावयाचें आम्हीं ठरविलें. तें परमेश्वरी नांवच मला झालें आहे. एकाचा नव्हे तर सर्वांचा उदय.

## तुलसीदासांचें भजन

तुलसीदासाचें एक भजन सकाळीं पहात होतों. त्यांत तो म्हणतो " आपलें हित सर्व चाहतात, आपले समजले जाणारांचें हित पाहणारे कांहीं असतात. परंतु सर्वांचें हित तेच चाहतात जे ईश्वराच्या चरणांची सेवा करतात, ज्यांनीं त्याचा आश्रय घेतला आहे. " सर्वांच्या भल्याची इच्छा म्हणजे बंधुभावाची

इच्छा. व्यापक बंधुभाव तेव्हांच होईल जेव्हां सर्वांना पित्याचें स्मरण होईल. ईश्वराची, सर्वांच्या पित्याची ओळख होईल तेव्हां हें होईल.

## दुनियेचे तुकडे

स्वार्थ पाहणारा दुनियेचें तुकडे करतो. तो स्वतः एका बाजूला पडतो आणि दुनिया दुसऱ्या बाजूला पडते. मग दुनिया लुटावयाची इच्छा तो करतो. तो स्वतः एकटा पडतो आणि दुनियेला दुष्मन मानतो. जो केवळ आपला स्वार्थ पाहत नाहीं, जास्त पहातो, परंतु सर्वांचा समावेश करण्याइतका मोठा नाहीं, तो लहान लहान जातींचें पाहतो, आपापल्या धर्माचें पाहतो, आपल्या देशाचें पाहतो, तोहि दुनियेचें तुकडे करतो. तुकडे यांचे लहान नसतील परंतु दुनिया अखंड रहात नाहीं. यांतून झगडे, लढाया निर्माण होतात. ह्या झगड्यांनीं सारी दुनिया तंग झाली आहे.

राष्ट्रीयता संकुचित होते आणि त्यामुळें रक्ताच्या नद्या वाहतात. धर्माच्या नांवानें जे वेगळेपणा ठेवतात तेहि दुनियेचे तुकडेच करतात आणि आपपर भाव धरतात. ईश्वराच्या नांवातच भेद मिटविण्याची शक्ति आहे. आपण सगळीं त्याचीं मुलें, तो पालन करणारा आहे, सगळ्यांवर सारखें प्रेम करणारा. आमच्यांत वेगळे वेगळे गुण असोत पण आम्ही एक कुटुंबाचे ही भावना असो. ह्यामुळें भेद मिटेल, प्रेम निर्माण होईल.

ईश्वराचें नांव घेणारे, भेदभाव सोडणारे एका जातीचे रहात नाहींत. कुराणांत सांगितले आहे कीं तुम्ही सारे एकाच जातीचे आहांत. दुनियेच्या कोणत्याहि हिश्यांत राहात असा. ईश्वर दुनियेपेक्षां फार मोठा आहे आणि ज्याच्या हृदयांत ईश्वर आहे त्याचे हृदय मोठें होतें, विशाल होतें.

मी एकनाथांच्या जन्मस्थानीं गेलों होतों. दहीहांडीचा उत्सव त्या दिवशीं असतो. श्रीकृष्ण सर्वांना दही वाटीत असे. सर्व मिळून तें खात. हजारों स्त्री-पुरुष भेद विसरून एकत्र होत आणि दह्याचे थेंब सर्वांना मिळत. थेंबाची साऱ्यांना इच्छा. तो प्रेमभाव पाहाण्यासाठीं मुसलमानहि आले होते. एकनाथांनीं कोणताहि



भेद मनांत ठेवला नव्हता. ते हिंदु होते पण असे होते कीं ज्यामुळें इतर सर्व धर्मांचाहि समावेश त्यांत होई. सर्व संतांनीं हाच संदेश दिला आहे. ईश्वराच्या नांवानें एकत्र करण्याचा प्रयत्न झाला. कबीरानें, नानकानें प्रयत्न केला. आम्ही एकत्र होतहि होतों परंतु राजकीय वावटळीनें आमचीं हृदयें संकुचित झालीं. लहान गोष्टी घेऊन मोठ्या विसरलों आणि बदनाम झालों. गांधीजी यासाठींच शहीद झाले. परंतु मला विश्वास आहे कीं हवा आतां बदलत आहे आणि बदलेल.

एक भाई म्हणाले " ही मधली सात वर्षें विसरून जातलि व पूर्वीची प्रेमाची हवा पसरेल. " माझा विश्वास आहे कीं प्रेमाची हवा पसरेल पण अशी कीं पूर्वी कधींहि तशी नसेल. पूर्वींचा प्रेमभाव फूट निर्माण न होणारा नव्हता. आतां प्रेमभाव असा निर्माण होईल कीं फूट निर्माणच होणार नाहीं आणि हें काम ईश्वराचें नांव करील. प्रत्येकानें आपल्या आवडीचें नांव घ्यावें, एकता ओळखावी. अज्ञानामुळें आपण अभेदांतून भेद काढतो. ईश्वराचें नांव सगळ्यांना एकत्र करील.

कांहीं दिवस येथें आहे. जें सांगणें जरूर वाटेल तें क्रमानें सांगेन. "

———

## २८।३।१९५१

: : :

हैद्राबाद शहरांत मुख्य वस्ती तेलगु भाषा जाणणारांची आहे. त्यामुळें येथें ईषावास्योपनिषदाचा सकाळचा प्रार्थना-पाठ संकृतमधून होत आहे. सर्व-धर्म-प्रार्थना मात्र मराठींतून होत आहे. तुलसीदासजींच्या विनयपत्रिकेंच एकेक पद घेऊन विनोबाजी तें समजाऊन सांगतात. या शिक्षणाचें माध्यम हिंदुस्तानी. हैद्राबादमधील वेगवेगळ्या संस्थांनी विनोबाजींनीं आपल्याकडे यावें म्हणून प्रयत्न केला. परंतु बिनोबाजी म्हणाले " संस्था निर्जीव असतात. व्यक्तींच्याकडे मी जातों. संस्थांकडे नाहीं जात." सहाजिकच संस्थांतर्फे कांहीं कार्यक्रम त्यांचे नाहींत. सकाळचें फिरणें शहर पाहणीच्या दृष्टीनें होणार आहे.

हैद्राबाद शहर मुंबईच्या खालोखाल सुंदर आहे. रस्ते रुंद, मधून मधून बाग, रस्त्यावर मध्यभागीं सुंदर दिवे आहेत. प्रतापगिरजी कोठींतून बाहेर पडतांच चर्चा निघाली कीं पादचारींनीं कोणत्या बाजूनें चालावे. लगेच दोन पक्ष पडले. पादचारींनीं उजव्या बाजूनें चालावें असें विनोबाजी म्हणाले. त्यांची दलील ( आरग्युमेंट ) होती कीं मोटारवाले भोंगा वाजवितात. जर समोरून वाहन येत असेल तर पाहून माणूस वाहनासाठीं रस्ता करून देईल. नाहींतर भोंग्याचा काय उपयोग ? अर्थातच डाव्या बाजूनें जावें म्हणणारांचेजवळ दलील दुसरी नव्हती. हैद्राबादचे सर्व मुसलमानच रजाकार किंवा त्यांचे सहाय्यक अशी बाहेरच्या लोकांची कल्पना होते, परंतु आज सकाळीं आम्ही मंजूरसाहेबांच्या घरीं गेलों. मंजूरसाहेबांना ' यार जंग ' हा किताब होता. परंतु येथील चळवळीच्या वेळीं त्यांनीं तो सोडला. येथल्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांना ते मदत करीत.



त्यांना रझाकारांनीं कमी त्रास दिला नाहीं. परंतु आपल्या तत्त्वापासून ते किंचितहि ढळले नाहींत. विनोबाजी घरीं आल्यानें त्यांना फार आनंद झाला. सहारा वाळंवटामध्यें जसे ओॲसिस तसे रझाकारी राजवटींत मंजूरसाहेब, शोएबुल्लाखान, जाफरभाई वगैरे लोक होत. विनोबाजींच्या समवेत फिरतांना अनेक विषय निघतात, अनेक प्रकारची चर्चा होते. नित्य नूतन ज्ञान मिळतें. हैद्राबादला व्यक्तिगत भेटींचा कार्यक्रम हाच खास कार्यक्रम आहे. बहुतेक दिवसभर भेटीगांठी होत असतात. सर्वांसाठीं प्रार्थनेच्यावेळीं विनोबाजी काय सांगावयाचें तें सांगतात. प्रार्थनेला लोक येथें खूप येतात. सर्व धर्मांचे लोक त्यांत असतात. आजच्या प्रार्थनेनंतर विनोबाजी आपल्या भाषणांत म्हणाले—
" आज प्रार्थनेच्या सुरवातीला कुराणांतला कांहीं भाग ( आयते ) माझ्या सूचनेवरून म्हटला गेला. त्यांत ईश्वराचीं दहा-पंधरा नांवें होतीं. दुसरे कांही नव्हते. ईश्वराचीं तीं नांवें सुंदर, पावन करणारीं, हृदयें साफ करणारीं. कुराण पुन्हांपुन्हां ईश्वराच्या नावावर येतें. जर कुराणांतून ईश्वराचीं नांवें असलेले भाग अलग केले तर त्याची कांही खास किंमत राहणार नाहीं. हिंदु धर्मग्रंथाचेहि असेच आहे. भागवत, महाभारत, रामायण इत्यादि ग्रंथाचेहि तसेच आहे. ईतर धर्मांचे जे ग्रंथ आहेत त्यांचेहि असेच आहे. अर्थ असा कीं सर्व धर्मांचें सार ईश्वराचा महिमा समजणें, ईश्वराचें नांव गाणें आणि चित्तशुद्धि करणें. काल त्याचीच चर्चा केली. त्याशिवाय कांही बोलणें मला सुचतहि नाहीं. ईश्वरस्मरणाचा अर्थ ज्या वाईट गोष्टी आपण पहातों, आपण ऐकतों त्या विसराव्या. चांगल्या गोष्टी आठवाव्या, त्यांचा संग्रह करावा.

## वाईट विसरा

आतां हिंदुस्थान वाईट हवेंतून निघाला आहे. जुना जमाना जात आहे. चांगली हवा येत आहे असे दिसत आहे. त्यावेळीं माणसांनीं ज्या गोष्टी केल्या त्या वातावरणांमुळें पराधीन होऊन त्यांनीं केल्या असें समजून परमेश्वराजवळ माफी मागून मोकळे झालें पाहिजे. जर त्या गोष्टींचें स्मरण राखूं तर त्या वाईट गोष्टी ताज्या राहतील. मग आमचें हृदय म्हणजे वाईट वस्तू साठविण्याची जागा, कचऱ्याची पेटी बनेल. दुनिया आज सुधारणेच्या मार्गावर आहे ती

विघडेल, आमचा मेंदू निकम्मा होईल. मग चांगल्या गोष्टींना तेथें जागा राहणार नाहीं. ईश्वराचें नांव मग कोठें राहील? माझी सर्वांना प्रार्थना आहे कीं झालें तें विसरा. त्या गोष्टीं मनुष्यस्वभावाच्या निदर्शक नाहींत, माणुसकीच्या द्योतक नाहींत. मनुष्याचें मन वाईट नसतें. कोट्यावधि लोक वाईट गोष्टी आपल्या मनानें करीत नाहींत हा विश्वास ठेवणें हा ईश्वरी स्मरणाचा अर्थ आहे. माणसांवरचा विश्वास ज्याचा उडाला त्याचा परमेश्वरावर भरंवसा नाहीं असेंच समजले पाहिजे.

ईश्वर सर्वत्र आहे. वाईट गोष्टी आहेत त्या वरवरच्या आहेत. राजकारणानें डोकें भरल्यामुळें असें झालें आहे. राजकारणाचें महत्व आहे. तेवढें कबूल करावें. पण आतां तो प्रश्न सुटला आहे. हिंदुस्तान स्वतंत्र झाला आहे. भलेबुरे करण्याची ताकत आतां हातीं आली आहे. आतां जें कार्य होईल तें लोकमतानें होईल, लोकांना हवें असेल तें होईल. ज्या प्रकारचें राज्य हवें असेल त्या प्रकारचें राज्य होईल. कोणतीहि गोष्ट लादली जाणार नाही. आपण वाईट गोष्टी विसरल्या पाहिजेत. माफ करीत गेलें पाहिजे. माणुसकी वाढवीत गेलें पाहिजे. पण सर्वांचेच हात रक्तानें रंगलेले. कोण कोणाला माफी करणार? परमेश्वरापाशीं माफी मागा. आपण जर बुराई विसरलों नाहीं तर मागें पडूं.

## गुंडांना धर्म नसतो

हैद्रावाद संस्थानांत कोठें मशीदी तोडून त्यांचीं मंदिरें बनविली. जेव्हां ती मशीद परत मागण्यांत आली तेव्हां असें सांगण्यांत आलें की "शंभर वर्षांपूर्वी ती मशीद नव्हती. मंदिर होते. तें परत केलें जाणार नाहीं. असें व्हायला नको आहे. हें चांगलें नाही. जर रझाकारांच्या जमान्यांत मंदिराची मशीद बनली असती तर ती गोष्ट मी समजूं शकलों असतों. शंभर वर्षांपूर्वीची गोष्ट खरी धरून चालले तरी त्यावर जोर देणे कोठवर चांगलें याचा विचार करा. यांतून कोणालाहि फायदा होणार नाहीं, धर्माचाहि फायदा होणार नाहीं.

अजिंठा आणि वेरुळचीं सुंदर लेणीं. सगळ्या जगभरचे प्रवासी तीं पाहतात. परंतु तेथल्या मूर्तीचीं नाकें तुटलेलीं. हीं सुंदर चित्रें श्रद्धेनें केलेलीं. तीं



कोणी तोडलीं? उत्तर मिळतें मुसलमानांनीं तीं तोडलीं. मला हें उत्तर पसंत नाहीं. पण उत्तर मिळतें त्याला काय करणार? माझें हृदय म्हणतें हें काम गुंडांचें आहे. गुंडांना धर्म नसतो. मुसलमान तो कीं जो ईश्वराला शरण असतो, सर्वांवर प्रेम करतो, नेकीनें चालतो. हिंदु तो कीं ज्याला हिंसेनें दुःख होते. तोहि प्रेम करतो. मानवांवर प्रेम करण्यापुढें जाऊन तो सर्व प्राणीमात्रावर प्रेम करतो, त्यांचें रक्षण करतो. असे असतात मुसलमान आणि असे असतात हिंदू. पण हें काम करणारे मात्र गुंड, त्यांना कोणताहि धर्म नाहीं!

कुराणांत मुसलमानांना सांगितलें आहे, "मुसलमानांनों, जे देवीदेवतांचें पूजन करतात त्यांची निंदा नका करूं. तुम्ही जर त्यांच्या देवीदेवतांची निंदा कराल तर तेहि तुमच्या अल्लाची करतील. गीतेनें 'आत्मौपम्य' वृत्ति आपल्याप्रमाणेंच दुसऱ्याला मानण्याची वृत्ति शिकविली. धर्माचें हें असें शिक्षण. ज्यांनीं हीं मोडतोडीचीं कामें केलीं ते बहकलेले होते. इस्लामचे अनुयायी ते नाहींत.

विचार करण्याची गोष्ट ही आहे कीं जर जुन्या गोष्टी आठवित बसूं तर हिंदुस्तान सोडून कोठें जाऊं? कोणाला ठीक होऊंच देणार नाहीं अशानें आम्ही. समोरच्याला 'बुरा बुरा' म्हणून आम्ही त्याला 'बुरा' बनवितों. वाईटपणाचें चिंतन करून वाईट बनतों. झालेली बुराई सोडली पाहिजे. परमेश्वराच्या नांवानें ही बुराई जाईल.

हैद्राबादमध्यें सर्व चांगलें होईल जर जुने विसरूं तर. ईश्वराचें स्मरण म्हणजे वाईटाचें विस्मरण. जर येथें सर्व जमाति प्रेमानें राहिल्या तर हिंदुस्तानांत चांगलें वातावरण तयार होईल. हिंदुस्तानकडे साऱ्या जगाची नजर आज आहे. साऱ्या दुनियेला लाभ व्हावा असा ईश्वरी संकेत आहे. रवींद्रनाथांनीं "महामानवेर सागर" म्हणजे 'मानवांचा महासागर' ह्या देशाला म्हटलें आहे.

हिंदुस्थानइतकें प्रेम दुसऱ्या देशांत नाहीं. हें आमचें धन आहे, ताकत आहे. हें जर ध्यानांत ठेवलें तर दुनियेच्या हवेंत आम्ही फरक करूं आणि हिंसेपासून दुनियेला वाचवूं.

आणखी ज्या गोष्टी मला सांगावयाच्या आहेत त्या मी उद्यां सांगेन."

मागें पुण्याला एक परप्रांतीयांसाठीं दलाचें शिबिर झालें होतें. हैद्राबादचे दोन लोक आले होते. पिसोळकर आणि आनंद भुमकर. आज कित्येक वर्षांनीं त्यांची भेट झाली. खूप बोललों. त्यांनीं त्या शिबिराहून आल्यावर हैद्राबादला चांगलें काम केलें. हैद्राबाद शहरांत सेवादलाच्या सोळा शाखा तेव्हां होत्या. परंतु रझाकारी राजवटींत पिसोळकर आणि बरेचसे लोक चळवळींत पडले. तुरुंगांत गेले. पिसोळकरच्या घरच्या नातेवाइकांनाहि धमक्या देण्यांत आल्या होत्या.

हैद्राबाद पहावयासाठीं आनंद बरोबर गेलों. चारमिनार पाहिला. हैद्राबाद शहर सुंदर वाटलें. युनिव्हर्सिटी पहावयालाहि जायचे आहे.

———

## २१।३।१९४९　　　: : :

आज सकाळीं बनजाराहिलवर महंमद शफींना भेटावयाचें ठरविले होते. येथील नवोदित पत्रकार वसंत गाजरे हे विनोबाजींच्या बरोबर प्रवासांत होतेच त्यामुळें परिचय झाला आहे. त्यांच्याबरोबर महंमद शफींना भेटावयाला बनजारा हिलवर गेलों. त्यांनीं अत्यंत आपुलकीनें स्वागत केले ७।८ मैल आम्हीं सायकलवर गेलों होतों त्यांनीं मोठ्या प्रेमानें आम्हाला पेय व बिस्किटें दिलीं. नंतर आमच्या गप्पा सुरूं झाल्या त्यांच्यांतली अजीजी–नम्रता सहज जिंकून घेणारी आहे. आमचे संभाषण सुरूं असतांनांच कोणाचा तरी फोन आला "अजी वोभी तो अपनेही बच्चे तो हैं। उनकी शरारतोंसे तंग आनेसे क्या होता है।"

"आपका विचार गलत है। यहाँही हमको रहना है, मुहब्बतसे मुहब्बत बढती है। पुराने जमानेमें हमने रझाकरोमें भर्ती होकर जो कुछ किया अुसके हिसाबसे ये शरारतें कुछ भी नहीं है।"

"यहाँके अपने मुसलमान भाअीयोंको दुःखमें छोडकर भाग जाना केअी बडा भारी काम नहीं है। अिससे तो दर्दमन्द भाअीयोंके साथ रहकर, अुनकी खिदमत करके मर पिटना अच्छा!"

अशाप्रकारचीं अर्धवट वाक्यें ऐकूं येत होतीं. शफी बाहेर आल्यावर म्हणाले "रझाकारांच्याकाळीं शेर बनून अत्याचार केले आणि आतां बिल्ली बनून पाकिस्तानांत जाऊं म्हणतात. मी सांगितले कीं येथल्या मुसलमानबंधूंचा तो विश्वासघात होईल."

मुहंमद शफी हे काश्मिरचे राहणारे आहेत. त्यांना देशकार्याची स्फूर्ति वडिलांच्यापासून मिळाली. गांधीजींची ओळख त्यांना त्यांच्या वडिलांनींच करून दिली म्हणाले, " यह इमानदार आदमी है, इसके पिछे चलो । " महंमद शफींच्या व्याख्यानांत " देश बापूका इन्सानियत फैलानेका काम " अशीं वाक्यें नेहमीं येतात. गांधीजीविषयींचें त्यांचें प्रेम हें त्यांच्या वडिलांनीं दिलेलें. ते अनेक भाषातज्ज्ञ आहेत. हिंदूंच्या धर्मग्रंथांचा त्यांचा अभ्यासहि सखोल आहे. गांधीजींजवळ त्यांनीं चार प्रतिज्ञा घेतल्या होत्या. कोणाहि हिंदी माणसाशीं इंग्रजींत भाषण करावयाचें नाहीं. हिंदुस्तानीचा प्रचार करावयाचा. स्वातंत्र्य मिळेपर्यंत लग्न करावयाचें नाहीं. सरकारी नोकरी करणार नाहीं--ह्या त्या चार प्रतिज्ञा. त्या प्रतिज्ञांवर अजून ते अढळ आहेत. काश्मिरमध्यें हिंदुस्थानी प्रचाराची मुहूर्त मेढ त्यांनींच रोवली.

शेख अबदुल्लांचा आणि जवाहरलालजींचा संबंध जोडण्याचें बरेचसे श्रेय शफींना आहे. ते म्हणाले " अत्याचार की लत लहूत बुरी चीज है । जिसने एक बार किसी स्त्रीपर अत्याचार किये वह फिर आगे अपनी माँ बहिनों का भी सोचता नहीं है । मुझे अफसोस अगर किसी बातसे होता है तो इन अत्याचारोंसे । और ज्यादा रंज इससे होता है कि इस लतको तोडनेकी कोशिश बहुत कम होती है ।"

त्यांचें इतिहासाचें ज्ञान तर अपूर्व वाटलें. साऱ्या जगाच्या इतिहासांतली उदाहरणें त्यांनीं दिली. महंमद शफीचें आत्मवृत्त रोमांचकारी असें आहे. ते जेव्हां उजेडांत येईल तेव्हां भारताच्या ह्या थोर भक्ताची कल्पना येईल. शफी येथें अपार काम करीत आहेत. त्यांच्या प्रकृतीवरहि बराच ताण पडला आहे. नॅशनल कॉन्फरन्सच्या कामाबद्दल आणि काश्मिरच्या इतिहासाबद्दलहि त्यांनीं खूप माहिती सांगितली. म्हणाले " आमच्या कार्यकर्त्यांची तोंडे सत्तेकडे नाहींत. आमचे फार थोडे लोक सरकारी नोकऱ्यांत आहेत. २० । २५ लोक सरकारांत जेमतेम असतील. बाकी सारे नॅशनल कॉन्फरन्सचें काम करतात. शेखअबदुल्ला सुद्धां प्रिमिअर व्हायला फारसे राजी नव्हते. अजूनहि ते म्हणतात दुसऱ्यानें कोणीतरी ही प्रधानकी घ्यावी मी पुन्हां आपल्या कामाला लागतों. परंतु येथें सारेच उलटें दिसत आहे. सारे सत्तेच्या मागें धांवतांना दिसत आहेत. त्यामुळें



जें काम कश्मिरमध्यें नॅशनल कॉन्फरन्स करीत आहे तें येथें दिसत नाहीं. आम्ही दिवाण काकच्या कारकीर्दीतलें सगळेच नोकर नाहीं काढले. त्यांना उदारतेनें क्षमा केली व कामावर ठेवले. आज त्यांचाहि उपयोग होत आहे. "

एका कॉंग्रेस कमेटीच्या अध्यक्षाबद्दल त्यांनीं सांगितलें. म्हणाले " येथें त्यांच्याहि सहकार्यानें काम करावयाचे असते. मी काश्मिरहून येथें आलों. येथल्या परिस्थितीवर काश्मिरचा विजय अवलंबून आहे हें आम्हाला दिसते म्हणून येथल्या मुसलमानांत विश्वास निर्माण करण्यासाठीं मी आलों. हैद्राबादचा लढा हा आम्हाला आपला लढा वाटतो परंतु ते कॉंग्रेस कार्यकर्ते म्हणाले " सरहद्द गांधींनींहि फसवले, पाकिस्तानांत मिळून गेले. आतां हे काश्मिरचे काय करतात ते पहावयाचे ! " मला संताप आला. सरहद्द गांधींनीं, त्या महात्म्यानें तुम्हाला फसवले का तुम्ही त्याला फसवले ? स्वातंत्र्य स्वीकारतांना स्वातंत्र्यासाठीं ज्यानें अखंड दोन तपें जीवन होरपळवून घेतलें त्याचा विचार तरी केलांत का? इतर प्रांतांत असेंब्लीच्या सभासदांच्या मतांवर ठरविलेंत आणि सरहद्द प्रांतांत प्लेबिसाइटला कशाला मान्यता दिलीत ? येथून प्रचारकांच्या सेना प्लेबिसाइटपूर्वी कां नाहीं गेल्या सरहद्दीवर. यांनींच स्वतःचा स्वार्थ पाहून त्या महात्म्याला दुःखाच्या खाईंत लोटलें आणि पुन्हां संशय व्यक्त करतात. कसले हे कॉंग्रेस कार्यकर्ते ! किती संकुचित यांची वृत्ति ! " त्यांचें म्हणणें अगदीं खरें होतें. काश्मिरचा लढा, सरहद्दीचा प्लेबीसाइट आम्हांला आपला वाटलाच नाहीं. सरहद्द गांधींवर आपण स्वातंत्र्य स्वीकारतांना अन्याय करीत आहोत असेंहि कोणाला वाटलें नाहीं आणि असें असतांना त्यांच्याबद्दल संशय दाखविणाऱ्यांना काय म्हणायचे !

वेळहि बराच झाला होता. पुन्हां भेटावयाचे आश्वासन देऊन आम्ही परतलों.

दुपारीं ओस्मानिया युनिव्हर्सिटी पहावयाला गेलों होतों. इमारती वगैरे फार सुंदर आहेत आणि शिक्षणहि स्वस्त आहे. उर्दूतून सारे विषय आतां पर्यंत शिकविले जात. आतां हिंदी माध्यम करणार ऐकले. मुलींच्यासाठीं वेगळीं कॉलेजें आहेत. आतां कांहीं थोड्या मुली मुलांच्या कॉलेजांत येतात परंतु पडद्याच्या

मोटारींतून वर्गात त्यांची बसावयाची जागा वेगळी. त्याला बाजूनें लाकडी पार्टीशन आणि फळ्यावरचे पाहण्यापुरते झरोखे. विद्येच्या क्षेत्रांतील ही गंमत वाटली. युनिव्हर्सिटी लायब्ररीहि चांगली आहे. तीहि पाहिली. तेथून संध्याकाळीं परतलों. विनोबाजींना युनिव्हर्सिटींत बोलावले होते पण ते गेले नाहींत. प्रार्थनेची वेळ झाली होती त्यामुळें प्रार्थनास्थानाकडेच गेलों. कालच्या प्रार्थनोत्तर प्रवचनाचें सूत्र घेऊन विनोबाजी म्हणाले

"काल आम्ही पाहिलें कीं गुंडांची आपली वेगळी दुनिया असते, त्यांना कोणताहि धर्म नसतो. असें असूनही ते दुष्कृत्य कां करूं शकतात हें पाहिलें पाहिजे. पुष्कळवेळां असें असतें की दुष्कृत्यें करणारे कांहीं थोडेच लोक असतात. असें असूनही ते दुष्कृत्यें करूं शकतात कारण जे स्वतःला चांगले मानतात, ज्यांचे विचार चांगले असतातहि त्यांची छुपी सहानुभूति ह्या गुंडांना असते. जर तसे नसते तर उघड रीतीनें दुष्कृत्यें करण्याची गुंडांची हिम्मत होती ना.

## सहानुभूतीचे प्रकार

सहानुभूती वेगवेगळ्या प्रकारची असते. वाईट केले परंतु ज्या परिस्थितींत तो होता त्या परिस्थितींत त्यानें जें केलें तेंच करणें शक्य होतें. हा सहानुभूतीचा एक प्रकार. कांहीं आपल्या मनाशीं म्हणतात, काम वाईट झालें खरें परंतु शेवटी नांवाला कां होईना तो आपल्या जातीचा होता. त्याचा कांहींहि दोष असो बचाव केला गेला पाहिजे. आपल्या मनाशीं त्याचा बचाव ते करून घेतात. कांहीं असेहि असतात, जे म्हणतात कीं गुंडांनीं जें कांहीं केलें तें समाजदृष्ट्या वाईट असलें तरी आपल्या जमातीसाठीं केलें असल्यामुळें चांगलेंच होतें. अशा प्रकारें युक्तिवाद करतात. गुंडांना मनांतून सहानुभूति दाखवतात. गुंड यामुळें थोडे असूनहि दुष्कृत्यें करूं शकतात. यासाठीं आपलें मन तपासलें पाहिजे. आपल्या मनांत अशा दुष्कृत्यांबद्दल सहानुभूति तर नाहींना हें पाहिलें पाहिजे. आपल्या मनांत अशी सहानुभूति नाहींच असें समजूं नये. वारंवार मन तपासलें पाहिजे. अशा प्रकारें मन तपासून आत्मशुद्धि करूं तरच येथें रामराज्य आणूं शकूं. तें स्थिर करूं शकूं. एक प्रकारचें स्वराज्य आम्हीं मिळविलें. उत्सवहि केला. स्वतंत्र झालों असें जाहीरहि केलें. सूर्योदय झाला तर



म्हणतात. परंतु उष्णता आणि प्रकाश मात्र मिळत नाहीं. तो कसला सूर्योदय? आम्ही जसें असूं तसें आमचें स्वराज्य बनणार हें शेवटीं लक्षांत ठेवलें पाहिजे. आम्ही जर बिघडलेलें असूं तर आमचें स्वराज्य सुधारलेलें कसें असेल? परक्याची सत्ता गेली आणि आमची आली एवढ्यानें नाहीं स्वराज्य होत. एक काळ असा होता स्वराज्य म्हणजे आपलें राज्य लोक तेव्हां मानीत. परंतु स्वराज्याची व्याख्या दिवसेंदिवस बदलत गेली. स्वराज्य म्हणजे रामराज्य असें मानण्यापर्यंत आपण येऊन पोंचलों.

## रामराज्यासाठीं आत्मशुध्दि हवी

रामराज्यांत कोणी कोणाला लुटत नाहीं, सारे प्रेमानें राहतात, सारे उद्योग करतात, उद्योग केल्याशिवाय खात नाहींत. उंचनीच मानित नाहींत. असें दृश्य दिसेल. आपल्या लोकांचें राज्य म्हणजे स्वराज्य असें आज जग नाहीं मानीत. आम्ही तर कधींच मानलें नाहीं. गांधींजीनीं तसें नाहीं आम्हांला शिकवले. खरें रामराज्य अजून जगांत कोठेंहि नाहीं. आम्हीहि स्थापन करूं शकलों नाहीं. तें जर हवें असेल तर त्यासाठीं आत्मशुद्धि केली पाहिजे. गांधीजी निरंतर सांगत कीं स्वराज्यासाठीं सेल्फ प्युरिफिकेशन, आत्मशुद्धि झाली पाहिजे. त्यासाठीं विधायक कामेंहि सांगितलीं. आम्ही तीं केलीं नाहींत, अंतःकरणें साफ केलीं नाहींत, काय काय तिथें लपलेले आहे आम्ही पाहिलें नाहीं. परिणाम असा झाला कीं स्वातंत्र्य तर आलें पण त्याच्या बरोबरच विनाशहि आला. आतां सावध झालें पाहिजे. आपली हृदयशुद्धि केली पाहिजे, दोष बारकाईनें तपासले पाहिजेत. आपले दोष लहान दिसले तरी शंभरपट मोठे करून पाहिले पाहिजेत.

## गुणदोषांचें स्केल

जगाला, स्वतःला शुद्धबुद्धीनें पाहण्याची युक्ति म्हणजे आपले दोष आणि दुसऱ्याचे गुण दिसतात त्यापेक्षां शंभर पट वाढवून पाहावे. आपले गुण आणि दुसऱ्याचे दोष दिसतील त्याच्या शतांश करून ते पहावे. नकाशा पाहतांना जसें स्केल लावलें म्हणजे खरें माप समजतें तसेंच येथें. नकाशांतला एक इंच म्हणजे एक मैल असें स्केलवरून आपण समजतों. तसेंच आपल्या व

दुसऱ्यांच्या गुणदोषाचें माप स्केल लावून पहावें म्हणजे खरें समजेल. जर आम्ही आत्मसंशोधन केलें तरच हिंदुस्तानचें रामराज्याचें स्वप्न साकार झालेलें दिसेल. म्हणून इतर लाख कामें बाजूला ठेवून आपलें हृदय बारकाईनें तपासण्याचें काम अगोदर करूया. हे सांगण्यासाठीं मी आलों आहें.

## साध्य आणि साधनें

हें करण्यांत एक अडचण आहे. लोक मानतात कीं उद्देश चांगला असला कीं झाले मग साधनें कोणतींहि वापरलीं तरी तीं चांगलीच. साधनांच्या बऱ्यावाईटाचा प्रश्नच नाहीं असें मानलें जातें. ही स्थिति फक्त हिंदुस्थानचीच आहे असें नाहीं. साऱ्या जगभर प्राचीन काळापासून लोक असे मानित आले आहेत. साध्य चांगले असलें म्हणजे वापरलेल्या बऱ्यावाईट साधनांचा बचाव होऊनच जातो असें मानतात. परंतु ही अतिभयानक वस्तु आहे. ह्या वस्तूवर जर आमचा विश्वास असेल तर मग कितीहि हृदय–संशोधन केलें तर कांहीं बाईट दिसणार नाहीं. ह्या दुष्ट विचारांत सर्व वाईटाला चांगले बनविण्याची किमया आहे. या धोक्यापासून आपण सावध असलें पाहिजे. गांधीजींसारखी व्यक्ति, जिच्यामुळें हिंदू धर्माचें मुख उज्वल झालें, शिर उन्नत झालें त्या व्यक्तिचा खून हिंदुधर्म रक्षणाच्या नांवानें होतो. हें कसें होऊं शकते ?धर्माचें रक्षण अधर्मानें होऊं शकते, उद्देश चांगला असला कीं झाले मग साधनें कोणतीहि वापरलीं तरी चालतील ह्या दुष्ट विचारानें गांधीजीची आहुती घेतली.

शिवाय उद्देश कोणाचा चांगला, कोणाचा वाईट हे कोणी ठरवायचे ? ज्याला जो उद्देश चांगला वाटतो तो त्याला चांगला. यासाठींच साधनें तपासण्याची गरज. साधनें चांगली कीं वाईट हा मुख्य मुद्दा आहे. जर साधनशुचितेवर विश्वास नसेल तर हिंदुस्थानसारख्या विशाल देशांत शांतता नांदणें कठीण. एवढा मोठा देश. इथें भिन्न भिन्न विचार असणारच. आपली विचारसरणी प्रत्येकाला चांगलीच वाटणार. त्या विचारांच्या सिद्धीसाठीं विवेकबुद्धि राखूनहि वाईट साधनें वापरतां येतात असें मानलें तर हिंदुस्तानांत शांति राहणें अशक्य आहे. स्वराज्य थोड्या दिवसांचे स्वप्न ठरेल अशानें.



मी आतां या निर्णयावर येऊन पोंचलों आहे कीं उद्देश कोणाचा कसा आहे तें मी पाहणार नाहीं. जर साधनें शुद्ध राखणारा तो असेल तर त्याला मी माझ्या विचाराचाच समजेन. राऊला जें सर्वोदय सम्मेलन झालें त्यांत यासाठीं आम्ही कांहीं विचार नक्की ठरविले. चांगल्या साध्यासाठीं चांगली साधनेंच वापरलीं पाहिजेत हा त्यांतला मुख्य विचार. हा आमचा ध्यनमंत्र आहे, ही आमची दृष्टि आहे. ही आम्ही कधींहि सोडणार नाहीं.

तुम्ही याचा विचार करा. जीं बाईट कामें झालीं त्यांचा बचाव करण्याचीं वृत्ति नका राखूं. झालेल्या चुका कबूल केल्या पाहिजे. जुन्या चुकींच्या गोष्टी विसरून गेलें पाहिजे. नवा योग्य मार्ग अवलंबिला पाहिजे. ही गोष्ट मानली तर आपण टिकूं. साधनें चांगलीं वापरा नाहींतर बेचैनीचा, बर्बादीचा अनुभव घ्या असें ईश्वरानें हिंदुस्थानसाठीं ठरवून ठेवलें आहे.'

———

## ३०।३।४९

येथें प्रवासांत व निवासांत कांहीं व्यक्ति माझी बरीच फिकीर प्रेमानें करतात. विनोबाजींचे दोन्ही सेक्रेटरी, त्यांच्या अंतेवासी महादेवीताआी, वर्ध्यांचे लक्ष्मीनारायण भारतीय हे नेहमी विचारपूस करतात आणि हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे एक त्यागी कार्यकर्ते अच्युतभाई देशपांडे यांचेहि माझ्या सोयी गैरसोयीकडे लक्ष असते. हैद्राबादच्या निवासाची सर्व व्यवस्था रामकिसनजी धूत व त्यांचे मित्र चरखा संघाचे वैद्यनाथन् वगैरेंनीं फार उत्कृष्ट ठेवली आहे.

हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसतर्फे सर्व भाषांचीं वृत्तपत्रें चालविण्यांत येतात. जयहिंद प्रिंटिंग प्रेस त्यांचा आहे. आज तिकडे गेलों होतों. पुण्याला मागें 'लोकशक्ति' वृत्तपत्रांत सहसंपादक असलेले एस्. आर. कुलकर्णी तेथें काम करतात. ४२ च्या चळवळींतहि त्यांनीं बरेंच काम केले आहे. त्यांच्याशीं परिचय झाला.

कार्यक्रमाच्या दृष्टीनें आजचा दिवस बराच गडबडीचा होता. आतांपर्यंत वैयक्तिक गांठीभेटी होत होत्या. आजपासून जरा सामूहिक स्वरूपांत कार्यक्रम सुरू झाले.

दुपारी कामगारवर्गांत काम करणारे कॉंग्रेसचे कार्यकर्ते आले होते. त्यांनीं आपल्या शंका विचारल्या. उत्तरें देतांना विनोबाजी म्हणाले "कामगारांना संप करण्याचा हक्क आहे. परंतु संपाचा त्यांनीं फार विचारपूर्वक व अपवादात्मक स्वरूपांतच उपयोग करावा. सारखे संप करीत असणें ठीक नव्हे. इतर सारे मार्ग थकले म्हणजे संपाचा सहारा ( मदत ) त्यांना घेतां येईल."



हिंदूंच्या पंचांगाप्रमाणें आज पाडवा. वर्षाचा नवा दिवस. सर्व धर्मीय लोकांचें सम्मेलन भरलें होतें. विनोबाजींनीं जमलेल्या लोकांना उद्देशून भाषण केलें.

## इन्सान आहोंत हें लक्षांत ठेवा

आजचा शुभदिन आहे. शुभ संकल्प करण्याचा दिवस. ह्या दिवसाच्या निमित्तानें आपल्या मनांत तुम्ही हा विचार पक्का करा कीं या पुढें हा हिंदु आहे, हा मुसलमान आहे, हा शीख आहे, हा पारशी आहे, हा ख्रिश्चन आहे असा विचार नको. कोण सुखी आहे, कोण दुःखी आहे एवढेंच पहा. जे लोक सुखी असतील त्यांनीं गरीबांना, दुःखींना मदत करावी. गरीबाला, दुःखीला मदत करतांना तो कोणत्या जातीचा आहे, तो हिंदु आहे कीं मुसलमान हा विचार नको. तो गरीब आहे, दुःखी आहे एवढा एकच विचार हवा.

विद्यार्थी जेव्हां शाळेंत येतो तेव्हां का त्याची जात आपण पहातों. त्याला विद्या हवी कीं नको, विद्येचें त्याला किती प्रेम आहे हें पाहिले जातें. आपणहि नित्यनिरंतर हाच विचार मनांत ठेवला पाहिजे. अलगपणा सोडला पाहिजे. आपण माणसाला शोभेसे वागावें.

## सर्व भाऊ भाऊ

जनावरें आणि माणूस यांच्यांत काय फरक आहे ? जनावरें एकमेकांच्या उपयोगी पडूं शकत नाहींत, एकमेकांची सेवा करूं शकत नाहींत. मनुष्य दुसऱ्याला मदत करूं शकतो; दुसऱ्याची सेवा करूं शकतो. एक कुत्रा दुसऱ्या कुत्र्याला मदत करीत नाहीं. दोन कुत्रे एकत्र आले कीं भांडतात. पण दोन माणसें, खरीं माणसे जर तीं असतील तर एकमेकांना मदत करूं शकतात, एकमेकांची सेवा करूं शकतात. दोन जनावरें पोट भरण्यासाठीं भांडतात. परंतु मनुष्याला स्वतः खाण्यापेक्षां खायला घालण्यांत अधिक आनंद होतो. त्यापेक्षां जास्त आनंद, अंतःसमाधान, स्वतः उपाशी राहून दुसऱ्याला खाऊं घालण्यांत त्याला वाटतें. आम्हाला आमचीं रोटी मिळो दुसऱ्याचे कांहींहि होवो असा विचार जर आम्ही करूं तर आम्ही माणूस कसले ? मग आम्ही हैवान ठरूं. दोन पायांची आम्ही

जनावरें असा अर्थ त्याचा होईल. सर्व भाऊ भाऊ आहोंत असें माना. सर्व एका ईश्वराचीं लेकरें आहोंत याचें भान ठेवा.

## प्रेम आणि दया जात ओळखित नाहींत

एकमेकांच्या दुःखाचा इन्सान विचार करूं शकतो. परंतु येथें काय दिसतें? हिंदूंच्या दुःखाचा मुसलमान विचार करणार नाहीं, मुसलमानांच्या दुःखाचा हिंदू विचार करतीलच असें नाहीं. निराश्रितांना कांबळी वाटतांनाहि जातीचा विचार. गरजू आहे कीं नाहीं ह्या प्रश्नापेक्षांहि तो हिंदू आहे का मुसलमान आहे का शीख आहे हे पाहणार? हिंदूंची कांबळी हिंदूंनांच देणार, मुसलमान इतरांना देणार नाहींत, शीखहि तसेंच करणार. गरजूपणाचा विचार मदत करतांना करावा. जातीचा विचार तेथे कशाला? मनुष्य बुडत असेल तर का त्याची जात पहाल? तो हिंदू असेल तरच त्याला काढावयाचें असा का विचार कराल? प्रेम आणि दया जात ओळखित नाहींत. जो कोणी दुःखी असेल त्याला सरळ मदत करावी. अशी जर मदत आपण करीत गेलों तर राजकीय प्रश्नहि सुटतील. हिंदमध्यें सुप्त ताकत आहे परंतु ती बाहेर येऊं शकत नाहीं. आमच्यामध्यें ऐक्य नसल्यानें प्रश्न बिकट होत आहेत. जातिवाद नको, फिरकापरस्ती नको. समाजाचे तुकडे करूं नका. भुकेल्याला अन्न द्यायचें, तहानेल्याला पाणी द्यायचें, जातपात न पाहतां द्यावयाचें ह्या मागची दृष्टि ओळखा.

## मोठा देश हवा असेल तर मोठें दिलहि हवे

आणि समजा सारे मुसलमान गेले तर कां भांडणें थांबतील? मग हिंदूंत होतील. पुढें त्यांच्यांतल्या जातीजातींत भांडणें होतील. पण ही भांडणें गेली तर वेगवेगळ्या भाषा बोलणारांमध्यें झगडे होतील. भाषावार प्रांतरचना झाली व हे झगडे मिटले तर एका भाषेच्या प्रांतातले लोक झगडतील. पुणें राजधानी असावी कीं नागपूर असावी? ह्या पुणेवाद, नागपूरवाद मग सुरू व्हावयाचा. अशा प्रकारें तुकडे करण्याची सीमाच नाहीं. आमच्या अपयशाचें कारण म्हणजे आमच्यांतले भेद. असे भेद जर ठेवायचे असतील तर एवढें मोठें राष्ट्र कशाला बनविलेंत? युरोपमधें जशीं लहान लहान हॉलंड, बेल्जम हीं राष्ट्रें तशी येथें कां नाहीं? पूर्वीपासून हा आपला मोठा देश



आहे. एवढा मोठा देश आणि एवढीं संकुचित मनें! हें कसें चालेल. मोठा देश हवा असेल तर मोठें दिलहि असलें पाहिजे.

## थोर भावना

लहान लहान राष्ट्रांची काय गत होते हें तर आपण पाहिलेच आहे. नेहमीं बिचारीं संकटांत असतात. आणि आपला देश केवढा मोठा! तो मोठा आजचा नाहीं. आज रेडियो, रेल्वे, टेलीफोन, विमानें सारें आहे. त्यामुळें सारें जगच जणुं लहान झालें आहे. परंतु एवढ्या मोठ्या देशाची कल्पना ही साधनें नसलेल्या आपल्या महामना पूर्वजांनीं केली. कावेरींत आंघोळ करणारा गोदावरी-कृष्णेंत आंघोळ करणाराहि "हर गंगे" म्हणतो. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या साऱ्या नद्या म्हणजे जणु गंगाच. ह्या थोर भावनेमुळें हा देश इतका मोठा झाला.

## येथलीं युध्दें यादवी युध्दें

इंग्रज इतिहासकारांनीं हिंदुस्तानचा इतिहास लिहिला. येथें ज्या लढाया चालू होत्या त्यांना त्यांनीं यादवी युद्धें (Civil Wars) म्हटलें. फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड यांच्यांतहि लढाया झाल्या पण तीं (Civil Wars) यादवीं युद्धें नव्हतीं. एवढेंच कशाला इंग्लंड स्कॉटलंडमधे झालेली लढाई, ती सुद्धां सिव्हिल वॉर नव्हती. परंतु येथल्या लढाया, यादवीं युद्धें तीं होतीं. मराठे आणि मुसलमानांची लढायी ही सिव्हिल वॉर होती. तें एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावरील आक्रमण असें नाहीं मानलें. तें आपसांतलें युद्ध होतें. झगडे वाईट होतेच परंतु तरीही आमची महानता, एवढा सारा देश एक मानण्याची वृत्तिच त्यांत दिसते. आमच्यांत सिव्हिल वॉर झाल्या. आक्रमणें आम्ही या लढायांना मानलें नाहीं. यांतहि आमचें मोठें मन मला दिसतें.

## जय हिंद ! जय दुनिया ! जय भगवान !

परंतु आज काय दिसतें. महाराष्ट्राचे धन्य महाराष्ट्र म्हणतात. आंध्रचें आंध्रमाताकी जय म्हणतात. तर गुजराथी जय-गुजरातचा घोष करतात. पण पूर्वींच्या काळीं असें नव्हतें त्यांना एकाद्या प्रांतांत जन्मलो याचा नसे अभिमान

वाटत. त्यांनीं 'दुर्लभम् भारते जन्म' म्हटलें. रेडियोयुग नव्हतें तरी त्यांनीं ह्या देशाची एकता मानली ही केवढी थोरवी. माझ्याकडे आजाद हिंद फौजेतला एक सैनिक आला म्हणाला "जयहिंद." मी म्हणालों "जयहिंद! जय दुनिया! जय भगवान!" फक्त हिंदचाच का साऱ्यांचा जय होवो. गांधीजींच्या मार्गाप्रमाणें चाललों तर एकाच्या जयांत साऱ्यांचाच जय होतो.

## भाषेचें महत्त्व संख्येवर नाहीं

काय आमचे झगडे. म्हणे मुंबई कोठें? मुंबई का आहे तेथून कोठें दुसरींकडे जाणार आहे. ती आहे तेथेंच राहणार आहे. हिंदच्याबाहेर थोडीच ती जाणार? आपल्या ताटांत वेगवेगळ्या कटोऱ्या आहेत. कोणत्याहि कटोरींत पडलें तरी तें आपल्याच ताटांत आहे त्याच्यासाठीं एवढीं भांडणें कशाला! पाहिजे तर ओली सुकी करून काय तें ठरवा. सारी मुख्य सत्ता जर दिल्लीच्या हातीं ठेवणार तर मग तीव्रता कशाला? एका भाषेचे थोडेसे लोक दुसऱ्या प्रांतांत गेलें तर बिघडलें कोठें? लोकांना वाटते आमची भाषा बोलणाऱ्यांची संख्या कमी झाली तर शक्ति कमी होईल. पण मराठीचें महत्त्व ती भाषा किती कोटी लोक बोलतात यावर का आहे? तीन करोड लोक बोलतात म्हणून का मराठी महत्वाची? कीं ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम या भाषेंत झाले म्हणून महत्त्व. महंमद पैगंबरांची गोष्ट आहे ना. लोक त्यांना म्हणाले "चमत्कार दाखवा." महंमद म्हणाले "माझ्या सारखा अनपढ शिकवतो हा काय कमी चमत्कार आहे?" अरबी भाषेचें महत्त्व कां? तिच्यांत कुराणासारखा ग्रंथ लिहिला गेला म्हणून त्या भाषेला महत्त्व. बोलणारांच्या संख्येनें भाषा महत्व पावत नाहीं. तामिल भाषेंत ऋषी तिरुवल्लुवर झाले, हिंदींत तुलसीदास झाले, मराठींत ज्ञानेश्वर तुकाराम झाले म्हणून या भाषा महत्त्व पावल्या.

## विविधतेंत सौंदर्य

आपला देश मोठा आणि दिल छोटें. त्यामुळें झगडण्यांत आपली फार शक्ति जाते. शक्तीचो वजाबाकी होते. आजचा हा प्रेमाचा दिवस आहे. हैद्राबादमधें सर्व प्रकारचें लोक आहेत, परमेश्वराची जणूं तुमच्यावर कृपा आहे.



"नाना धर्माणम् पृथिवीम् विवाजसम्" असे तो वेदांतला ऋषि म्हणतो. येथें वेगवेगळ्या भाषा आणि धर्म आहेत. याचें त्याला वाईट नाहीं वाटत. त्याला त्या विविधतेंत आनंद वाटतो. जर सगळ्यांचे सारखे नाक डोळे असते, विचार असते तर कोण कोणाशीं बोलला असतां? सारा आनंद मग मावळला असता. विविधतेंत सौंदर्य असतें नुसतेच जर 'सा सा' वाजविले तर तें का संगीत होईल? लोकांना तें रुचेल का? विविधता हा अलंकार आहे. योग्य उपयोग करण्याची अक्कल असेल तर विविधताहि फायदेशीर होऊं शकते. नाहींतर नुकसान होईल. तेल, काडी, वात असेल आणि अक्कल असेल तर प्रकाश मिळूं शकेल. नाहींतर आग लागेल.

झगड्यांमुळें आपलें जगांत हंसू होत आहे हें ध्यानांत घ्या. काय ते झगडे! आतां पुढें लोक मग चावलवाले, गेहूँवाले अशासारखें झगडे उभे करतील. आपण शहाणे होऊन झगडे सोडून देऊं या." असें विनोबाजींचें सुंदर भाषण झालें.

त्यानंतर बॅ. अकबरअल्ली व इतर वक्त्यांनीं भाषणें केली. आणि हा सुंदर समारंभ संपला. प्रार्थनेची वेळहि होत आली होती तेव्हां सर्व लोक प्रार्थनास्थानीं गेले.

प्रार्थनेनंतरच्या प्रवचनांत विनोबाजी म्हणाले—

## सेवेचें विशाल क्षेत्र

माझ्या प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो, काल आपण हें पाहिलें कीं आपलीं हृदयें जर साफ असतील तर गुंडांचें कांहींच चालणार नाहीं. त्याचाच आणखी पुढें विचार करतां करतां आपण हें पाहिलें कीं नुसतें ध्येय चांगलें असणेंच पुरेसें नाहीं. तें ध्येय गाठण्यासाठीं जीं साधनें वापरूं तींहि साफ असलीं पाहिजेत. खोट्याचा उपयोग नको, हिंसेचा उपयोग नको. जर हा विचार आमचा निश्चित होईल तर फार वेगानें प्रगति होईल, उन्नती होईल. नाहींतर एकमेकांची शक्ति खर्ची करण्यांत सारें सामर्थ्य खर्च होईल. जोडण्याच्या कामीं येणार नाहीं. जी सेवा आपल्याला करावयाची ती सरळ मार्गानें, सत्यानें, कोणालाहि न दाबतां, जबरदस्तीचा यत्किंचितहि उपयोग न करतां,

न दवतां किंवा कोणाच्याहि बाह्य जबरदस्तीशिवाय केली पाहिजे. जर हें ठरलें तर आमच्या समोर सेवेचें एक मोठें विशाल क्षेत्र येतें.

## राज्य अगोदर किसान कामगांचें मग इतरांचें

स्वराज्य नव्हतें तोंपर्यंत तें मिळविण्याचें ध्येय. त्यांतून सर्वांना उत्साह, जोश होता. नौजवानांना त्याग करण्याची संधि होती. आतां स्वराज्य आलें. आतां तो उत्साह कार्यकर्त्यांच्यामध्यें नाहीं. तो कसा आणावा असा प्रश्न लोक विचारतात तेव्हां फार आश्चर्य वाटतें ! आतां तर खरी कामाची संधि आहे. शेतांत काटेकुटे, दगडगोटे होते. ते उचलून फेंकून दिले. आतां जर तो किसान म्हणेल कीं काटेंकुटे दगडपथ्थर काढण्यांत उत्साह होता आतां ते वेचले. आतां कामांत उत्साह नाहीं वाटत. तर काय म्हणूं आपण त्याला ? हेंच ना कीं हा पागल झाला आहे. शेतीचें खरें काम तर या नंतरच सुरूं व्हावयाचें आहे. आतां बीं पेरावयाचें आहे, तें उगवल्यावर त्याची कापणी करावयाची आहे. शेतीला खरी सुरवांत आतांच तर व्हायची आहे. आतांपर्यंत केलें तें कांहीं फुकट नाहीं गेलें. तें केलें नसतें तर बीं पेरणेंच शक्य नव्हतें. ते दगड गोटे उचलण्यांत जेवढा उत्साह होता त्यापेक्षां उत्साह कमी न होता वाढला पाहिजे. काटे थोडे फार अजून असतील तर तेहि १ । २ वर्षांत सारे नाहींसे होतील देशांत राजेमहाराजे होते ठायींठायी. त्यांच्यामुळें तुकडे होण्यांची भीति होती. त्यांचा प्रश्न हळूं हळूं सुटत आहे. भाषावार प्रांत विभागणीचें काम राहिलें आहे. तें आवश्यक आहे. त्यांतून मातृभाषांचा विकास होईल. किसानांना समजणाऱ्या भाषेंत राज्यकारभार चालेल. हें राज्य अगोदर किसानकामगारांचे नंतर इतरांचे होईल. किसान कामगार हे पाया आहेत. त्यांच्याच आधारावर देश उभा राहाणार. त्यांच्या भाषेंत राज्यकारभार होणें जरुरीचें आहे. यासाठीं दुसऱ्या भाषेचा तिरस्कार करण्याचें कारण नाहीं. भाषावार प्रांत रचनेमुळें खेडूतांची आणि जनतेची सोय होणार म्हणून ते हवेत. भाषावार प्रांतरचना द्वेषानेंहि होईल आणि गरीबांच्या सेवेच्या दृष्टीनेंहि होईल. एकच गोष्ट पण चांगले चांगल्या उद्देशानें आणि बुरे बुराईनें करतात. परिणामहि मग तसाच होतो. संस्थानिकांचा आणि भाषावार प्रांतरचनेचा हे दोन प्रश्न सुटले कीं व्यवस्थेचें काम संपतें.



राजे जनसेवेला लागले आणि लोकांच्या भाषेंत राज्यकारभार सुरूं झाला म्हणजे विघ्नें टळलीं पण येवढ्यानें काम संपत नाहीं. मला तर आतां कामाबद्दल अति उत्साह वाटतो. लहानपणापासून मी रचनात्मक काम, जनसेवा करीत आहे. कित्येक वर्षे मी याच कामाला दिलीं. रोज चिंतन केलें. वातावरण विरुद्ध असूनहि काम करावें लागे. परिणाम समाधानकारक निघत नव्हते. आठ घंटे कातीत असें. मजुरी अधिक कशी मिळेल याचे प्रयोग करीत असें. शेतीत, चामड्यांत, ग्रामोद्योगांत, नई तालीममध्यें प्रयोग केले. परंतु तें वाढत नव्हते. कारण देशांत विरुद्ध ताकत होती आणि ती उन्नती होऊं देत नव्हती. आता ती ताकत गेली. आतां पेरणी करण्याइतकी जमीन साफ झाली आहे. पेरणी करतां येईल. फसल काढतां येईल.

## मजूर ठरूं अशी भीति लोकांना वाटते

शेवटचा एक प्रश्न आहे. गरिबीचा तो प्रश्न. प्रश्न उत्पादन वाढीशिवाय सुटणार नाहीं. परंतु नुसत्या उत्पादन वाढीनेंहि प्रश्न सुटणार नाहीं. आजच्या सारखे जर तुकडे राहिले तर उत्पादन वाढूनहि प्रश्न सुटणार नाहींत. दुःख जाणार नाहीं. कांहीं लोकांना जास्त काम करावें लागतें पण खायला पोटभर मिळत नाहीं. इतर कांहीं सेवा करतात पण उत्पादक काम करीत नाहींत. ते उत्पादक काम करीत नाहींत एवढेच नव्हे तर त्याना उत्पादक कामांचा तिरस्कार आहे. शारीरिक परिश्रम करून कांहीं निर्माण करणें हें हलक्या दर्जाचें ते मानतात. समाजाच्या धारणेसाठीं आवश्यक असलेलीं कामें करणारांना हलके मानल्यामुळेंच आपलें इतकें अधःपतन झालें आहे. शारीरिक, उत्पादक परिश्रम न करणारे उच्च मानले जात आहेत तोंपर्यंत नुसत्या उत्पादनाच्या कमीजास्तीपणानें प्रश्न सुटणार नाहींत. कांहीं लोकांना भूक लागत नाहीं. त्यासाठीं दंड बैठका डंबेल्स करतात. उठतात आणि बसतात. शरीराला श्रमवा पण त्यांतून उत्पादन होऊं देऊं नका असें आज चाललें आहे. कुदळीनें खणाल, झाडाला पाणी घालाल तर भूकहि चांगली लागेल पैदासहि वाढेल. पण श्रमांतून उत्पादन झाले तर आपण मजूर बनूं ही भीती लोकांना वाटते. Fifteen Minutes Exercise पंधरा मिनीटांचे व्यायाम निघाले आहेत. खोलींत १०–१५ मिनीटें हातपाय हलवायचे म्हणजे म्हणे भूक लागेल. पण उत्पादन करणाराना आम्ही नीच

ठरविलें. त्यामुळें आपल्या श्रमांतून कांहीं उत्पादन झालें तर आपण नीच ठरूं अशी भीति लोकांना वाटते नई तालीममधें उद्योगांतून शिक्षण देतात. एक गृहस्थ म्हणाले, " आतां मुलांकडूनहि तुम्ही कामें करवून घेणार ? " दोन मुलें चक्कीवर बसली. त्यांच्या चक्की फिरवण्यानें जर खालीं पीठ पडूं लागलें तर फॅक्टरी होईल ना ती. मग काम करणारा मजूर ठरावयाचा. कारण त्यांतून उत्पादन होतें. पण मी जर सांगितलें कीं दहावेळां तीं मुलें उजवा हात लावतील, दहा वेळां डावा हात लावतील. चक्कींत गहू टाकणार नाहीं. खालीं पीठ पडणार नाहीं. तर मग लोक सारे खूष होतील. कसरतीचा हा नवा तरीका आहे म्हणतील. त्या चक्कींत गहूं टाकले कीं त्यांना तिरस्कार वाटेल. मजूरी विषयीं जोंपर्यंत अशी हलकेपणाची भावना आहे तोंपर्यंत ह्या देशांत दोन वर्ग राहतील. त्यांचे झगडे होत राहतील. खाणें तर सर्वांनाच लागतें मग आपल्या खाण्यासाठीं जे उत्पादन करतात त्यांना हलके कां समजावें ? एक चाकू अतिकामानें झिजत आहे. दुसरा काम नसल्यामुळें गंजून नाहींसा होत आहे. एकाला पोटभर खावयाला मिळत नाहीं आणि दुसऱ्याला भूक लागत नाहीं. भगवंतानें सर्वांना तोंड दिलें आणि हातहि दिले. कांहींनीं काम करावें आणि कांहींनीं खावें असें जर त्याला वाटत असतें तर त्यानें कांहींना नुसती तोंडें दिलीं असतीं आणि कांहींना नुसते हात दिले असते. कांहींना राहू केलें असते, कांहींना केतू केले असतें. कांहीं डोक्याचे आणि कांहीं धडाचे ठेवले असते. प्रत्येकाला डोक्याचें आणि हाताचें काम हवे आहे. तरुणांनो, तुम्हाला जर क्रांति हवी असेल तर कामाला लागा आणि दाखवा कीं परिश्रम म्हणजेच पूजा आहे. परिश्रम म्हणजेच देशसेवा आहे. बिना-काम खाणें पाप आहे. जो परिश्रम न करतां खातो तो चोरीचे खातो असें गीता म्हणते. जेव्हां प्रोफेसर आणि डॉक्टर, मॅजिस्ट्रेट आणि वकील, व्यापारी आणि बुद्धिमान हातानें कामें करतील, चक्की चरखा चालवितील तेव्हांच उत्पादन वाढ होऊं शकेल. आज सारे उत्पादन वाढ सांगतात. किसानांना, मजूरांना उत्पादन वाढविण्याला सांगतात. पण बाकीचे काय करतात ? जर उपवास करीत नसाल तर उत्पादनाचें काम नको का करायला? उत्पादन वाढीची जबाबदारी देशांतल्या सर्व जनतेवर आहे. सर्व जेव्हां उत्पादक परिश्रम करतील तेव्हांच उत्पादन वाढ होऊं शकेल. देशांत शक्ति आहे पण तिचा साक्षात्कार झाला पाहिजे व उपयोग करून घेतला पाहिजे.



## हातानें काम करूं तर क्रांति येईल, साम्ययोग येईल

एक मनुष्य एकदां सांगत होता. खाणारीं १० तोंडें आहेत. पण परमेश्वरानें वीस हातहि दिले आहेत हें तो विसरला. ते जर काम करूं लागतील तर मग १० तोंडांना खाऊं घालणें कठिण नाहीं. पण वीस हात कामाला लागले नाहींत. परमेश्वराची काय कसूर आहे ? त्यानें जर एका हाताला दोन तोंडें दिलीं असतीं तर त्याची कसूर होती. पण तसें नाहीं. आतां तक्रार कसली ? हातानें जर आपण काम करूं तर क्रांति येईल, साम्ययोग येईल. साम्ययोग हा ह्या युगाचा संदेश आहे. सर्वांनीं उद्योग करून साम्ययोगाच्या प्रस्थापनेंत भाग घ्यावा. विद्यार्थी आणि शिक्षकांनीं रोज एक तास उत्पादन करावें. प्रत्येकानें थोडें थोडें काम केलें तरी महान् कार्य होईल. पावसाचे थेंब थोडे थोडे सर्वत्र पडतात पण जमीन भिजवितात, तिला सस्यश्यामल करतात.

प्रत्येक आईनें जेवणापूर्वी मुलाला विचारावें तूं आज काय पैदा केलेंस ? पैदाईस केल्यावाचून खाणें म्हणजे पाप ही भावना सर्वत्र पसरेल तर देशाचा नूर पालटून जाईल, सर्वत्र तेज येईल. प्रत्येकजण मजुरी करतो म्हणजे देशाचें काम करतो मेंदूला मजुरीनें तरतरी येते, ताजेपणा येतो; विचारशक्ति वाढते असा माझा अनुभव आहे. नुसत्या बुद्धीनें चांगला साफ विचार नसतों मी करूं शकलों.

न्यायाधीश जर चक्की, चरखा चालवील, लांकडें फोडण्याचें काम करील तर त्याचा फैसला खरा होईल. त्याचा मेंदू कधीं थकणार नाहीं. कामांतच त्याला विश्रांति मिळेल. ही अनुभवाची गोष्ट आहे. देशासाठीं भगवद्भक्ति म्हणून उत्पादन करा. रात्रीं त्यावांचून जेवायचें नाहीं ठरवा. असें कराल तर श्रमाची प्रतिष्ठा होईल, मजुरांची उन्नति होईल. कबीरानें विणणारांची, नामदेवानें शिंप्यांची, श्रीकृष्णानें गवळ्यांची, रोहिदासानें चांभारांची प्रतिष्ठा वाढविली, इज्जत वाढविली. साऱ्या संतांनीं परिश्रमाची प्रतिष्ठा वाढविली. गांधीजीहि सूत कांतून प्रार्थनेला गेले. जर मजुरीची प्रतिष्ठा वाढली तर मजूरमालक सवाल मिटून जातील.

३१।३।१९४९ : : :

## सज्जनता आपला प्रभाव टिकवते

आज सकाळीं फिरावयाला म्हणून सर्व गोवळकोंड्याकडे निघाले. हैद्राबादपासून जवळ हा किल्ला आहे. किल्ला चढतांना नांवाविषयीं चर्चा निघाली. गोल-कुंडा म्हणजे गोल पहाड याचा अथ कांहीं म्हणाले. ह्या प्रदेशांत दगड खूपच आहेत. विनोबाजी म्हणाले. " ते गोल-कुंडा नसेल. गोवलकोंडा तर नाहींच ते गोपाल-कुंडा म्हणजे गोपाळांचा पर्वत आहे. " जाफरभाई हैद्राबादचे एक कार्यकर्ते. ते म्हणाले " येथें दगड खूप आहेत " विनोबाजींनीं कुराणांतली एक आयत सांगितली. तिचा अर्थ " जगांत कांहीं लोक दगडापेक्षांहि नीच असतात " असा. ह्या किल्ल्यांत पूर्वी राजानें त्याचा एक दिवाण रामदास ह्याला कोंडून ठेवलें होते तळघरांत. रामदासस्वामी आणि हा रामदास वेगळा. परंतु तोहि संत पुरुषच होता. त्याला कोणी मारले याची चर्चा निघाली. कोणाला सांगता येईना. विनोबाजी म्हणाले " रामदासाचें नांव ठाऊक आहे पण त्याला मारणाऱ्याची कोण आठवण ठेवतो ? येशूला क्रूसवर कोणीं चढविलें, सॉक्रेटिसाला विषाचा पेला कोणी दिला आहे जगाला ठाऊक ? त्यांची नांवें सारे विसरले. जगांत दुर्जनता टिकूं शकत नाहीं. सज्जनता मात्र आपला प्रभाव टिकवू ठेवते. " किल्यावरून फिरून आम्ही उस्मान व हिमायत सागर पहावयाला गेलों होतों. येतांना ज्या मोटारींत मी बसलों होतों. ती सर्वांच्या मागें होती त्या रस्त्याला धूळहि खूप होती. पुढच्या बाजूला बसून मोटार चालविणाराला जवळ आलेल्या बैलगाड्या अगदीं नजीक आल्यावर दिसल्या. मोटार वळवितांच ती रस्त्याच्या खालीं उतरली. पुन्हां ती वळवितांना ब्रेक ऐवजी अक्सीलरेटरवर पाय ठेवल्यानें



मोटार भरदिशीं दुसऱ्या बाजूला उतरून शेतांत घुसली. सुदैवानें मोटार खेरीज कोणाला इजा झाली नाहीं. परतायला यामुळें बराच वेळ झाला.

दुपारी चर्चेसाठीं कांहीं प्राध्यापक आलेले होते. भाषा व लिपीवर त्यांच्याशी खूप सुंदर चर्चा झाली. " उच्च शिक्षणहि प्रदेश भाषेंतच चालावे. पण प्राध्यापकांना हवें तर त्यांनी इंग्रजीचाहि अभ्यास करावा. विषय हिंदुस्तानींत समजावून देण्याची त्यांना मुभा असावी म्हणजे परप्रांतीय प्राध्यापकांचाहि उपयोग होऊं शकेल " विनोबाजी म्हणाले.

## स्त्रियांचीं कर्तव्यें आणि हक्क मनुष्यांसारखेच

त्यानंतर कांहीं भगिनी आल्या होत्या. त्यापैकीं एकीनें " समाजवादी विधायक कार्यक्रमावर विश्वास ठेवीत नाहींत " म्हटलें. " विनोबाजी म्हणाले चरखा, चक्की नको असा विचार समाजवादांत नाहीं मोठे उद्योगधंदे राष्ट्राच्या मालकीचे असावे असें त्यांचें म्हणणें आहे. " चर्चेत ते म्हणाले " स्त्रिया कोणी स्वतंत्र प्राणी नाहींत. त्याहि मनुष्यच आहेत. त्यांची कर्तव्यें आणि हक्क मनुष्यांसारखेंच. "

विनोबाजी भगिनींच्या सभेंतून प्रार्थनेला आले. प्रार्थनोत्तर प्रवचनांत ते म्हणाले—

## परिश्रमाची किंमत ओळखली पाहिजे

काल आम्ही जी गोष्ट पाहिली ती फार विचार करण्यासारखी आहे. आपल्या देशाच्या दृष्टीनें परिश्रमांची इज्जत, किंमत वाढविणें जरूर आहे. पण वाढविणें शब्द बरोबर नाहीं. शरीरपरिश्रमाची किंमत आहेच. ती आपण ओळखली पाहिजे. चित्तशुद्धि आणि धर्मभावना यासाठींहि शरीरपरिश्रमाची जरुरी आहेच.

## मेंदूला खुराक हवा, शरीराला मेहनत हवी

आम्ही अलिकडे जें अर्थशास्त्र बनविलें आहे तें Division of Labour श्रम-विभाजन शिकवितें. वैदिक काळींहि वर्णव्यवस्थेंत काम वाटण्याची सोय होती. परंतु श्रमविभाजनाचा अर्थ असा नाहीं कीं कांहींनीं

हातानें कामें करूंच नयेत. अर्थ इतकाच कीं प्रत्येकाला अलग अलग गुण मिळाले त्याचा उपयोग प्रत्येकानें आपआपल्या परीनें समाजाला द्यावा. पण तशाप्रकारें समाजसेवा करूनहि जी जबाबदारी सर्वांवर येते ती आम्ही विसरूं शकत नाहीं. प्रोफेसर शिकवितो, विद्यार्थी शिकतो, न्यायाधीश न्याय देतो. अशी वेगवेगळीं कामें ते करतात आणि केलीं पाहिजेत. त्यांची आवश्यकता आहे. परंतु उत्पादक परिश्रम करण्याची साऱ्या समाजावर आणि प्रत्येक व्यक्तीवर जबाबदारी येते. त्यांत कोणाला सूट नाहीं. प्रत्येकाच्या मेंदूलाहि खुराक हवा. शरीराला मेहनतहि हवी. पण आम्ही विभागच असे केले कीं कांहींना दिमागी कामच नको, कांहींना शारीरिक श्रम नको. हें चूक आहे. कांहींना फक्त मेहनत करावी लागते, इतर मदत करीत नाहींत हें बरोबर नाहीं. वेदांनीं विभागणी केली आहे. पंचजनांना वेगवेगळीं कामें सांगितली आहेत. पण त्यांना " पंचकृष्टीः " म्हटलें. पांच मजूर म्हटलें. प्रत्येक मजूर आहे. मजुरी कमीजास्त असेल पण प्रत्येकानें मजुरी केली पाहिजे. नाहींतर समाजाचे तुकडे होतात आणि एक काम उंच आणि दुसरे नीच असा भेद निर्माण होतो. दुनियेंत आणि हिंदुस्थानांतहि असा भेद आहे. हिंदुस्थानांत प्रत्येक गोष्टीला धर्माचें बळ असे. परंतु आतां तसें होत नाहीं. भंग्यानें कायम भंगी काम करावें आणि इतरांनीं पर्वा करूं नये. अशामुळें भंगी नीच मानलें गेलें. त्यांना अस्पृश्य मानलें. हा धर्म नव्हे ही गुलामी आहे, हा जुल्म आहे. यानें समाजाला नुकसान पोंचतें. हा असला भेद नाहींसा केल्यावांचून सर्वोदय येणार नाहीं. कोणतेहि समाजसेवेचें काम उच्च-नीच मानूं नये ही गोष्ट अति आवश्यक आहे पण ही केवळ बोलण्याची गोष्ट नाहीं.

## जितका जो विद्वान तितका तो त्यागी

मजुरांना मजुरीहि समान मिळाली पाहिजे. जेथे अध्यापक आणि सुतार, न्यायाधीश आणि भंगी यांच्या मजुरींत इतका फरक नसेल तो समाज व्यवस्था धार्मिक. प्राचीन काळीं आजच्या सारखें नसे. त्याकाळीं विद्वान समाजाकडून मिळे त्यावर संतोष मानी, फकीरी घेई. जितका जो विद्वान तितका तो त्यागी असे. सुतारापेक्षां त्याला जास्त पगार नव्हता. आज उलट परिस्थिति आहे.



प्राध्यापक सहा महिने शिकवितो. सहा महिने तर त्याला सुट्टी असते. तनखा त्याला बारा महिन्यांचा. दिवसाचे दोन अडीच तास तो काम करीत असेल नसेल पण त्याचा पगार मोठा. त्या मजुराच्या आणि प्राध्यापकाच्या वेतनांत किती फरक? ही टीका नाहीं आहे मी करीत. तो प्राध्यापक आणि मजूर म्हणजेहि मीच. मी प्राध्यापकाचें आणि मजुरीचें दोन्हीं कामें केलीं आहेत. दोन्हीं मला समान आहेत. जितके प्राध्यापकाचें काम जरूरी तितकेच मेहतराचेंहि जरूरी आहे. पण आज त्यांच्या प्रतिष्ठेंत फरक आहे. कमाईंत फरक आहे, तो नको. आज तर उलट स्थिति आहे. जो जास्त शिकला तो जास्त पैसे मागतो. मला ज्ञानानंद मिळतो. मजुरी कमी मिळाली तरी चालेल असा विचार नाहीं तो करीत. इतरांना ज्ञानानंद मिळत नाहीं त्यांना तो द्यावा असा विचार नाहीं तो करीत. गरीबांचा मी सेवक हें तो विसरतो. जे संपत्तिमान आहेत त्यांची सेवा तो करतो. काम करीत नाहीं. कामाचा अनुभव त्याला नसतो. खरी सेवा त्याला लाभत नाहीं तें बंगाली गीत आहे ना?

निचोर काछे होते निचूर शिखली न रे मन॥
लागेनो जार पायेर धुली किनीबी तार चरन धूली॥

तूं भगवंताचा सेवक होऊं इच्छितोस ना? त्याची पदधूली डोक्यावर घेऊं इच्छितोस ना? जे नीच गणले आहेत त्यांची सेवा कर. त्यांची चरण धूळ मिळेल, पण तूं तर त्यांची सेवा करतोस ज्यांच्या पायाला धुळीचा स्पर्शहि होत नाहीं. मग तुझी इच्छा कशी सफळ होईल?

आमचा सुशिक्षित सामान्य जनतेपासून अलग राहतो आणि खरी सेवा करू शकत नाहीं. उत्पादनाचें काम करणारी जनता ज्ञानावाचून राहिली. त्यामुळें आमची कारागिरी, सारें कौशल्य गेलें. उत्पादनहि घटलें. आम जनतेचें उत्थान झालें नाहीं. अधःपतन झालें. आम जनता अधःपतित ठेऊन इतर उन्नती नाहीं करूं शकणार. आम जनता हा पाया आहे.

## सद्गुण आम जनतेच्या सेवेंत लावा

पाणी जसें खालीं खालीं जातें, समुद्राकडे जातें, त्याप्रमाणें ईश्वरानें जे जे सद्गुण दिले आहेत ते आम जनतेच्या सेवेंत लावावयाचा विचार हवा. कुराणांत

सांगितलें आहे, ईश्वर अव्यक्त आहे. त्याची सेवा करतां यावी, दर्शन घेतां यावें म्हणून आम जनतेची सेवा करा. त्याशिवाय आत्मसंतोष नाहीं. हिंदुस्तानची जनता जी मरत आहे तिची सेवा न केली तर तिची आणि आमची स्थिति काय होईल. त्यांना खायला नाहीं. कसें होणार ते इन्सान? त्यांच्याकडे डोळेझाक करून मेवे खाल्ले तर त्यांत काय गोडी? त्यासाठीं उंचनीच भाव गेला पाहिजे. प्रत्येकानें उत्पादक परिश्रम केले पाहिजेत. ह्यामुळें मजुरांच्या हृदयाशीं हृदय जुळेल. सुख-दुःखांत भागीदार होतां येईल. खरी सेवा करण्याची संधि मिळेल.

## समाज परमेश्वर रूप माना

असें जर न करूं तर सर्वत्र भेद पडतील. शरणार्थी, हरिजन, किसान, मजूर, भिल्ल, हे दुःखी आहेत. दिवाळीच्या दिवशीं भिल्लाच्या घरांत शेरदिड-शेर धान्य असते आणि शहरांत उत्सव चालतो. हें कसें वाटतें? यांतून कसें जीवन सुखी होणार? त्या भंग्याविषयीं देखील किती आपली बेपर्वाई. त्याला माणूस आपण मानीत नाहीं. त्यामुळें आम्ही अमानुष ठरतो. त्याच्या-बद्दल आम्ही विचारच करीत नाहीं. सफाई करणारा भंगी नचि आणि घाण कर-णारे उच्च! जोडे करणारा चांभार नीच आणि जोडे वापरणारे उच्च! मजूरी करून उत्पादन करणारा मजूर नीच आणि रोटी खाणारा उच्च! स्त्रियांनाहि नीच मानण्यापर्यंत आमची मजल. कारण त्या हातानें सेवा करतात ना. दळायला पुरुष तयार नाहींत. कारण तें तर स्त्रियांचें काम, म्हणून त्यांचा तिरस्कार. रसोई पुरुषांना नाहीं. जणूं त्यांना रसोईची जरूरीच नसते. सुताचेंहि तसेंच तें म्हणे स्त्रियांचें काम. आम्ही तें करूं तर नीच ठरूं अशी भीति वाटते. शहर आणि देहात, स्त्री आणि पुरुष असे अन्यायाचे तुकडे आम्ही केले. अशानें जीवन सुखी होणार नाहीं. समाज परमेश्वररूप माना त्यावांचून दुःखच राहील. गरीबांची सेवा करा. रोज कांहीं तरी मजुरीचें काम करून त्यांचें स्मरण करा.

## सामराज्य हवें

पूर्वी समाजरचना भिन्न होती. यंत्रें तेव्हां नव्हती. छापणें सोपे नव्हते. पूर्वीच्या राजांजवळ शक्ति नसे. श्रीमंताजवळहि नसे. पण आतां सर्वांत समानता



हवी. ती युगाची मागणी आहे. 'सामराज्य' हवे आहे. 'सामराज्य' हा नवा शब्द आहे. बिहारचे गव्हर्नर असलेले माधवराव अणे. दर पाडव्याला संस्कृत कविता करून ते मित्रांना पाठवितात. ह्या वेळच्या कवितेंत ते सामराज्य हवे म्हण-तात. रामराज्य झालें, धर्मराज्य झालें आतां सामराज्य हवें. त्यांत फरक नाहीं. रावण होता तेव्हां रामराज्य झाले. कौरव होते तेव्हां धर्मराज्य झाले. गरीबांना पिळणाऱ्यांचा विरोध म्हणून आतां 'सामराज्य' हवें. आज नवें वर्ष सुरु झाले. त्याचे नांव विरोधी नाम संवत्सर. विरोध कोणाचा आणि कसा? हृदयांत विष-मता आहे तिचा विरोध. त्यासाठीं उंचनचि भाव काढा. समानता आणा. जीव-नांत मजूरांच्या कामाला स्थान द्या. उचनीचतेचा विरोध, वाईटविचारांचा विरोध हा सच्चा विरोध.

नौजवानांना माझें सांगणें आहे कीं सर्वोदयाच्या ध्येयासाठीं त्यांनीं प्रयत्न करावा. स्त्री पुरुष, मालक मजूर, खेडूत शहरी, मेहतर प्रोफेसर, छोटे बडे सारे समान व्हावे, मजूरांचा आदर करूं तेव्हांच हे होईल."

१।४।१९४९ : : :

## लोकनागरीचा वर्ग

विनोबाजी नेहमीं म्हणत असतात कीं संस्था निर्जीव असते म्हणून संस्थांच्याकडे मी जात नाहीं. व्यक्तींच्याकडे जातों. आज सकाळच्या फिरण्यांत वेगवेगळ्या लोकांच्या घरीं जाण्याचा कार्यक्रम होता. रस्त्यानें जातांना एका तेलगू वाचनालयांत आम्हीं गेलों. विनोबाजीनीं सारी वृत्तपत्रें चाळलीं. तेथें जुन्या हस्तलिखित पोथ्याहि कांहीं होत्या. भिंतीवर तेलगू कवींची चित्रें होतीं. परंतु लोकांत इतकी अनास्था कीं चित्रांतील कवींचीं नांवेहि सांगतां येत नव्हती. कांहींच्या घरीं जे विनोबाजी पोंचले ते अगदीं अयाचित. तेथून आल्यावर लोक-नागरीचा वर्ग विनोबाजीनीं घेतला. तसें पाहिलें तर व्याकरण, शास्त्रीय विषय अति कंटाळवाणें वाटतात. परंतु विनोबाजीनीं फार सरस रीतीनें लोक-नागरी समजावून दिली. सुरवातीला त्यानीं दोन गोष्टी सांगितल्या. म्हणाले "जी गोष्ट मला पटते त्या गोष्टींचा मी लगेच अंमल करतों. ह्या माझ्या गुणाचें भान मला आहे. हा गुण इतरांत जरा कमी भासतो. आणि आपल्याकडे अभ्यास करण्याची वृत्तिहि फार कमी आहे. कारण लोकांत सत्त्वच कांहीं राहिलें नाहीं. हिंदुस्थानांत एक देशभाषा आणि प्रदेश भाषा ठायींठायीं असणार. राष्ट्रलिपि नागरी राहील. इतर सर्व भाषांचें साहित्य नागरी लिपींत छापावें म्हणजे सर्व लोक लिपीचा सुरवातीला अभ्यास न करतां भाषेचा अभ्यास करूं शकतलि. आणि हिंदुस्तानी प्रदेश-लिपींतून शिकवावी म्हणजे लिपीच्या अभ्यासाशिवाय वेगवेगळ्या प्रदेशांतले लोक राष्ट्रभाषा शिकून घेतलि. नागरी लिपि राष्ट्रलिपि करावयाची म्हणजे सर्व प्रकारचे तिच्यांत उच्चार लिहितां



आले पाहिजेत व जसें लिहिलें तसेंच वाचून योग्य शब्द उच्चारला गेला पाहिजे." सुरवातीला जोडाक्षरांपसून विनोबाजींनीं सुरवात केली. युक्ताक्षरें लिहितांना ती दुर्बोध कशी होतात हें त्यांनीं दाखवलें, त्यांनी Godown हा शब्द अवयव पाडून God-own असा लिहिला. नागरी लिहीतांना असेच चुकीचे अवयव युक्ताक्षरें-लिहिण्याच्या सध्यांच्या पद्धतीनें कसे पडतात तें त्यांनीं उदाहरणांनीं दाखविलें. युक्ताक्षरें लिहितांना हलन्त वापरून शब्द-घटना स्पष्ट होईल अशा रितीनें शब्द लिहावेत असें त्यानीं सांगितलें. उत्साह हा शब्द उत्‌साह असा लिहावा. अशा प्रकारें जर युक्ताक्षरांची योजना झाली तर विद्यार्थ्यांचा निदान दोंन वर्षे वाचतील म्हणाले. 'ख' हें अक्षर बदलून गुजरातितला ख स्वीकारावा म्हणाले. कानडीप्रमाणें नागरींत ऱ्हस्व 'अे', 'ओ' लिहिण्याची सोय कशी करावी ते सांगितलें. दोन अनुस्वार असावेत. 'वेदांत' ह्या शब्दाचे दोन वेगवेगळे अर्थ आहेत. एक वेदामध्यें व दुसरा वेदशास्त्र. हे दोन वेगवेगळे अर्थ दोन वेगवेगळ्या उच्चारांनीं प्रकट होतात. त्या उच्चारासाठीं दोन चिन्हे हवींत. वेद-शास्त्र या अर्थी जो शब्द आहे तो 'वेदांत' असा लिहावा असें सांगितलें. नाहींतर इतर भाषी लोक 'बरं झालं' हें 'बरम् झालम्' असे वाचतील. वेगळ्या लिप्यांचा सखोल अभ्यास करून विनोबांजींनीं 'नागरी' चे संशोधन केलें आहे. ते म्हणाले "पूर्वी दुसऱ्या चाकोरींतून साक्षर झालेल्यांना ही लिपि जड वाटेल. पण नवीन साक्षर होणारांना सोपें जाईल. लेखणी क्रांतिकारी आहे. माझ्या लेखनांत मी लगेच लोकनागरीचा प्रयोग सुरूं केला आहे. छापखान्यांत होईल तेव्हां होईल." रोमन विषयीं आणि छपाई शास्त्राच्या दृष्टीनें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरेंहि त्यानीं दिली. लिपि सुधारणेचें स्पष्टीकरण करणारे 'लोक नागरी' म्हणून पुस्तकहि प्रसिद्ध केलें आहे. त्यांचें सेवक मासिक. तेंहि लोकनागरींतच छापलें जातें. गीताईहि लोकनागरींत छापली आहे.

## विधायक कार्याचा मध्यबिंदु खादी

दुपारीं वेगवेगळ्या क्षेत्रांत कामें करणारे विधायक कार्यकर्ते जमले होते. त्यांत मुख्यतः चरखा संघांतलेच अधिक लोक होते. विनोबाजींना विचारलेल्या शंकांचें त्यानीं निवारण केलें. त्यानीं मुख्यतः हा विचार मांडला कीं, 'सर्वो-

दयाच्या विचाराचें प्रतिनिधित्व खादीच करते. हरिजनसेवा, सफाई, महारोगी सेवा वगैरे कामें महत्त्वाचीं आहेत. त्यांना कोणाचाहि विरोध नाहीं, त्या कामासमोर विरोधी विचार उभा नाहीं. परंतु खादी-ग्रामोद्योगाविरुद्ध एक विचार उभा आहे. म्हणून आमच्या सर्व विधायक कार्यांचा मध्यबिंदू खादी हा विचार आहे. हिंदुस्तानांत माणशीं ॥। एकर शेती पडते. हजारों वर्षें त्यांतून पीक काढल्यानें त्या जमीनींत फार सुपिकता येणार नाहीं. जमीनहि अधिक देतां येणार नाहीं. शेतकऱ्याला जोडधंदा हवा. शेतकरी सर्व उपयोगी वस्तू निर्माण करीत असल्यानें तो खऱ्या अर्थानें श्रीमंत आहे. आज श्रीमंत समजले जाणाऱ्यांच्याकडे उत्पादन कशाचें होतें ? परंतु त्या निर्माण करणाऱ्यांचा पहिला हक्क असूनहि त्याला उपाशी रहावे लागते. कारण तो कचा माल विकतो, पक्का माल त्याला विकत घ्यावा लागतो. दोन्ही वेळां तोंच गरजवंत असल्यानें त्याचें नुकसान होतें. जर शेतकरी त्याला लागणारा बराचसा पक्का माल तो निर्माण करीत असलेल्या मालापासून गांवातल्या गांवांतच करील तर हा देश आणि त्यांतल्या किसानांची हालत सुधारूं शकेल. आतां यापुढें दुसरी मदत करतां येत नाहीं म्हणून खादीचें काम देतों अशी लाचार खादी नको. भूतदयेची खादी नको. तर येथली खेडी खादी दृष्टीवांचून सुधारणारच नाहींत म्हणून खादी. हें आपण समजून घेतलें पाहिजे. "

## सहकारी दुकान अधिक सुन्दर हवें

यानंतर इतर प्रश्नांची उत्तरें देतांना विनोबाजी म्हणाले " खेडेगांवचें दुकान व्यक्तीच्या मालकीचें नसावें. व्यक्तीच्या मालकीचें दुकान असेल तर खेड्यांचे सारें अर्थशास्त्र एका व्यक्तीच्या हातांत जातें. गांवावर मग कोणताहि निर्बंध राहूं शकत नाहीं. सहकारी तत्त्वावर चालणारें दुकान असेल तर उत्तम. पण तें व्यक्तीच्या दुकानाहून अधिक सुंदर रीतीनें चाललें पाहिजे. त्या दुकानांतून गांवांत होणाऱ्या कच्च्या मालाचा पक्का माल करण्याचे काम, तेलघाणी वगैरे चालविले पाहिजे. बिन जरूरीच्या वस्तूंविरुद्ध गांवांत ह्या दुकानांतून लोकमत तयार करतां येईल. चहा विडीसारख्या वस्तूंविरुद्ध जनमत जागृत करतां येईल. निर्यात होणारा गांवांतला पैसा वाचवितां येईल. ह्या दुकानामुळें होणाऱ्या



संघटनेंतून ' नई तालीम ' शाळा, गांवची सफाई आणि खताचें उत्पादन करतां येईल. गांवाला लागणारे वस्त्र घरोघर तयार होण्याच्या दृष्टीनें कताईविणाई शिक्षणाची व्यवस्था करतां येईल.

एकांगी कामामुळें विचार वाढत नाहीं. मला निरुपयोगी हिंदुस्तानी नको. हिंदुस्तानींतहि चरखा मला हवा आहे. साल्व्हेशन आर्मींत लोकांना जेवण देतात आणि मागावर बसवतात. सर्वांनीं कातून विणलें पाहिजे. तीस वर्षें होऊनहि आतां नुसतें सूतच काढणें पुरेसे नाहीं. स्वतः विणाई केली पाहिजे. किसानाला आज स्वतः सूत काढूनहि खादी परवडणार नाहीं. कारण विणाईची मजूरी त्याला द्यावी लागते. ती त्याला परवडणार नाहीं. किसानाला जर विणायला शिकवलें तर त्याला कपाशीच्या भावांत कपडा मिळूं शकेल आणि खादी परवडूं शकेल.

## विजेचा विरोध नाहीं

विजेशीं खादीचा विरोध नाहीं. जर खेड्यांत अगोदर वीज आणणार असतील, ती घरोघर देणार असतील तर तो माग विजेवर चालेल. कांहीं उद्योग घरांतच करावयाचे असतात, कांही गांवात, कांहीं प्रांतांत आणि कांहीं देशांत कांहीं ठिकाणींच करावयाचे असतात. त्या त्या उद्योगांची जागा बदलली नाहीं म्हणजे झाले. गृहोद्योगासाठीं वीज वापरली तर हरकत नाहीं पण सरकार वीज देणार अगोदर शहराला आणि पन्नास वर्षांनीं ती येणार खेड्यांत.

विमान, रेडियो मला हवे आहे. इतर गोलांवरचे भाऊ त्यांच्याशीं मला संपर्क ठेवतां येईल अशीं यंत्रें मला हवी आहेत. मी त्या शास्त्रज्ञाला सांगेन कीं तुझें विमान जरा चांगले कर. त्यांत वारा फार येतो. माझें सूतहि तेथें चांगले निघूं शकलें पाहिजे. रेडियोवाल्याला सांगेन हजारों मैलावरचें तूं ऐकवितोस पण एवढ्यानें माझें समाधान नाहीं. त्या मंगळावर माणसें आहेत. त्यांचें वृत्त मला समजेल असा रेडियो शोधून काढ.

## दुसऱ्या देशांवर अवलंबणें नको

आतां यापुढें जीं जीं युद्धें होतील तीं एकाएका देशाची असणार नाहींत. आतां विश्वयुद्धें World Wars होतील. आपण दुसऱ्या देशांवर अवलंबून

राहूं नये म्हणजे त्यांच्या हितसंबंधांना धोका पोचणार नाहीं आणि आक्रमणाची भीति राहणार नाहीं. जितक्या लौकर हीं जागतिक युद्धें होतील तितक्या लवकर अहिंसेला आशा आहे. कारण आजचे मुत्सद्दी व्यापक दृष्टीचे, जागतिक दृष्टीचे आहेत. दुनियेचा विचार करणारा फार वेळ लढाई करूं शकत नाहीं. लहान लहान झगडे थांबविणें मुश्कील आहे. हे लहान झगडे साधूवृत्तीनें नाहींसे होतील. मोठ्या प्रमाणावरच्या लढायाहि थांबूं शकतील. तिसऱ्या महायुद्धाला मी डरत नाहीं. बाँब टाकणारा तितका क्रूर नसतो जितका हातांत चाकू धरणारा खुनी क्रूर असतो. चाकू हातांत धरणारा द्वेषी असतो. बाँब टाकणारा फक्त हुकुमाची तामिली करतो. त्याला द्वेष नसतो. तो अहिंसक होऊं शकेल. त्याचा रस्ता फक्त चुकला आहे. मनुष्य हत्यारें सोडील कारण त्यांतून फायदा नाहीं हें त्याला दिसून येईल.

चर्चेनंतर प्रार्थना झाली. प्रार्थनोत्तर प्रवचनांत विनोबाजी म्हणाले—

## एकतरफी प्रेम

बंधूनों, इथल्या कार्यकर्त्यांशीं हल्लीं माझी चर्चा होत असते. पुष्कळवेळां चर्चेंत असें विचारलें जातें कीं जर समोरचा मनुष्य प्रेम करील तर त्यावर प्रेम करतां येईल. पण एकतरफी प्रेम करणें कसें शक्य आहे ? हा प्रश्न येथेंहि कितीतरी लोकांच्या तोंडून मी ऐकला. मी त्याची थोडी जाहीर चर्चा करावयाचें ठरविलें आहे. तुमच्या समोर माझे कांहीं विचार मी मांडणार आहे.

## आई प्रेम करण्याचा स्वभाव सोडीत नाहीं

प्रत्येक माता आपल्या मुलांवर प्रेम करते. पण मुलानें तिच्यावर प्रेम केलें पाहिजे अशी शर्त तिची नसते. पुष्कळ वेळीं तर असें दिसतें कीं मुलगा आईवर प्रेम करीत नाहीं, तिची पर्वा करीत नाहीं, तिच्याशीं वाईट रीतीनें वागतो. पण तरीहि ती माता प्रेम करणें सोडीत नाहीं. त्याच्यासाठीं ती कष्टी होते. मनांत रागहि येत असेल पण तरी प्रेम करणें ती कमी नाहीं करीत. त्याच्यासाठीं जें कांहीं करतां येण्यासारखें असेल तें करायला सदैव तत्पर असते. त्याच्या सुखानें सुखी होते, दुःखानें दुःखी होते. निरंतर सेवा करीत असते. ती आशा करीत



असते, कीं एक दिवस मुलगा सुधारेल आणि शेवटीं आपल्या प्रेमानें जिंकून घेते. कदाचित् जिंकले नाहीं तरीहि आपला प्रेम करण्याचा स्वभाव नाहीं सोडीत.

## प्रेम महान शक्तिशाली आहे

आमची जर त्या मातेप्रमाणें प्रेमावर श्रद्धा असेल तर समोरचा प्रेम करतो कीं नाहीं त्याची पर्वा आम्ही करणार नाहीं. सूर्यनारायण समोरच्या गुहेंत प्रकाश आहे कीं नाहीं हें का कधीं पाहतो ? तो उलट असा विचार करतो कीं समोरच्या गुहेंत प्रकाश नाहीं, अंधार आहे म्हणून मी माझा प्रकाशाचा धर्म सोडणार नाहीं. जेथें जेथें मी जाऊन पोंचेन तेथून तेथून माझ्या प्रकाशानें सारा अंधार दूर होईल. अंधाराचा तर माझ्यावर कांहीं परिणाम होणार नाहीं. तलवारीच्या शक्तीवर ज्यांचा विश्वास असतो ते असा कधीं विचार नाहीं करीत कीं समोरच्या माणसाजवळ तलवार नाहीं मग मी तरी कशाला जवळ बाळगूं तलवार ? आपल्याजवळ त्यानें तलवार ठेवली नाहीं, बेवकूफ आहे तो. पण मी स्वतः जवळ अवश्य ठेवीन. कारण मी बेवकूफ नाहीं. तो असा विचार करतो. कारण तलवारीच्या शक्तीवर त्याचा विश्वास असतो ना. प्रेमाच्या ताकतीवर ज्याचा विश्वास असेल तो विचार करील कीं सामनेवाल्याच्या हृदयांत प्रेम नाहीं तरी मी तें अवश्य राखीन. त्याच्याजवळ प्रेम नाहीं माझ्या जवळ आहे. आणि प्रेमांत जबरदस्त शक्ति आहे. मी त्याला जिंकून घेईन. जिंकण्याची इच्छा ठेवणें तर चांगलें नाहीं. पण तशी इच्छा न ठेवतांहि तो जिंकून घेईल. कारण त्याच्यापाशीं एक महान शक्ति पडलेली आहे.

## प्रेमानें जिंका

पण गोष्ट अशी आहे कीं प्रेमाच्या शक्तीवर आमचा विश्वास नसतो. आम्ही प्रेम करतों पण तें लाचारीनें करतों. आमच्यावर प्रेम करणारे कोणी मिळाले तर त्याला वश होऊन आम्ही प्रेम करतो. पण आमचा प्रेमाचा स्वभाव नाहीं आणि प्रेमावर आमची श्रद्धाहि नसते. ज्यांनीं प्रेमाचा अनुभव घेतला त्यांनीं प्रेमाचा महिमा गाईला आणि आम्हाला असें शिकविलें कीं जर समोर द्वेष दिसला तर प्रेम राखा. प्रेमानें जिंका. भगवान बुद्धांनीं तर सांगितलें

कीं वैरानें वैर शांत नाहीं होत. प्रेमानेंच ते शांत होते. येशू ख्रिस्तानें तर येथवर सांगितले कीं दुष्मनांवरहि प्रेम करायला शिका. दोस्तांवर प्रेम करतां त्यांत काय आहे मोठेसे ? तें तर प्रत्येकच करतो. दुष्मनांवर प्रेम करायला शिकाल तर त्याच्यावरहि जय मिळेल, तुमचें कांहीं वैशिष्ट्य होईल. कुराणांतहि एका ठिकाणीं लिहिलें आहे कीं तुमच्या मनांत कोणाविषयीं अदावत असेल तर त्याच्यावर प्रेम करण्याचा प्रयत्न करा. एक दिवस असा अनुभव तुम्हांला येईल कीं तो तुमचा ' वलीयत हलीम ' म्हणजे प्यारा दोस्त बनला आहे. ही प्रेमांत शक्ति आहे. एकतर्फी प्रेम करण्याची ताकद आमच्यांत असली पाहिजे. समोरचा मनुष्य काय करतो आणि काय करीत नाहीं त्याच्याशीं माझ्या स्वभावाचा संबंध नाहीं. माझा स्वभाव तर माझ्याजवळ पडलेला आहे. मी त्याच्या हातांत नाहीं जाणार. तो नाचवील तसा मी नाचलों तर माझा स्वभाव कोठें राहिला, म्हणून मी तर प्रेमच करीत राहीन. त्याच्यांत प्रेम कमी असल्याचें जसजसें मला दिसेल, किंवा द्वेष आहे असें आढळेल तशी प्रेमाची शक्ति मी अधिक प्रकट करीन. असें जर मी करीन तर एक दिवस मला यश अवश्य मिळेल. दुनियेच्या दृष्टीनें यश जरी नाहीं मिळालें तरी चित्ताचें जें समाधान राहील तें एक महान यश निरंतर माझ्याजवळ राहीलच. तें तर मी कधीं गमवणार नाहीं. एक दिवस नक्की असा येईल कीं ज्या दिवशीं माझी फत्ते होईल. "

## विषय, काल, स्थलाप्रमाणें भाषेचें स्वरूप वेगळें

आज रात्रीं राष्ट्रभाषा प्रचारकांपुढें विनोबाजींनीं आपले विचार मांडले म्हणाले " एका प्रकारची भाषा सर्व ठिकाणीं चालेल असें समजणें बरोबर नाहीं. पुणें आणि कानपूर मधें हिंदुस्तानीचें स्वरूप एक राहणार नाहीं. इंग्लंडची भाषा इंग्लीश पण लंडन आणि कँटरबरीच्या भाषेंत फरक सांपडतो. एक मराठीच घेतली तरी नागपूरची, खानदेशची, कोंकणची भाषा वेगळी आहे. विषयाप्रमाणें, काळाप्रमाणें आणि स्थळाप्रमाणें भाषेचें स्वरूप वेगवेगळें होत असतें. तुकाराम आणि एकनाथ यांच्याहि भाषेचें वेगळें वेगळें स्वरूप आहे.

अमूक प्रकारेंच भाषेंतल्या शब्दांची निवड व्हावी असे म्हणून कसें चालेल ? अलाहाबाद युनिव्हर्सिटींत मी व्याख्यान दिलें. नंतर कांहीं मुलें आलीं.



विचारले, " तुम्ही हिंदी, हिंदुस्तानी कीं उर्दु भाषेंत बोलला ? " मी म्हणालों " माझ्या एका प्रश्नाचें उत्तर अगोदर तुम्ही द्या म्हणजे मग मी तुमच्या प्रश्नाचें उत्तर देईन. माझी मातृभाषा आहे मराठी. मी जें बोललों तें तुम्हाला समजलें का ? समजले असेल तर तिचें नांव मी सांगतों. मी अलाहाबादी भाषेंत बोललों. तीहि वेगळी असते. दिल्ली, हैद्राबाद, अलिगड वगैरे वेगवेगळ्या ठिकाणीं मी वेगळे वेगळे शब्द वापरीन, वेगळें रूप असेल. गंगेच्या स्वरूपांत जसा ठिकठिकाणीं फरक दिसतो, तसेंच भाषेचेंहि असणार. शाळेंतल्या विद्यार्थ्यांसमोर जें रूप वापरीन तें कॉलेजांतल्यापेक्षां वेगळें असणार. भाषा जी ठरते ती शब्दावरून नाहीं ठरत. क्रियापदें, रूपें, यावरून भाषा ठरते. खाना, पीना वगैरे हिंदींत, हिंदुस्तानींत, उर्दुंत तसेच आहेत. हिंदी, हिंदुस्तानी उर्दूच्या क्रियापदांत, रूपांत जर फरक पडला तर भषा वेगळी झाली असे म्हणावें लागेल. हिंदी, हिंदुस्तानी, उर्दू ह्या तिन्हींत ' खाता है ' असेंच रूप होणार. भाषा आपलें विचार दुसऱ्यांना समजावें म्हणून असते. माझी भाषा दुसऱ्यांना न समजो व ऐकणारे मला विद्वान म्हणोत अशी इच्छा असेल तर लोकांना न समजणाऱ्या भाषेंत बोला.

## सर्व भाषा नागरींत लिहाव्यांत

हिंदुस्तानांत सर्व भाषांना एकच लिपि असावी. इतर लिप्याहि चालोत. नागरी सुधारून सर्व भाषा तिच्यांत लिहितां येईल त्यानें ऐक्यवर्धन होईल. हैद्राबादमधील तीन भाषा जर नागरींत लिहिल्या जातील तर फार सोय होईल. एकमेकांच्या भाषा शिकणें सोयीचें होईल. नागरींत लिहिल्यानें वाङ्मय वाचतां येईल. उर्दूवाल्यांनाहि माझें सांगणें आहे कीं जर त्यांना उर्दू टिकवावयाची असेल तर ती नागरींतहि लिहिली गेली पाहिजे. उर्दू पुस्तकें नागरींतहि छापली गेलीं पाहिजेत. नागरींत उर्दू छापली, लिहिली तर उर्दूतले सोपें शब्द इतर भाषांतून घेतले जातील. लिपीचा आग्रह त्यांनीं सोडला तर उर्दूभाषा खूप विकास पावेल. बंगाली, गुजराथी, कानडी ह्या भाषाहि नागरींत लिहिल्या जाव्यात.

युरोपांत वेगवेगळ्या भाषा चालतात. परंतु युरोपला एकदेश होण्याची इच्छा नाहीं. एक केंद्र त्यांना नको आहे. हिंदुस्तानची जनता एकता चाहते. लिपीमुळें भाषा शिकण्यांत एक अडथळा येतो. नागरी लिपींत जर वेगवेगळ्या भाषा

लिहिल्या गेल्या तर त्या भाषा शिकणें सुलभ होईल. एकता वाढेल. त्या भाषांच्या लिप्याहि राहतील. ज्याप्रमाणें प्रदेश भाषा नागरींतहि लिहिल्या जाव्या असे मी म्हणतों त्याच प्रमाणें राष्ट्रभाषा त्या त्या लिपींतून त्यांनी अगोदर शिकाव्या म्हणजे सुलभतेनें शिकतां येतील. नंतर नागरीहि ते शिकतील. प्रत्येक भाषेबरोबर एकएक लिपी शिकावी लागल्यानें माझे डोळे बिघडले.

## समाजशास्त्राचे शब्द संस्कृतवरून

नवे शब्द घेतांना तुलसीदासानें जसें सोपे सोपे संस्कृत शब्द घेतले तसे घेत जावे. शास्त्रांची रचना देशी भाषांतून करतांना पुष्कळ नवे शब्द लागतील. समाजशास्त्रें ( Social Science ) जेवढीं आहेत तेवढ्यांचे पारिभाषिक शब्द संस्कृतच्या आधारें बनविता येतील. जीं विज्ञानशास्त्रें आहेत त्यांत जागतिक परिभाषा स्वीकारणें बरें.

एक संस्कृतच्या आधारावर शब्द बनवायचें म्हटलें तरी शब्द अनेक बनतात. रेफ्युजी या शब्दासाठीं मराठींत आश्रयार्थी वापरतात, उत्कलमध्यें आश्रयप्रार्थी म्हणतात. मल्याळममध्यें अभयार्थी, हिंदींत शरणार्थी म्हणतात. एकाच संस्कृतच्या आधारें हे पारिभाषिक शब्द बनले आहेत. त्यांत एकसूत्रता येण्यासाठीं एकादी समिति असली पाहिजे. आपण साधारणतः कॉम्पीटिशन या अर्थी स्पर्धा शब्द वापरतों. पण दक्षिणेकडे एका ठिकाणीं ' चरखा मत्सरम् ' मी ऐकले. ते म्हणाले स्पर्धेत वाईट अर्थच येतो. मत्सर चांगलाहि असूं शकतो, वाईटहि असूं शकतो. तेव्हां अशा प्रकारें पारिभाषिक शब्द बनवितांना काळजी घेतली पाहिजे. मुख्यतः पारिभाषिक शब्दांना संस्कृतचा आधार असावा असे मी म्हटले पण त्याचा अर्थ इतर भागांतले सोपे शब्द घेऊं नये असा नाही. खूर्दबीन व दूरबीन हे दोन शब्द मायक्रोस्कोप व टेलिस्कोप यासाठी आहेत. ते शब्द चांगले आहेत. तसेच राहिले पाहिजेत. दूरदर्शक यंत्र, सूक्ष्म दर्शक यंत्र यापेक्षा ते सोपे आहेत. फारसी असूनहि ते शब्द राहिले पाहिजेत. डिसीप्लीनसाठी मराठींतला शिस्त शब्द चांगला आहे तो हिंदुस्तानींत दाखल केला पाहिजे.



## रोमनचा प्रश्न

रोमन चालणार नाहीं. आणि चालूहि नये. रोमनची लिपी साऱ्या जगभर चालते. परंतु एका अक्षराचा एकच उच्चार सर्वत्र नाहीं. ' C ' चा उच्चार क, श, स, च वगैरे वेगवेगळा होंतो आणि शिवाय सर्व उच्चार रोमनमध्यें लिहिले जाऊं शकत नाहींत. तीं सुधारतां येईल हे खरे पण त्या सुधारणा इतक्या होतील कीं मग ती लिपि रोमन राहणार नाहीं. या उलट नागरी अक्षरांचा सर्व शब्दांत तोच उच्चार होत असतो". विनोबाजींनीं आपले विचार सांगितल्यावर बोलींचा प्रश्न निघाला. मारवाडी भाषा अशी आहे कीं तिच्यांत ग्रंथरचना नाहीं. ती नुसती बोली आहे. तिच्यांतून शिक्षण दिले जावें असा कोणी आग्रह धरणार नसल्यानें ती बोलली जावी. पण त्यांचा प्रश्न निर्माण होणार नाहीं.

---

## २।४।१९४९ : : :

## स्त्रियांनीं सेवेसाठीं पुढें यावें

हैद्राबाद शहरापासून ८ । १० मैलावर हैदरशाह गोट म्हणून एक विभाग आहे. खेडेंच म्हणाना. त्या ठिकाणीं आज जायचें ठरलें होतें. कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक निधीतर्फे तेथें एक वैद्यकीय केंद्र चालतें. एक भगिनी तेथें राहून काम करतात. त्या केंद्राच्या निरीक्षणार्थ विनोबाजी गेले. एक महिन्यांत तेथें सात प्रसूती झाल्या आणि शंभर रोग्यांना औषधी मदत दिलीं गेली. तेथल्या वस्तीवरचे लोक जमले होते. लहान लहान झोपड्यांत ते रहात होते. झोपड्यांत उभे राहतां येईल इतकीहि त्यांची उंची नव्हती. त्या लोकांना हिंदी येत नव्हतें. फक्त तेलगू समजे. विनोबाजींनीं हिंदुस्थानींत भाषण दिलें. व दुसऱ्या एका मित्रानें त्याचा तेलगूंत अनुवाद केला. विनोबाजी म्हणाले " येथें हें केंद्र सुरू झालें आहे. पुढें वाढेल. प्रत्येक गांवांत स्त्रियांत असें काम झालें पाहिजे. ह्या कामासाठीं स्त्रियाच पुढें आल्या पाहिजेत. हिंदुस्तानांत अजून स्त्रिया अशा कामासाठीं पुढें येत नाहींत. पुरुषांनीं कितीहि सेवा केली तरी ती स्त्रियांना पुरेशी होणार नाहीं. स्त्रियांनीं पुढें आलें पाहिजे. कस्तुरबा केंद्रांतून सेवेसाठीं स्त्रिया तयार झाल्या पाहिजेत. पुरुष स्त्रियांची सेवा करूं शकत नाहींत. त्याचप्रमाणें शहरी स्त्रिया खेडूतांची सेवा करूं शकणार नाहींत. त्यासाठीं खेडूत स्त्रियांनीं तयार झालें पाहिजे. अशा स्त्रिया तयार होतील अशी मला आशा आहे. जितक्या सहज खेळतों तितक्या सहज मग कामें होतील. कार्यकर्त्यांनीं बाहेरून घटकाभर येऊन सेवा करण्यापेक्षां खेड्यांत जाऊन राहिलें पाहिजे. तेव्हांच एकमेकांच्या हृदयाची ओळख पटेल. तशी ओळख पटली तर सेवाकार्य चांगलें होऊं शकेल.



## काम मनःपूर्वक व्हावें

स्त्रियांनीं करावयाचीं कामेंहि पुष्कळ आहेत. आज कपडा मिलचा खरीद-लेला आहे. स्त्रिया तो सर्व तयार करूं शकतील. शिक्षण जेव्हां सर्वांना मिळेल तेव्हांच हें होऊं शकेल. हें हैद्राबाद संस्थानांतील पहिलेंच केंद्र आहे असें मला समजलें आहे. पुढें हें काम वाढेल.

मी निराश नाहीं. जें काम होईल तें मनःपूर्वक व्हावें. लहान असो परंतु पक्कें असावें. काम वाढविणें, दिखाऊपणानें काम करणें फायदेशीर नाहीं. स्त्रियाहि आपल्या पायावर उभ्या राहूं शकतील याचें भान हवें आहे. आत्मविश्वास आणि हें भान करविणें हें आमचें काम आहे.

हें केंद्र निघालें त्याबद्दल आनंद प्रदर्शित करून संपवितों."

## सर्वोदयासाठीं जमीन

हैदरशाह गोटांतला हा कार्यक्रम आटोपून येतांना संगमावर गेलों. मुच-कुंदा गावाजवळ हा संगम आहे. बापूजींची रक्षा या ठिकाणीं समर्पण कर-ण्यांत आली होती. सबंध हैद्राबाद संस्थानांत नांदेड आणि मुचकुंदा या दोनच ठिकाणीं रक्षा विसर्जन झाले. फेब्रुवारींत भस्म समर्पणाच्या दिवशीं तेथें यात्रा झाली. तीन एकर जमीन गांवांतल्या एका गृहस्थानें सर्वोदयासाठी दान दिली. विनोबाजींच्या हस्तें ती जमीन देण्यांत आली. विनोबाजी म्हणाले " येथें भस्म प्रवाहित झालें. येथें सर्वोदयाचें कांहीं काम सुरू झालें पाहिजे. आज हैद्राबादमध्यें आणि इतरत्रहि असें दिसतें कीं कार्यकर्ते एकमेकांची शक्ति तोडतात. वास्तविक कार्यकर्त्यांच्या विचारभिन्नतेमुळें एकमेकांचे पोषण झालें पाहिजे. असें झालें तर कामें होऊं शकतील. तेलंगणांत काम सुरू व्हावयाचें होतें. परंतु तेथें कम्युनिस्ट क्षेत्र ( Communist Area ) जाहीर केलें. कम्युनिस्ट क्षेत्र असें कांहीं कोठें नाहीं. आम्ही कळवळ्यानें गरिबांची सेवा करीत नाहीं. त्यामुळें तेथले शेतकरी कम्युनिस्टांकडे वळले. आम्हीहि गरीबांची सेवा करूं शकतों. हें दाखविलें पाहिजे. जमीन दिली ही गोष्ट ठीक. परंतु नुसत्या जमिनीनें काम नाहीं होऊं शकत. त्या जमिनीचा उपयोग करणारे

हवेत. इतर जमीनींपेक्षां येथें फसल (पीक) जास्त आली पाहिजे. जर जास्त पीक आलें नाहीं तर ती जमीन सर्वोदयाला देऊन काय उपयोग होणार !"

विनोबाजी परत ४१५ मैल पायींच आले. येतांना अनेक विषयांवर चर्चा होत होती.

## अध्ययनहीनता नको

दुपारीं कार्यकर्त्यांशीं चर्चा होती. चर्चेपूर्वी कांहीं प्रश्न लोकांनीं अगोदर दिलेले होते. त्यांचीं उत्तरें विनोबांनीं दिलीं पण तत्पूर्वी आपलेंहि कांहीं विचार त्यांनीं सांगितले ते म्हणाले "इतके प्रश्न निर्माण होतात. त्याच्या मुळांत एकच वस्तू आहे. अनेक कारणामुळें आमचे कार्यकर्ते अध्ययनहीन आहेत. त्यामुळें ते फार काळ टिकूं शकत नाहींत. दृढ राहूं शकत नाहींत. मोठाल्या झाडांना जमीनींतून अखंड पाणी मिळत असतें. बाहेरच्या पाण्यावर जें निर्माण होतें तें हिवाळ्यांत संपतें. ज्वारी, बाजरीचीं शेतें कांहीं दिवसच हिरवीगार दिसतात. कारण त्यांना तळांतून जीवन मिळत नाहीं. परंतु जमिनींतून झऱ्यांतलें पाणी ज्यांना मिळतें तीं सदैव हिरवींगार दिसतात. कारण त्यांच्या मुळांना सदैव पाणी मिळत असतें. कार्यकर्त्यांची अशीच स्थिति आहे. विचारस्रोत जर अखंड जिवंत असेल तर त्यांच्यांत टवटवी दिसेल. गांधीजींच्या विचारांचेंहि अध्ययन नाहीं. इतरांचे तर दूरच राहिले. त्यांचें स्वतःचें कांहींच अध्ययन नसतें. दुसऱ्यांचें ऐकून त्यांना शंका निर्माण होतात. लोकमान्य म्हणत "मी अध्ययना शिवाय राहूंच शकत नाहीं." रात्रीं १२ वाजेपर्यंत जागून ते वाचीत, अध्ययन करीत. गांधीजी वाचीत नसत असें भासतें. पण तें खरें नाहीं. दरवर्षी एकेक नवीन गोष्ट ते देशाला देत. चरखा, नई तालीम, निसर्गोपचार वगैरे ते नवेनवें देशाला देतच होते. ते वेगानें प्रगति करीत होते. कार्यकर्त्यांचे अध्ययन होत नाहीं. यांत कसूर कोणाची हा प्रश्न नाहीं. नित्य अध्ययन हवें. नुसतें लिहिणें वाचणें पुरेसें नाहीं. अध्ययनावाचून कधीं मी झोपलों आहे असें मला आठवत नाहीं. जेवल्यावांचून मी झोपलों असेन पण अध्ययनावांचून झोपलो नाहीं. ज्या दिवशी अध्ययन केले नाहीं तो दिवस जन्मलाच नाहीं असें समजावें !



## आत्म्याचें अध्ययनावांचून भागत नाहीं

रोज आपण खातों, पितों, स्नान करतों, झोपतों तसेंच रोज ज्ञानहि मिळविलें पाहिजे. तुम्ही म्हणाल वेळ मिळत नाहीं. संसारांतल्या अडचणीमुळें कांहीं सुचत नाहीं. कांहींचें डोकें चालत नाहीं. पण ह्या सर्व गोष्टी असतांना खाऊं कसें शकतों ? सांसारिक अडचणी आहेत. म्हणून मी जेवणेंच सोडतों असें म्हणतो का कोणी ? वेळ मिळत नाहीं म्हणून जेवण सोडलें म्हणणारा कोणी मी पाहिला नाहीं. थोडा वेळ आहे त्यांत जेवण करावे कीं अध्ययन असा प्रश्न असता तर मी अध्ययन निवडीन. उपास करण्याचेंहि अध्ययन त्यांतून होईल. जेवतो नित्य. कारण त्यावांचून चालणार नाहीं. हें जाणवतें तसेंच आत्म्याचेंहि अध्ययनावांचून भागत नाहीं याचें भान झालें पाहिजे. माणसाचें डोकें कधीं रिकामें राहात नाहीं. जर स्वतः अध्ययन केलें नाहीं तर चिंतनाशिवाय घेतलेल्या दुसऱ्याच्या विचारांनीं डोकें भरून जाईल. त्या विचारांचा विचार करण्याची शक्तिहि अध्ययन नसल्यामुळें कार्यकर्त्यांत असत नाहीं. त्यामुळें प्रश्नांचीं उत्तरें त्याला देतां येत नाहींत. प्रत्येकवेळीं बोलतांना मनुष्य खोटेंच बोलतों असें नाहीं. परंतु आपल्या वाणीनें विचार त्याला प्रकट नाहीं करतां येत आणि तो समजूंहि शकत नाहीं. वाणीचा सम्यक् उपयोग त्यांना ठाऊक नसतो. वाणीचा सम्यक् उपयोग केला पाहिजे. सम्यक् वाणीचा उपयोग करतां येत नसल्यानें कार्यकर्त्यांबद्दल गैरसमजहि खूप पसरतात.

## माणसाचें मस्तक अजब कलाकृति

बापूशीं माझा पत्रव्यवहार कमी होता, भेटीहि क्वचितच होत. परंतु त्यांच्या विचारांचें मी अध्ययन करीत असें. हरिजनमध्यें त्यांची 'प्रश्नाची पेटी' असे. वेगवेगळ्या प्रश्नांना बापू उत्तरें देत. मीं त्यापैकीं प्रश्न तेवढे वाचीत असे उत्तरें अगोदर नसे वाचीत. ते प्रश्न वाचून मीं स्वतःचीं उत्तरें तयार करीत असे. त्यानंतर त्यांचीं उत्तरें पहात असे. त्यामुळें आतां नवीन सवाल नसतात. माणसाचें मस्तक ही दुनियेंतील अति अजब कलाकृति आहे. मस्तकांत अजब शक्ति आहे. विचारांचा अमाप खजिना तेथें सामावूं शकतो. चिंतनाचा स्वभाव बाणवला कीं हें सारें होईल. त्यासाठीं चिंतनाचा स्वभाव

वाणवला पाहिजे. प्रश्नाचें उत्तर आपणच अगोदर लिहावें. नंतर अधिकारी व्यक्तीच्या उत्तराशीं तुलना करावी. यानें विचारशक्तीला चालना मिळते, विचार करण्याचें सामर्थ्य येतें.

## जो सोया उसने खोया

कार्यकर्त्यांचें नसतें अध्ययन आणि प्रश्न विचारले जातात. दहा मिनिटांत त्याचीं उत्तरें कशीं देणार? विचार करून, चिंतनांतून, प्रयोगांतून प्रश्न निर्माण झाले पाहिजेत. विचाराला, अध्ययनाला, चिंतनाला, वेळ काढला पाहिजे. 'जो सोया उसने खोया.' अध्ययन न करतां जो झोपला तो गमावून बसला असें समजावें. उषःकालीं उठून चिंतन केलें पाहिजे. उपनिषदांनीं गृहस्थाश्रमींना अभ्यास करणारांत अग्रणी मानलें आहे.

## कार्यकर्त्यांना अध्ययन हवें

अभ्यासाला चांगली जागा असावी. जसें रसोई-घर तसें चिंतन-घर हवें. "शुचौ देशे स्वाध्यायात् अधीयानः" गृहस्थाश्रमी जर अध्ययनहीन झाले तर दुनिया कशी चालावी? पाश्चात्यांना अध्ययनाचें महत्त्व समजलें आहे. नित्य-निरंतर ते अध्ययन करीत असतात. हिंदुस्थानांतली कोणतीहि भाषा शिकायची असो. तिचा कोष इंग्रजींत मिळेल. वेगवेगळ्या भाषांचीं व्याकरणेंहि आहेत. कार्यकर्त्यांना अध्ययन हवें. त्यांना अनुभव असल्यानें त्यांच्या अध्ययनानें भरीव (Solid Knowledge) निर्माण होईल.

## सांप्रदायिक अध्ययन नको

अध्ययनासाठीं (Study Circles) अभ्यास मंडळें काढलीं जातात. पण हीं मंडळें अभ्यास मंडळें बनण्याऐवजीं प्रॉपगँडा करण्याचीं, सांप्रदायिक विचार फैलावण्याचीं केंद्रें बनतात. तें अध्ययन नव्हे. तयार विचार डोक्यांत घुसविण्याचा प्रयत्न असल्या मंडळांतून केला जातो. हा प्रयत्न सार्वत्रिक आहे. एकच बाजू अशा मंडळांतून शिकविली जाते. आणि तीच खरी असें सांगितलें जातें. हा ज्ञानप्रचार नव्हे. कामापुरते विचार डोक्यांत कोंबण्याची ही युक्ति आहे. सांप्रदायिक अध्ययन नको. धुळ्याला गांधी तत्त्वज्ञान मंदिरांत मी सांगितलें कीं



नुसता गांधी तत्त्वज्ञानाचा अभ्यास नका करूं. साऱ्याच जीवन तत्त्वज्ञानांचा अभ्यास करा.

आपल्या डोक्यानें विचार करा. एकाद्याच्या व्याख्यानानें प्रश्न सुटत नाहींत. त्यासाठीं अध्ययन हवें. अनुभवानें आणि अध्ययनानें झालेलें सम्यक ज्ञान आणि सम्यक् वाणी सरळ हृदयांतच शिरते."

## सत्याग्रह म्हणजे सत्यनिष्ठा

यानंतर सत्याग्रहाकडे चर्चेचा ओघ वळला. विनोबाजी म्हणाले "सत्याग्रह हा फार सुंदर शब्द आहे. इतका चांगला शब्द आणि त्याचा इतक्या लौकर दुरुपयोग! आज सत्याग्रह म्हणजे झगडा असें लोक मानूं लागले आहेत. तें चूक आहे. सत्याग्रह म्हणजे सत्यनिष्ठा. ती सबंध जीवनांत असली पाहिजे, सर्व व्यवहारांत ती असली पाहिजे. वचन पाळणें, वेळेवर काम करणें, चिंतन करणें हे सारे सत्याग्रहच आहेत. योग्य वेळीं झोपणें आणि सकाळीं वेळेवर उठणें हा सत्याग्रह. सत्याग्रही अनावश्यक वस्तू खाणार नाहीं. चमेलीचें अत्तर चांगलें म्हणून कोणी चरख्यांत नाहीं घालीत. फार चांगलें चमेलीचें अत्तर आहे. घातलें दोन तोळे चरख्यांत. चरख्यांत तेल घालावयाचें तें चरख्यानें चागलें काम द्यावें म्हणून. तसेंच शरीराचें. लोकसेवेसाठीं शरीर हवें आणि त्यासाठीं शरीरांत शक्ति हवी. म्हणून खाणें. खाण्यांत आनंद नाहीं. दुःखहि नाहीं. हाहि सत्याग्रह. प्रेम ठेऊन खास प्रसंगीं विरोध करणें हाहि सत्याग्रह. माता मुलाला विरोध करते. त्या विरोधांतहि प्रखरतेनें मुलाबद्दलची मातेची कल्याणेच्छा दिसत असते. त्या कल्याणेच्छेच्या प्रखरतेमुळें सत्याग्रह यशस्वी होतो. अशा प्रकारचे प्रसंग येत असतात.

## सत्याग्रहांतून दोघांची चित्तशुद्धि

परंतु आज सत्याग्रह शब्दाचा अर्थ वेगळा झाला आहे. शस्त्र जवळ नाहीं म्हणून किंवा शस्त्रानें फायदा होत नाहीं म्हणून शस्त्राच्या ऐवजीं उपवास करतात किंवा संप करतात, आणि त्याला सत्याग्रह म्हणतात. ज्याच्या विरोधी हा उपाय वापरला जातो त्याच्याबद्दल कल्याणेच्छा किंवा प्रेम हृदयांत नसतें. उलट त्याच्या नाशाचा प्रयत्न असतो. मंदिरांत हरि-

जनांना प्रवेश दिला म्हणून त्याविरुद्धहि म्हणे सत्याग्रह. हा काय सत्याग्रह झाला? अशानें एकमेकांविरुद्ध सत्याग्रह होऊं लागले तर जो जास्ती दिवस उपवास करील तो यशस्वी व्हावयाचा. ६० उपवास विरुद्ध ७० उपवास अशी लढाई मग होईल. तोफांत जसें चालतें कीं याची तोफ १० मैल गोळा फेकते तर त्याची १५ मैल. हा सत्याग्रह शब्दाचा दुरुपयोग आहे. शुद्ध प्रेमावांचून सत्याग्रह यशस्वी होणार नाहीं. सत्याग्रहांतून दोघांची चित्तशुद्धि झाली पाहिजे. आज युद्धाची भाषा सर्वत्र वापरली जाते. सत्याग्रहावरहि त्याचा परिणाम झालासा दिसतो. युद्धाचे शब्द सत्याग्रहांतहि येतात. लोकांचें चित्त शृंगारांतून काढून भक्तींत लावण्यासाठीं एकेकाळीं भक्तांनींहि असा उपाय केला होता. त्यांनीं शृंगारांत भक्ति आणण्याचा प्रयोग केला परंतु त्यांतून भक्तीचा प्रचार झाला नाहीं. तसेंच आज सत्याग्रहांत होत आहे. सत्याग्रहांत विरोध नसतो. सर्वांवर प्रेमच असतें. परमेश्वराच्या सर्जेतहि प्रेम असतें. सूर्य आणि अंधाराच्यांतहि परिभाषेमुळें युद्धाची कल्पना येते. लोकांना आज पाहिजे आहे अंतः शुद्धीशिवाय यश. तें ज्या मार्गांनीं मिळेल तें ते चोखाळतील. तोफ टाळून जर अंतःशुद्धीशिवाय यश मिळत असेल तर त्यांना हवें असतें. भक्तांनींहि असेंच केलें आहे. गंगेंत डुबकी मारा म्हणतात. अंतःशुद्धीशिवाय लोकांनाहि मोक्ष हवा असतो गंगेंत डुबकी मारली कीं अंतःशुद्धीची कांहीं भानगड नाहीं, मोक्ष ठेवलेलाच आहे. प्राणायामानें नाक धरून मुक्ति मिळते. साधूची सेवा करून, दर्शन करून विना अंतःशुद्धि मुक्ति मिळते. अंतशुद्धीशिवाय मुक्ति मिळविण्याच्या प्रयत्नांतून सिद्धि, चमत्कार, जप, तप, यज्ञयाग, दान, बलिदान, यात्रा निघाल्या. लोक म्हणतात अंतःशुद्धि नको. जप, तप, यज्ञ, स्नान असें कांहींतरी सांगा. ही चुकीची दृष्टि आहे. अंतःशुद्धि हा सत्याग्रहाचा आत्मा मानला पाहिजे.

## प्रश्न सोडविणारे एजंट नकोत

मजुरांच्या बरोबर काम केल्यावांचून मजुरांचे प्रश्न सुटणार नाहींत. कबीरासारखे विणकर झाल्यावांचून त्यांचे प्रश्न कसे सुटणार? आम्ही मजूर न बनतां त्यांचे प्रश्न सोडवतो. म्हणजे एजंट बनतों. समाज अशानें फक्त जागृत होईल परंतु प्रश्न सुटणार नाहीं. स्वतः मजूर न बनतां आम्ही क्रांति चाहतों आणि



म्हणून मजुरांना बहकावण्याचा मार्ग घेतों. यामुळें मजुरांना चार पैसे कदाचित् जास्ती मिळतील पण त्यांचे प्रश्न सुटणार नाहींत. मजुरीला लागल्यावांचून मजुरांचें खरें काम होऊं शकणार नाहीं. सम्राटांचीं नांवें जनतेच्या मनावरून पुसलीं गेलीं परंतु कबीराचें अजून कां राहिलें आहे? त्याच्या केवळ भजनांमुळें तो जिवंत नाहीं. तो स्वतः मजुरी करून अनुभव घेत होता, ते अनुभव काव्याच्या द्वारें त्यानें मांडले. जीवनानुभवामुळेंच तो जिवंत राहिला आहे.

## सज्जन मजूर व्हावेत

शिक्षितांनीं शरीरश्रम तर करावेतच पण सज्जनांनीं मजूर बनलें पाहिजे. सज्जन मजूर बनले तर स्वयमेव संघटना होईल. मालकांना मग संशय राहाणार नाहीं. मजूरांचे संघटन करण्याचा हाच तरीका मला ठीक वाटतों. मजूरांना ज्ञान द्यावें आणि तें एक आवश्यक अंग ( Indispensible ) बनतील असा प्रयत्न करावा. त्यांनीं लाचारीनें मजूरी करू नये, पूज्य बुद्धीनें करावी. न बोलण्यानेंहि त्यांचीं कामें होतलि. त्यांचा सत्याग्रह यशस्वी होईल. अन्तर्वृत्तीचा परिणाम झाल्यावांचून राहाणार नाहीं. घरांत मौनाचा परिणाम होतो ना? त्याठिकाणीं प्रेम असतें. प्रेम असेल तरच सत्याग्रह यशस्वी होईल.

समाजांतले संबंध आपण उन्नत केले पाहिजेत. ते जर बिघडले तर समाज कसा टिकेल? हे संबध आपल्याला सुधारावयाचे, योग्य मार्गावर आणावयाचे आहेत.

आज संप करणारा मजूर मालकाला म्हणतो "मालकानें विचार करावा. देशाचें उत्पादन संपामुळें घटेल." म्हणजे देशसेवेसाठीं उत्पादन वाढविण्याची म्हणजेच देशसेवेची जबाबदारी आपण मालकावर टाकतों. हें बरोबर नाहीं. काम बंद करण्यापूर्वी विचार करावा. काम बंद करणें ही अखेरची गोष्ट होईल. उपवास, संप यांना स्थान आहे. पण इतर सर्व गोष्टी अगोदर करून झाल्या पाहिजेत."

## अधिकाऱ्यांविरुद्ध सत्याग्रह

सरकारी अधिकाऱ्याविरुद्धच्या सत्याग्रहाची गोष्ट निघाली तेव्हां विनोबाजी म्हणाले " अधिकाऱ्यांच्या चुका दाखविण्यानें सरकारचें प्रेस्टिज वगैरे कांहीं

कमी होत नाहीं. सरकारलाहि त्या चुका नकोच असतात. अशा चुकांविरुद्ध सत्याग्रह करतां येईल. अशा सत्याग्रहानें सरकारचें प्रेस्टीज कमी होणार नाहीं. समजा एखादा सरकारी अधिकारी दारूडा आहे. सरकारलाहि त्यानें दारू प्यावी असें वाटत नाहींच. त्याच्याविरुद्ध सत्याग्रह करण्यानें सरकारचें प्रेस्टीज कमी होणार नाहीं. सरकारहि तसें मानणार नाहीं. पण सरकार अगोदर आपलें मानलें पाहिजे आणि त्याच्याशीं निरंतर सहकार्य करीत असलें पाहिजे.

व्यक्तींना समजावण्यांत मला आनंद वाटतो. व्यक्तींचाच समाज बनतो. व्यक्तींच्या उद्धारानेंच समाजाचा उद्धार होतो. म्हणून व्यक्तींकडे मी अधिक लक्ष देतों. " चर्चेनंतर विनोबाजी प्रार्थनेला गेले.

## प्रेम वाढविलें पाहिजे

प्रार्थनोत्तर प्रवचनांत म्हणाले—

" हिंदुस्तात हा एक मोठा देश आहे. येथें अनेक जाती, अनेक प्रांत अनेक भाषा आहेत. ह्या सर्वांत जर प्रेम राहिलें तर हिंदुस्तानच्या दृष्टीनें कोणतीहि गोष्ट कठिण नाहीं, त्याच्या पुढें कोणताहि प्रश्न मग राहाणार नाहीं. त्यासाठीं प्रेम वाढविलें पाहिजे आणि सर्व एक आहोंत ही भावना वाढविली पाहिजे. हें कसें करावें याच्या लहान लहान युक्त्या पाहिल्या पाहिजेत. आपण सर्व परमेश्वराचे आहोंत ही भावना वाढविली पाहिजे. परंतु ही फार मोठी गोष्ट आहे. छोटे व्यावहारिक उपाय हवेत. सर्व हिंदुस्तानांत एक देशभाषा असावी. ती हिंदी होवो, हिंदुस्थानी होवो. नांवाचें महत्त्व मला नाहीं. सर्वांना समजण्यासारखी ती सोपी असावी. तशी ती असली म्हणजे हिंदी-हिंदुस्तानींत फरक राहात नाही. नाममात्र फरक राहिला तरी त्याची फिकीर नाहीं. जर एकभाषा शिकलों तर एकमेकांची हृदयें जाणून तिची प्रेमभाव ठेवण्याला मदत होईल. परंतु त्याबाबत मी सांगू इच्छित नाहीं. मी आज प्रांतीय भाषांचें, प्रादेशिक भाषांचें महत्त्व सांगू इच्छितों.



## प्रदेश भाषा शिका

देशाची एक भाषा हवी आणि तिचें ज्ञान सर्वांना हवें. प्रदेशभाषांचाहि विकास झाला पाहिजे. प्रदेश भाषांचा अभिमान नको. प्रदेशभाषांबद्दल प्रेम करण्याचा धर्म आपल्याला समजला पाहिजे. प्रदेशभाषा ही त्या प्रदेशांतल्या आमजनतेची, किसानांची खेडूतांची भाषा. हिंदुस्थानच्या सेवेचा खरा अर्थ ह्या किसानांची, खेडूतांची सेवा. त्यांच्या हृदयांशीं हृदय मिळालें पाहिजे. त्यांच्या सुख-दुःखाची ओळख हवी ही ओळख होण्यासाठीं त्यांच्या भाषेचा अभ्यास हवा. हैद्राबादमध्यें हिंदुस्तानी येत असली कीं काम भागतें. परंतु हा प्रदेश तेलगू भाषेचा. येथली प्रदेश-भाषा तेलगू ती सर्वांनीं शिकली पाहिजे असें मी चाहतों. जोंपर्यंत येथें राहणारे तेलगू शिकत नाहींत तोंपर्यंत त्यांनीं आपलें कर्तव्य पुरें केलें असें म्हणता येणार नाहीं. मी जर येथें कामासाठीं राहिलों असतों तर तेलगू शिकणें कर्तव्य मानलें असतें. सहा वर्षांपूर्वी वेलोर जेलमधें पाय ठेवल्या दिवसापासून मी तामिल शिकण्याला सुरवात केली. रोज एक तास मी शिकत असे. तेलगु, मल्याळम् आणि कन्नडहि शिकलों. परन्तु तामिल शिकण्याची उत्सुकता होती. कारण तामिल प्रांतांत राहाणार होतों. तेथलें अन्न खाणार, पाणी पिणार, सेवा करणार होतों. तामिल जर न शिकलों तर तें माझ्या प्रेमाला शोभणार नाहीं असें वाटत होतें. तेथें वॉर्डर वगैरे होते. त्याचे माझ्यावर फार प्रेम होतें. जेलमधें लोक जातात. कोणी इंग्रजी शिकतो, उर्दु शिकतो. पण मला तामिल शिकतांना पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. त्यांना अति प्रेम वाटे. बोलण्या इतपत मी शिकलों नाहीं तरी प्रेमसंबंध झाला. येथें मुसलमान, महाराष्ट्रीय, कानडी कोणीहि असो. येथें रहावयाचें तर त्यानें तेलगू शिकावें. त्यामुळें ज्ञान होईल. एकमेकांबद्दलचें प्रेम वाढेल, दुजाभाव जाईल.

## तेलगू याचा अर्थ मध

ह्या ज्या प्रदेशभाषा आहेत त्या सामर्थ्यशाली आहेत. सुंदर आहेत, मधूर आहेत. तेलगूची मधुरता तर निरुपम आहे. ' तेलगू ' ह्या शब्दाचा अर्थच मुळीं मध. मधासारखी गोड ती भाषा. अनेक भाषांचा मी अभ्यास केला आहे. तुलनेंत तेलगू अधिक गोड आहे असें माझें मत बनलें. तेलगू साहित्यहि विपुल

आहे, चांगलें आहे. हिंदुस्तानीचें साहित्य पांचशें वर्षांचें पण तेलगूचें हजार बाराशें वर्षांचें आहे. त्या भाषेशीं परिचय हवा. त्यामुळें आपल्या भाषेला फायदा होईल. त्यांनाहि लाभ होईल.

## भक्तीपूर्वक भाषेची सेवा

सकाळीं कस्तुरबा स्मारक केंद्रावर गेलों होतों. सोपें व्याख्यान झालें. परंतु तर्जुमा बरा झाला नाहीं. जर तेलगूंत बोललों असतों तर हृदयापर्यंत जाऊन भिडलें असतें, हृदयाशीं हृदय मिळतें. चारच शब्द पण त्यांच्या भाषेंत बोललों असतों तर भाऊ भाऊ बनलों असतों. येथें प्रेमभावाला वाव आहे. तेलगू भाषा शिकून प्रेमभाव वाढवा.

येथल्या युनिव्हर्सिटीनेंहि ठीक दृष्टि ठेवली असती तर लाभ झाला असता. तेलगू–उर्दू, कन्नड–उर्दू, मराठी–उर्दू कोष त्यांनीं बनविले असते. व्याकरणें लिहिलीं असतीं त्यानें प्रेम वाढलें असतें. उर्दूचीहि तरक्की झाली असती. परंतु त्यांना सुचलें नाहीं. येथील प्रदेशिक भाषांबद्दल त्यांनीं जें धोरण ठेवलें त्यामुळें फार नुकसान झालें. त्यांनीं जर येथल्या प्रदेश भाषांना उत्तेजन दिलें असतें तर येथल्या जनतेचें प्रेम त्यांना मिळालें असतें. इतरांना एक उदाहरण झालें असतें. पण झालें तें गेलें. आतां तरी नोट केलें पाहिजे. इतर भाषा शिकण्याची सोय केली पाहिजे, कोष, व्याकरणें तयार केलीं पाहिजेत.

इंग्रजी भाषेची वाढ अशा प्रकारें भक्तिपूर्वक तेथल्या लोकांनीं केली आहे. दुनियेंतल्या सर्व भाषा शिकण्याची सोय त्यांनीं करून ठेवली आहे. कुराण, वेद यांसारख्या ग्रंथांच्या अभ्यासाची सोयहि इंग्रजींतून आहे. तामिलमल्याळमूचे कोषहि त्यांचे चांगले आहेत. ह्या भाषा शिकतांना इंग्रजीचा मला उपयोग झाला. आपल्याला ह्याची शरम वाटली पाहिजे. आपल्या देशांतल्या भाषा शिकण्याची सोय येथल्या भाषांतून नसावी आणि इंग्रजीच्या सहाय्यानें आम्ही येथल्या भाषा शिकाव्या हें लांच्छनास्पद आहे. जर दुसऱ्यावें प्रेम, सहभाव हवा असेल तर दुसऱ्याची इतकी कदर केली पाहिजे.



## इंग्रजीचा अभ्यास

आतांपर्यंत लाचारीनें इंग्रजी शिकत होतों. इंग्रजीचा बोजा होता. आतां तो राहणार नाहीं. फायद्यासाठीं इंग्रजी शिकूं पण तें सक्तीचें असणार नाहीं. इंग्रजीचा बोजा आतां जाईल. दुसऱ्या भाषा शिकण्यांत आतां ती शक्ति खर्च करूं. इतर भाषांचा अभ्यास न झाल्यानें येथल्या भाषांचा विकास नाहीं झाला. त्यांचा अभ्यासहि नाहीं झाला. यापूर्वी संस्कृतचा जमाना झाला, पर्शियनचा, इंग्रजीचा जमाना झाला पण प्रदेशभाषांकडे दुर्लक्ष होतें. आतां प्रदेशभाषा वाढोत. त्यांचा प्रेमभाव वाढो. प्रत्येक भाषा माझी वाटो. भाषांचा सहकार होवो. एका भाषेची उन्नती दुसऱ्या भाषेलाहि उन्नत करते कारण सर्व भाषांचा मूळ स्रोत एकच आहे.

हैद्राबादेंत राहाणाऱ्या सर्व बंधूंनीं कमीतकमी तेलगू शिकावें. ती हैद्राबादची प्रदेश-भाषा आहे. महाराष्ट्रांत राहाणाऱ्या सर्वांनीं मराठी शिकावें, कर्नाटकांत राहणाऱ्यांनीं कन्नड शिकावें. असें न होतां जर हिंदुस्तानीनें काम भागवीत राहिलों तरी खरी प्रगति होणार नाहीं, भेदभाव वाढेल. हिंदुस्तानीबद्दल प्रेम वाटणार नाहीं. तिरस्कार वाटेल. हिंदुस्तानी हे शिक्षणाचें माध्यम फार काळ चाललें तरी तिच्याबद्दल तिरस्काराची भावना निर्माण होईल. हिंदुस्थानीबद्दल आदर वाटावा असें वाटत असेल तर हिंदुस्थानीवाल्यांनीं मातृभाषांना, प्रदेशभाषांना उत्तेजन द्यावें. प्रत्येकानें आपापल्या सीमेंत रहावें. तरच प्रेम वाढेल आदर राहील. हिंदुस्थानी भाषा मोठमोठीं शहरें, प्रांत एकमेकांशीं जोडील तर प्रदेशभाषा खेडीं आणि शहरें जोडील. प्रदेशभाषा आणि देशभाषा दोन्हींचा विकास होईल याकडे लक्ष द्या. एक उत्तम आदर्श त्यांतून मिळेल.

———

## ३।४।१९४९ : : :

## सलामती समिति

आज हैद्राबाद शहरांत जातीय वैमनस्य दूर करून ऐक्य वाढविण्यासाठीं सर्व जातीच्या लोकांची एक सलामती समिति तयार करण्यांत आली. सलामती समितीच्या सभासदांना विनोबाजींनीं चार शब्द सांगितले. सायंकाळीं प्रार्थनेनंतर बीदर भागांत फिरावयाला विनोबाजी जावयाचे असल्यानें दिवसभर गडबड चालू होती. वेगवेगळे लोक भेटीसाठीं येत होते. एकाद्या लग्नघरांत जशी सर्वत्र धांदल दिसते तशी धांदल होती. हैद्राबादमध्यें सकाळच्या प्रार्थनेलाहि बरेच लोक येत असत. दुसरा हैद्राबादमधला खास कार्यक्रम म्हणजे रोज दुपारीं २ ते ३ पर्यंत सामुदायिक सूतकताई नियमित होत असे. गांवांतलीं ४०-५० मंडळी नियमानें येत असत. ह्या सूतकताईच्या कार्यक्रमानंतरच बहुधा चर्चा वगैरे होत असत.

## कर्म आणि ज्ञानाचा एकत्र उपयोग

आजहि दुपारीं चर्चा होती. मुख्यत: शिक्षणावर नई-तालीमवर चर्चा झाली. विनोबाजी म्हाणले "नई-तालीम शिक्षण पद्धतीची रचना मुख्यत: खेड्यांच्याकडे लक्ष देऊनच केली आहे. त्याशिवाय खेड्यांचें चालणारच नाहीं. हिंदुस्तान हा मुख्यतः खेड्यांचा देश आहे. नई-तालीम मधला विचार मुलांना विनाकाम ज्ञान देऊ नये हा आहे. कर्म आणि ज्ञान यांचा एकत्र उपयोग त्यांना शिकवावा. शिक्षणाची जीवनाशीं फारकत असूं नये.



आजच्या शिक्षणांत असें होऊं शकते कीं वर्गात युरोपचा भूगोल चालतो आणि इकडे देशांत बिहारचा भूकंप होतो, पंजाबमध्यें दंगे होतात पण त्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती नसते. त्यांचा जणु त्या घटनांशी संबंधच नसतो. वृत्तपत्रांत येणाऱ्या घटना, स्थानिक महत्त्वाच्या घटना यांच्याशीं संबंध हवा. पैठणची यात्रा असेल तर त्याचीहि चर्चा हवी. नई-तालीमचा असा उद्देश आहे. समजा वर्गातला एक मुलगा आजारी पडला तर शिक्षकांनीं विद्यार्थ्यांसह त्याच्या समाचाराला जावें आणि त्या रोगासंबधी चर्चा करावी, माहिती द्यावी. गांवांत कॉलरा असला तर कॉलरा म्हणजे काय, तो कसा होतो, त्याला प्रतिबंध कसा घालावा हें विद्यार्थ्यांना शिकवलें पाहिजे. नित्य घडणाऱ्या घटनांना जोडून शिक्षण असावें. संबंध नसलेलें ज्ञान आम्ही लादतो, वरून थापतो आणि निरर्थक प्रश्न त्यांना विचारीत बसतो. रेल्वेच्या दोन गाड्या एकेमकांविरुद्ध जात आहेत, एक अमूक वेगानें जाते दुसरी तमूक वेगानें जाते. त्या एकमेकांना किती वेळांत ओलांडतील? असे प्रश्न विचारले जातात. त्याऐवजीं व्यवहाराशीं संबंधित असें ज्ञान द्यावें. घरांत होणारा खर्च कसा होतो, भाजी किती खाल्ली, आहार कसा असावा, योग्य वस्तू मिळत नसतील तर त्यांची पूर्ति कशी करावी हें शिकवावे! नाहींतर कॉलेज शिकूनहि रसोयी करतां येत नाहीं. आहारशास्त्र ठाऊक नसतें, पोळी कच्ची कीं पक्की हेंहि समजत नाहीं. एका बाजूनें जळूनहि रोटी कच्ची राहूं शकते हें समजत नाहीं. साधी पोळी करण्यावरून पदार्थविज्ञान, रसायन, भूमिती सारे विषय शिकवितां येतील.

## घराशीं गांवाशीं व जीवनाशीं शिक्षणाचा संबंध हवा

शहरीं मुलांनाहि काम तर हवेंच. ते जर नसेल तर शहरी आणि देहाती यांच्यांत लढाई होईल. जर ग्रामवृत्ति नसेल तर अशी लढाई अटळ आहे. शहरांतूनहि चक्की चालवावी. चांगलें पीठ मिळेल. शालेय ज्ञानाचा घराशीं, गांवाशीं आणि जीवनाशीं संबंध असावा. भविष्यकाळीं केव्हांतरी उपयोग पडणारें ज्ञान नको. मग तें सारें विद्यार्थी विसरून जातो. मग ३३ टक्के आठवलें कीं पास करतात. म्हणजे ६७ टक्के ज्ञान विसरायला परवानगी असते. व्यवहारांत असें चालेल काय? शेंकडा तेहतीस भाकरी चांगल्या करणाऱ्या आचाऱ्याला ठेवाल का नोकरीला? ७५ टक्के भाकरी चांगल्या केल्या तरी ठेवाल का? मोटार ड्रायव्हर

समजा २५ टक्के वेळीं अपघात करतो तर चालेल काय ? तेथें थोडीहि चूक नको असते. ज्ञानांतहि तसेंच हवें. शंभर टक्के ज्ञान हवें. एकादा म्हणाला कीं नव्याण्णव टक्के ध्रुवाची जागा दाखवितो तर चालेल का ? आज उपयोग नाहीं तें विद्यार्थी विसरेल. पुढें दहा वर्षांनीं उपयोगी पडणाऱ्या गोष्टी डोक्यांत ठेवायला तो विद्यार्थी तयार नसतो. मग त्याला ज्ञानासाठीं इनाम देतात. ज्ञान दिल्याबद्दल इनाम घ्यावें कीं घेतल्याबद्दल द्यावें ? अगोदर ज्ञान देऊन उपकार करतां आणि त्यानें मान्य केल्याबद्दल त्याला इनाम देतां. इकडे सोटा आणि तिकडे नोटा (इनामाच्या) यांच्या जोरावर सारें लादावयाचें. पाठ केलेलें सारें लादलेलें, थापलेलें असतें. जरुरी ज्ञान जर विद्यार्थ्याला दिलें तर विद्यार्थी भुकेलेल्या प्रमाणें तें घेतील. तें जर कामाचें, उपयोगाचें असेल तर लक्षांतच ठेवील. आंबा एकदां खाल्ला तर विसरतां का ? एकदां स्वाद घेतला तर विसरत नाहीं. अनुभवाची चीज विसरत नाहीं. माळी बगीच्यांत योग्य तेवढें पाणी देतो आणि सारें पाणी उपयोगी पडतें. ज्ञान देणें हे पेरण्यासारखें आहे. तें फेंकणें नव्हे. पेरतांना स्थळ, काळाची अनुकूलता बघावी लागते. तसें ज्ञानाचें हवें. कामांतून, प्रयोगांतून ज्ञान दिलें गेलें पाहिजे. आंबा खेड्यांतच असतो पण, त्याची गोडी कळली कीं शहरीं तो घेतो. नई-तालीम खेड्यासाठीं असली तरी तिची किंमत कळली तर शहरी लोक ती घेतील. जुन्या शिक्षण पद्धतीनें शिक्षणाचा भार होतो, शरीरें कमजोर होतात. जर ह्या शिक्षणानें विद्यार्थी कर्मयोगी, ज्ञानानें दुरुस्त, वाणीनें दुरुस्त निघतील तर शहरी लोक ही शिक्षणपद्धति स्वीकारल्यावांचून राहणार नाहींत. नुसत्या कायद्यानें ते घेणार नाहींत. आम्ही या शिक्षणानें चांगलीं तयार झालेली मुलें समाजापुढें ठेवलीं पाहिजेत. एका शाळेंत हा प्रयोग यशस्वी झाला तर दुनियेंत सर्वत्र होईल. शिक्षणाचें हें वैशिष्ट्य आहे. रवींद्रांच्या, दयानंदांच्या, गांधींच्या प्रयोगांचा विचार करा. पाश्चिमात्यांनींहि लहान प्रमाणावर प्रयोग केले. मोठे प्रमाण महत्वाचें नाहीं. जर चाळीस तेजस्वी विद्यार्थी यांतून तयार झाले तर प्रयोग साऱ्या दुनियेंत होईल.

## मी शिकतों हा अहंकार कशाला

आजचें शिक्षण बंद पडल्यानेंच मला समाधान होईल. दोन वर्षें शाळा बंद केल्या तरी चालेल. त्यांना कामाला लावा. शरीरें कमवायला लावा. जुनी शिक्षण



पद्धति अजीबात बंद पडली तरी फायदाच होईल. आग जरी घराची विझली तरी पुरे. मग त्यांत पुरेसें पाणी सध्यां नसले तरी चालेल. मुलाला आजच्या शाळेंत जाण्याचा सल्ला मी देत नाहीं. कांहीं न शिकतांच मी शिकलों असा अहंकार तरी कशाला हवा.

## पंचवीस वर्षें शिकतच असतो

आज वयाच्या पंचवीस वर्षापर्यंत मुलें शिकत असतात. आणि मग पुरुषार्थ केव्हां करणार ? अहमदशहाचा मुकाबला १८ वर्षाचा जनकोजी शिंदे करीत होता. सेनापति पेशवे इकडून दक्षिणेंतून लिहून पाठवतात की " तुम्ही त्याचा प्रतिकार करीत रहा. " दक्षिणेंतून तयारी करून पेशवा येईपर्यंत तो लढत राहिला. भाऊसाहेब पेशवे चौदा वर्षांचे पण युद्ध खेळत होते. ज्ञानेश्वरानीं सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली. पण आज पंचवीस वर्षें शिकतच असतो मुलगा. मनूनें सांगितले आहे कीं ' प्राप्तेषु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् ' मुलगा सोळा वर्षाचा झाला कीं त्याच्याशीं मित्राप्रमाणें वागावें. आपण मित्राला का रोजच्या रोज फुकट खायला घालतों ? जो बाप मुलाला सोळा वर्षानंतर खायला फुकट घालील तो खरा बापच नाहीं. पक्षी आपल्या पिलांनीं लौकर उडायला लागून स्वावलंबी व्हावें म्हणून प्रयत्न करतात आणि इकडे मुलगा आज्ञा पाळेनासा होईपर्यंत बाप आज्ञा देतच असतो. आजची शिक्षण पद्धति संपली तरीही ठीकच होईल. आजच्या शिक्षणाला उद्योग जोडायचें काम चालू आहे. परंतु ती नई-तालीम नव्हे. नई-तालीममधें उद्योग आणि शिक्षण यांचा समवाय आहे.

## सिद्धांतांशीं समझौता नको

रचनात्मक कार्यकर्त्यांचे इतर संघटनांशीं कोणते संबंध असावेत असा प्रश्न या नंतर निघाला. विनोबाजी म्हणाले, "संबंध महत्वाचा नाहीं. तो संबंध ठेवण्याचा ढंग कोणता हा महत्त्वाचा प्रश्न आहे. रचनात्मक कार्यकर्त्यानें सत्य-अहिंसेची शपथ घ्यावी. कोणाचीहि मागें निंदा त्यानें करू नये. वैर कोणाशीं त्याचें नको. दोष दाखवायचे ते त्या माणसाच्या समोरच दाखवावे. पण आम्हीं उलटें करतों.

आपले दोष तर कोणी पहातच नाहींत. देशांतल्या पार्ट्याहि एकमेकांचे दोषच पाहातात. आपल्या दोषांचा मात्र विचार करीत नाहींत. डॉक्टरकडे गेलात तर दुसऱ्याला काय रोग झाला हें सांगत बसाल का ? प्रत्येक तेथें जसें स्वतःला काय काय झालें हें सांगतो तसें आपण दोष सांगावे. डॉक्टर उपाय करील. जो आपले दोष पाहत नाहीं पाहून लपवून ठेवतो, इलाज करीत नाहीं तो मृत्यूकडे जात असतो. आपल्याला झालेला रोग जो पहात नाहीं, पाहिल्यावर तो लपवून ठवतो इलाज करीत नाहीं तो जसा मृत्यूची वाट चालत असतो तसेंच हेंहि आहे.

सिद्धांतांशीं समझौता करूं नका. सभासद कोणाचेहि व्हा परंतु असत्य नका करूं हिंसा नका करूं. असत्य, हिंसा असेल तर पार्टीचा लोभ सोडून दूर व्हा.

या मर्यादा ध्यानांत ठेवून रचनात्मक कार्यकर्त्यांनीं सर्वांशीं संबंध ठेवावेत. संबंध ठेवावयाचे ते आपल्या अटींवर ठेवावे दुसऱ्यांच्या नव्हे.

मृत्यू आपले सारें पूर्वस्मरण घालवितो. त्याच्यावरून सूचना घेऊन आपणहि जुनें विसरलें पाहिजे. जुने न विसरतां उगाळीत बसूं तर कधींच एकत्र येतां येणार नाहीं. जुनें विसरणें हा एकतेला एक मोठा आधार आहे. सम्यक् स्मरण आणि सम्यक् विस्मरण यानें सम्यक् स्मरणशक्ति होते. प्रेमाची शक्ति ओळखली पाहिजे. प्रेमामुळें विविधतेंत सौंदर्य येतें. प्रेम नसेल तर विविधता विनाशाकडे घेऊन जाईल.

दुसऱ्याच्या दृष्टीनेंहि थोडा विचार करावा. केवळ बदमाशाला कोठली आत्मप्रतिष्ठा, कोठला अभिमान असें म्हणूं नये. त्याच्याजवळ जर आत्मप्रतिष्ठा नसती तर तो जगलाच नसता. ज्या अर्थीं तो जगतो आहे त्या अर्थीं त्याच्याजवळ वेगळी दृष्टि असेलच. त्या दृष्टीनें पहावें म्हणजे तेथेहि थोडीफार भलाई नजरेला पडेल. रोगानें अगदीं जर्जर झालेलाहि आशा सोडीत नाहीं. तो विचार करतो माझे हातपाय तर अजून शाबूत आहेत. फक्त हृदयांत गडबड आहे. तो रोगी चांगलें काय आहे तें पाहतो, स्वतःच्या दृष्टीनें चांगलें काय तें पाहतो.



त्याची किंमत ठेवतो. तो आधार व्यर्थंचा समजूं नका. तो त्या वेळेलाहि त्या चांगल्याच्या आधारावरच जगत असतो. आई असेंच करते. तिचा मुलगा बदमाष असला तरी चांगला गुण तेवढा पाहाते. त्याला प्रेम देते. मुलाला ती आत्मस्वरूप समजते. आणि दोष निघून जातील अशी आशा राखते. पण आपण त्या आत्मस्वरूप शब्दाला भितों. हिंदुस्थानची विशेषता म्हणजे आत्मज्ञान. त्याच्या तोडीचें ज्ञान जगांत नाहीं. त्याची किंमत ओळखा. ती ओळखाल तर जीवन आनंदमय मंगलमय होईल. आत्मज्ञानासाठीं प्रयत्न करा. दुनियेला सुधारण्याच्या गोष्टी करतां स्वतःवरही थोडी दया करा. ज्ञानेश्वर म्हणतात, " जया हातीं आपुली कृपा " त्याचें रहस्य समजून घ्या.

चर्चा आटोपून विनोबाजी प्रार्थनास्थानीं गेले.

## प्रेमाचा धडा

प्रार्थनोतर प्रवचनांत विनोबाजी म्हणाले—" सुमारें तीन आठवडे इकडे फिरत आहे. जीं कामें मीं आपलीं मानलीं त्यांत हिंदु-मुसलमान इत्यादि सर्व जातींचें ऐक्य हें एक महत्त्वाचें मानलें. जेथें जातों तेथें ह्या कामासाठीं वेळ देतों. हिंदुस्तानांत अशा दोन जागा आहेत कीं जेथें हिंदु-मुस्लीम प्रश्न सुटला कीं साऱ्या हिंदुस्तानांत तो प्रश्न सुटेल. पाकिस्तान हिंदुस्तानमधील हा प्रश्न नाहीं. हिंदुस्तानांतलाच प्रश्न आहे. मेवाडमधील मुसलमान दुःखी होते. परंतु त्यांचा प्रश्न सुटला आहे. मेव लोकांना वसविलें आहे. त्यांना वसविण्यांत हिंदूंहि मदत करीत आहेत. तेथें आमचेहि कांहीं कार्यकर्ते काम करीत आहेत. निरहंकारी, प्रेमळ कार्यकर्ते. त्यांच्या राहण्यानें प्रेमाचा धडा सारे शिकले आणि प्रेमानें त्यांचें ऐकतहि आहेत. हैद्राबादमधें जर तसें होईल, सारे प्रेमानें राहतील तर साऱ्या देशभर त्याचा सुगंध पसरेल. त्या आशेनें मी आलों. दोन्ही जातींत प्रेमभाव नांदावा म्हणून शक्य तें सारें केलें. वीसपंचवीस जबाबदार लोकांची एक सलामती समिति स्थापन झाली आहे. दोन्ही जातींत संघर्ष होण्याची शक्यता दिसेल तर तेथें आपले प्राण पणाला लावून ते द्वेषाग्नि निर्माण होऊं देणार नाहींत. ही समिति दोन्हीं जातींची सेवा करील. त्यांच्या कामांत सुयश मिळेलच कारण ते चांगलें काम करीत आहेत.

## खरा लाभ हृदयें एक होतील, मोठीं होतील तेव्हांच

सेवेचा कार्यक्रम आतां आहे. कार्यपद्धतीचा फरक त्यांत बाधा आणणार नाहीं. नुसत्या राजकीय ऐक्यानें लाभ नाहीं. हृदयाचें ऐक्य असेल तरच फायदा होईल. संस्थानें विलीन होत आहेत. या मोठ्या घटना आहेत पण खरा लाभ हृदयें एक होतील, मोठीं होतील तेव्हांच. असें झालें तरच कामें होतील. तें ऐक्य होईल, ती विशालता येईल अशी आशा करतों. हिंदुस्तानचें भलें चाहत असाल तर मनांतले दुर्भाव काढून टाकले पाहिजेत. पक्षभेदांत समजुतीचा उणेपणा आणि दुर्भाव या शिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. सद्भावानें झगडे मिटतील. परंतु सर्वांचें सहकार्य लाभेल तेव्हांच हें होऊं शकेल. आपल्या हृदयांतहि सुशिक्षितांनीं दोन जातींत भेद करूं नये. साऱ्यांना येथेंच राहावयाचें आहे. खाणें, पिणें, मरणें साऱ्यांचें येथेंच. आपण जें खातों, त्या अन्नांत, पाण्यांत भेद नाहीं. तो सूर्य सर्वांवर सारख्या रीतीनें प्रकाशतो. तो भेद करीत नाहीं. त्याच्यापासून सर्वांशीं समान वागायला आपण शिकलें पाहिजे.

## नेकीची कसोटी लावा

जो आजारी असतो त्याला आजारी म्हणून आपण ओळखतों. हिंदु-मुसलमान म्हणून नाहीं ओळखत. सुखी असेल तर त्याला सुखी म्हणून आणि दुःखी असेल त्याला दुःखी म्हणून आपण पाहतों. त्याची जात पाहात नाहीं. त्याचप्रमाणें सज्जनाला सज्जन म्हणून पाहावें. धर्मनिष्ठाला धर्मनिष्ठ म्हणून समजावें. नेक काम जर तो करील तर तो हिंदुमुसलमान कोणीहि असो त्याला सच्चा धर्मनिष्ठ मानावें. नेकीची कसोटी लावा. कोणत्या ईश्वराचें नांव घेतो, प्रार्थना कशी करतो, त्याचे लग्न कसें होतें., मृत्यूनंतर त्याच्या शरीराचें काय करतात, जानवें घालतो कीं दाढी ठेवतो, वगैरे गोष्टींना महत्त्व नका देऊं. त्याचा विचार नका करूं. सुशिक्षित हें समजतील आणि सलामती समितीशीं सहकार्य करतील तर ठीक होईल. मी येथून गेलों तरीहि तुमच्या बरोबर राहीन. एक जमाना असा होता कीं त्यावेळीं दक्षिणेकडून उत्तरेकडे आत्मज्ञान गेलें शंकराचार्य, मध्वमुनी, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य हे



दक्षिणेकडलेच. त्यांनीं उत्तरेच्या लोकांना आत्मज्ञान, भक्ति दिली. उत्तरेंतले लोक त्यांचे अनुयायी म्हणवितात. इथें जितका वल्लभसंप्रदाय आहे तितकाच गुजरातेंत तो आहे. पूर्वी जसा ज्ञानाचा प्रकाश दक्षिणेकडून उत्तरेकडे गेला तसा प्रेमाचा संदेश इकडून उत्तरेकडे जावो. मद्रासमध्यें जितकें हिंदुमुसलमानांत प्रेम राहिलें तितकें उत्तरेंत नाहीं राहिलें. आतां दक्षिणेच्या प्रेमसंदेशवाहकांत हैद्राबादहि येऊं द्या.

## प्रेमसंगीत

आतां आपण सरळ मार्गावर येऊं. कुराणांत "हे अल्ला, मला सरळ मार्गानें ने" अशी प्रार्थना आहे. तो नीट मार्गावर नेत आहे. सारी दक्षिण प्रेमाचा संदेश देईल. हें एक उत्साहाचें काम आहे. ह्या कामासाठीं अनुकूल परिस्थिति येथें आहे. येथें विविध भाषा आहेत. त्यांचा लाभ घ्या. विविधतेंत एकता पहा. भेदांत अभेद पहा. प्रेमाचें संगीत कसें निर्माण करावें याचें उदाहरण घालून द्या.

## दुनियेला सांत्वना

बुद्धाच्या अनुयायांनीं पूर्वी साऱ्या जगाला प्रकाश दिला. आतां २५०० वर्षांनंतर पुन्हां असा मनुष्य निर्माण झाला. त्याच्याकडे साऱ्या जगाचें आकर्षण. त्याचा मार्ग अनुसरूं तर येथें राहणारांत अशी शक्ति येईल कीं साऱ्या दुनियेला त्यांतून सांत्वना मिळेल. हें एक थोर कार्य आहे. परमेश्वरानें ही महान् संधि दिली. या गोष्टीनें उत्साहाचें भरतें येतें. ईश्वरानें फार पवित्र संधि दिली आहे असें वाटतें. ह्या संधीचा नीट उपयोग केला तर स्वतःचाहि उद्धार होईल आणि दुनियेचाहि होईल.

—

४।४।१९४९ : :

## बाहेर जाणारा पैसा थांबवा

संध्याकाळची प्रार्थना आटोपून विनोबाजी मोटारीनें बीदर विभागांत फिरण्यासाठीं रवाना झाले. रात्रीं जहराबाद गांवांत मुक्काम होता. विनोबाजींच्या स्वागतार्थ लोक जमले होते. विनोबाजींनीं त्यांना उद्देशून चार शब्द सांगितले. म्हणाले " व्यसनें सोडा. व्यसनांच्या निमित्तानें गांवांतून आपला पैसा बाहेर जातो तो थांबला पाहिजे. खेडगांवांतून पैसा वेगवेगळ्या मार्गांनीं बाहेर जात आहे. आपण गरीब होत आहोंत. प्रेमानें एकमेकांशीं रहा. " दुसऱ्या दिवशीं सकाळच्या प्रार्थनेलाहि बरेच लोक होते. फेऱ्या घेऊन गाणीं गात, जयघोष करीत ते आले. या भागांत विशेष उत्साह दिसून आला. बीदर जिल्ह्यांत रझाकारांनीं धुमाकूळहि खूप घातला होता. सकाळीं प्रार्थनेनंतर विनोबाजी सहसा प्रवचन देत नसत. परंतु जहराबादला बोलले. म्हणाले " प्रत्येकानें श्रवण आणि मनन करावें. स्त्रियांनीं असे प्रसंग टळूं देऊं नयेत. जेवण सोडूनहि त्यांनीं यावें. जेवण तयार करण्याच्या वेळीं जर श्रवणाची संधि असेल तर तीहि त्यांनीं सोडूं नये. ज्ञान हवें. ज्ञानाशिवाय जर तरून जाऊं तर तें फार धोक्याचें आहे. श्रवण मनन आणि पठण त्यांनीं करावें. सेवेबरोबरच ज्ञान असलें पाहिजे. ज्ञान नसेल तर आसक्ति राहते आणि मुक्ति मिळत नाहीं. श्रवण करण्याचा प्रसंग असेल तर सारें सोडून त्यांनीं यावें. "

## ईश्वर सत्य ओळखतो

जहराबादहून आम्ही अलगोल गांवीं गेलों. हें एक लहानसें खेडेगांव आहे. डोंगराळ मुलूख असल्यानें रस्ता बराच त्रासाचा आहे. गांवापासून मैल-



भर मोटारी आल्यावर गांवच्या वानरसेनेनें जयघोषानें सलामी दिली. ' जयहिंद, महात्मा गांधीकी जय ' या घोषणांनीं त्यांनीं स्वागत केलें. हिंदी फौजा ह्या विभागांत शिरल्यावर रझाकारी अत्याचारांतून नुकत्याच मुक्त झालेल्या ह्या गावांतील हरिजनांना धाकानें ख्रिश्चन बनविण्यांत आलें. परंतु तरीहि गांवकऱ्यांत फारसा भेद दिसला नाहीं. विनोबाजींच्या स्वागतार्थ सारे एकत्र जमलेले होते. येथल्या लोकांना मराठी तर नाहींच पण हिंदुस्तानीहि फार थोडें समजत होतें. येथल्या जनतेची भाषा तेलगू. सभेला स्त्रियाहि पुरुषांच्या बरोबरीनें हजर होत्या. विनोबाजी गावांतल्या हरिजन वस्तींत फिरले आणि लोकांच्या जवळ थोडी चौकशीहि त्यांनीं केली. विनोबाजी सभेंत म्हणाले " झालें गेलें तें विसरा सर्व प्रेमानें रहा. ईश्वर, हिंदू, मुसलमान ख्रिस्ती, कांहीं ओळखत नाहीं. तो सत्य ओळखतो. तो धर्म जाणत नाहीं. सत्य आणि प्रेम तो जाणतो. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती जर खराब असतील तर मग ते कोणीहि असोत, त्याला मान्य होणार नाहींत. "

विनोबाजींना जे हार अर्पण केले ते त्यांनीं लहान मुलांच्या गळ्यांत घातले. मुलांना खूप आनंद झाला. अलगोलची सभा आटोपून जहराबादवरून आम्ही हुमानाबादकडे निघालों. रस्त्यानें गांवोगांवचे लोक जमले होते. कमानी उभारल्या होत्या. विनोबाजींचें स्वागत केल्यानंतर त्यांची मोटार पुढें जात होती. मध्यान्हीला आम्ही हुमाणाबादला पोंचलों. माणिक प्रभूंचा ह्या गावांशीं संबंध असे. विनोबाजींचें येथें सुंदर प्रवचन झालें. पैठणला नाथांच्या स्मरणानें विनोबाजींना गहिंवरून आलें होतें. त्यांना तेथें बोलणेहि जड जात होतें. येथें आपल्या मातेची आणि आजोबांची आठवण येऊन त्यांचे डोळे आणि कंठ भरून आला. व्याख्यान अति सुंदर झालें. विनोबाजी हिंदुस्तानींतच बोलले.

## स्त्रियांना श्रवणाची संधि द्या

" माझ्या प्रिय बंधूंनो आणि भगिनींनो, तुम्हाला पाहून आनंद होत आहे. हा कन्नड प्रांत आहे हें ठाऊक आहे. येथील प्रादेशभाषा कन्नड. ती मला थोडी समजतेहि पण तितकी बोलतां नाहीं येणार. राष्ट्रभाषेंत म्हणून बोलतों. समजाल अशी आशा. पूर्ण नाहीं समजलांत तर सार तरी समजाल.

तुम्ही मोठ्या संख्येनें आलांत पण स्त्रिया फार थोड्या. सभेंत पुरुष येतात. स्त्रिया येत नाहींत. त्या घरकामांत असतात. त्या सेवापरायण असतात हें ठीक. श्रवणाची संधि असेल तर स्त्रियांनाही मिळावी. मी म्हणेन अशा प्रसंगीं पुरुष व स्त्रिया दोघें येऊं शकत नसतील तर पुरुषांनीं मुलें सांभाळावीत आणि स्त्रियांना पाठवावें. उपवास करावा पण श्रवणाची संधि सोडूं नये. इतर प्राण्यांप्रमाणेंच मनुष्य जगतो. दोघांच्याहि बाह्य जीवनांत फरक नाहीं. जनावरें खातात, पितात आणि झोपतात. मनुष्यहि ह्या गोष्टी करतो. पण नुसत्या शारीरिक सुखानें मनुष्याच्या आत्म्याला संतोष होत नाहीं. त्याला एक अधिक भूक असते. आत्म्याची भूक असते. आत्मा जितका पुरुषांत आहे तितकाच स्त्रियांतहि आहे. श्रवण, मनन, चिंतनाची संधि सर्वांना हवी. ज्ञानचर्चा, भक्ति, श्रवण, मनन या सर्व गोष्टी सोडल्या तर मानवजीवन जगण्यालायक राहाणार नाहीं. मनुष्याला बाकीच्या गोष्टींनीं समाधान होणार नाहीं. हें तुम्हाला ठाऊक आहे. बाहेरच्यानें हें सांगण्याची जरूरी नाहीं. हा गांव सत्पुरुषांच्या नांवें प्रसिद्ध आहे. तुम्ही हें विसरला नसाल. ह्या गांवाचें सत्पुरुषाशिवाय कांहीं ठाऊक नाहीं. बाकीच्या येथल्या माणसांची का किंमतच नाहीं ? ईश्वरापाशीं आहे. परंतु मानवाच्या जीवनाची सफलता ज्या जीवनांत दिसते त्याच्या इतकी किंमत दुसऱ्या कशाला नाहीं. त्याला विसरणें शक्य नसतें. ईश्वराच्या नांवासारखा त्यांच्या नांवाचा आदर वाटतो. खरें जीवन कसें असावें तें हे लोक दाखवीत असतात.

## ईश्वराला हृदयाची ओळख असते

असा एक महापुरुष आतांच होऊन गेला. महापुरुषांची येथें अखंड परंपरा आहे. नदीसारखा त्यांत अखंड प्रवाह आहे. असा काळ नाहीं कीं ज्यावेळीं येथें सत्पुरुष नव्हते. ही ईश्वरी कृपा आहे. युगानुयुगें सत्पुरुष येत आहेत सर्व जातींत. ब्राह्मण सत्पुरुषांप्रमाणें इतर जातींतहि सत्पुरुष आहेत. सत्पुरुषांची जात नसते. ते ईश्वराचें प्यारे असतात आणि ईश्वरी प्रेमाचा संदेश देत असतात. त्यांतून बोध घेतला पाहिजे कीं परमेश्वर जातपात धर्म पाहात नाहीं. हृदयाची सत्यता, आंतरिक प्रेम पाहतो. तें जर त्याला मिळालें तर निरक्षरालाहि तो जवळ घेतो. प्रेम नसेल तर पंडितहि त्याच्यापासून दूर राहतो.



अशा गोष्टी आपण ऐकल्या आहेत. रामकृष्णांच्या गोष्टी आपल्याला ठाऊक आहेत. शबरीचा आदर करून त्यानें फळें कशीं खाल्लीं तें ठाऊक आहे. त्याचा अर्थ इतकाच कीं ईश्वरापाशीं हृदयाची ओळख असते. तो हृदयाहृदयांत असतो. लहानसा आवाज प्रत्येक हृदयांत ऐकूं येतो. तो परमेश्वरी आवाज चांगल्या कामाला आंतून हुंकार देतो, शाबासकी देतो. मनुष्याला समाधान मिळतें.

मुलाला आईच्या शाबासकीनें सर्वांत जास्त संतोष मिळतो. तसा संतोष देणारा आवाज प्रत्येक हृदयांत असतो. तो आम्ही ऐकला नाहीं आणि साऱ्या दुनियेनें शाबास म्हटलें तरी हृदयांतून शाबासकीचा हुंकार मिळाल्यावाचून समाधान लाभत नाहीं. श्रीमंताच्याकडे नौकरचाकर असतात. पाहिजे तीं सुखें त्यांच्यापुढें हात जोडून उभीं असतात. तरी ते रडतांना मी पाहिले आहेत. कारण त्यांना अंतःसमाधान नसतें. असा आंतला शाबासकीचा आवाज ज्यानें ऐकला, दुनियेची दौलत त्याला मिळाली. ज्याला तो आवाज आला नाहीं त्याच्यावद्दल कबीरानें म्हटलें आहे—

"हीरा तो गया तेरा कचरेमें."

## देतो तो देव, राखतो तो राक्षस

वाईट काम केलें तर आंतून समाधानाचा आवाज येत नाहीं. या उलट समोर वाढून आलेलें ताट भुकेल्याला देऊन, उपास करूनहि अन्तःसमाधान, आनंद मिळतो. सर्वांना खायला घालण्यांत आनंद होतो. आपण मित्रांना खाऊं घालून आनंद मानतों. पण भुकेलेल्याला खायला घालून स्वतः उपास करण्यांत अतुल आनंद वाटतो. लहानपणची कोकणांतील गोष्ट मला आठवते. आंब्याला फळें येत. आजोबा फळें देत. आम्हीं घरोघर एकेक दोनदोन वाटत असूं. अगोदर गांवांतल्या लोकांना, नंतर मुलांना. दुसऱ्याला देण्यांत काय आनंद आहे तें मी कोणत्या शब्दांत सांगूं. अजून मला आठवतें. चारपांच वर्षांचा होतों मी तेव्हां. लोकांना फळें देण्यांत किती आनंद मला होई. ज्यांनीं मला हा आनंद दिला त्यांचा कृतज्ञ आहे. आई म्हणे जो मागेल त्याला दे. तो कोण याचा विचार नको करूं. आपलें काय होईल त्याचा विचार नको करूं. हें पहा देतो तो देव

बनतो, राखतो तो राक्षस होतो. हा जो तिनें मंत्र दिला तो ढालीसारखा माझा बचाव करीत आहे. ह्या मंत्रानें मला वांचविलें आहे.

## पराधीनतेंत पापपुण्य नाहीं

मानव जन्म आज आहे उद्यां नाहीं. ईश्वराच्या हातांत सारें. ह्या क्षणीं आहे एवढें समजा. म्हणून चांगलीं कामें लौकरांत लौकर करावींत. स्वार्थासाठीं, धन भरण्यासाठीं मानव जन्म नाहीं. जातांना मनुष्य कवडीहि नेत नाहीं. हृदयाला समाधान देईल असें धन मिळवा. हा कोणता जमाना ओळखा. हा फार भाग्यशाली जमाना आहे. हिंदुस्तान स्वतंत्र झाला आहे. चांगलीं कामें करावींत अशी संधी आम्हांला आहे. आपले शास्त्रकार म्हणतात कीं गुलामांना कशाचें नीतिशास्त्र, कशाचा धर्म ! नीतिशास्त्र, धर्म स्वतंत्र असतील त्यांनाच सांगावें. आतांपर्यंत आपण गुलाम होतों. दुसरा नाचवील तसें नाचावें लागे. आतां मनाप्रमाणें करूं शकूं. वाईट किंवा चांगले आतां आपण होऊं शकतों. स्वतंत्र झालों म्हणजे संकटाच्या पलीकडे गेलों असें समजूं नये. आतापर्यंत पापपुण्य आपल्याला कांहीं नव्हतें. पराधीनतेंत पाप किंवा पुण्य कांहीं माणसाला नसतें. आतां स्वतंत्र झालों. चांगले किंवा वाईट हवें ते बनूं शकूं. काय करावयाचें तें करा. सत्ता तुमच्या हातांत. आतां संधि. विचार करा. चिंतन करा. वर्षानुवर्षे गुलाम कां राहिलों ? एवढा मोठा देश कां गुलाम ? भेद मिटविले नाहींत, सान्यांना एकत्र नाहीं केलें त्यानें असें झालें. विविधता वाईट नाहीं. संगीतांत वेगवेगळे ध्वनि असतात पण ते वाईट नसतात. त्या विविधतेंतून संगीत निर्माण होतें. हाताची पांची बोटें सारखीं नसतात पण तीं वाईट नाहींत. लहानांत खुबी आहे, मोठ्यांत खुबी आहे. संत्रें गोड आहे, आंबा, केळें, गोड, पण त्यांत वेगवेगळा स्वाद आहे. अशी विविधता वाईट नाहीं. विविधतेचा उपयोग केला तर ताकद येईल. नाहींतर भेद वाढतील, संकुचितता येईल, स्वार्थ वाढेल.

## आपण पस्तीस कोटी कां?

कांहीं लोक म्हणतात कीं वेदांतानें आम्ही कमजोर झालों. पण त्यांना समजत नाहीं. नीट विचार केला तर समजेल कीं निवृत्ति, त्याग, संन्यास,



भक्ति यांनीं बिघडलें नाहीं. नुकसान लोभानें झालें. जातीय भावनेनें हिंदुस्तानची ही हालत केली. शिवाशिव उच्चनीच अशा पायऱ्या आम्ही केल्या. आम्ही या भावनेनें बिघडविलें. सुंदरतेंत असुंदरता निर्माण केली. ताकत कमजोर केली. तेल आणि बत्ति आहे. तिनें आगहि लागेल. चांगलेंहि होईल. आमच्यांत उपयोग करण्याची अक्कल नव्हती. आम्ही भेद निर्माण केले. आणि गुलाम बनलों. हा इतिहास जर आपण समजलों तर पहिलें कर्तव्य भेदभाव विसरणें. भाऊ भाऊ व्हा. असें जर झालें तर हैद्राबाद संस्थान हिंदुस्तानची ताकत बनेल. आपल्या पूर्वजांनीं हा मोठा देश मानला आहे. एकाद्या मुलाला विचारलें कीं तुला भाऊ किती तर पस्तीस कोटि म्हणेल. जपानी सहा कोटि म्हणेल. फ्रेंच चार कोटि म्हणेल. इतरहि चार सहा कोटी म्हणतील. आपणच पस्तीस कोटि कसे? कारण ऋषींनें हिमालयापासून सागरापर्यंत आम्ही एका विचाराचे हें शिकविलें. कावेरी नदींत गोदावरींत आंघोळ करणाराहि 'हर गंगे' म्हणतो. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत सर्वत्र रामनाम. त्यावेळीं रेल्वे मोटारी नव्हत्या तरीहि असा प्रेमभाव नांदत होता. भाषा एक नसूनहि एकता होती. ही एकता त्यावेळीं होती ज्यावेळीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत जायला वर्षानुवर्षे लागत. आणि आज सकाळीं दिल्ली तर दुपारीं मद्रासला विमानानें जातां येतें. इतकी दुनिया जवळ आली आहे. आज जर दिल छोटें केलें, प्रांतीयता ठेवली, जातीयतेची भावना ठेवली तर घात होईल.

आचार न शिकवितां धर्मप्रचार नुसता करतात. हल्लीं बाटवतात. आचरणाची जरूरी मानित नाहींत. कोट्यावधि संख्या ही उन्नति मानतात. संख्येनें प्रगति होत नाहीं. चित्तशुद्धि हवी. जीवनपरिवर्तनाची आज कोणाला जरूरच भासत नाहीं. नुसता अभिमानच वाढवूं इच्छितात. त्यानें नुकसान होतें. छोटे अभिमान मोठ्या देशांत कसे भलें करतील ?

## वाईट विसरा

आतां चांगले दिवस आले आहेत. जुने विसरा. विसरण्याची शक्तिहि महत्त्वाची. जुन्या आठवणीनें कल्याण नाहीं. उपनिषदानें सांगितलें आहे "विद्यां च अविद्यां च".

वाईट तें विसरा. पण लोक वाईट विसरतात का ? आपलें हृदय म्हणजे का दुनियेचा कचरा भरण्याचें स्थान ? त्यांतून काय फायदा होणार? चांगल्या निवडक गोष्टींचें स्मरण ठेवा. मुंगी साखरेचे कण कण घेते. मनु म्हणतो " मुंगी जसे कण कण घेते त्याप्रमाणें धर्म, पुण्य, सचाई यांचा संग्रह करा. "

लोक विचारतात वाईट कां विसरावें ? वाईट जें कांहीं होतें तें शरीरानें होतें. चांगलें जें होतें तें आत्म्यानें. शरीराचा नाश होतो. आत्मा अमर आहे. म्हणून आत्म्याचे जें जें म्हणजे चांगलें तें आठवावयाचें. नाशिवंत शरीराचें तें विसरायचें ! जे अनाशी आहे त्याची आठवण ठेवा. विश्वासानें विश्वास वाढतो. भलाईनें भलाई वाढते. जसें पेराल तसें कापणी करून घ्यावें लागेल. बाभूळ पेरून आंबा मिळत नाहीं हें जाणतों. पण तरीहि वाईट पेरून चांगलें मिळावें म्हणतों. दुसऱ्यानें एका घराला आग लावली म्हणून मी दुसऱ्याला लावली. तर गांवांतली दोन घरें जळतात. दुसऱ्यानें वाईट केलें म्हणून मी वाईट केलें तर जगांत दोन वाईट झाले. अशानें जग सुधारणार नाहीं.

## ' स्व ' शुद्ध करा

एकाद्याची दुसऱ्यानें मुलगी पळविली तर मुलगी पळविणाराला ठार केलें तर समजूं शकेल. पण त्याची मुलगी पळविणें मी समजूं शकत नाहीं. अशानें धर्म टिकत नाहीं. रावणानें रामाची सीता पळविली. पण म्हणून रामानें जर मन्दोदरीला पळवून आणलें असतें तर वाल्मीकीनें कशाला रामायण रचलें असतें ? आज बुराईला बुराईनें उत्तर दिलें जात आहे आणि धर्मरक्षणाच्या नांवें हें होत आहे. जातीच्याजाती उठून हजारों स्त्रिया पळवितात यापेक्षां आणखी पतन कोणतें ? असें जर स्वराज्याचें स्वागत तर तें स्वराज्य कोठें नेईल आपल्याला ? अशानें विनाशाकडे आपण जात आहोंत. केवळ स्वराज्य आल्यानेंच कल्याण होत नाहीं. जर ' स्व ' शुद्ध असेल तर हें स्वराज्य मंगल, कल्याणकारक होईल. "

बीदर विभागांत मोटारींतून फिरतांना एका वेगळ्याच प्रकारचा आनंद होत आहे. लाल माती, साधारण डोंगराळ मुलूख, रस्त्याच्या चोहों बाजूला आंब्याचीं झाडें दिसतात. कैऱ्यांनीं कांहीं लहडलेलीं आहेत. यंदा खूप आंबे होणारसें वाटतें.



हैद्राबादच्या शहरीं जीवनांतून बाहेर पडून निरामय खेडूत जीवनांत व फारशी रहदारी नसलेल्या रस्त्यानें फिरत आहोंत.

## नौखाली यात्रेची आठवण

हुमानाबादच्या प्रवचनानंतर विनोबाजी माणिकनगरला गेले. माणिकप्रभू म्हणून एक संत झाले. त्या महापुरुषाचा हा गांव. तेथें दुपारची विश्रांति घेऊन विनोबाजी गोरटा गांवाकडे निघाले. मध्यंतरी गारांचा पाऊस झाला आणि नाल्यामध्यें पाणी चढल्यानें थांबावें लागलें. परंतु ठरल्याप्रमाणें विनोबाजी गोरटा आणि घोरवाडी ह्या दोन्ही ठिकाणीं गेलेच. गोरटा गांवावर रझाकारी जमान्यांत फार अत्याचार झाले. विनोबाजींच्यासाठीं तेथें गवताची झोपडी उभारली होती. गांवच्या स्त्रिया विनोबाजींसमोर आपलें हृदय मोकळें करीत होत्या. विनोबाजी सांत्वना देत होते. बापूजींच्या नौखाली यात्रेची आठवण यावी असें तें दृश्य होतें. इतर ऐकणारे तीं वर्णनें ऐकून स्तिमितच झाले होते. ऐकणाऱ्यांच्या डोळ्यांतून पाणी आल्यावाचून राहिलें नाहीं. घोरवाडी मुसलमानांचें गांव. पोलीस ॲक्शननंतरहि तेथलें कॉंग्रेस कार्यकर्ते लहान मुलांना औषधें देत आहेत, कॉडलिव्हर तेल देत आहेत.

## बीदरला

दुसऱ्या दिवशीं सकाळीं विनोबाजी बीदरकडे रवाना झाले. मोटारींत जागेचा अभाव होता व आमच्या बरोबर असलेली पोलीस ट्रक पाऊस व चिखल यामुळें गोरटा व घोरवाडीला जाऊं शकत नव्हती. त्यामुळें आम्हीं चिटगोपा गांवीं रात्रीं मुक्काम केला. सकाळीं आम्हांला घेण्यासाठीं जिप आली होती. आम्ही पोलीस ट्रकमधून उतरलों व जिपनें गेलों. त्या ट्रकमध्यें पोलीस व थोडे विनोबांचें दर्शन करूं चाहणारे लोक होते. त्या ट्रकला बीदरकडे जाणाऱ्या रस्त्यावर उतारावर अपघात झाला. बसलेले सारे जखमी झाले. विनोबाजींच्या परिवारापैकीं कोणी त्यांत नव्हतें.

प्रवचनाच्या वेळेपर्यंत आम्ही पोंचू शकलों नाहीं. अपघात झालेल्या ट्रकमधें लाउडस्पीकर्सवाल्याचा एक मनुष्य सांपडला होता. त्याचा

तपास लागावयाचा होता. सामनाचाहि तपास करावयाचा असल्यानें मागें थांबावें लागलें. जहराबादला थांबलों. तेथें रस्त्यावर एका मुसलमानाचा मळा होता. त्यानें रझाकार जमाना व पोलीस ॲक्शनच्या काळांतली माहिती सांगितली. तेवढ्यांत समजलें कीं आमचा पेशंट दवाखान्यांत येऊन दाखल झाला आहे. दवाखान्यावरहि तोफा डागल्यानें त्याची एक भिंत नादुरुस्त झाली होती. त्यामुळें इनडोअरपेशंट घेणें शक्य नव्हतें आणि त्याला मारहि विशेष न लागल्यानें त्याला घेऊन हैद्राबादला आलों. येतांना वाटेंत लष्कराचे तळहि दिसले. जोराचा पाऊस येऊन गेला. हैद्राबाद पहाडी प्रदेशांतच आहे. त्यामुळें शहराच्या आसपास मोठमोठ्या शिळा आढळतात. त्या अशा विचित्र स्थितींत दिसतात कीं पहाणाराला गंमत वाटते. एकूण अपघाताचा प्रसंग सोडतां प्रवास मजेदार झाला. पाऊस पडणें, मोटारी ओढून चिखलांतून बाहेर काढणें वगैरे इतके विविध अनुभव या दोन दिवसांत आले कीं विचारूंच नका. परंतु रेडियो व वृतपत्रें यांनीं दिलेल्या बातमीनें लोकांची दिशाभूल झाली. विनोबाजी व इतरांची अनेकांनीं चौकशी केली. बीदरला विनोबाजी पोंचताच सभा झाली. विनोबाजीनीं एकोप्यानें नांदावयास सांगितलें. दुपारी गायांतील प्रतिष्ठित लोकांची बैठक झाली. विनोबाजीनीं शांततेची अवश्यकता व जुनें विसरून जाण्याचें महत्त्व सांगितलें.

दुपारी दोन वाजतां सर्व लोक हैद्राबादकडे रवाना झाले. हैद्राबादला तेथील मुलींनीं वेळ ठरविलेला होता. हैद्राबादचे समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते नरहरी वेळोगीकर यांच्या भगिनीनें विशेष पुढाकार घेतला होता. मुलींशीं विनोबाजीनीं मोकळेपणानें चर्चा केली. नंतर प्रार्थना व प्रवचन झालें.

———

६।४।१९४९ : : :

## जुनें विसरा

आज सकाळीं हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसमधील दोन्ही गटांचे लोक विनोबाजींच्याकडे आले होते. विनोबाजींच्या समोर आपलें म्हणणें त्यांनीं मांडलें. विनोबाजी म्हणाले " जुनें जर विसरूं शकत नसाल तर एकत्र येऊन नवा इतिहास निर्माण करतां येणार नाहीं. "

## प्रार्थनेचें मला महत्व

सायंकाळची प्रार्थना हैद्राबादचें उपनगर सिकंदराबाद येथें झाली. सिकंदराबाद मधें समाजवादी पक्षाचें चांगलें काम आहे असें सगळ्यांच्या तोंडून मी ऐकलें. तेथील एका शाळेंत प्रार्थना झाली. विनोबाजी प्रार्थनोत्तर प्रवचनांत म्हणाले, " बंधुभगिनींनो, गेले नऊ दिवस मी येथें आहे. आज येथून जाणार. हैद्राबादमेंध लोकांशीं भेटीगांठी झाल्या. सलामती समितिहि स्थापन झाली. ती काम करील. त्यांचें जें महत्त्व आहे तें आहे. माझ्या मनांत ह्या नऊ दिवसांच्या प्रार्थनेचें महत्व. प्रार्थनेला हिंदु मुसलमान स्त्री पुरुष येत. सामुदायिक प्रार्थनेनें चित्ताची शुद्धि होते. एकता निर्माण होते. विकास करण्याची ताकत प्रार्थनेइतकी दुसऱ्या कशांत नाहीं. जें काम झालें त्यापैकीं बरेचसें प्रार्थनेनें झालें.

## भारतीय संस्कृति

हिंदुस्थानची सभ्यता, संस्कृति नदीसारखी वाढत आली आहे. प्राचीनकाळच्या विचारांचें वेदांत दर्शन होतें. वेद हा आद्य ग्रंथ. हिंदुस्थानच्या जुन्या

भावना, विचार तेथें पहावयाला मिळतात. त्या वेदापासून वाढत हा प्रवाह आला नंतर उपनिषदें, आचार्य, संत, बौद्ध, जैन, नानक, ख्रिस्त, ज्यू, पारशी, मुसलमान वगैरे प्रवाह त्यांत दाखल झाले. नदी विशाल झाली. ही विचारधारा प्यारी असली पाहिजे. कांहीं म्हणतात कीं जुनी विचारधारा आम्हाला पसंत आहे. पण नंतरच्या प्रवाहांनीं ती अशुद्ध झाली असें कांहीं मानतात. हा विचार चुकीचा आहे. वेगवेगळे प्रवाह मिळण्यानें नदी जशी परिपुष्ट होते तशी संस्कार सरिता त्यांत ख्रिस्ती, मुसलमान, वगैरे प्रवाह दाखल झाल्यानें परिपुष्ट झाली आहे. नवीन सद्धारा दाखल झाल्या त्यांचें प्रेम हवें. मुसलमानहि कांहीं असे आहेत कीं जे अरबांशी संबंध तोडतात आणि प्राचीन संबंध तोडतात. ही त्यांची चूक आहे. ते येथेंच जन्मले आणि येथलेच आहेत, वैदिक समाजाचे हिस्से आहेत. प्रार्थनेची वेगळी पद्धति स्वीकारली म्हणून ते हिंदुस्तानी नाहींत असें नाहीं. ते हिंदुस्तानी आहेत असेंच त्यांनीं मानलें पाहिजे.

## सारा संस्कारप्रवाह एकच

गीतोपनिषदांचे संस्कार हवे, नव्याचें प्रेम हवें. केवळ प्राचीन विचारधारा मानणारे, आणि केवळ नवीन विचारधारा मानणारे ते चूक करतात. सारा संस्कारप्रवाह एक समजून अभ्यास करा. हिंदूंनीं इस्लाममधले चांगले विचार घ्यावे आणि मुसलमानांनीं हिंदूंचे चांगले विचार घ्यावेत. अशानें आमचें जीवन समृद्ध होईल. साधा परिचय तर असतोच पण उत्तम उत्तम विचारांच्या परिचयानें आनंद मिळेल, शांति वाढेल. हा देश समन्वयाचा देश आहे. सर्व संस्कृतींमधून त्यानें घेतलें आहे. वैदिक स्वरूपांतला आजचा धर्म नाहीं. वेदाच्या काळच्या देवता आपण विसरलों. बीज रूपानें मिळतील तरी पण त्यांत एक विचार आहे असें वाटतें. अशा अभ्यासानें एकता निर्माण होईल. देवाचें नांव घेण्यानें प्रेमभाव येतो.

आज आपण बुराई तेवढी घेतों. हिंदूंत ही बुराई, मुसलमानांत ती बुराई. निंदक बुराईचें ध्यान करतात. ध्यानाचा जो परिणाम तो परिणाम होतो. बुराईचें स्मरण वाढतें. वाणीनें त्याचें उच्चारण होतें. पुढें आचरणांतहि ते दोष दाखल होतात. त्यासाठीं एकमेकांमधील उत्तम विचाराचा परिचय करून घ्यावा. धर्मग्रंथांचें अध्ययन करावें. प्रार्थनेमुळें हा लाभ होतो. जीवन सर्वांचें शुद्ध होतें. "



रामनवमीच्या दिवशीं रामदासांचा जन्म झाला. त्यांचा उत्सव होतो. समर्थांचें गांव जांब. विनोबाजींना त्याप्रसंगीं येण्याचें समर्थभक्त व धुळ्याच्या समर्थ वाक्देवता मंदिराचे प्रमुख श्री. देव यांचें आग्रहाचें निमंत्रण होतें. त्यासाठीं विनोबाजींच्या समवेत आम्ही सारे हैद्राबादचें उपनगर सिकंदराबाद, तेथून निघालों. निझाम रेल्वेवरच्या परतूड स्टेशनापासून १७।१८ मैल लांब जांब आहे.

जांबहून विनोबाजी बडोद्याकडे जाणार. जांबचा कार्यक्रम हा त्यांचा हैद्राबाद संस्थानांतला शेवटचा कार्यक्रम. जांबनंतर हैद्राबाद संस्थानांतला या वेळचा त्यांचा दौरा संपेल.

———

७।४।१९४९ : : :

## जांबचा रामजन्मोत्सव

पू. विनोबाजींच्या हैद्राबाद दौऱ्यांतील आतां शेवटचा मुक्काम. या मुक्कामानंतर विनोबाजी गुजरातेंत जाणार. सकाळींच आम्ही जांबला जाण्यासाठीं परतूड स्टेशनवर उतरलों. परतूडपासून १७।१८ मैलांवर रामदास स्वामींचें जन्मग्राम जांब आहे. रामनवमीला तेथें उत्सव असतो. समर्थ वाक्‌देवता मंदिराचे एक प्रमुख कार्यकर्ते श्री. शंकर श्रीकृष्ण देव. त्यानीं आग्रहानें उत्सवासाठीं विनोबाजींना आमंत्रिलें होतें. संत तुकडोजी महाराजहि उत्सवासाठीं येणार असें ठरलें होतें. परतूड स्टेशनवरच पू. विनोबाजी आणि संत तुकडोजी यांचीं भेट झाली. तेथून मोटारीनें जांबकडे जावयास निघालों. जांबचे समर्थांचें मंदिर हरिजनांसाठींहि खुलें करण्यांत आलें आहे. जें मंदिर हरिजनांसाठीं उघडलें नाहीं त्यांत जावयाचें नाहीं असा विनोबाजी आणि संत तुकडोजी या दोघाचाहि सत्याग्रह. जांबचे मंदिर उघडें झाल्यानें दोघांना आनंद झाला होता. रामजन्माच्या वेळीं दोघेहि मंदिरांत हजर होते.

## संत तुकडोजी

संत तुकडोजी व विनोबाजी दोघेही एकाच खोलींत थांबले होते. नित्य यज्ञ म्हणून रोज विनोबाजी सूत काढतात. विनोबाजी तर सुताचे आचार्य. विनोबाजींच्या चरख्यावर तुकडोजीनींहि सफाईदार रीतीनें थोडें सूत काढलें. तुकडोजीनीं आपल्या गुरुदेव सेवा मंडळांतहि सूत कताई हा विषय ठेवला आहे. मध्यंतरी त्यांच्या मंडळाचा उत्सव झाला तेव्हां सामुदायिक सूतकताईसाठीं एक



हजार चरखे चालविणारे लोक होते. राजेंद्रप्रसादांच्यावरहि त्या दृश्याचा अपार परिणाम झाला. तुकडोजी समाजाला वळण लावण्याचें कार्य आपल्यापरि पार पाडित आहेत. त्याच उत्सवाच्यावेळीं पंचवीस हजार सेवक एका वेळीं बिनबोभाट जेवल्याचें सांगतात. किती अपूर्व दृश्य असेल तं !

## धर्माचा अभ्यास प्रदेश भाषेंतून

दुपारीं विनोबाजींचा निवास एका तंबूंत होता. चर्चेसाठीं मंडळी जमली होतीं. चर्चेत विनोबाजी म्हणाले " कायदे जसे प्रदेश भाषेंत असावेंत त्या प्रमाणें धर्मांचा अभ्यासहि प्रदेश भाषेंतून व्हावा. निर्बुद्ध पाठांतरानें योग्य संस्कार उमटूं शकत नाहींत. युरोपीय ख्रिश्चन धर्माचा अभ्यास मूळ बायबल ज्या भाषेंतून लिहिलें गेलें त्या भाषेंतून करीत नाहींत. मूळ बायबल अर्धे ग्रीक मधें अर्धे हेब्रूंत लिहिलें आहे. पण इंग्रज लोक आपल्या धर्माचा अभ्यास इंग्रजी भाषांतरावरून करतात. इतर युरोपीय देशांत असेंच आहे. ज्यांना धर्माचा विशेष अभ्यास करावयाचा असेल ते मूळ बायबल वाचतात. परंतु बहुसंख्य सामान्य जनता आपापल्या प्रदेशभाषांतूनच अभ्यास करते. महंमदानें सागितलें आहे "प्रत्येक भाषेंत त्या भाषेंतून ईश्वराचा संदेश ऐकवण्यासाठीं परमेश्वरानें एकेक प्रेषित पाठविला आहे. अरबी भाषा जाणणाऱ्या लोकांसाठीं त्यानें अरबी जाणणाऱ्या मला पाठविलें आहे." मराठी भाषी लोकांचा धर्मग्रंथ जर कोणता असें कोणी मला विचारील तर ज्ञानेश्वरी, भागवत असें मी सांगेन. ज्ञानेश्वरी, भागवत वाचणाराला वेदाध्ययन करणाऱ्यापेक्षां कमी धर्म ज्ञान झालें आहे असें नाहीं हिंदी भाषिकांचा धर्मग्रंथ तुलसीरामायण असेंच मी मानतों. मुसलमानांनींहि कुराणाचें वाचन आपापल्या प्रदेश-भाषांतल्या भाषांतरांवरून करावें. पौनारला आम्ही मागें घरोघर कोणतीं पुस्तकें आहेत याची गणती केली होती. सर्वांत जास्त पुस्तकें कुराणाची निघालीं. लग्नांत कुराणाची प्रत भेट दिली जात असे. इतर पुस्तकें पुष्कळ होतीं. परंतु एकाच पुस्तकाच्या सर्वांत जास्त प्रति असलेलें पुस्तक कुराण निघालें. तेथल्या स्त्रिया कुराण वाचण्यासाठीं उर्दू शिकतात. २।४ पानें त्या वाचतात न समजतां त्या वाचतात. त्यांना वाटतें कुराणाची चार पानें वाचली म्हणजे मोक्ष मिळेल. ह्या अशामुळें धर्म आचारापासून भिन्न होतो. प्रदेश भाषांतूनच धर्माचे ज्ञान झालें पाहिजे. जपानी लोक बौद्धधर्माचे अध्ययन मुख्यतः त्यांच्या भाषेंतून करतात. ज्यांना विशेष ज्ञान

मिळविण्याची गरज भासते ते अर्धमागधी, पाली वगैरे शिकतात. आपल्याकडे महानुभाव पंथ आहे. त्या पंथाचे अनुयायी काबूलमधें आहेत. तेथेंहि थोडेसे नागरी शिकून ग्रंथ वाचणारे लोक-धर्म जर जीवनांत यावयाचा असेल तर निर्बुद्ध पाठांतरांपेक्षां प्रदेश-भाषेंतून त्यांचें अध्ययन झालें पाहिजे. " विनोबाजींनीं यासाठीं आपल्या सर्वधर्म प्रार्थना मराठींतून केल्या आहेत. गायत्री मंत्र उपनिषदांतली प्रार्थना, पारशी, जैन, बुद्ध, ख्रिस्ती, सिख, शंकराचार्यांच्या षट्पदींतला भाग, ज्ञानेश्वरींतला भाग, नंतर तुलशीदासांचा दोहा अशा ऐतिहासिक क्रमानें विनोबाजी ही सर्वधर्म प्रार्थना म्हणतात. त्यापैकीं कांहीं प्रार्थना यापूर्वी थोड्या थोड्या दिल्या आहेत. विनोबाजींनीं ईशोपनिषदाचेंहि सुंदर गद्य मराठींत भाषांतर केलें आहे. त्यांचें तें गद्य गेयहि आहे. स्वतः विनोबाजी तें सुंदर रीतीनें म्हणतात. गीताईची रचनाहि याचसाठीं त्यांनीं केली. खऱ्या धर्मज्ञानासाठीं धर्मग्रंथ प्रदेश-भाषांतून असावे हा मुद्दा त्यांनीं मांडला.

## सेक्युलर स्टेट

त्यानंतर हिंदुस्तान हें सेक्युलर स्टेट होणार असें जें घटनेंत घातलें आहे त्याबद्दल चर्चा निघाली. विनोबाजी म्हणाले " सेक्युलर याला प्रतिशब्द धर्मातीत हा बरोबर नाहीं. सेक्युलरला पंथातीत म्हणावें. गणित हें शास्त्र जसें पंथातीत तसें राज्यहि पंथातीत असावें. सेक्युलर स्टेट म्हणजे अधर्मी राज्य नव्हे. तर खरें धर्माचें राज्य. वेदांत असे म्हटले आहे कीं जो ज्ञानी झाला त्याला पिता हा अपिता, माता अमाता, लोक अलोक आणि वेद अवेद होतात. याचा जो अर्थ तो धर्मातीत याचा केला पाहिजे. परंतु धर्म शब्द चांगला आहे. त्याचा दुरुपयोग अशा प्रकारें नको. पंथांतीत हा शब्द योग्य होईल. " कोणीतरी म्हणालें कीं उर्दू वर्तमानपत्रें सेक्युलरचें भाषांतर ' लामजहब ' करतात. लामजहब म्हणजे अधर्मी. विनोबाजी म्हणाले " सेक्युलर स्टेट हें अधर्मी तर नव्हेच परंतु धर्मापलिकडचें आहे. धर्मांच्या बंधनाची तेथें जरूर भासत नाहीं. मतलबी लोक जाणून चुकीचा अर्थ करतात आणि दुबळे असतात ते अज्ञानानें तो शब्द वापरतात "



## साक्षात्कार : चमत्कार

यानंतर चमत्कार, साक्षात्कार वगैरेबद्दल चर्चा निघाली. विनोबाजी म्हणाले " लोक म्हणतात रामदास अगदीं राम जन्मला त्यावेळीं जन्मले म्हणून महान् ? त्याच वेळीं इतरहि शेकडों प्राणी जन्माला येत असतील. त्यांत कसला चमत्कार ! आणि त्याला एवढें महत्त्व तरी कशाला विनाकारण. म्हणे खणतांना मूर्ति सांपडली. मलाहि पौनारला सांपडली होती. त्यांत चमत्कार वगैरे कांहीं नाहीं. मागें कस्तुरबा गेल्या तेव्हां एकजण व्याख्यानांत म्हणाले शिवरात्रीच्या दिवशीं कस्तुरबा गेल्या त्या महापतिव्रता होत्या. मी म्हणालों, त्या शिवरात्रीच्या दिवशीं गेल्या म्हणून महापतिव्रता, आणि इतर दिवशीं जात्या तर ? त्या पतिव्रता होत्या. त्याचा संबंध शिवरात्रीच्या मरण्याशीं कशाला ? ज्या ज्या मूर्तीचें ध्यान करूं तसें दर्शन ईश्वर करवील, भक्तांची हौस पुरवील. पैठणला कृष्णदयार्णव होते. त्यानीं अष्टभुजा भगवंताचें दर्शन मागितलें. त्यांना तसें मिळालें म्हणतात. "

## ऐतिहासिकता व धर्मग्रंथ

त्यानंतर ऐतिहासिकता व गीता यांचेविषयीं चर्चा निघाली. तेव्हां विनोबाजी म्हणाले " असा ऐतिहासिक आधार शोधणें फायद्याचे नाहीं.

योगेश्वर जिथें कृष्ण, जिथें पार्थ धनुर्धर ॥
तिथें मी पाहतों नित्य, धर्म श्री जय वैभव ॥

याचा जर ऐतिहासिक अर्थ करूं गेलों तर मी अर्जुन पाहिजे. समजा तसा झालों तरी श्रीकृष्ण कोठून आणणार? त्यापेक्षां प्रत्येकाच्या अंतःकरणांत चाललेल्या झगड्याचें तें रूपक आहे म्हणणें लाभाचें होईल. "

## जनता शिक्षण

ज्या ठिकाणीं सामुदायिक प्रार्थना व्हावयाची होती ती जागा साफ नव्हती. चुबुक काटे फार. तुकडोजी म्हणाले " लोकांना शांत, एकाग्र रहावयाला आम्ही सांगणार. ते या कांट्यांत कसे एकाग्र शांत बसतील ? " गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांसह त्यांनीं हातांत झाडू घेऊन तें पटांगण साफ करून टाकलें. जनता

शिक्षणाचा जणुं तो एक प्रयोग होता. रात्रीं सामुदायिक प्रार्थनेच्या प्रसंगीं त्यांनीं लोकांना नीट रांगा करून बसविलें. प्रार्थना झाल्यावर विनोबाजींचें प्रवचन झालें. विनोबाजी म्हणाले " माझ्या खेडेगांवच्या बंधूभगिनींनो — आज या ठिकाणीं येऊं शकलों याबद्दल आनंद वाटत आहे. गेले तीन आठवडे इकडे परिस्थिति पाहाण्यासाठीं आणि देतां आली तर मदत देण्यासाठीं मी फिरत आहे. उत्सवाच्या योगानें येथें येण्याची संधि लाभली. येथलें आकर्षण आणि ओढ तर पूर्वींपासूनच होती. या पूर्वीं यायला हवें होतें. परंतु पूर्वीं फिरत नव्हतों. लोकसेवेच्या कामांत होतों. त्यांत मग्न होतों. गांधीजींच्या मृत्यूनंतर फिरणें अगत्याचें वाटूं लागल्यानें सध्यां फिरत आहे.

## बुद्धि सुचल्यावर अंमल केला हें भाग्य

दुसरें म्हणजे आतां आडकाठी उरली नाहीं. पूर्वीं या ठिकाणीं हरिजनांना प्रवेश नसल्यानें इच्छा असून, तळमळ असूनहि येथें येण्याला मन होत नसे. म्हणून आलों नाहीं. आतां अडचण दूर झाली. ईश्वराची कृपा, त्यामुळें ही सद्‌बुद्धि झाली. गोष्ट उशीरा झाली आहे. परंतु बुद्धि सुचल्यावर अंमल केला हें भाग्य. यांतून प्रगति होईल. निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या मर्यादा असतात. पूर्वींच्या मर्यादा आज आवश्यक नाहींत. परंतु त्यांना दोष नको. देशकालाप्रमाणें गरजा बदलतात आणि धर्माचें स्वरूपहि बदलतें.

## वेदाचा अधिकार

एका काळीं वेदाचें दार फक्त कांहीं लोकांनाच उघडें होतें. परंतु त्यांत अधिकार देण्याघेण्याची, उंचनीचपणाची दृष्टि नव्हती. त्याकाळीं लेखनकला नव्हती. घोकून घोकून शिकावें लागे. उच्चारण बिघडून अपपाठ होऊन ग्रंथ बिघडेल म्हणून मर्यादा ठरविल्या. वृक्षाचें रक्षण करण्यासाठीं लहान असतांना कुंपण असतें. पुढें काढतों. वेदाध्ययनाच्या बाबतींतहि आतां पूर्वींची गरज राहिली नाहीं. लेखनमुद्रण कला आतां आहे. प्लेटहि घेतां येईल. आजच्या ब्राह्मणाचा आवाज एक हजार वर्षांनीं ऐकतां येईल अशी सोय आतां आहे. पूर्वीं सोय असती तर



नामदेवांचा आवाज जसाच्या तसा ऐकला असता. समाजाची अशी प्रगती होत असते. जुन्या काळाप्रमाणें आतां रक्षणाची जरूरी नाहीं. मी वेदांचा अभ्यास करीत होतों. पाश्चात्यांचीं पुस्तकें चांगली वाटलीं. आपल्याकडे नव्हतीं. आतां तो जुना नियम कामाचा नाही. तो नियम करण्यांत त्यांची भेदबुद्धि, दुष्टबुद्धि होती असें नाहीं. मंदिराबाबतच्या नियमांची तशीच स्थिति. ते अनुदार नव्हते. परंतु आज त्यामुळें भेद वाढतो आहे, कारण काळाची गरज वेगळी आहे.

रामदासांची विशेष शिकवण म्हणजे ते म्हणतात कीं " देशकाल अवधान राखावें. " रमदासांना हें कार्य अवश्य प्रिय झालें असेल. असें केलें नसतें तर मात्र त्यांना आवडलें नसतें. रामदासांचा जो अभ्यास मी केला त्यावरून ही मंदिरप्रवेशाची गोष्ट त्यांना पटेल असें वाटतें.

## हार्द, मर्म ओळखून अर्थ करावा

सर्वांना सर्वकाळीं उपयोगी पडणारीं कांहीं वचनें असतात. कांहीं काळाच्या छायेंत इतर काळांत वापरलीं तर चुकीच्या मार्गानें नेतात. त्या वचनांतलें हार्द ओळखून, मर्म जाणून त्या वचनांचा अर्थ केला पाहिजे. ही गोष्ट रामदासांना खास आवडेल. जुनें ग्रंथ असा अर्थ न केला तर बांधतील, अडथळा करतील. व्यापक अर्थ केला पाहिजे.

भेटो कोणी एक नर। त्याचें राखावें अंतर। या नांव भजन ॥

आत्मा आत्म्यांत घालावा ही त्यांची शिकवण. अवांतर वस्तू, मर्यादा समजून जर अर्थ केला तरच जुन्या ग्रंथांचा कांहीं उपयोग. गीतेचा ज्ञानदेवांनीं व्यापक बुद्धीनें उदार अर्थ केला तसें आपण करावें, जुनीं वचनें नवीन अर्थानें भरलेलीं बनवावीं. उदाहरणार्थ मराठा तितुका मेळवावाचा अर्थ भारती तितुका मेळवावा असा करावा. एवढेंच नव्हे तर मानवमात्र मेळवावा असा करावा. रामदासांच्या मनांत हाच अर्थ पण त्या काळाची जरूरी आणि आवश्यक मर्यादा ओळखून त्यानीं ही भाषा घातली. आज जग जवळ आले आहे, एकत्र आलें आहे. प्रचारांची आजचीं साधनें तेव्हां नव्हती. रामदासांना जितके फिरायला तेव्हां बारा वर्षे लागली तितकी सहा महिन्यांत फिरण्याइतकी जलद साधनें आतां आहेत. जग लहान बनले आहे. अर्थ व्यापक आणि मोठा आतां केला पाहिजे.

## आईची गोष्ट

आपण आजच्या काळांत जर हरिजनांना दूर ठेवलें तर ईश्वराला काय वाटेल ? एका आईला पांच मुलें होतीं. त्यातलें एक मूल हरवलें. तिचें सरें लक्ष त्या हरवलेल्या मुलावर होतें. बाकीचीं चार मुलें तिला प्यारीं होतींच पण त्या हरवलेल्या मुलावर तिचें सारें लक्ष केंद्रित झालेलें पाहिलें तेव्हां शेजारी म्हणाले " हीं चार मुलें जवळ आहेत त्यांची चिंता नाहीं आणि एक हरवलें तर त्याची एवढी चिंता ! " ईश्वरालाहि ज्याला दूर टाकलें त्याचीच चिंता अधिक असेल. गांधीजींनीं यासाठीं हरिजन शब्द काढला. हरिजन म्हणजे परमेश्वराचे प्यारे. हरिजन हा शब्द देऊन गांधीजींनीं प्रेमाचा धडा शिकवला. हरिजनांची सेवा केली पाहिजे, हरिजन बनले पाहिजे. हरिजन न झालों तर असुरजन होऊं.

## भेद अहंकार नकोत

एक स्वामी परमेश्वर बाकी सारे सेवक हेंच नातें. कोणी विद्वान नाहीं, कोणी अविद्वान नाहीं. कोणी मोठा नाहीं कोणी छोटा नाहीं. कारण तो देव केवढा मोठा. त्याच्यापुढें आपलें काय ? सूर्यासमोर चांदण्यांचें काय होय ? सूर्याचें तेज सर्वत्र, इतरांचें तेज त्याच्या तेजांत विलीन होतें. परमेश्वराच्या सान्निध्यांत सारे भेद आणि अहंकार नष्ट झाले पाहिजेत. नाहींतर कसलें भजन, कसली प्रार्थना ! उपासना म्हणजे जवळ बसणें. जर भेद अहंकार मनांत असले तर जवळ बसलों असें होईल का ? मिठाचा खडा पाण्यांत टाकला तर तो खडा वेगळा राहील का ? मी जर ईश्वरासमोर असतों तर मी-तूंपणा नसता. ईश्वरमय सारे आहोंत असें मानलें तर उपासना. परंतु मंदिरांत कोणी यावें हें ठरविले जाते. हें बुद्धि अहंकारयुक्त असल्याचें लक्षण.

आमचे आजोबा होते. देवघरांत पूजा करीत. तेथें ते कधीं रागावत नसत. एकदां मी त्यांना बिलगलों तर लघुशंका झाली तरी त्यांनीं दूर केलें नाहीं. देवघरांत विंचू आला. विंचू सहज उचलून टाकतां येतो. नांगी धरली तर अति दीन होतो. त्याला आपण राक्षस वाढतों. सोडून दिलें तर उपकार मानीत असेल. हें



माझें मत. आजोबांनीं देवघरांत विंचू मारूं दिला नाहीं. देवमंदिर, प्रार्थना या अशा जागा आहेत कीं इतर ठिकाणीं खपणारे भेद तेथें खपणार नाहींत. याबाबत इस्लामपासून शिकण्यासारखें आहे. ज्याला धर्म शुद्ध करायचा असेल तो जेथून जें मिळेल तें घेतो.

## इस्लामपासून बोध

इस्सामपासून बोध हा कीं प्रार्थनेच्या वेळीं जो ज्या ठिकाणीं आला तो त्या ठिकाणीं बसेल. मुल्ला करतां फक्त खास जागा. औरंगजेब जामा मशिदींत उशीरा आल्यावर मागें बसे. इतरांना तो आल्याचें माहितीहि पडत नसे. ईश्वरासमोर कोणी बादशाहा नाहीं, कोणी गरीब नाहीं. सारे सारखेच. परंतु देवळांतहि आम्ही जागा देतों, गादी देतों. एरव्ही हें शोभेल पण देवळांत, प्रार्थनेंत शोभणार नाहीं हें लक्षांत घेतलें पाहिजे.

हरिजन मंदिर प्रवेश हा कांहींना भ्रष्टाकार वाटतो. परंतु पुढें काय करणार हें समजेल तर ही शुद्धि आहे असें ध्यानांत येईल. मद्रासमध्यें हरिजन मंदिर प्रवेश कायदा झाला. रामेश्वर, मीनाक्षि, श्रीरंगम्, हीं मंदिरें उघडलीं गेलीं. विशालतेंत हीं मंदिरें अद्वितीय आहेत. तींहि उघडलीं. आतां पुढें असा कायदा कीं मंदिरांत बलिदान बंद. राम, कृष्ण, विठोबा यांच्या पुढें बलिदान चालत नाहीं. पण कांहीं देव मांस खातात. कोंबडा, बकरा आवडतो. भक्ताच्या जिभेला गोड लागणारें त्यांना आवडतें. हरिजन मंदिर प्रवेशानंतर बलिदान बंदी, दारू न पिण्याचा कायदा, अशा कायद्यांनीं शुद्धि होत राहील.

भेदभाव सारे काढा. व्यवहार कांहीं भेद टिकवील पण विचारानें भेदभाव टिकवूं नका. विचार अभेदाचाच होऊं दे. देहाच्या मर्यादा आहेत. त्या भेद ठेवतील पण अभेद आचरणांत आणि वातावरणांत वाढवावयाचा प्रयत्न करा ही विनंति."

## तुकडोजींशीं भेट

विनोबाजींच्या प्रार्थना प्रवचनानंतर संत तुकडोजींचीं भजनें झालीं. विनोबाजीहि भजनाला हजर होतेच. सारीं भजनें राष्ट्रीय आणि स्वातंत्र्यानंतरच्या विधायक कार्याला प्रेरणा देणारीं होतीं. रात्रीं तुकडोजींना नांदेडला जावयाचें होतें. जाण्यापूर्वी विनोबाजींच्या तंबूकडे ते आले. सामुदायिक प्रार्थनेबद्दल दोघांचें बोलणें झालें. विनोबाजी म्हणाले, " बापूंशीं पूर्वी या बाबतींत बोलणें झालें आहे. स्थितप्रज्ञाचीं लक्षणें सर्वत्र प्रार्थनेंत असावींत. बाकीचा भाग आपापल्या इच्छेनुसार ठेवावा. "

---

८।४।१९४९ : : :

## साधनशुद्धि

सकाळीं विनोबाजींच्या समवेत फिरावयाला निघालों. जांबजवळ १॥-२ मैलांवर आसनगांव म्हणून एक खेडें आहे. आसनगांवची मुलगी रामदासांना देणार होते. 'सावधान' शब्द ऐकून ज्या बोहल्यावरून समर्थ पळाले ती जागाही लोक दाखवितात. विनोबाजी म्हणाले, " जर यांतून वैराग्याची भावना निर्माण झाली तर पाहून फायदा. नाहींतर नुसते दगड पाहिले असेंच होईल. "

रस्त्यानें जातांना मी विचारलें " साधनशुद्धीची कसोटी काय ? "

" अहंकार रहितता " विनोबाजी म्हणाले.

" पण अहंकारावांचून तर कोणताच पक्ष उभा राहूं शकणार नाहीं. अहंकारावरच तर पक्षाची उभारणी असते " मी म्हणालों.

" होय, त्याला माझ्याजवळ तोड आहे. हिंदची घटना जर योग्य प्रकारें बनविली गेली तर निःपक्ष लोकशाही येथें नांदूं शकेल. आजच्याप्रमाणें निवडणुकीचा तरीका आहे तोपर्यंत पक्षोपपक्षांचें असेंच चालणार. माझी घटना गांवपंचायतीवर आधारलेली आहे.

## अल्पसंख्याकांचे प्रश्न मिटतील

प्रत्येक गांवांत ग्रामपंचायतीसाठीं निवडणुका व्हाव्यांत. निवडणुकानंतर निवडून येणाऱ्या लोकांनीं जे निर्णय घ्यावयाचे ते एकमतानेंच घ्यावेत. चार

विरुद्ध एक, तीन विरुद्ध दोन अशा प्रकारें निर्णय घ्यावयाचे नाहींत. जर ठरविक मुदतींत पंच एकमत करूं शकले नाहींत तर नवे पंच निवडावयाचे. यामुळें 'मायनॉरिटी प्राब्लेम्स' अल्पसंख्याकांचे सर्व प्रश्न मिटतील. तालुका संस्थांच्या निवडणुका गांवोंगांवच्या पंचांनीं, जिल्ह्याच्या तालुक्यांनीं आणि प्रांतांच्या जिल्ह्यांनीं कराव्यात. केंद्रीय निवडणुका प्रांतांनीं कराव्यात. आज परिस्थिति अशी नाहीं. प्रांताच्या आणि केंद्रीय असेंब्लीच्या निवडणुकाहि आज खेडोपाड्यांतून होतात. पक्षोपपक्षांचे लोक त्यांत उभे राहातात. उमेदवारांपैकीं फारच थोड्यांची प्रत्यक्ष माहिती खेडुतांना असते. बाहेरचे लोक येऊन कांहीं तरी सांगतात आणि मग खेडूत कांहीं तरी मतें बनवतात. आजच्या निवडणूक पद्धतीमुळें शहरांचीं भांडणें खेडोपाडीं पसरतील. खेड्यांचे तुकडे पडतील, सर्वत्र अल्पसंख्याकांचे प्रश्न उभे राहातील. या उलट अप्रत्यक्ष पद्धतीनें जर निवडणुका झाल्या तर शहरांतलीं भांडणें खेड्यांत जाणार नाहींत आणि खेड्यांतहि एकमतानें निर्णय घेण्याचें बंधन असल्यानें लोकांची वृत्ति भांडणें मिटवण्याकडेच राहील, जर त्यांना गांवचें खरें हित करण्याची तळमळ असेल तर." मधेंच एकानें प्रश्न विचारला "जर अडवणुकीचें धोरण एकाद्यानें स्वीकारलें तर?" विनोबाजी म्हणाले "जर कांहींच काम होत नसेल तर ते पंच बरखास्त होतील. आणि एकसारख बरखास्त होणें चालू राहाणार नाहीं. कारण आडवणुकीचें धोरण स्वीकारणाऱ्याला लोक निवडून देणार नाहींत. माझा जनतेवर विश्वास असल्यामुळें मी असें म्हणतों. ज्याचा जनतेवर विश्वास नसेल तो ऑटोक्रॅट, हुकूमशाही वृत्तीचा. मी तसा नाहीं. त्यामुळें जनता आपले हितमंगल समजूं शकेल असा मला विश्वास वाटतो."

## साधनशुद्धीची कसोटी

"तुमची घटना ठीक आहे. पण आजच्या घटनेप्रमाणें तर पक्षोपपक्ष राहणारच. मग साधनशुध्दीसाठीं काय कसोटी?" मी विचारलें.

"सत्य सोडूं नये. लोभ किंवा दंडानें कोणतीहि गोष्ट त्यांनीं करवूं नये. ही तात्पुरती आजच्या परिस्थितींतील कसोटी म्हणतां येईल" विनोबाजी म्हणाले.



फिरून परत आल्यावर विनोबाजींना मंदिराच्या विश्वस्तांनीं बोलावलें होतें. विनोबाजी विश्वस्तांपुढें तिकडे गेले. तेथेंहि त्यांनीं आपले विचार विश्वस्तांच्या पुढें मांडले. इतिहास संशोधनावरून चर्चेला सुरवात झाली आणि त्या निमित्तानें त्यांनीं आपले विचार मांडले. ते म्हणाले—"प्रत्येक वस्तूची एक ऐतिहासिक मागणी असते आणि तदनुकूल वागणें व्हावयास पाहिजे. हें वागणें नवीन कल्पनेच्या पायावर उभारलें गेलें पाहिजे. त्यांत जुन्या अडचणींचा अभाव असला पाहिजे. आतां मी बघून आलों कीं बीदर जिल्ह्यांत ख्रिस्ती धर्माचा प्रचार होत आहे. ख्रिस्ती धर्म एक उदार धर्म आहे. रामदासी संप्रदायाप्रमाणें तो एक संप्रदाय आहे. रामदास पंथीयांनीं कबीर पंथाची दीक्षा घेणें जसें निर्दोष आहे तसेंच हिंदूंनीं ख्रिस्ती होणें आहे; ख्रिस्ती होण्यानें जर जीवन सुधारत असेल तर ख्रिस्ती होणें वाईट कांहींच नाहीं. याची एक दुसरी बाजूहि आहे. आम्ही लोकांनीं आमच्या गरीब लोकांची अत्यंत उपेक्षा केली आहे. मी हे शब्द अत्यंत तोलून बोललों आहे. आपण महारोगी सेवेचेंच उदाहरण घेऊं. महारोगी ख्रिस्ती बनतात हा तक्रारीचा विषयच होऊं शकत नाहीं. ते लोक रोग्याचा संबंध स्फूर्तिच्या झऱ्याशीं करून देतात. त्याशिवाय सेवेची स्फूर्तिच असंभव आहे. ख्रिस्ताच्या जीवनांत तशी स्फूर्ति आहे. त्यानें स्वतः सेवा केली आहे. ज्यांची सेवा करावयाची त्यांच्या स्थितीची जास्तींत जास्त अनुभूति पाहिजे. ही सेवेची वृत्ति आमच्या धर्मांत नाहीं हें ओळखलें पाहिजे. ती जेथें आहे तेथून आणली पाहिजे. तेव्हांच "ते पूर्ण आहे" सिद्ध होईल.

## स्वयंभू देवांची पूजा

कांहीं लोकांना वाटतें, कीं टाळमृदुंगानें एकाग्रता व तन्मयता होते. पण सेवेंत तशी होत नाहीं. मूर्तिपूजेचें नाटक उपासनेच्या गरजेंतूनच निघतें पण जी स्वयंभू मूर्ति आहे तिची प्राणप्रतिष्ठा करायला मंत्र लागत नाहींत. अशा मूर्तींची सेवा आपण करीत नाहीं. निझामच्या राज्यांत तीन स्वयंभू महादेव आहेत. पण निझामच्या राज्यांत दीडकोटी स्वयंभू दगड आहेत. त्यांची पूजा आम्हीं करीत नाहीं. युरोपमध्यें स्वयंभू महादेव पुष्कळ असतात पण ते लोक तिकडे लक्ष देत नाहींत. दगडाच्या मूर्तिवर ध्यानाच्या प्रक्रियेची अनुभूति गैर

नाहीं. पण जेथें तहानभूक नाहीं तेथें परमेश्वराचा आरोप करणें कठिण कीं जेथें असा प्रयत्न करावा लागत नाहीं, तेथें तसा आरोप करणें कठिण. गीतेच्या १२ व्या अध्यायांत हा विषय चांगला मांडला आहे. सेव्य रागवूं शकतो पण निर्विकार दगड रागावत नाहीं. आणि असें रागावणें एकतर्फी असल्यानें समजणें शक्य आहे. दोघांच्या रागद्वेषाची टक्कर होते म्हणून दगडाची सेवा सोपी. परंतु अशी सेवा आज परमार्थात मोडूं शकत नाहीं. परमार्थ हा परम पुरुषार्थ मानला आहे. आणि सेवेंत परम पुरुषार्थ करावा लागतो.

## हृदयाचीं कपाटें खोला

आम्हांला मोक्ष गफलतीनें मिळणार असेल तर नको आहे. स्वतःला त्याची अनुभूति पाहिजे. राजवाड्यांच्या स्मारक प्रसंगीं भाषण करतांना मी म्हटलें होतें कीं तुम्ही इतिहासाच्या संशोधनांनीं कितीहि कपाटें भरलीं तरी जोंवर हृदयाचीं कपाटें उघडत नाहींत तोंवर कांहीं उपयोग नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं आमच्या जीवनांत सत्व उरलें नाहीं म्हणून आम्ही सेवा करूं शकत नाहीं.

## पावित्र्य संचारी हवें

परवां मी पैठणला गेलों होतों. एकनाथांच्या त्या गांवाला किती घाण. इतर कोणत्याहि ठिकाणीं जेवढी घाण असूं शकते तेवढी घाण तेथें होती. आम्ही आमचें राष्ट्र इतकें अस्वच्छ ठेवूं शकतों याचें कारण हेंच आहे कीं आम्ही सेवा केलेली नाहीं. पावित्र्य मंगल तर खरेंच पण जें पावित्र्य आसपासची घाण दूर करूं शकत नाहीं तें खरें पावित्र्यच नाहीं, त्यांत संचारी शक्ति नाहीं.

## मंदिरांत सेवाकार्य हवें

येथें रामदासांचें सुंदर मंदिर बांधलें आहे. दक्षिणेंतहि मंदिरें बांधण्याची पद्धत आहे. अफाट खर्च ते लोक मंदिरावर करतात. बांधकाम अनेक वर्षें चालू असतें. अपूर्व कामगिरीच असते ती. इमारतीच्या त्या वाढत्या शिखरांच्या वाढत्या कळसाबरोबर संस्थेचें वाढतें वैभव प्रकट होत असतें शिवाजीनेंहि अशाच प्रकारें प्रतापगडचें वैभव वाढविलें. रायगडचें वाढविलें नाहीं. भक्तीचें वळणच



असें असतें. मग परमेश्वराच्या चरणीं अर्पण करून फुलांचें कौतुक करण्याची दृष्टि आपोआपच लाभते. आजच्या काळांत आपण त्या जुन्या मंदिराची बरोबरी करणारीं मंदिरें प्रत्येक ठिकाणीं बांधू शकूं असें नाहीं. म्हणून मंदिर या संस्थेंत कोणत्याना कोणत्या सेवाकार्याचें अखंड दर्शन घडलें पाहिजे. दवाखाना, सफाई, शिक्षण इत्यादि कार्य मंदिरामार्फत सहज चांगलें घडवून आणतां येईल.

एक गोष्ट आणखी लक्षांत ठेवायची ती अशी की जुनें तेवढें सर्वच फार मोठें मानणें योग्य नाहीं. त्यांत तारतम्याची हानी होते. नाथांनीं भागवतासारख्या ग्रंथाचें संशोधन केलें तें ठीकच आहे. पण कांहीं वस्तू तर केवळ संग्रहात्मकच असतात.

एका गृहस्थानें दासबोध छापला. त्यांत लहानमोठ्या दोन्ही टाइपांत ओव्या दिल्या आहेत. कारण काय विचारतां म्हणाला " बारीकटाईपामुळें मोठ्या टाइपांतले व मोठ्या टाइपामुळें लहान टाइपाचें महत्त्व पावतें. " हें अकलेचें प्रदर्शन आहे. मी याला विवेकहीन मूर्तिपूजा म्हणतो.

## संत वाङ्मयविषयक दृष्टि

रामदासी साहित्यांत अमूक एक तेवढें चांगलें आहे असें आपल्याला पटकन् ओळखतां आले पाहिजे. सर्वच ओव्या नारायणाच्या लायकीच्या म्हणणें म्हणजे टका शेर भाजी आणि टका शेर खाज्या म्हणण्यासारखें आहे. म्हणून संतवाङ्मयाविषयीं दृष्टि चतुर्विध हवी. संग्रहात्मक, संशोधनात्मक, परिक्षणात्मक आणि लोकोपयोगी. लोकांतर्फे मी असें आश्वासन देऊं इच्छितों कीं जनता लोकोपयोगी वाङ्मयाचा स्वीकार केल्याशिवाय राहणार नाहीं.

लोक म्हणतात समर्थांचा आत्मा दासबोध आहे. मी म्हणतो दासबोध फक्त विस्तार आहे. समर्थांच्या शिकवणीचें सार, त्यांचें हृदय, त्यांचें सर्व मर्म श्लोकांत उतरलें आहे. गंगेच्या ओघाप्रमाणें सतत वाहणारा प्रवाह मनाच्या श्लोकांत आहे. त्यांत सदा ताजेपणाचा अनुभव येतो. समर्थांचें तें अंतिम काव्य आहे अशी समजूत आहे. त्यांत त्यांची अनुभूति प्रगट होते. म्हणूनच " बहुत दिसां आपुली भेट झाली " असे उद्गार त्यांच्या मुखांतून निघाले आहेत. त्याच प्रमाणें ' अकलेचा पवाड ' घालण्याविषयीं आणि कांहींतरी आपला मगज राख-

ण्याविषयीं समर्थांनीं स्वतः सुचविलें आहे. याप्रमाणें सेवेची गरज, आणि संशोधनाचें तारतम्य ह्या दोन गोष्टींकडे लक्ष ठेऊन या ठिकाणीं समर्थांची सेवा चालविली जाईल अशी मी आशा करतों."

दुपारीं १ वाजतां परतूडकडे निघायेंच ठरलें होतें. परंतु गाड्यावैलांची जमवाजमव करतां करतां ३ वाजले निघायला विनोबाजींचा टांगा पुढें निघून गेला. मोटार वाहतूक करण्याइतका रस्ता चांगला नसल्यानें टांगे, बैलगाड्यांचाच आश्रय घेणें भाग होतें. रस्त्यानें जातांना विविध विषयांवर गप्पा होत होत्या. विनोबाजींच्या सेक्रेटरींचे, दामोदरदास मुंदडा आणि दत्तोबा दास्तानें यांचे अनुभव ऐकत होतो. परंतु एवढ्यांत एक विघ्न आले. एका गाडीच्या चाकाची खिळ निघाली, चाक बाहेर पडले. इजा कोणालाच झाली नाहीं. संध्याकाळ झाली होती. पायीं चालण्यांतहि मजा वाटेल म्हणून गाडी खाली उतरून आम्ही कांहीं लोक पायीं चालू लागलों. अच्युत देशपांडे बरोबर होते. चालतां चालतां सबंध हैद्राबाद लढा आणि सध्यांचे तेथले राजकारण एका दृष्टीकोनांतून ऐकायला मिळाले. हैद्राबादच्या राजकारणांतले प्रवाह समजले.

परतूडला पोचतां पोचतां अंधार पडला होता. प्रार्थना होऊन गेली होती. विनोबाजी नास्ता घेत होते. आमचीहि जेवणासाठी लोक वाटच पहात होते आतां उद्यांच्या दिवस विनोबाजींच्या सहवासांत रहायचे. पण ती फक्त सहयात्रा होणार. चर्चा, गोष्टी सारे बंद. हे तीन आठवडे किती पटकन् निघून गेले. ज्ञानाचा आनंद हे तीन आठवडे विपुल मिळत होता. कॉलेजांत चार वर्षें मी काढली परंतु विविध विषयावरचे इतके मौलीक विचार जे ह्या तीन आठवड्यांत मिळाले ते मिळूं शकले नव्हते. साधना साप्ताहिकाला माझ्या ह्या प्रवासाचा किती उपयोग होईल कोणाला ठाऊक ? परंतु मला व्यक्तिगत मात्र खूप उपयोग झाला हें निश्चित. सत्संगाचा लाभ समजला. पूर्वीचे संत परमेश्वराजवळ इतर कांहीं मागण्याऐवजी संतसंगच का मागत ते समजले.

आतां पहाटेच्या गाडीनें येथून निघूं. मनमाडवरून मुंबईला जाणार. गुरुजींनीं विनोबाजीना भेटावे म्हणून पत्र टाकलेच आहे. पहावें काय काय होतें तें ?

---